म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3923

REFBK-0024726

62143

संदर्भ निबंध
३१२३
२७८२६
३०।१०।८५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 DEC 1985
29 DEC 1985
15 JAN 1986
19 FEB 1986
9 MAR 1986
0 APR 1986
20 AUG 1986
28 SEP 1986
1 OCT 1989
15 OCT 1989
1 NOV 1989
4 MAY 1991

(क्रु. मा. पहा)
५०००-३-८४

# निरंकुशाची रोजनिशी

.... सुधीर मोघे ....

REFBK-0024726

आशय प्रकाशन

सुधीर मोघे / ऑगस्ट १९८५

□

प्रकाशक : सौ. शुभदा सुधीर मोघे
आशय प्रकाशन
१०२ – १०३ / ७, बापूजी कृपा,
भोंडे कॉलनी, एरंडवन,
पुणे ४११ ००४

□

मुद्रक : दिलीप माजगावकर
साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव
पुणे ४११ ०३०

□

मुखपृष्ठ : वासंती मुझुमदार

□

मांडणी : अजित सोमण

□

© सौ. शुभदा मोघे

□

विक्रीव्यवस्था : राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०
फोन : ४४ ३४ ५९

□

मूल्य : रु. चाळीस □ □ □ □

□

कै. पी. आर. शिंदे

ऊर्फ 'सरकारां' च्या

स्मृतीला

□

## अनुक्रम

देवाय नमः / १ : जन्मस्थान / ५ : सरकार / १० :
रेषांच्या जगात / १४ : पुतळ्यांची गोष्ट – कालची / १८ :
पुतळ्यांची गोष्ट–'आज'ची ( नेहमीची ? ) / २२ : घायाळ योद्धा / २५
कवि हृदयातला ताज / २९ : बंबई मेरी जान / ३४ : सत्त्व / ३९
मुनीर हुसेन / ४४ : एक आषाढ – शब्दांचा ! / ४९ : मुशायरा / ५४
स्वतंत्रते भगवती / ५९ : टिळक आणि आगरकर / ६४ :
दुसरं घर / ६९ : 'वराती'चे दिवस / ७४ : संस्था / ७९ :
उंबरठ्यावरचा / ८५ : मुहूर्ताचं गाणं / ९० : जुना मित्र / ९५ :
शंकरभाऊ / १०० : सुहृद / १०५ : अ-स्मिता / ११० : लय / ११५ :
अजोड / १२१ : 'कवितेतला' कवी / १२६ : सल / १३० :
'पटकथे'ची कथा / १३६ : एक डोळस अनुभव / १४० :
हकिकत / १४४ : सती / १४९ : बेघर / १५४ । कविमित्रा / १५९
मध्यन्तर / १६३

□□

3923
निबंध २४७२६
30/10/85
शाखा (स्थळ प्रत)

एक गोष्ट खरी;

श्रेयातला सिंहाचा वाटा आपण घेत असलो तरी आपण एकटे काहीच करू शकत नाही. अनेक समानधर्मियांचं आणि मित्रांचं ऋण एकवटतं तेव्हांच छोट्यामोठ्या गोष्टी उभ्या राहातात. " निरंकुशाची रोजनिशी " ह्याला अपवाद नाही. पहिलं ऋण मानायला हवं " तरुण भारत " च्या " मध्यंतर " पुरवणीचं; " तरुण भारत " चे भूतपूर्व संपादक श्री. वि. ना. देवधरांचं, आणि त्यांचे सहकारी श्री. विजय सबनीस आणि श्रीकांत कुलकर्णी ह्या दोघांचं ! ह्या मंडळीनीच कविता-गाण्यांत गुंतलेल्या मला गद्य ललित लेखनाकडे वळवलं. साप्ताहिक सदर चालवणं ही सोपी गोष्ट नव्हे. त्यामुळं हे आपल्याकडून कसं काय पार पडणार ह्या विषयी मी स्वतःसुद्धा साशंक होतो. पण लिहायला सुरुवात केली आणि साऱ्या शंकाकुशंकांचं धुकं पार निवळलं.

जगताना नव्हते
लिहिण्याचे मज भान
जगण्यात गुंतले होते
पुरते प्राण
थांबलो जरासा – जरा उतरला कैफ
अन् सुटे मनाचा
गहिरा अनवट गोफ...

–अशीच प्रत्यक्षात अवस्था झाली. स्वतःला उपसत जाण्याचा हा अनुभव नवा आणि अनोखा होता. शिवाय जोडीला अनेक ज्ञात–अज्ञात वाचकांकडून मिळणारी " दाद " हे टॉनिक होतंच. एकूण काय – " मझा " आला.

आज " निरंकुशाची रोजनिशी " पुस्तक रूपांत साकार होते आहे तीही दोस्तमंडळींच्या सहकार्यातूनच !

## अनुक्रम

देवाय नमः / १ : जन्मस्थान / ५ : सरकार / १० :
रेषांच्या जगात / १४ : पुतळ्यांची गोष्ट – कालची / १८ :
पुतळ्यांची गोष्ट–'आज'ची ( नेहमीची ? ) / २२ : घायाळ योद्धा / २५
कवि हृदयातला ताज / २९ : बंबई मेरी जान / ३४ : सत्त्व / ३९
मुनीर हुसेन / ४४ : एक आषाढ – शब्दांचा ! / ४९ : मुशायरा / ५४
स्वतंत्रते भगवती / ५९ : टिळक आणि आगरकर / ६४ :
दुसरं घर / ६९ : 'वराती'चे दिवस / ७४ : संस्था / ७९ :
उंबरठ्यावरचा / ८५ : मुहूर्ताचं गाणं / ९० : जुना मित्र / ९५ :
शंकरभाऊ / १०० : सुहृद / १०५ : अ-स्मिता / ११० : लय / ११५ :
अजोड / १२१ : 'कवितेतला' कवी / १२६ : सल / १३० :
'पटकथे'ची कथा / १३६ : एक डोळस अनुभव / १४० :
हकिकत / १४४ : सती / १४९ : बेघर / १५४ । कविमित्रा / १५९
मध्यन्तर / १६३

□□

3923
२४८२६
निबंध
30/10/85

एक गोष्ट खरी;

श्रेयातला सिंहाचा वाटा आपण घेत असलो तरी आपण एकटे काहीच करू शकत नाही. अनेक समानधर्मियांचं आणि मित्रांचं ऋण एकवटतं तेव्हांच छोटयामोठया गोष्टी उभ्या राहातात. " निरंकुशाची रोजनिशी " ह्याला अपवाद नाही. पहिलं ऋण मानायला हवं " तरुण भारत " च्या " मध्यंतर " पुरवणीचं; " तरुण भारत " चे भूतपूर्व संपादक श्री. वि. ना. देवधरांचं, आणि त्यांचे सहकारी श्री. विजय सबनीस आणि श्रीकांत कुलकर्णी ह्या दोघांचं ! ह्या मंडळीनीच कविता-गाण्यांत गुंतलेल्या मला गद्य ललित लेखनाकडे वळवलं. साप्ताहिक सदर चालवणं ही सोपी गोष्ट नव्हे. त्यामुळं हे आपल्याकडून कसं काय पार पडणार ह्या विषयी मी स्वतःसुद्धा साशंक होतो. पण लिहायला सुरुवात केली आणि साऱ्या शंकाकुशंकांचं धुकं पार निवळलं.

जगताना नव्हते
लिहिण्याचे मज भान
जगण्यात गुंतले होते
पुरते प्राण
थांबलो जरासा – जरा उतरला कैफ
अन् सुटे मनाचा
गहिरा अनवट गोफ...

–अशीच प्रत्यक्षात अवस्था झाली. स्वतःला उपसत जाण्याचा हा अनुभव नवा आणि अनोखा होता. शिवाय जोडीला अनेक ज्ञात–अज्ञात वाचकांकडून मिळणारी " दाद " हे टॉनिक होतंच. एकूण काय – " मझा " आला.

आज " निरंकुशाची रोजनिशी " पुस्तक रूपांत साकार होते आहे तीही दोस्तमंडळींच्या सहकार्यातूनच !

प्रमोद अनगळनं सहकार्याचा सक्रिय हात पुढं केला म्हणून मूळात हा संकल्प उभा राहिला.

दिलीप माजगावकरनं आपुलकीनं आणि साक्षेपानं पुस्तकाच्या निर्मितीत लक्ष घातलं.

वासंती मुझुमदारांनीही तितक्याच आपुलकीनं; पुस्तकाचं व्यक्तिमत्त्व बोलकं होईल असं सुरेख मुखपृष्ठ करून दिलं. आणि अजित सोमणनं नेहमीप्रमाणं साऱ्याच आघाड्या एकाच वेळी कौशल्यानं सांभाळल्या.

माझ्या डोक्यावरचं हे मैत्रीचं ऋण दिवसेदिवस वाढतच जाईल आणि पुस्तकावरचं " ऋण " मात्र मराठी रसिकतेच्या आशीर्वादानं झपाट्यानं हलकं होईल अशी उमेद इथं व्यक्त करतो आणि ह्या छोट्याशा यज्ञाचं पहिलं अर्घ्य ओंजळीत घेतो.

" ॐ देवाय नमः "

॥ निरंकुशाची रोजनिशी ॥ एक ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3923
निबंध क्र. २८७२६
३०।१०।८५
शाखा (स्थळ प्रत)

## ॥ देवाय नमः ॥

कुठल्याही जातिवंत परफॉर्मरप्रमाणंच मलाही लहानपणी भोवताली कोंडाळं जमा करून गोष्टी सांगणं हा छंद होता. गोष्ट 'रचणं' ही गोष्ट तेव्हापासून आजतागायत जमलेली नाही, पण आयत्या पिठावर रेघोटचा माराव्या तशा गोष्टी रंगवून सांगण्यात अस्मादिकांचा हातखंडा! सुदैवानं तो भाबडेपणा बराच लौकर संपला. गोष्ट सांगणं हा प्रकार प्रसंगी किती 'पीळ' दार होऊ शकतो ह्याचे अनेक दाहक अनुभव पुढं घ्यावे लागल्यामुळं असेल– पण तो पीळ वळणं मी सोडून दिलं. असं असूनही, मध्यन्तरी एक चित्रपट पाहिला आणि माझ्या खोल मनातला तो वेडा कथेकरी इतक्या वर्षांनी ताडकन् उसळी मारून बाहेर पडला. भेटेल त्या माणसाला मी त्या चित्रपटाविषयी सांगत राहिलो आणि पुढंही सांगत राहीन. संतकवींच्या अंतःकरणातल्या देवाइतका निर्मळ, पारदर्शी असा तो चित्रपट म्हणजे– 'ओ गॉड!' (Oh! God)

मूळ रंगभूमीवरच्या जॉर्ज बर्नस् ह्या नावाच्या सुमारे ऐंशी वर्षांच्या उबदार आवाजाच्या नटानं ह्यातली 'देवा'ची मध्यवर्ती भूमिका केली हा एक तपशील पुरे! कारण चित्रपट पहाताना रुपेरी पडद्याची चौकटसुद्धा जिथं विरघळून जाते तिथं बाकीच्या तपशिलाला अर्थ काय? मुंबईत काही आठवडे आणि पुण्यात तर मोजून चार दिवस हा 'ओ गॉड' देवासारखा मुकाट नांदला आणि निमूट निघून गेला. तेव्हा मनात आलं, एरवी 'देव देव' करणाऱ्या ह्या दुनियेत खऱ्या-खुऱ्या देवाचं मात्र काही 'खरं' नाही. गंमत म्हणजे त्या चित्रपटाचाही विषय हाच आहे.

ह्या चित्रपटाचा एक नायक आहे साक्षात 'देव' आणि दुसरा नायक 'तो'! ह्या 'तो' ला नाव आहे, पण त्याला महत्त्व नाही. कारण हा 'तो' म्हणजे तुम्हीच किंवा मीदेखील! एका डिपार्टमेंटल स्टोअरमधल्या एका विभागाचा कर्मचारी! सुखाची नोकरी, सुबक बायको आणि दोन सुरेख मुलं अशा चौकटीत निवांत जगणारा. तसा अश्राप, निर्मळ मनाचा; पण देवाबिवाच्या वाटेला न जाणारा किंवा खरं म्हणजे देवाविषयी माफक अविश्वासच बाळगणारा!

एका सकाळी त्याच्या हाती एक छापील पत्र पडतं. 'अमुक इमारतीच्या १३ व्या मजल्यावरच्या २४ नंबरच्या खोलीत मला भेट. महत्त्वाचं काम आहे.' आणि खाली चक्क सही असते, 'गॉड!' कुणी तरी केलेला चावटपणा असावा म्हणून तो ते पत्र चुरगाळून फेकून देतो. तर उसळी घेणाऱ्या रबरी चेंडूसारखं तेच पत्र पुन्हा पुन्हा त्याला भेटत राहतं. कळस म्हणजे दुकानात कोबीची सडलेली पानं काढून टाकताना गाभ्याशी त्या पत्राचा बोळा (त्यानंच केलेला) मिळतो. शेवटी, सोक्ष-मोक्ष लावायचा म्हणून हा त्या इमारतीत हजर होतो. १३ व्या मजल्या-वरच्या २४ नंबरच्या आकाशी निळसर रंगाच्या त्या धूसर खोलीत एक उबदार स्वर त्याचं स्वागत करतो, 'आलास? ये, ये!' ह्याची धांदल— दिसत कुणीच नाही आणि नुसताच आवाज? हा काय फाजीलपणा! तो खाली येऊन तावातावानं चौकशी करतो तेव्हा रिसेप्शनिस्ट गोंधळून सांगते, 'पण आमच्या हॉटेलला १३ वा मजलाच नाही.'

दुसऱ्या दिवशी हा घरी एकटाच मस्त शॉवर घेत उभा! एक-दम लक्षात येतं नेहमीप्रमाणं आपण टॉवेल विसरलो आणि घरात कुणीच नाही. तेवढ्यात, त्याच्या अंगावर टॉवेल फेकला जातो. हा त्या दिशेनं पहातो तर समोर ८० वर्षांपुढचा एक चुणचुणीत बुढ्ढा उभा! ढगळ पँट, चौकड्याचा शर्ट, जाकिट, डोक्यावर बसकी 'गोल्फ कॅप' आणि चष्म्याआड लुकलुकणारे विलक्षण शब्दातीत डोळे!— तो बुढ्ढा हसून म्हणतो, 'गोंधळू नकोस. मीच तो — गॉड!' — आणि ह्यानंतर तान्हं पोर आईला ओळखायला लागतं तशी ह्याला देवाची हलके हलके ओळख पटत जाते.

त्या दोघांचे सारे संवाद म्हणजे जणू छोटया कविताच ! हा विचारतो, ‘ तू ‘ असा ’ कसा ?’

देव हसून विचारतो, ‘ मग मी ‘ कसा ’ असणार ? आणि माणसाला भेटताना माणूस व्हायला नको ?’

देवाचं त्याच्याकडचं ते ‘ महत्त्वाचं ’ काम तसं फार साधं– त्यानं फक्त सर्वांना सांगायचं की ‘ मंडळी हो, देव आहे.’ मग ह्याची शंका–‘ पण मीच का सांगायचं ? ’ उत्तरादाखल देवाचा पुन्हा प्रश्नच– ‘ तू का नको ?’

‘ पण मी कुठल्या चर्चचा, पंथाचा नाही.’

देव निरागसपणे सांगतो–‘ मी सुद्धा नाही.’

आणि ह्यानंतर देवाचा तो संदेश हे उसनं काम उरतच नाही. ती त्याच्या आतली ऊर्मी बनते. तो तळमळून जगाला सांगत राहतो, ‘ अहो खरंच देव आहे. त्यानंच मला हे सांगितलं.’

कुणाला तो माथेफिरू वाटतो. बायकोला वाटतं, कामाच्या ताणामुळं त्याचा तोल चाललाय्. पोरांना तर बापाबद्दल चक्क सहानुभूती वगैरे वाटते. वृत्तपत्रं, दूरदर्शन सगळीकडं एकच धमाका उठतो. देवाचा एकमेव ‘ अधिकृत ’ ( ? ) प्रतिनिधी असलेला एक धर्मोपदेशक तर त्याच्यावर खटलाच घालतो, लोकांच्या फसवणुकीचा ! हा बिचारा कोर्टात तेच सांगतो, ‘ देव मला भेटतो–माझा एकमेव साक्षीदार तोच ! ’

‘ मग आता काय देवाला कोर्टात बोलवायचं ?’ ह्या उपरोधिक प्रश्नाला गंभीर स्वरात उत्तर येतं– ‘बोलवायची गरज नाही मी आहेच.’ आणि चक्क भर कोर्टात सर्वांसमोर तो ‘ परमपुरातन बुढ्ढा ’ हजर होतो आणि पिंजऱ्यात उभा राहून रिवाजानुसार ‘ माझ्याशपथ खरं सांगेन, खोटं सांगणार नाही.’ असं म्हणून स्वतःच्या अस्तित्वाचा निर्वाळा देतो– सगळ्यांची अवस्था तुमच्याआमच्यासारखी. धड ना स्वीकार, ना नकार ! पूर्ण विश्वास नाही आणि पूर्ण अविश्वासही नाही. शेवटी देव विषादानं म्हणतो, ‘ काय गंमत आहे ! चार भुताखेताचे सिनेमे आले आणि तुम्हाला सैतान पटला पण देव ‘ खरा ’ वाटत नाही ?’

अखेर जसा आला तसा देव अंतर्धान पावतो. कोर्टात एकच खळबळ ! एकच चांगलं निष्पन्न होतं, 'संशयाला जागा' म्हणून 'तो' निर्दोष सुटतो.

शेवटच्या प्रत्यक्ष भेटीत तो देवाला कळवळून विचारतो, 'देवा, ह्या सगळ्या खटाटोपात काय साधलं ?' देव हसून म्हणतो 'वेडचा, अरे 'तू' मिळालास. हे बघ, कोटचावधी बियाणं मी जगात विखरून टाकतो. त्यातली थोडीच अंकुरतात. थोडचांची रोपटी होतात आणि एखादाच वृक्ष होतो; पण मी पेरीत रहातो.' निरोप घेताना देव अपार मायेनं त्याच्या गालावर हळूवार थोपटतो.

तुम्हाला खरंच सांगतो— त्याक्षणी असं वाटतं की पडद्याबाहेर येऊन त्या हातानं आपल्यालाच थोपटलं. तो एकाच वेळी ऊब आणि थंडावा देणारा 'ईश्वरी स्पर्श' आपल्या गालाला झालाय. सगळं काहूर निवतं. नामदेव, जनी, दामाजी ह्यांच्या भाकड वाटणाऱ्या कथांमागचा खोल आंतरिक अर्थ जाणवतो. जाणवतं, की रोजच्या धकाधकीत खरंच तो आपल्याबरोबर असतो. सुखदुःखाच्या प्रत्येक घोटाच्या तळाशी तोच दिसतो. धावत्या बसमध्ये चढताना आपला गेलेला तोल आपसूक तोच सावरतो आणि सिद्धिविनायकासमोरची लांबलचक मूढ रांग पाहून आपली नजर हतबुद्ध होऊन आत वळते तेव्हा जवळच्या सीटवर खटचाळ हसत तोच बसलेला असतो आणि आपल्याला हलकेच डोळा घालतो.

❊ ❊

## ॥ जन्मस्थान ॥

'जागृत देवस्थान' हा शब्दप्रयोग आपल्याकडं (अवज्ञा होण्या-इतपत) अतिपरिचयाचा आहे. मुळात देवस्थानाशीच फारसं सख्य नसल्यामुळं ते जागृत आहे की निद्रिस्त ह्याची पंचाईत मी कधीच केली नाही. जागृत 'जन्मस्थान' ही चीज मात्र माझ्या आयुष्याच्या अगदी सलामीलाच मला भेटली. कारण माझा मुळी जन्मच तिथं झाला (त्यामुळं ते स्थान 'जागृत' झालं असं मात्र नाही.) त्या ठिकाणाचं लौकिक नाव 'किर्लोस्करवाडी' असलं तरी आम्हाला 'घरच्या' माणसांच्या भाषेत मात्र ती नुसतीच 'वाडी !'– ह्या दोन अक्षरांमध्ये आमचं सारं बालपण आणि त्याबरोबरचे लाखो संदर्भ ढगातल्या आटोकाट पाण्यासारखे टिच्चून भरले आहेत.

मुळात हिंदुस्थानच्या अवाढव्य नकाशावरचं 'औंध' नावाचं टिचभर संस्थान हीच मुळी एक 'जागृत भूमी' होती. अर्थात् ही सारी जागृती होती ती औंधच्या भवानराव पंत प्रतिनिधींमुळं ! 'औंधचा राजा' अशा शीर्षकानं ह्या 'राजा'– 'माणसा'चं एक सुरेख व्यक्ति-चित्र कै. ग. दि. माडगूळकरांनी रेखाटून ठेवलंय.

स्वत:च्या संस्थानाला 'जगदंबेची परडी' मानणाऱ्या ह्या श्रद्धा-वान पुरुषाला समाज-जीवनाच्या नाना अंगांचं भान होतं. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच, आपल्या संस्थानात लोकराज्य पद्धतीवर निवडणुका घेण्याइतका तो 'उद्या'चा होता. भविष्याच्या पोटी दडलेल्या औद्योगिक क्रांतीची चाहूलही त्यानं पुसटशी ऐकली असणारच. त्यामुळंच, लक्ष्मणराव किर्लोस्कर नावाच्या धडपड्या हुन्नरी यंत्रज्ञाच्या

स्वाधीन त्यानं आपल्या हद्दीतला एक माळ केला. त्या प्रतिभावंतानंही तिथं उभी केली, एक नीटनेटकी, आटोपशीर, सुसंस्कृत वस्ती.' त्यानं नुसती 'औद्योगिक वसाहत' स्थापली नाही, एक जिवंत गाव उभा केला–तेच माझं जन्मस्थान !

वाडी सोडल्याला मला १४ वर्षं झाली. आता ती खूप बदलली म्हणतात; पण माझ्या डोळ्यांसमोर आहे ते मात्र तेच जुनं रूप, बालपणी पाहिलेलं ! मोजकी तीनशे साडेतीनशे घरांची वस्ती. टुमदार छोटीशी घरं, सुरेख अंगणं–घरांची मांडणी इतकी सरळ रेषेत की गावाच्या टोकाला उभं राहिलं तर गावाचं दुसरं टोक व्यवस्थित दिसावं. भरपूर झाडी–तीही अशी मजेदार की गावात वावरताना जाणवणार नाही. पण थोडाही 'टॉप अँगल' लावला की लक्षात येईल की सगळा गाव बहुतेक झाडीखालीच लपलाय. स्वच्छ, रेखीव रस्ते; मधोमध शाळेची एकसंध इमारत आणि पुढं, पुण्यामुंबईच्या पोरांनी जळावं असं प्रशस्त, स्वयंभू मैदान ! बाजूला व्यायामशाळा, तिला लागून हनुमानाचं गाभाऱ्यासारखं आटोपशीर मंदीर. आतला शुभ्र संगमरवराचा बलदण्ड कोरीव हनुमान, औंधाच्या कुणा शिल्पकारानं घडवलेला !– आधुनिकता व टापटीप पाहिली तर छोटेखानी शहर आणि निसर्गसान्निध्य आणि निवांतपणा ह्या बाबतीत निर्मळ खेडं !

तेव्हा लक्षात आलं नाही, पण आज कळतं–ह्या एवढ्याश्या गावानं आपल्याला खूप दिलं. आणि तेही दानाचा बडेजाव न मिरवता! कुठल्याही कलेचं किंवा तंत्राचं पद्धतशीर शिक्षण घेण्याची सोय तिथं नव्हती. पण तरीही, उघड्या जगाच्या बेमुर्वतखोर धकाधकीत उतरताना कुठंही कमी पडू नये अशी संस्कारांची पुण्याईही ह्याच गावानं पाठीशी उभी केली. मालतीबाई बेडेकरांच्या शब्दात सांगायचं तर किर्लोस्करवाडीच्या हवेतच ह्या साऱ्या गोष्टींचे 'जंतू' होते. आपण फक्त झकास श्वासोच्छ्वास करायचा. कारखान्याच्या लोखंडी सान्निध्यात तर आम्ही वाढलोच. पण बाहेरचे स्वच्छ वारेही, किर्लोस्कर मासिकं आणि 'शंवाकि' ह्यांच्यामुळं आमच्या छाताडात पेरले गेले.

वाडीमध्ये ' मालक ' संस्कृती होती. पण त्यामागं अभिप्रेत असलेली दुर्गंधी नव्हती. इतक्या वर्षांपूर्वी तिथं जातिनिरपेक्ष सहजीवन होतं. स्त्री–पुरुषांना समान पातळीवर वावरण्याची संधी होती. नव्या प्रथा उभारण्याची उमेद होती आणि जुन्या प्रथांमध्ये नवे अर्थ शोधण्याची क्षमता होती. कै. ना. धों. ताम्हनकरांच्या दाजी धडपडे ह्या अफलातून व्यक्तिरेखेमागं–त्यांच्या प्रतिभेइतकाच वाडीच्या वातावरणाचाही वाटा मानावा लागेल. किर्लोस्कर मासिकांच्या वाढदिवसांचे किंवा विशेषांकांचे सोहाळे म्हणजे छोटेखानी साहित्यसंमेलनंच असायची; फक्त अव्यवस्था आणि कोरडेपणा हे साहित्यसंमेलनाचे अपरिहार्य घटक नसलेली !

ना. सी. फडक्यांची आखीवरेखीव भाषणं तिथंच ऐकली. ' महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व ' वगैरे होण्यापूर्वीचे ताजे, सच्चे पु. ल. देशपांडे प्रथम तिथंच पाहिले. गिरीश, यशवंत, संजीवनी, वसंत बापट आदींची काव्यगायनं ऐकली. अमरशेखांचा पहाडी स्वर कानात साठवला. ' बिनबियांचं झाड ' मध्ये उदयोन्मुख निळू फुले पाहिला. आकाशवाणी वाद्यवृंदात क्लॅरिओनेट वाजवणारे राम कदम पाहिले. सुरेश हळदणकरांच्या बैठकीत तंबोऱ्यावरचा पोरसवदा प्रभाकर कारेकर हेरला. विजय मर्चंटला भेटलो. नंदू नाटेकरचा उभारीतला खेळ पाहिला.

इथंच माझ्या वडिलांची ऐन उमेदीतली बहारदार कीर्तनं ऐकली; नाटकं पाहिली. इथंच दादानं–मोघ्यांच्या श्रीकांतनं–वयाच्या ७ व्या वर्षी पोवाडा म्हणण्यासाठी रंगभूमीवर पहिलं पाऊल ठेवलं. बहिणीनं वडिलांचा वारसा उचलून नेटकी कीर्तनं केली. आणि इथंच–वक्तृत्व, नाट्य, संगीत आणि काव्य यांचे प्राथमिक धडे वडलांच्या सहवासात मीही गिरवले.

–पण म्हणून काही ते पृथ्वीतलावरचं नंदनवन नव्हतं. मनुष्यवस्तीला चिकटलेले सारे गुणावगुण कमी अधिक तिथंही होते. सुरक्षितपणाच्या भ्रामक कल्पना होत्या. त्यातून येणारा नाकर्ता आत्मसंतुष्टपणाही होता. आयुष्याचा विचित्र एकेरीपणा हा तर महाभयंकर शाप!

त्यामुळंही असेल, पण वाडीत उभा जन्म काढण्याची नुसती कल्पनाही मला असह्य होती. तरीही काही काळ कॉलेजच्या वयात कारकुनीचं पुण्यसंपादन करीत मी त्या गाळात रुतलोच. पण मनाची सारी ओढ होती, उघड्या जगाकडं ! अखेर तो क्षण आला. समुद्रात उतरायच्या उत्साहात मी मागं वळूनही न पाहता माझा गाव सोडला. जणु दुसरा जन्मच घेतला. नवे संदर्भ जुळत चालले. नवी क्षितिजं उलगडत गेली. पहात।पहाता किती दूर येऊन पोचलो.

पण ह्या तेरा–चौदा वर्षांत अधुनमधुन आणि अलिकडे तर फार तीव्रतेनं वाडीची आठवण व्हायची. मनाशी म्हणायचो, जन्मस्थानाची एखादी ' झुळुक भेट ' घेऊन यायचीच.

–पण इतक्या वर्षात तो योग नाही तर नाहीच जमला. ' मंतरलेल्या चैत्रबनात 'चा कार्यक्रम दोनदा वाडीला ठरता ठरता रद्द झाला आणि अखेर झाला पण तोवर मीच ' चैत्रबन ' सोडलं होतं. माझे बहुतेक सारे मित्र वाडी सोडून कुठं कुठं पांगले. कुणी ज्येष्ठ आप्त एकाएकी दिवंगत झाले. एक–दोन नावं सोडली तर एक एक दुवा तुटतच चालला आणि परवा तर कहरच झाला.

एका दौऱ्यानिमित्त जितेंद्र अभिषेकींबरोबर महालक्ष्मी एक्सप्रेसनं चाललो होतो. पहाटे ४।। च्या सुमाराला; काही क्षण का होईना, पण वाडीचं निदान स्टेशन पहायचं ह्या कल्पनेनं थरारून मी कऱ्हाडपासून गाडीच्या दरवाजात उभा होतो. आणि माझ्या जन्मस्थानानं मला तीन सुरेख फटके लगावले. पहिला – माझ्या वाटेवरच्या खुणा–कुंडलचा रस्ता पूल, ओढा केव्हा गेल्या कळलंच नाही. बहुधा त्या पार बदलल्या असाव्यात. दुसरा – महालक्ष्मी एक्सप्रेस वाडीला थांबलीच नाही. धाड-धाड निघून गेली. तिसरा–स्टेशनच्या ' मेन ' लाईनवर एक लांबलचक मालगाडी सारा प्लॅटफार्म झाकून उभी होती. त्यामुळं, दोन डब्याच्या फटीमधून स्टेशनवरच्या प्रकाशाच्या चार-दोन रेषा डोळ्यापुढं नाचत राहिल्या आणि बघता बघता स्टेशन जाऊन भोवताली काळोख पसरला मागे दूरवर वाडीच्या दिव्यांचे काजवे डोळे मिचकावत होते. मी निमूट जागेवर येऊन बसलो.

एक वेळ अशी होती की, माझ्या गावानं मला जखडून ठेवलं होतं आणि मी त्या ' रेशमी सक्ती 'तून सुटायला धडपडत होतो.

एक वेळ अशीही आहे—मी भेटायला उत्सुक आहे; पण माझा गाव मला ओझरतं दर्शन द्यायलाही राजी नाही.

चालायचंच ! ' जन्मस्थाना 'लाही त्याचे म्हणून काही मान, अपमान असणारच !

॥ निरंकुशाची रोजनिशी ॥ तीन ॥

## ॥ सरकार ॥

'सरकार' हे काही त्यांचं खरं नाव नव्हे. त्यांचं मूळ आडनाव वेगळंच आहे; पण मराठा आडनावांना 'सरकार' ही उपाधी जोडून त्यांना भोसलेसरकार, जाधवसरकार करणं ही खास कोल्हापुरी स्टाईल आहे. तिला अनुसरून सरकारांचं हे नवं 'बारसं' केलं ते मुळात आमच्या दादानं, सुमारे एक तपापूर्वी ! काही दिवसांतच त्यांचं मूळ आडनाव, मालकाच्या संकोची, मर्यादशील स्वभावाला जागून अलगद बाजूला झालं आणि 'सरकार' हे सुटसुटीत नावच रोजच्या व्यवहारात रूढ झालं. इतकं की काहींचा– 'तेच त्यांचं आडनाव'– असा अजूनही समज होतो आणि मग–'बंगाली असून मराठी काय छान बोलतात हो' वगैरे घोळ सुरू होतो. पुन्हा सरकारांचं व्यक्तिमत्वही बंगालपासून मद्रासपर्यंत कुठंही 'फिट्ट' बसू शकणारं !

१९६८ च्या उन्हाळ्याच्या सुरुवातीला किर्लोस्कर वाडीत रुजलेली घट्ट मुळं अलगद बाहेर काढून ती पुण्याच्या भूमीत नव्यानं रोवण्याचा कार्यक्रम मोघे कुटुंबानं केला. प्रभात रोडजवळच्या भोंडे कॉलनीतल्या आमच्या घरापासून सरकारांचं घर केवळ दोन–अडीच मिनिटांवर ! पण तरीही त्यांची माझी पहिली भेट पुण्यात आल्यानंतर वर्ष–दीड वर्षांनंतर झाली आणि तीही पुण्याच्या पार दुसऱ्या टोकाला किर्लोस्कर प्रेसमध्ये ! – काही काळ अंगावर चढवलेली कारकुनीची झूल झटकून तेव्हा नुकताच मी मोकळा श्वास घ्यायला लागलो होतो. चारचौघांना सांगण्यासाठी 'एम्. ए. करतोय' हा बहाणा होता आणि एरवी भविष्यातल्या अंधाराची चाचपणी चालली होती. किर्लोस्कर

मासिकांच्या संपादकीय खात्यात लुडबुड हा त्यातलाच एक भाग! अशाच एका सकाळी अनिल हवालदारबरोबर सरकार तिथं भेटले. त्या भेटीत औपचारिक ओळखीपलिकडं त्यांचं माझं एक शब्दही बोलणं झालं नाही; पण तरीही त्यांच्या साधासुध्या व्यक्तिमत्वाचा खोल ठसा त्या दिवशी माझ्या मनावर नकळत उमटला तो आजही तितकाच ताजा आहे.

सडसडीत अंगकाठी, रापलेला सावळा रंग, तरतरीत नाक, भव्य कपाळ, उलटे फिरवलेले करडे केस आणि चष्म्याआडचे शांत, निवांत डोळे.

गडद रंगाची पँट, राखी शर्ट, गळ्याला बांधलेला सौम्य रेशमी स्कार्फ, व्यक्तिमत्त्वाचं एक अंग वाटावं इतक्या सहजतेनं हातात धरलेला पाईप आणि साऱ्या वागण्याबोलण्यातून व्यक्त होणारा एक दुर्मिळ खानदानी सुसंस्कृतपणा!

— मग कळलं की अनिल हवालदारच्या वडिलांपेक्षाही सरकार एक–दोन वर्षांनी मोठे आहेत आणि तरीही ते अनिलचे 'मित्र' आहेत. वयात इतकं अंतर असलेली त्या दोघांची दोस्ती हा त्या काळच्या माझ्या अकलेच्या दृष्टीनं कुतुहलाचा विषय होता. मग अनिलकडूनच सरकारांची तुटक ओळख अधुनमधून होत राहिली.—ते मुळचे कराचीचे, इकॉनॉमिक्स घेऊन एम्. ए. झालेले. एक वेळचे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे छायाचित्रकार! मुंबईच्या एका ख्यातनाम जाहिरातसंस्थेत अधिकारपदावर असलेले; पण हळूहळू त्या गदारोळातून आणि व्यापातून स्वतःला अलगद सोडवत गेलेले (सरकारांच्या भाषेत—निवृत्ती इन इन्स्टॉलमेंट्स्) देवाणघेवाण आणि अलिप्तता ह्यांची मुष्किल सांगड घालीत पुण्याच्या घरात एकट्याच्या 'संसारा'त राहणारे, महाकठीण असं स्वतंत्र एकाकी आयुष्य खऱ्याखुऱ्या अर्थानं जगणारे! मग हळुहळू जाणवू लागलं की वरकरणी संकोची, सौम्य, अनाग्रही अशा ह्या व्यक्तित्वात कसली तरी जबरदस्त खेच आहे. एक अनाकलनीय ओढ आहे.

अनिल हवालदार आणि सरकार ह्यांच्या मैत्रीचं एक मजेदार स्वरूप माझ्या हळुहळू लक्षात आलं. अनिलचं आयुष्य अनेक घडामोडींनी

भरलेलं तर सरकार काठावरच्या मोडतोडी त्रयस्थपणे पहात संथपणे वाहणाऱ्या निर्मळ पाण्यासारखे ! काठावरच्यांनी वाटल्यास हवा तेव्हा पाण्याचा आधार घ्यावा पण पाण्याची भूमिका मात्र केवळ मूक साक्षीदाराची ! ...असाच काही काळ गेला. अनिल हवालदार मॉस्कोला निघून गेला. मलाही माझा प्रवाह मिळाला. माझं 'पुणे–मुंबई'–'मुंबई –पुणे' सुरू झालं आणि–सरकारना हे जाणवलं की नाही कोण जाणे; पण मला मात्र जाणवलं की नकळतच त्यांच्या आयुष्यातली अनिल हवालदारची जागा मी घेतली आहे.

जगून झालेल्या गेल्या आठ–नऊ वर्षांकडं मी बघतो तेव्हा माझ्या लक्षात येतं– माझ्या आयुष्याच्या अनेक व्यक्तिगत उलथापालथींशी सरकारांचा तसा कुठूनही प्रत्यक्ष संबंध लागत नाही; पण तरीही त्यांचं अस्तित्व सर्वत्र आहेच. त्यांना कुठंच वगळताही येत नाही. माझं मुख्य वास्तव्य आमच्या घरात असलं तरी माझ्या आयुष्याचा एक कोपरा सरकारांच्या घराशी, किंबहुना त्यांच्या शांत निवांत व्हरांड्याशी निगडित झाला आहे. खुललेला, बहरलेला, गजबजलेला, मोडलेला, खंतावलेला, कोंडलेला आणि हर्षविषादापलिकडे 'खुशाल' झालेला अशा नाना रूपांत मी तिथं कैकवेळा विसावलो आहे आणि त्या साऱ्या अवस्थांत सरकारांनी मला अबोल सोबत दिली आहे. सोबत देण्याची 'भूमिका' न घेता––आपली जागा किंचितही न सोडता !

अनिलची जागा मी घेतली असं म्हणायचं ते केवळ वाच्यार्थानंच घ्यायचं. कारण अनिलपेक्षा मी तसा खूपच वेगळा ! तो रिझर्व्हड्, आत्मलक्षी तर मी सदैव मित्रांच्या गराड्यानं वेढलेला– त्या काळात तर फारच ! त्यामुळं मी सरकारांच्या आयुष्यात घुसलो तो माझ्या साऱ्या गोतावळ्यासह आणि बघता बघता तो सगळा गोतावळा सरकारांचा झाला. २५-३० वर्षांनी लहान असलेले सारे पण सरकारांशी असे समरस झाले की 'कुणाची ओळख पूर्वीची ?' असा संभ्रम पडावा. सरकारांच्या व्यक्तिमत्त्वाची हीच तर गंमत आहे. घर–संसार न थाटलेला एवढा 'संपूर्ण गृहस्थ' माझ्या पाहण्यात नाही. बारीकसारीक रीतीभातीत अतिशय दक्ष ! कुणी वास्तुशांतीला बोलावलं तर निदान

फुलं नेतील. जिथं जायचं तिथं लहान मुलं आहेत का, पाहतील. कुणाची भांडीकुंडी परत करताना ती घासून लखलखीत तर होतीलच पण त्यात एखादा पदार्थ ठेवायला झोपेतही चुकणार नाहीत. 'जातपात' या प्रकारात आपल्याला कधीच गम्य नव्हतं; पण संदर्भासाठी ती परिभाषा वापरायची तर 'खरंखुरं संस्कारित ब्राह्मण्य' सरकारांमध्ये मी जे अनुभवलं ते केवळ जन्मानं ब्राह्मण 'झालेल्या' आम्हा कुणाकडंही नाही.

सरकारांच्या आणि माझ्या मैत्रीला एक दशक पुरं होत आलं. त्या निरामय स्नेहाचं निःशब्द प्रतीक म्हणजे 'पक्ष्यांचे ठसे' ह्या काव्य-संग्रहाच्या मुखपृष्ठावरचं सरकारांनी छायांकित केलेलं प्रसन्न, रंगीत आभाळ !

योग फार विचित्र असतात. 'पक्ष्यांचे ठसे' स्वच्छ प्रकाशात आलंय आणि सरकार मात्र कॅन्सर नावाच्या निर्घृण व्याधीच्या विळख्यात आहेत. असंख्य आनंदांच्या, तृप्तीच्या क्षणात आम्ही त्यांचे वाटेकरी झालो. त्यांच्या आजच्या सोसण्यातला वाटा मात्र कुणीही उचलू शकत नाही. उभं आयुष्य एकटे राहूनही ते कधीच एकटे नव्हते; पण आप्तांचं प्रेम, सेवा, शुश्रुषा ह्यांच्या उबदार छायेत असूनही आज ते फार एकटे आहेत. ज्या अपार समजुतीनं त्यांनी सारं आयुष्य स्वीकारलं त्याच धैर्यानं ते आजचं हं विपरीत दानही पेलताहेत व रक्ताच्या नात्या-पलिकडले आम्ही ? . . . .

. . . . आम्ही त्यांची वाट पाहतो आहोत.

साऱ्या इच्छाशक्ती एकवटून मनःपूर्वक त्यांची वाट पहातो आहोत.

ज्या चिवट श्रद्धेच्या बळावर ह्या 'अधांतरी' पृथ्वीवर आपण निर्धास्त आहोत तीच श्रद्धा आम्हाला दिलासा देते आहे;

सरकार परत येतील– पूर्वीसारखे होऊन !

आमचा हा 'एकमेवाद्वितीय' ज्येष्ठ मित्र पुन्हा आमच्यामध्ये येईल–नक्की येईल.

भरलेलं तर सरकार काठावरच्या मोडतोडी त्रयस्थपणे पहात संथपणे वाहणाऱ्या निर्मळ पाण्यासारखे ! काठावरच्यांनी वाटल्यास हवा तेव्हा पाण्याचा आधार घ्यावा पण पाण्याची भूमिका मात्र केवळ मूक साक्षीदाराची !...असाच काही काळ गेला. अनिल हवालदार मॉस्कोला निघून गेला. मलाही माझा प्रवाह मिळाला. माझं 'पुणे–मुंबई'–'मुंबई –पुणे' सुरू झालं आणि–सरकारना हे जाणवलं की नाही कोण जाणे; पण मला मात्र जाणवलं की नकळतच त्यांच्या आयुष्यातली अनिल हवालदारची जागा मी घेतली आहे.

जगून झालेल्या गेल्या आठ–नऊ वर्षांकडं मी बघतो तेव्हा माझ्या लक्षात येतं– माझ्या आयुष्याच्या अनेक व्यक्तिगत उलथापालथींशी सरकारांचा तसा कुठूनही प्रत्यक्ष संबंध लागत नाही; पण तरीही त्याचं अस्तित्व सर्वत्र आहेच. त्यांना कुठंच वगळताही येत नाही. माझं मुख्य वास्तव्य आमच्या घरात असलं तरी माझ्या आयुष्याचा एक कोपरा सरकारांच्या घराशी, किंबहुना त्यांच्या शांत निवांत व्हरांड्याशी निगडित झाला आहे. खुललेला, बहरलेला, गजबजलेला, मोडलेला, खंतावलेला, कोंडलेला आणि हर्षविषादापलिकडे 'खुशाल'झालेला अशा नाना रूपांत मी तिथं कैकवेळा विसावलो आहे आणि त्या साऱ्या अवस्थांत सरकारांनी मला अबोल सोबत दिली आहे. सोबत देण्याची 'भूमिका' न घेता––आपली जागा किंचितही न सोडता !

अनिलची जागा मी घेतली असं म्हणायचं ते केवळ वाच्यार्थानंच घ्यायचं. कारण अनिलपेक्षा मी तसा खूपच वेगळा ! तो रिझर्व्हड्, आत्मलक्षी तर मी सदैव मित्रांच्या गराड्यानं वेढलेला– त्या काळात तर फारच ! त्यामुळं मी सरकारांच्या आयुष्यात घुसलो तो माझ्या साऱ्या गोतावळ्यासह आणि बघता बघता तो सगळा गोतावळा सरकारांचा झाला. २५-३० वर्षांनी लहान असलेले सारे पण सरकारांशी असे समरस झाले की 'कुणाची ओळख पूर्वीची ?' असा संभ्रम पडावा. सरकारांच्या व्यक्तिमत्त्वाची हीच तर गंमत आहे. घर–संसार न थाटलेला एवढा 'संपूर्ण गृहस्थ' माझ्या पाहण्यात नाही. बारीकसारीक रीतीभातीत अतिशय दक्ष ! कुणी वास्तुशांतीला बोलावलं तर निदान

फुलं नेतील. जिथं जायचं तिथं लहान मुलं आहेत का, पाहतील. कुणाची भांडीकुंडी परत करताना ती घासून लखलखीत तर होतीलच पण त्यात एखादा पदार्थ ठेवायला झोपेतही चुकणार नाहीत. 'जातपात' या प्रकारात आपल्याला कधीच गम्य नव्हतं; पण संदर्भासाठी ती परिभाषा वापरायची तर 'खरंखुरं संस्कारित ब्राह्मण्य' सरकारांमध्ये मी जे अनुभवलं ते केवळ जन्मानं ब्राह्मण 'झालेल्या' आम्हा कुणाकडंही नाही.

सरकारांच्या आणि माझ्या मैत्रीला एक दशक पुरं होत आलं. त्या निरामय स्नेहाचं निःशब्द प्रतीक म्हणजे 'पक्ष्यांचे ठसे' ह्या काव्य-संग्रहाच्या मुखपृष्ठावरचं सरकारांनी छायांकित केलेलं प्रसन्न, रंगीत आभाळ!

योग फार विचित्र असतात. 'पक्ष्यांचे ठसे' स्वच्छ प्रकाशात आलंय आणि सरकार मात्र कॅन्सर नावाच्या निर्घृण व्याधीच्या विळख्यात आहेत. असंख्य आनंदांच्या, तृप्तीच्या क्षणात आम्ही त्यांचे वाटेकरी झालो. त्यांच्या आजच्या सोसण्यातला वाटा मात्र कुणीही उचलू शकत नाही. उभं आयुष्य एकटे राहूनही ते कधीच एकटे नव्हते; पण आप्तांचं प्रेम, सेवा, शुश्रुषा ह्यांच्या उबदार छायेत असूनही आज ते फार एकटे आहेत. ज्या अपार समजुतीनं त्यांनी सारं आयुष्य स्वीकारलं त्याच धैर्यानं ते आजचं हे विपरीत दानही पेलताहेत व रक्ताच्या नात्या-पलिकडले आम्ही? ....

.... आम्ही त्यांची वाट पाहतो आहोत.

साऱ्या इच्छाशक्ती एकवटून मनःपूर्वक त्यांची वाट पहातो आहोत.

ज्या चिवट श्रद्धेच्या बळावर ह्या 'अधांतरी' पृथ्वीवर आपण निर्धास्त आहोत तीच श्रद्धा आम्हाला दिलासा देते आहे;

सरकार परत येतील– पूर्वीसारखे होऊन!

आमचा हा 'एकमेवाद्वितीय' ज्येष्ठ मित्र पुन्हा आमच्यामध्ये येईल–नक्की येईल.

❊ ❊

॥ निरंकुशाची रोजनिशी ॥ चार ॥

## ॥ ' रेषां 'च्या जगात ॥

रेषा – भक्ष्य गिळून निपचित पडलेल्या अजगरासारखं एक निर्जीव अस्तित्व !

पण ही रेषा जिवंत होते तेव्हा साक्षात् सळसळतं चैतन्य वाट चालू लागतं. मग गतिमान पृथ्वी साकार होते. आकाश जन्माला येतं. क्षितिज लवलवू लागतं. ग्रहताऱ्यांपासून झाडांडोंगरापर्यंत आकार साकारतात. ' अक्षर ' निर्माण होतं. मग जाणवतं– सारं विश्व ह्या रेषेच्या मिठीतच सामावलं आहे. फार कशाला, अनादि अनंत आणि अंतिम काळ म्हणजेही एक अतूट रेषाच !

कवी ज्ञानेश्वरांना ह्या ' रेखे 'नंच भूल घातली. समर्थांनी आपला जगड्व्याळ व्याप मांडला तो हे ' रेखेंचे गुंडाळे ' हाती घेऊनच !

जागेपणी जाणवतो तो तेजाळ रेषांचा मेळ;
झोपेत गुंगवतो तो हा धूसर रेषांचाच खेळ आणि
जागृति व स्वप्न ह्यांना अलग करते ती देखील तरल रेषेचीच लचकती वेल !

तसे आपण सारे ह्या रेषेचे गुलाम ! पण आपल्यातलाच एखादा गुलाम वेगळा निघतो. तो ह्या रेषेची जादू ओळखतो. आपल्या राणीवरच प्रभुत्व मिळवतो आणि एका विश्वाच्या पोटात दुसरं छोटंसं विश्व निर्माण करतो. अशा विश्वकर्मा जादुगारासाठी मग स्वप्नही आपली सीमारेषा ओलांडून दिवसाच्या प्रकाशात येतं, क्वचित् – कधीमधीच ! अशा ह्या जादुगाराचं नाव, वॉल्ट डिस्ने आणि त्याचं जिवंत रेखांकित स्वप्न म्हणजे ' जंगल बुक ' हा खराखुरा ' चित्र ' पट !

एक तान्हं मूल प्रचंड जंगलात पोरकं एकाकी पडतं. साहजिकच ते वन्य पशूंमध्ये त्यांच्यातलंच एक होऊन वाढतं. असं वाटतं की हा रंगतदार सहवास कधीच संपणार नाही. पण अखेर केव्हातरी ती अपरिहार्य सीमारेषा यावीच लागते– तशी ती येते आणि अलगदपणे दोन्ही जगं वेगळी होतात.

ह्या एवढ्याशा गोष्टीत वास्तविक तसं काय नवीन आहे? पण रूडयार्ड किपलिंगच्या अक्षर रेषांनी ह्या साध्यासुध्या गोष्टीला कधीही शिळा न होणारा ताजेपणा दिला आणि वॉल्ट डिस्नेच्या कुंचल्यातील कोवळ्या रेषेनं तिला अक्षरश: रक्तामांसाचा अर्थ दिला.

'गेलं ते रम्य बालपण' म्हणून कढ काढणं हे आपल्याकडचं जुनं दुखणं आहे; पण त्यातला योग्य तो अर्थ ओळखून, वयाचा काटा उलटा फिरवायचा असेल तर खुशाल 'जंगल बुक'ला जाऊन बसावं. सगळी आबालवृद्ध मंडळी कशी वयाच्या एका समान रेषेवर येऊन बसतात. यापूर्वी, ही किमया दोनच 'मानवी रेषां'ना जमली होती. एक हडकुळी, रडवेली रेषा आणि दुसरी गोलमटोल भाबडी रेषा. दोन्हींची नावं अनुक्रमे लॉरेल आणि हार्डी!

'जंगलबुक' ह्या केवळ रेखाटनातून बनलेल्या संपूर्ण कथाचित्राचं मुख्य वैशिष्टच म्हणजे– 'ही रेखाटनं आहेत.' ही जाणीव काही क्षणातच पुसली जाते आणि मागं उरतो एक लोभस आणि थरारक अनुभव! दिग्दर्शक, प्रमुख ५-६ चित्रकार, व्यक्तिरेखांना स्वर देणारे कलाकार, संगीतकार, गायक, छायाचित्रकार, संकलक अशा अनेक तंत्रज्ञ कारागरांच्या समूह शक्तीतून हा 'अनुभव' साकार झाला आहे.–, पण, सात पिढ्यांनी उभ्या केलेल्या 'कैलास लेण्या' मागे जसा आपल्याला एकच शिल्पकार हात दिसतो, तसाच प्रकार इथं ी आहे. 'जंगलबुक' मागं जाणवतो एकच सामूहिक हात– ज्याला आपण नाव देतो, वॉल्ट डिस्ने! कारण ह्या 'चित्रानुभवा'ची पहिली ठिणगी प्रथम त्याच्याच मनात पडली होती ना!

ह्या चित्राचे किती म्हणून बारकावे सांगावे? साधं जंगल म्हटलं तरी, पानं, फुलं, वेली, झाडं, गवत आणि त्यांच्या अगणित रंगच्छटा

आहेतच; पण त्याबरोबरच झाडांचं 'टेक्श्चर' आहे. दगडांचं ओबड-धोबड काठिण्य आहे. मातीचा भुसभुशीतपणा आहे. कोसळणारा धबधबा आहे. साचलेली डबकी आहेत. झुळझुळणारे झरे आहेत. निळशार तळं आहे आणि त्या पाण्यावर हालणारी प्रतिबिंबंही आहेत.

निसर्गाची रूपं म्हणावी तर जंगलातली भर दुपार आहे. पौर्णिमेची टिपूर चांदणी रात्र आहे, रात्रीतून हलके हलके उजळणारी केशरी पहाट आहे. कोसळता पाऊस आहे आणि पाऊस ओसरल्यावर, निथळणारं ओलंचिंब रानही आहे. प्राणीजीवनात काळा चित्ता, अस्वल हत्ती, वाघ, लांडगा ही 'प्रतिष्ठित' मंडळी आहेतच, पण जोडीला वानरांचे कळप आहेत. अजगर आहे. गिधाडं आहेत. फुलपाखरं आहेत आणि दगडाखालच्या धावऱ्या काळ्या मुंग्याही आहेत.

पुन्हा ह्या साऱ्यांना त्यांची त्यांची म्हणून 'व्यक्तिमत्त्वं' आहेत. दातपडक्या काळ्या चित्त्यात एक परिपक्व भलेपणा आहे. 'बलु' अस्वलामध्ये विदूषकी भाबडा आडदांडपणा ओतप्रोत भरला आहे. खुनशी अजगराचे जहरी डोळे, लवचिक अंग आणि सुस्त हालचाली नजरबंदी करणाऱ्या! तर माकडांच्या अगाध लीला केवळ त्यांनाच जमणाऱ्या आणि शोभणाऱ्याही! अवजड शरीरांची अक्षरशः घुसळण करीत ठेक्यात चाललेली हत्तींची परेड हा तर 'जंगलबुक'चा हायलाईट आहे. पुन्हा त्या परेडमधून जो 'खाकीपणा' व्यक्त होतो, त्याला तोड नाही. मुख्य खलनायक शेर खान वाघोबा, दबा धरल्यावर होणाऱ्या पाठीच्या स्नायूंच्या सूक्ष्म आणि हिंस्र हालचालींसह पोटात दचका निर्माण करतात. (जॉर्ज सँडर्स ह्या नटाच्या घनदाट आवाजाचा ह्यातला 'वाघाचा वाटा' मानायलाच हवा.) आणि ह्या सर्वांपलिकडे – हाडा-मांसाच्या कलाकारातही दुर्मिळ असलेल्या दोन गोष्टी ह्या सर्व मंडळीं-कडे आहेत. त्या म्हणजे– हलता, पारदर्शी चेहरा आणि विलक्षण बोलके डोळे! त्यामुळंच असंख्य बारीकसारीक तपशिलातून अखेर उभं राहतं ते एक उत्कट भावनाटच!

ह्या सर्वांचा मध्यबिंदू म्हणजे तो मानवी बच्चा! रानातल्या खुल्या हवेत वाढलेला, स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव नसलेला निर्भय

आणि मनस्वी मोग्ली ही जंगलबुकमधली सर्वांत हृद्य व्यक्तिरेखा ! जंगल सोडण्याच्या नुसत्या कल्पनेनंही कासावीस होणारा मोग्ली एका चतुर किशोरीच्या केवळ दर्शनानं संपूर्ण पालटतो. तिच्या पापण्यांचं चंट आव्हान आणि त्याच्या नाकाला पडणाऱ्या मजेदार सुरकुत्या ह्यांचा काय तो संवाद होतो आणि भारल्यासारखा तो तिच्यामागे निघूनही जातो.

जिथली वस्तू तिथं जावी असं मानणारा बगेरा चित्ता तृप्त होतो. आतून हिरमुसलेला ' बलु ' अस्वल मनाची समजूत घालत बगेरालाच मिठीत घेत भसाडच्या आवाजात त्याचं आवडतं गाणं गाऊ लागतो. त्या दोघांच्या पाठमोऱ्या आकृती दूरदूर जात असतानाच चित्र स्थिर होतं. तेव्हा आपल्याला भान येतं की इतका वेळ देहभान हरपून आपण पाहिला तो निव्वळ ' रेषां 'चा खेळ होता; पण म्हणून काहीच बिघडत नाही. उलट मनावर रेंगाळते, एखाद्या लोभस स्वप्नातून जाग आल्यावर उरते तशी, हुरहुरीची हळवी रेघ !

बा, वॉल्ड डिस्ने, ( इथं ' बा ' ह्या संस्कृतप्रचुर संबोधनाचा ' बाप ' हा ग्रामीण अर्थच घ्यावा) तुझ्या कुंचल्याच्या लयदार रेषेला लय्‌लय् सलाम.

—माझ्या वेडावाकडच्या अक्षररेषेचे !

❋ ❋

आहेतच; पण त्याबरोबरच झाडांचं ' टेक्श्चर ' आहे. दगडांचं ओबड-धोबड काठिण्य आहे. मातीचा भुसभुशीतपणा आहे. कोसळणारा धबधबा आहे. साचलेली डबकी आहेत. झुळझुळणारे झरे आहेत. निळंशार तळं आहे आणि त्या पाण्यावर हालणारी प्रतिबिंबंही आहेत.

निसर्गाची रूपं म्हणावी तर जंगलातली भर दुपार आहे. पौर्णिमेची टिपूर चांदणी रात्र आहे, रात्रीतून हलके हलके उजळणारी केशरी पहाट आहे. कोसळता पाऊस आहे आणि पाऊस ओसरल्यावर, निथळणारं ओलंचिंब रानही आहे. प्राणीजीवनात काळा चित्ता, अस्वल हत्ती, वाघ, लांडगा ही ' प्रतिष्ठित ' मंडळी आहेतच, पण जोडीला वानरांचे कळप आहेत. अजगर आहे. गिधाडं आहेत. फुलपाखरं आहेत आणि दगडाखालच्या धावऱ्या काळ्या मुंग्याही आहेत.

पुन्हा ह्या साऱ्यांना त्यांची त्यांची म्हणून ' व्यक्तिमत्त्वं ' आहेत. दातपडक्या काळ्या चित्त्यात एक परिपक्व भलेपणा आहे. ' बलु ' अस्वलामध्ये विदूषकी भाबडा आडदांडपणा ओतप्रोत भरला आहे. खुनशी अजगराचे जहरी डोळे, लवचिक अंग आणि सुस्त हालचाली नजरबंदी करणाऱ्या ! तर माकडांच्या अगाध लीला केवळ त्यांनाच जमणाऱ्या आणि शोभणाऱ्याही ! अवजड शरीरांची अक्षरशः घुसळण करीत ठेक्यात चाललेली हत्तींची परेड हा तर ' जंगलबुक 'चा हायलाईट आहे. पुन्हा त्या परेडमधून जो ' खाकीपणा ' व्यक्त होतो, त्याला तोड नाही. मुख्य खलनायक शेर खान वाघोबा, दबा धरल्यावर होणाऱ्या पाठीच्या स्नायूंच्या सूक्ष्म आणि हिंस्र हालचालींसह पोटात दचका निर्माण करतात. (जॉर्ज सँडर्स ह्या नटाच्या घनदाट आवाजाचा ह्यातला ' वाघाचा वाटा ' मानायलाच हवा.) आणि ह्या सर्वापलिकडे – हाडा-मांसाच्या कलाकारातही दुर्मिळ असलेल्या दोन गोष्टी ह्या सर्व मंडळीं-कडे आहेत. त्या म्हणजे– हलता, पारदर्शी चेहरा आणि विलक्षण बोलके डोळे ! त्यामुळंच असंख्य बारीकसारीक तपशिलातून अखेर उभं राहतं ते एक उत्कट भावनाट्य !

ह्या सर्वांचा मध्यबिंदू म्हणजे तो मानवी बच्चा ! रानातल्या खुल्या हवेत वाढलेला, स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव नसलेला निर्भय

आणि मनस्वी मोग्ली ही जंगलबुकमधली सर्वांत हृद्य व्यक्तिरेखा ! जंगल सोडण्याच्या नुसत्या कल्पनेनंही कासावीस होणारा मोग्ली एका चतुर किशोरीच्या केवळ दर्शनानं संपूर्ण पालटतो. तिच्या पापण्यांचं चंट आव्हान आणि त्याच्या नाकाला पडणाऱ्या मजेदार सुरकुत्या ह्यांचा काय तो संवाद होतो आणि भारल्यासारखा तो तिच्यामागे निघूनही जातो.

जिथली वस्तू तिथं जावी असं मानणारा बगेरा चित्ता तृप्त होतो. आतून हिरमुसलेला 'बलु' अस्वल मनाची समजूत घालत बगेरालाच मिठीत घेत भसाडच्या आवाजात त्याचं आवडतं गाणं गाऊ लागतो. त्या दोघांच्या पाठमोऱ्या आकृती दूरदूर जात असतानाच चित्र स्थिर होतं. तेव्हा आपल्याला भान येतं की इतका वेळ देहभान हरपून आपण पाहिला तो निव्वळ 'रेषां'चा खेळ होता; पण म्हणून काहीच बिघडत नाही. उलट मनावर रेंगाळते, एखाद्या लोभस स्वप्नातून जाग आल्यावर उरते तशी, हुरहुरीची हळवी रेघ !

बा, वॉल्ड डिस्ने, (इथं 'बा' ह्या संस्कृतप्रचुर संबोधनाचा 'बाप' हा ग्रामीण अर्थच घ्यावा) तुझ्या कुंचल्याच्या लयदार रेषेला लय्‌लय् सलास.

—माझ्या वेडावाकड्या अक्षररेषेचे !

❊ ❊

|| निरंकुशाची रोजनिशी || पाच ||

## || पुतळ्यांची गोष्ट—कालची ||

ही हकीकत तशी जुनी आहे.

आणि तशी, कधीच जुनी होणारी नाही.

माझ्या गावाचे एरवी किती गोडवे गाईले तरी एका अर्थी तिथलं आयुष्य हा विचित्र कोंडमारा होता. विशेषतः नव्हाळीच्या वयात! कारखान्याच्या चार भसाड्या भोंग्यांमध्ये बंदिस्त झालेलं एकसुरी आयुष्य आणि तेच ते चेहरे! स्वतःचा चेहरा कितीही आवडला तरी चोवीस तास तोच दाखवणारा आरसा पुढं उभा केला तर? तरुण पिढीच्या आरोग्याच्या दृष्टीनं अतिशय आवश्यक अशी 'पौष्टिक' व्हिटॅमिन्स— हॉटेल्स आणि सिनेमाथिएटर्स—ही तर तिथं 'औषधा'ला नव्हती. तिथलं करमणुकीचं एकमेव साधन म्हणजे गावच्या छोटेखानी स्टेशनवरून संध्याकाळी सातच्या सुमाराला जाणारी पुणे—बेंगलोर एक्सप्रेस!

'आज एक्सप्रेस दीड तास लेट आहे.'

'आज 'राईट टाईम' गेली.'

'आज गर्दी प्रचंड होती.'

'आज एक्सप्रेस एकदम मोकळी!'

एवढंच माफक 'थ्रिल' त्या बापुडवाण्या गावाला सोसायचं. आबालवृद्ध गावकऱ्यांच्या दृष्टीनं त्या गाडीचं 'दर्शन' घेणं हा कडकडीत 'नेम'च होता म्हणा ना! काही काही मंडळी तर इंजिनमधला कोळसा खिशातून घरी आणून चुलीत टाकल्याखेरीज अन्न घेत नसत म्हणे! (खरं खोटं, इंजिन ड्रायव्हरला आणि घरोघरी जळालेल्या त्या कोळशाला ठाऊक!)

ह्या ' रुटीन 'चाही कंटाळा आला की शनिवार, रविवार संधी साधून सांगलीला पळायचं. उन्हातान्हात चटकमटक खात, शहरच्या पोरींचे चेहरे पहात भटकायचं.

किमान एक, किंवा वेळेला तीन तीन हिंदी ' सिनेमे ' पहायचे आणि केलेल्या ' प्रचंड चैनी 'वर स्वतःच खूष होऊन रात्रीच्या गाडीनं पूर्वायुष्यात परतायचं– की पुन्हा एकदा–

एक्सप्रेस एके एक्सप्रेस

आणि एक्सप्रेस दाही एक्सप्रेसच !

अशाच एका ट्रिपमधली ही हकीकत आहे.

रात्री ११॥–१२ ची वेळ तशी विचित्रच ! झोपेचा अंमल सुरू झालेला असायचा. दिवसभराची वणवण पापण्यांवर स्वार होऊन डोळे उघडे ठेवणं मुष्किल झालेलं असायचं. त्यात भरीला भर म्हणून गाडीला महामूर गर्दी ! डब्यात तर माणसांची ठेचाठेच असायचीच; पण बंद दरवाजाबाहेरच्या पायफळीवरसुद्धा एखादा दुसरा माणूस लटकत असायचा… माझा एक शाळासोबती असाच लटकत असताना मधल्या ' वेरळा ' नदीच्या पुलावरून खाली पडून गेला होता. प्रत्येक वेळी ती दचका देणारी आठवण पोटात असायचीच.

त्या दिवशीही गर्दी प्रचंड होती. दाराजवळच्या रेटारेटीत मीही कसाबसा उभा होतो. बाहेरच्या पायफळीवर हँड्लला हाताची मिठी घालून एक माणूस उभा होता. डब्यात माणसांचा भरपूर कलकलाट चालला होता, सर्वांचे आवाज टिपेला पोचले होते. त्यात एका तान्ह्या पोराचं किंचाळणं मिसळलं होतं. गंमत म्हणजे इतक्या गोंधळातही बोलण्यात मश्गूल झालेल्या सर्व माणसांना एकमेकांचे आवाज विनासायास ऐकू येत होते आणि या सगळ्या कोलाहलाचं अंगाई गीत करून चांडाळ झोप माझ्यावर कबजा करू पहात होती.

असा अर्धा एक तास गेला असेल नसेल, तेवढ्यात डब्यात एकदम ओरडा झाला. अर्धवट गुंगीत असलेला मी जागा होत असतानाच शब्द ऐकले, ' पडला…पडला '. माझी नजर साहजिकच दरवाजाबाहेर गेली. थोडचा वेळापूर्वी तिथं लटकत असलेला माणूस आता तिथं नव्हता.

'काय झालं' ह्याची दखल मोठ्या मेंदूनं घेण्यापूर्वीच छोटा मेंदू कामाला लागला आणि माझा हात 'चेन'वर गेला. माझ्या सुदैवानं भोवतालीही बरेच छोटे मेंदू जागे होते. तेव्हा एका 'कोरस' हातानं साखळी खेचली गेली आणि गाडी थांबली.

गाडी थांबली मात्र... आणि तो चमत्कार घडला. क्षणापूर्वी कल-कलणारा तो डबा एकदम फ्यूज उडावी तसा चिडिचूप झाला. एखाद्या पापभीरू माणसाच्या हातून नकळत खून झाल्यावर यावी तशी भेदरट अवकळा सर्वत्र पसरली. दरम्यान गार्ड डब्यात हजर झाला होता.

'साखळी कुणी खेचली ?'

त्याच्या या प्रश्नावर कुणाचंच उत्तर गेलं नाही. कारण साऱ्या जिवंत माणसांचे एकाएकी पुतळे झाले होते.

(आणि पुतळ्यांना जीभ नसते.)

गार्डनं तोच प्रश्न पुन्हा विचारला. मला राहवेना. मी पुढं होऊन सांगितलं, 'मी खेचली चेन... म्हणजे, मी एकट्यानं नाही सर्वांनी...' मी आशेनं सर्वांकडं पाहिलं; पण कुणाची पापणीही हलली नाही.— (कारण, पुतळ्यांच्या डोळ्यांप्रमाणं त्यांच्या पापण्याही गारेच्या असतात.)

'का खेचली चेन तुम्ही ?'

'इथं बाहेर लटकलेला एक माणूस खाली पडला.'

'तुम्ही पडताना पाहिला ?'

'नाही, मी नाही——पण, ही सगळी मंडळी ओरडली.
शिवाय थोड्या वेळापूर्वी तो तिथं नक्की होता आणि
आता नाही.'

मी पुन्हा एकदा आशेनं भोवताली पाहिलं; पण कसलीही हाल-चाल झाली नाही. (कारण अशी हालचाल होण्यासाठी मस्तकात मागं छोटा मेंदू असावा लागतो.— आणि पुतळ्यांच्या मस्तकात . . . छोटा किंवा मोठा . . . कुठलाही मेंदू मुळात नसतोच.)

'हे पहा, आम्ही गाडी मागं घेऊन पाहतो; पण तसा कुणी माणस मिळाला नाही तर विनाकारण चेन खेचल्याबद्दल मी तुम्हाला एकट्याला जबाबदार धरणार.'

(पुतळ्यांच्या निर्विकार चेहऱ्यावरसुद्धा क्वचित् सुटकेचा भाव येऊ शकतो.)

मी निमूटपणे हुंकार भरला. गाडी मागं जाऊ लागली; पण माझ्या सुदैवानं त्या दिवशी परमेश्वर अप्सरांचा 'ऑपेरा' (शेवटचा 'शो') पाहून नुकताच घरी परतल्यामुळं जागा असावा. कारण थोड्याच वेळात तो माणूस सापडला. मुख्य म्हणजे जिवंत होता. पुढचं सारं झटपट घडलं. जखमी माणसाला घेऊन गार्ड स्वस्थानी गेला. आमचा डबा पुन्हा पूर्ववत रुळावर आला. बघता बघता पुतळ्यांची माणसं झाली. इतका वेळ अफू खाल्ल्यासारखं निपचित पडलेलं पोर नव्या जोमानं केकाटू लागलं. माणसांच्या तुटलेल्या संवादांचे धागे बघता बघता जुळून आले . . . मध्ये काहीच न घडल्यासारखा डबा नव्या चैतन्यानं पुन्हा कलकलू लागला.

माझ्या मेंदूपर्यंत मात्र, यातलं काहीच पोचत नव्हतं.

कारण एव्हाना . . .,

माझाच पुतळा झाला होता.

❋ ❋

## पुतळ्यांची गोष्ट—'आज'ची (नेहमीची?)

अलिकडची गोष्ट आहे.

मुंबईत एखादा दिवस फार विचित्र उगवतो. म्हणजे तसा तो कुठल्याही गावात उगवू शकतो. पण मुंबईतला विचित्र दिवस ही काही खास वेगळीच गोष्ट आहे.

तो दिवस तसाच होता. सकाळपासून सारंच गाडं उलटसुलट चाललं होतं. सरळ सुतासारख्या गोष्टी गुंता होऊन पुढं येत होत्या आणि त्याबद्दल कुणालाच दोषी धरता येत नव्हतं. अर्धा दिवस असा गेला, आता पुढचाही असाच जाणार का? हा विचार करीत मी रणरणत्या उन्हात बसस्टॉपवर उभा होतो. इतक्यात, देवदूत यावा तशी 'डबलडेकर' आली. मी बसमध्ये चढून वरच्या डेकवर गेलो.

डाव्या हाताच्या पहिल्याच डबल सीटवर अलिकडं एक छोटीशी शाळकरी पोरगी बसली होती. ८-९ वर्षांची! पलिकडं खिडकी-जवळची सीट रिकामी होती. ती मुलगी पलिकडं सरकेल किंवा मला जाऊ देण्यासाठी आपले पाय मागं करेल म्हणून मी अपेक्षेनं थांबलो—पण तिनं काहीच हालचाल केली नाही. मी निमूटपणे तिच्या छोट्या गुडघ्यांना घसटून पलिकडे गेलो आणि खिडकीजवळ बसलो.

माझं लक्ष वेधण्याच्या दृष्टीनं ती मुलगी फारच लहान होती. आणि हव्या त्या वयाची असती तरी तिची दखल माझ्याकडून घेतली गेली नसती, इतका मी स्वतःमध्येच बुडालो होतो. पण तेवढ्यातही जाणवलं की, आठ—नऊ वर्षांची ती गोरीपान पोरगी मोठी गोड होती. अंगावर शाळेचा युनिफॉर्म होता. दप्तरही होतं. मागच्या सीटवर एक

काळं कुळकुळीत जोडपं बसलं होतं. त्यांच्या मांडीवर, हिची धाकटी बहीण शोभेल अशी एक चिमुरडी पोरगी गाढ झोपली होती. ही मुलगीही त्यांच्यापैकीच असणार !

बस चालली होती. मी निरुद्देश बाहेर बघत होतो. तेवढ्यात ती पोरगी पेंगणाऱ्या माणसाचा तोल जावा तशी एकदम माझ्या मांडीवर लुढकली आणि घाईघाईनं उठून स्वतःला सावरून पुढं पाहू लागली. मी हसून दुर्लक्ष केलं.

पण पुन्हा दोन–तीन वेळा हाच प्रकार घडला. एकदम स्वतः-वरचा ताबा जावा तशी ती कोसळायची आणि शरमून उठायची– मधेच त्या मागच्या काळ्या माणसानं मला न कळणाऱ्या भाषेत त्याच्या त्या मुलीला दटावलंसुद्धा ! सताड उघड्या डोळ्यांनी पेंगणाऱ्या त्या मुलीचं मला मात्र हसूच आलं.

थोड्या वेळानं त्यांचा 'स्टॉप' आला. ते जोडपं उठलं आणि ह्या मुलीला बखोटीला धरून 'हांग हांग' अशा काही तरी शब्दात घाई करू लागलं. ती मुलगीही दप्तर सावरत उठली आणि दोन्ही सीटस्च्या दांड्यांना पकडून माझ्याकडं एकटक पहात राहिली.

क्षण, दोन क्षणच.
पण मला तो काळ किती दीर्घ वाटला.
ती नजर फार फार विचित्र होती.
विलक्षण रिती, आणि तरीही
खूप काही सांगू पहाणारी . . .

पण त्या क्षणी माझे मात्र, फक्त डोळेच जागे होते. ती मंडळी उतरून गेली. बस पुढं चालू लागली. त्या झोपलेल्या मुलीला खांद्यावर टाकलेलं ते जोडपं आणि त्यांचं बोट धरून लडखडत जाणारी ती मुलगी अशी ती पाठमोरी चौकडी दूरदूर जाताना मी पहात होतो. आणि–एकदम माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

त्या दोन्ही मुलींचं रंगरूप आणि त्या जोडप्याचा वेष आणि संस्कृती ह्यांचा काहीही संबंध नव्हता. शिवाय-त्या मुलीचं

सताड उघडया डोळयांनी पेंगणं, मनाचा एक्सरे काढावा तसं आरपार पाहणं...

मी ताडकन् उठून जिना उतरून खाली आलो. सर्कलला वळताना हळू झालेल्या बसमधून उडी टाकून मागं गेलो. वेडयासारखा त्या चौघांना पाहू लागलो–पण मुंबईच्या सर्वसमावेशक गर्दीनं त्यांना केव्हाच गिळून टाकलं होतं.

विलक्षण बेचैनीत उरलेला दिवस गेला. रात्री ही हकीकत ऐकल्यावर परिचयाचे ज्येष्ठ गृहस्थ माझ्यावर भडकले.

'शहाणा आहेस ! त्यांना गाठून तू काय करणार होतास ?
ह्या मंडळींची टोळी असते.
नशिब, त्यांनी कुणी तुला हेरलं नाही. लक्षात ठेव,
ह्या मुंबईत फक्त नाकासमोर जगायचं.'
त्यांचं म्हणणंही रास्तच होतं.
शिवाय–त्यांचा सल्ला नसतानाही मी त्यांना हवा तसाच वागलो होतो; आणि तसाच जगतोही आहे.
तात्पर्य––
जन्म घेणं आपल्या हाती नसल्यामुळं तो जिवंत माणूस म्हणून घ्यावा लागला तरी,
प्रत्यक्षात मात्र पुतळा होऊन जगता यायला पाहिजे–– तत्त्वचर्चा करण्यापुरतं अधुनमधून माणूस बनलं म्हणजे झालं !
एवढं यश तुला रगड !

❊ ❊

## ॥ घायाळ योद्धा ॥

आज त्याची गणना ‘प्रथितयश’ या संज्ञेखाली होते. नाटच, चित्रपट, साहित्य, वृत्तपत्र ह्या साऱ्या क्षेत्रांत त्यानं स्वतःचा असा खास ठसा उमटवला आहे. यश त्याच्या वाटेला बऱ्यापैकी उशीरा आलं; पण आलं तेव्हा ‘अनंत हस्ते-कमलावराने’ असं भरभरून आलं,– पण ह्यातलं काहीच झालं नव्हतं तेव्हापासून मी त्याचा चाहता होतो आणि आजही आहे. अजूनही त्याचा चाहता व्हावंसं वाटतं हे विशेष आहे. कारण यश बरसलं की भली भली माणसं सुस्त, मुर्दाड बनतात. त्यांच्या आयुष्याचं सुखासीन शेवाळं बनतं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं टोकच पार बोथट होऊन जातं. पण तो ह्याला अपवाद ठरला आहे. अजून तो आयुष्याला सामोरा जाताना दिसतो. जनमानसात तर नाहीच; पण स्वतःच्या मनातही स्वतःचा सुबक पुतळा अजून त्यानं उभारलेला दिसत नाही. मातीच्या माणसांत त्याला रस आहे आणि त्यांच्या सुखदुःखांच्या अर्थहीन वाटणाऱ्या कोलाहलातच तो कलावंत म्हणून आजही घडतो– बिघडतो आहे. त्याची ही खूप जुनी आठवण, का कोण जाणे, माझ्या मनात खोलवर अडकून राहिली आहे. घटना म्हणून पाहिलं तर तिच्यात विशेष असं काहीही नाही; पण माझ्या आयुष्याच्या संदर्भात मला ती उगाचच फार मोलाची वाटते– त्या घटनेतली माझी भूमिका केवळ सामान्य प्रेक्षकाची असूनही !

मी तेव्हा विद्यार्थीदशेत होतो; पण ‘निरस्तपादपेदेशे’ ह्या न्यायानं म्हणा किंवा वडिलांच्या वारश्याची पुण्याई म्हणून म्हणा– पण त्या पोरवयापासूनच मी गावच्या सांस्कृतिक कार्यात बऱ्यापैकी

घुसखोरी करायचो. विशषत: नाटक, सिनेमा, साहित्य ह्या क्षेत्रांतील कोणीही मान्यवर पाहुणे गावात आले की त्यांची बडदास्त ठेवणारा हौशी, उत्साही स्वयंसेवक ह्या नात्यानं मला त्यांच्यावर सोडण्यात येई! व्यं. न. कुलकर्णी––हॅम्बुर्ग––(हा तेव्हा समास होता),सुरेश हळदणकर, प्रसाद सावकार, ज्ञानेश्वर नाडकर्णी, विजय तेंडुलकर, प्रभाकर गुप्ते अशा कित्येक थोरामोठ्यांना माझ्या सेवेचा लाभ त्या काळात घ्यावाच लागला आहे. त्याची माझी भेटही अशीच झाली. मला वाटतं नवरात्र व्याख्यानमालेत सहभागी होण्याच्या निमित्तानं तो आमच्या गावी आला होता.

तेव्हा तो अजून चढणीवरच होता, गाठायचा तो पल्ला अजून खूपच दूर होता; पण तरीही, कलाक्षेत्रात त्याचं नाव होतंच! एक प्रयोगशील कलाकार म्हणून, प्रवाहाच्या विरुद्ध हात मारणारा बहाद्दर म्हणून! शिवाय पुण्या–मुंबईपासून दूरच्या गावामध्ये अशा माणसांचं केवढं अप्रूप असतं हे तिथं राहिल्यावाचून कळणं मुष्किल आहे– अशा काहीशा ग्लॅमरस पार्श्वभूमीवर त्यानं गावात एंट्री घेतली.

त्याच्या रात्रीच्या व्याख्यानाचा टेंपो तो आल्या क्षणापासून बांधला जाऊ लागला. नादलुब्ध भुंग्यांसारखी माणसं त्याच्या भोवती रुंजी घालू लागली. ह्या काहीशा अनपेक्षित अनुभवानं तोही सुखावून खुलत चालला. देखणं रूप नसलं तरी त्याच्या व्यक्तिमत्वात आकर्षण होतं. मितभाषी असला तरी मोजक्या शब्दांतून चातुर्य मधासारखं ठिबकत होतं. आत्मविश्वासयुक्त वागण्या–बोलण्यानं तो माणसं जिंकत चालला होता आणि त्याच्यावर अगोदरच लुब्ध असलेला मी भारावून त्याचं हे कौतुक न्याहाळत होतो.

संध्याकाळी फिरायला जाताना गावाचे सुनसान, निर्मनुष्य रस्ते पाहून तो मिष्किलपणे म्हणाला"ह्या शांततेनं जीव घुसमटायला लागला बुवा, केव्हा एकदा मुंबईचा निवांत गदारोळ आणि घाम पाहतोयसं झालंय!" वाटेत गावातले एक भीषण बोअर गृहस्थ भेटले. त्यांच्यावर सोपवलेल्या कामाखेरीज सर्वत्र नाक खुपसणे ह्याविषयी प्रसिद्ध असलेले! स्वप्नांत सुचलेल्या एका गोष्टीचा आराखडा त्या गृहस्थांनी

ह्याला सविस्तर ऐकवला आणि वर पुन्हा 'स्वप्न तुटल्यामुळं गोष्ट अर्धवट राहिली, म्हणून हे जंतू मी तुमच्या डोक्यात घालतोय –तुम्ही ह्यावर लिहा,' – हेही ठेऊन दिलं. चेहऱ्याची घडी बदलू न देता ओठावर सूक्ष्म हसू खेळवीत त्यानं शांतपणे सांगितलं, 'हरकत नाही. फक्त हे जंतू मुंबईपर्यंत जिवंत राहिले पाहिजेत.'

रात्र झाली. व्याख्यानाची वेळ येऊन ठेपली. नटूनथटून माणसं जमली होती. जवळच्या शहरची, खास त्याच्या भाषणासाठी गाडी काढून आलेली एक देखणी पुरंध्री त्याच्याशी हळूहळू कुजबुजत होती. तो उल्हसित होता. सगळं वातावरणच उल्हसित होतं. दिवसभरच्या चढत्या टेंपोवर काही क्षणातच क्लायमॅक्स विराजमान होणार होता. कुठे संशयाला जागा नव्हतीच आणि त्यामुळंच तो जन्मजात सावध पुरुषही नकळत थोडा बेसावध झाला होता, ढिला पडला होता.

सभेचे पहिले उपचार पार पडले आणि खुर्चीवर बसूनच तो बोलू लागला. प्रस्तावनेच्या चारदोन सैल वाक्यांनंतर त्यानं सांगितलं की– 'कलाक्षेत्रातील आधुनिक प्रवाहाशी तुम्ही मंडळी अपरिचित दिसता, तेव्हा तोंडओळख म्हणून आरंभी मी काही वाचन तुमच्यापुढं करणार आहे–' असं म्हणन श्रोत्यांची प्रतिक्रिया न आजमावताच त्यानं वाचनाला आरंभही केला आणि दिवसभर कौतुकाच्या एकाच दिशेनं फिरणाऱ्या वेगवान चक्राला एक जोरदार गचका बसला आाणि हलकेच त्या चक्रानं उलटी दिशा पकडली, त्याला सुगावाही लागू न देता !

तो वाचत होता ते साहित्य वाईट होतं असं नव्हे. त्याचं वाचनही वाईट नव्हतं– तरीही मैफिलीचा पहिला सूरच विसंवादी लागून मैफिल विस्कटावी, तसं काहीतरी घडलं होतं. वक्ता आणि श्रोत्यांमधला संवादच साधला नव्हता. जणू काही एका निर्जन बेटावर तो मुंडी खाली घालून मोठ्यांदा वाचत होता आणि ज्यांच्यासाठी वाचन चाललं होतं ते पलिकडच्या तीरावर होते. क्षणाक्षणाला त्याच्यापासून दूर दूर चालले होते.

वक्त्याच्या हातांतून गेलेल्या सभ्य, सुसंस्कृत सभेत अशा वेळी काय होतं ?– कंटाळा नावाची विषारी वाळवी एखादं अधू झाड

पकडते आणि हलके हलके आजूबाजूला फैलावू लागते. निःशब्द जांभया उमटू लागतात. अस्वस्थ आळोखेपिळोखे चुळबुळू लागतात. त्या दिवशीही, पहाता पाहता सारी सभा त्या वाळवीनं व्यापली, तरी तो आपला वाचण्यातच दंग होता; पण मग बघता बघता ती वाळवी थेट टेबलाखाली त्याच्या पावलांनाच भिडली. त्या थंडगार, गिळगिळीत स्पर्शानं तो भानावर आला. घाईघाईनं वाचन आवरतं घेऊन काहीतरी निर्जीव बोलू लागला; पण एव्हाना डाव हातातून गेला होता. उतारा-वरून घरंगळणाऱ्या खटाऱ्यासारखं भेलकांडत त्याचं व्याख्यान कसंबसं एकदाचं मुक्कामाला पोचलं. दुखवटयाची सभा संपावी तशी एकेक मंडळी काढता पाय घेऊ लागली, काहीच न बोलता !

धिक्काराच्या घोषणा परवडतात पण उपेक्षेची करुण शांतता जीव घेते. त्या जीवघेण्या शांततेत तो घुसमटत होता ! युद्ध म्हटलं की हार–जीत आलीच; पण आपल्या गाफिल चुकीनं युद्ध हरलो ही कळ लाखो जखमांपेक्षा भयंकर असते. त्या अदृश्य घावानं तो तडफडत होता. वरच्या निर्विकार मुखवटयाआड !

मध्यरात्र ! गेस्टहाऊसमध्ये आम्ही दोघंच बसलो होतो, एक शब्दही न बोलता ! त्याचे जखमी डोळे आतल्या आत धुमसत होते, मिटलेले घट्ट ओठ कडूजहर घोट गळयातच रिचवीत होते. त्या क्षणी मला त्याच्याविषयी फार फार जवळीक वाटली. त्याच्या त्या अवस्थेनं खूप काही शिकवलं. प्रत्येक कलाकाराच्या आयुष्यातल्या एका अटळ टप्प्याचं आकलन करून दिलं. त्या संस्कारक्षम कोवळया वयात त्याच्या रूपानं प्रथमच दिसलेला तो घायाळ योद्धा आजवर अनेकदा अनेक ठिकाणी भेटत आला आहे.

कधी मनस्वी अभिनेत्यांमध्ये, कधी जिद्दी गायक-वादकांमध्ये कधी लढाऊ खेळाडूंमध्ये आणि कधी कधी . . . स्वतःमध्येही !

## ॥ कविहृदयातला ताज ॥

सर्वसामान्य मराठी मुलाप्रमाणंच अस्मादिकांच्या आयुष्यातही 'ताजमहाल' ही चीज प्रथम शालेय इतिहासाच्या वाटेनं आली. 'शहाजहानने अमुक अमुक साली मुमताज ह्या आपल्या आवडत्या राणीच्या प्रेमाचे स्मारक म्हणून ताजमहाल बांधला.' ही निरुपद्रवी माहिती अतिशय कोरड्या स्वरात प्रथम नक्की केव्हा दिली गेली हे सांगणं कठीण आहे. ह्यातील 'आवडती राणी' हा शब्दप्रयोग एव्हाना गोष्टीतून ऐकून ऐकून अतिपरिचित झाला होता. पण 'जी नावडती नाही ती आवडती' ह्यापलिकडं त्या शब्दप्रयोगाचा अर्थ कळण्याचं ते वय नव्हतं. त्याच वयाच्या आजच्या मुलांचं ह्या विषयातलं ज्ञान पाहता, निरंकुशाची पिढी फारच बावळट होती हे कबूल करायला हवं. त्यामुळं 'प्रेमाचं स्मारक' या प्रकरणाचा उजेड डोक्यात पडणं तर शक्यच नव्हतं. अशा परिस्थितीत ताजमहाल तेव्हा आमच्या आयुष्यात आला म्हणजे नक्की काय झालं हे सांगणं अवघड आहे; पण तो आला हा मात्र 'इतिहास' आहे.

नंतरच्या काळात 'ताजमहालची भेट झाली ती आमच्या गावातील गणेशोत्सवात गाणाऱ्या एका लोकल 'भौगीत गायका'च्या हळवेल्या स्वरातून–'बॉदशहॉच्या अमर प्रीतीचे मौंदिर एकवि-श्शाऽऽल; यमुनांकांठीं ताजम–हाऽऽल !' ह्यातल्या, 'बाद' 'शाल' 'हाल' या अक्षरांवर कोळशाचं इंजिन फुस्कारावं तसा तो गायक श्वासाचा जोरदार फुस्कारा सोडीत होता. निरंकुशाच्या बाळबुद्धीला देवाशपथ ते हृदयद्रावक शोकगीत वाटलं. आणि, मुमताज तर गेलीच पण

ताजमहालचंही काही बरंवाईट झालं नाही ना ? अशीही अपशंका त्याच्या बालमनाला चाटून गेली. अर्थात पुढं त्याला त्याची चूक कळून आली आणि इतर अनेक भावगीतं ऐकल्यावर, 'शोकगीत' हे भावगीताचंच दुसरं नाव आहे हे मौलिक ज्ञानही त्याला प्राप्त झालं. तरीही ताज-महालविषयी प्रतिकूल मत व्हावं असं तोपर्यंत काही घडलं नव्हतं.

परंतु ह्याच सुमाराला शाळेच्या क्रमिक पुस्तकातून कवी कुसुमाग्रजांची एक कविता भेटली आणि तिनं जादू केली.

वर पूर्ण चंद्रमा पसरी मायाजाल
वसुधेच्या वदनी लहरे हास्य सलील
ते समूर्त होउन तीरावर यमुनेच्या
हिमशुभ्र उभा हा संगमरवर विशाल

इतके दिवस इतिहासाच्या पुस्तकात किंवा कुरूप कॅलेण्डरमध्ये निर्जीवपणे बंदिस्त होऊन पडलेला ताजमहाल या कवितेनं जणु डोळ्यां-समोर साक्षात् उभा केला. प्रत्यक्ष न अनुभवलेल्या एका सौंदर्याचा थेट प्रत्यय त्या कवितेनं घडवला.

पौर्णिमेच्या झिलमिलत्या सरोवरावर विसावलेला राजहंस,
पृथ्वीच्या पेल्यात फेसाळणाऱ्या चांदण्याच्या मदिरेवर उठलेला मधाळ तरंग,
असंख्य हृदयात घुमणाऱ्या उन्मादक प्रणयगीताची युगायुगांना पालाण घालीत चाललेली मंजुळ लकेर,
ग्रहनक्षत्रांच्या ताटव्यातील भूकमळाच्या एका पाकळीवर तरारलेला दंवाचा रुपेरी थेंब...!

...बापरे, आपली तर कवटी पार वितळूनच गेली. पहिल्या पावसाचा शिडकावा शिंपल्यावर तापलेल्या मातीला जे काही होत असेल, तसं काही तरी मनाला झालं. कवितेकडून हा अनुभव त्या वेळी तरी अपूर्व होता. गारुड्याच्या पुंगीची चढावी तशी मजेदार भूल मनावर पसरत होती. इतक्यात, त्या कवितेनं अकस्मात् कलाटणी घेतली, आपल्याच नादात डौलात चाललेल्या नागानं अचानक पलटी घ्यावी तशी-- 'कसलं आलंय प्रेमाचं स्मारक ? कामांधतेच्या होमात मुक्यानं

शेकडो राणीवशातल्या स्त्रिया घुसमटत बळी गेल्या, त्यांचं काय ?

'शत अनामिकांचे त्या हे कबरस्तान
त्या अबल आसवांचे हे करुण निधान !'

कवीचा युक्तिवाद बिनतोड होता. परिणामतः कोवळ्या वयातल्या संवेदनाक्षम मनामध्ये 'ताजमहाल' ह्या अक्षरांवर एक बारीकसा चरा उमटला आणि नकळत एक अढी तयार झाली.

अशीच काही वर्षं गेली आणि ती अढी अधिक गडद करणारी कविता घेऊन आणखी एक कवी आयुष्यात आला-साहिर लुधियानवी !

साहिरच्या 'ताज' ह्या कवितेतला प्रेमिक प्रेयसीला भेटायला बोलावतो. पण संकेतस्थळ म्हणून ताजमहाल त्याला नको आहे.

'मेरे मेहबूब, कहीं और मिला कर मुझसे'—कारण,
'जगात आजवर लाखो प्रेमिक झाले त्यांचे आवेग काय खोटे होते ?
पण हा बडेजाव ते कुठून आणणार ? बिचारे तुझ्यामाझ्यासारखे कंगाल होते.
राणी, ज्यांच्या घामानं ताजमहाल बांधला, त्यांना काय प्रीती ठाऊकच नव्हती ?
पण त्यांच्या स्मरणावर 'ना चिरा ना पणती !'

आणि शेवटी तो उसळून म्हणतो-'हे उद्यान, ही नक्षी, हे मनोरे, हे नजरबंदी करणारं शिल्प म्हणजे काय आहे ठाऊक आहे ?' 'इक शहेन्‌शाहने दौलतका सहारा लेके हम गरीबोंकी मुहब्बतका उडाया है मज़ाक !' झालं, कुसुमाग्रजांनी पाडलेल्या अढीची साहिरमहाराजांनी घट्ट निरगाठ केली. आणि अशा दुखऱ्या पूर्वग्रहानिशी एके दिवशी मी प्रत्यक्ष ताजमहालच्या भेटीला गेलो.

उत्तर हिंदुस्थानच्या उन्हाळ्यातली तपती दुपार अंतर्बाह्य अनुभवत ताजमहालच्या प्रवेशद्वारापाशी पोचलो आणि त्या महिरपीत दिमाखानं उभ्या असलेल्या 'ताज'चं पहिलं दर्शन घडलं. तो क्षण शब्दांत पकडणं केवळ अशक्य आहे.

ऐरावताच्या शुभ्रतेतील मांगल्य,
पौर्णिमेच्या अगम्य चांदण्यातली हुरहूर,
'लता'च्या स्वरातील दिलासा आणि बेचैनी,
विश्वरहस्याच्या गाभ्यातली अपार अपार कोवळीक....

या साऱ्यांचे अर्थाभास संगमरवरात एकवटून पुढे आले आहेत असं वाटलं. इतकी तरल आणि धूसर सघनता मी त्यापूर्वी आणि त्या नंतरही पाहिली नाही. आणि मग मनापासून जाणवलं, आपल्या परम-प्रिय कविद्वयांनी जोरदार घोळ केला आहे. शहाजहान बादशहावरच्या त्यांच्या वाजवी-अवाजवी रागापायी त्यांनी बिचाऱ्या शिल्पकृतीला उगाचच धोपटलं आहे.

ताजमहाल शहाजहाननं बांधला हा ऐतिहासिक तपशील झाला पण ताजमहाल ही त्या अर्थानं ऐतिहासिक वास्तू नव्हेच मुळी ! रायगडची भग्न बाजारपेठ किंवा राजदरबार यांचे अवशेष पहाताना मनात 'इतिहास' जागा होतो. रूढ अर्थानं अवशेष न बाळगणाऱ्या राजगडावरदेखील त्याच्या द्रष्टया निर्मात्याचं वादळी आयुष्य मनात रुंजी घालू लागतं. दौलताबादचा किल्ला पाहताना विराट इतिहास-पुरुषच पाहतो आहोत असं वाटतं. कारण या साऱ्या वास्तूंना इतिहासाचा एक पुराणा उग्र गंध आहे. पण ताजमहाल ही कलाकृती मात्र आपल्याला ह्या सर्वांच्या पार नेते. स्थळकाळाचे हिशोब पुसून टाकते. मग भूत-भविष्य-वर्तमानाचे कंगोरे विरघळून जातात आणि लौकिकापासून उंच गेल्यासारखं वाटतं. इतक्या तरल निर्मितीला 'प्रेमाचं स्मारक' वगैरे म्हणणं हा देखील एक शाळकरीपणाच आहे. प्रत्येक अनुभवाला कसलं ना कसलं लेबल लावलंच पाहिजे का ?

मग मनात आलं. केव्हा तरी दस्तुरखुद्द कवींशी हे सगळं बोलायला पाहिजे. तेवढ्यात कुसुमाग्रजांचा 'स्वगत' हा कवितासंग्रह हाती आला. त्यातली 'ताजमहाल' याच नावाची मुक्तछंदातली नवी कविता वाचली आणि संतुष्ट होऊन मनातल्या मनात टुण्कन् उडीच मारली. ह्या मनकवड्या कविमंडळींचं हे एक असतं. ते दुसऱ्याला तोंड उघडायला संधीच देत नाहीत.

आता कधीमधी मनात पुनवेचं लख्ख चांदणं पडतं. त्या झुरमुरत्या चांदण्यातून आठवणीतला ताजमहाल जागा होतो आणि त्याच्या सोबतीला कवीचे बोल असतात–

संहारक अस्त्रांनी दुखावलेल्या
आकाशाच्या एका निवांत निर्मळ कोपऱ्यात,
द्वंद्वाच्या, क्षोभाच्या, अशांतीच्या
पलिकडे असलेल्या प्रदेशात,
उभा आहे हा विशुद्ध सौंदर्याचा संचय
एकाकी--
माणसाच्या पुनरुत्थानाची प्रतीक्षा करीत !

❋ ❋

॥ निरंकुशाची रोजनिशी ॥ नऊ ॥

## ॥ बंबई मेरी जान ॥

काही काही माणसं पहिल्या भेटीत आपल्याला अजिबात आवडत नाहीत. ओळख वाढल्यावर तर ती जास्तच नकोशी होतात आणि असं होता होता एका बेसावध क्षणी आपल्याला धबाक्कन् त्यांच्या प्रेमातच पडायला होतं. मुंबई शहराचं असंच आहे.

प्रथमदर्शनी मुंबई शहर हे केवळ दोनच तत्त्वांची भेसळ करून बनवलेलं वाटतं. घाम आणि गर्दी ! लहानपणी आमचं गाव सोडून मुंबईला जायचा प्रसंग सटीसामाशी गुदरायचा तेव्हा मी माझ्या साऱ्या प्रियजनांचा दाटलेल्या कंठानं 'तुमची आमची हेची भेटी' ह्या थाटा-मध्येच निरोप घ्यायचो. कारण मुंबईच्या त्या अवाढव्य दातेरी चक्रातून आपण जिवानिशी बचावून... गेला बाजार हातीपायी धड सुखरूप येऊ अशी मला मुळीच शाश्वती नसे. मुंबईत पोचल्यावरही सोबतच्या पालकांच्या धोतराचं अथवा कोटाचं टोक एका मुठीत घट्ट पकडूनच मी सर्वत्र भेदरलेल्या कोकरासारखा संचार करीत असे. आपल्याला ह्या मर्त्य जगाशी जखडून ठेवणाऱ्या 'जीवतंतू' इतकंच ते धोतराचं (अथवा लुगड्याचं) टोक माझ्या दृष्टीनं त्या क्षणी महत्त्वाचं असायचं. सोबतचे पालक बिचारे ओसंडत्या उत्साहानं मला राणीचा बाग, मत्स्यालय, गेटवे ऑफ इंडिया वगैरे वगैरे मुंबईतली 'सक्तीची' प्रेक्षणीय स्थळं दाखवीत असताना मला मात्र, त्या 'अर्जुनफेम' पोपटाच्या कंठासारखा माझ्या मुठीतला 'वस्त्राधार' तेवढा दिसत असे.– असेच एकदा मला एका वाघाच्या पिंजऱ्यासमोर उभा करून माझे पालक 'अपरिहार्य कर्तव्य' पार पाडण्याकरिता 'सार्वजनिक' ठिकाणी गेले. तर मी भलं

मोठं भोकाड पसरून तेच कर्तव्य मनात नसतानाही वाघाच्या साक्षीनं साजरं केलं.– तात्पर्य, मुंबई शहराची मला एवढी जबरदस्त धास्ती होती.

पण नियतीचा खट्याळपणा तरी पहा! मी 'व्यवसाययोग्य वयात आल्यावर' (ह्या शब्दयोजनेत काही तरी भयंकर घोळ झालाय– चाणाक्ष मंडळींनी त्यावर अधिक विचार करू नये) हिंदुस्थानचा एवढा उभा आडवा 'आसिंधुसिंधु' नकाशा सोडून तिनं नेमकं मला याच गदारोळात फेकलं. ही हकीकत तेव्हाचीच आहे. तेव्हा मी मुंबईत नुकताच राहू लागलो होतो. माझी कामाची जागा आणि माझं राहण्याचं ठिकाण ह्यांना जोडणारा एक बस रूट होता. त्यामुळं मी रोज फक्त त्याच रस्त्यानं नाकासमोर पहात ये–जा करायचो. (गेले ते सरळमार्गी दिवस!) काही कारणानं तो रस्ता जराही वेडावाकडा व्हायचा प्रसंग आला की मी कावराबावरा! अशा अवस्थेत एक पत्ता शोधून काढण्याची जबाबदारी माझ्यावर येऊन कोसळली.

एका मराठी ऑर्केस्ट्रावाल्या मंडळीला काही समारंभानिमित्त श्रीनिवास खळे प्रमुख पाहुणे म्हणून हवे होते. माझ्या दोस्तमंडळींची, मी मुंबईत गेलो म्हणजे एव्हाना अर्धी मुंबई मला 'हाय निरंकुश' म्हणून ओळखत असणार– अशी समजूत झाली असावी. ती 'गैर' असली तरी 'गो ऽ ऽ ड' ही असल्यानं दूर करायचंही माझ्या जिवावर यायचं. त्यामुळं एका रविवारी मी खळ्यांचं घर शोधायचा संकल्प सोडून बाहेर पडलो.

एक बडे नाट्यनिर्माते परिचयाचे होते. ते खळ्यांचा पत्ता सांगू शकतील म्हणून त्यांच्याकडे गेलो. तेव्हा ते सगळा लवाजमा घेऊन दौऱ्यावर निघत होते. तरी पण त्या गडबडीतही त्यांनी त्यांच्या एका हस्तकाला बोलावून सांगितलं– 'हे बघ, याला श्रीनिवास खळ्यांचा पत्ता चांगला नकाशा वगैरे काढून समजावून दे किंवा शक्यतो तूच त्याला घेऊन जा. तो मुंबईत नवीन आहे.' हस्तकानं तत्परतेनं होकार भरला. माझं काम इतकं सोपं होईल अशी माझी कल्पना नव्हती. मी अंमळ गहिवरलोच! नाट्यनिर्मात्यांची बस सुटली व पहाता पहाता

दिसेनाशी झाली. बस नक्की गेली अशी खात्री झाल्यावर ते हस्तक महाशय माझ्याकडे वळले आणि थंडपणे बोलते झाले. 'हे बघा निरंकुश-साहेब, खळ्यांचा पत्ता मलाही ठाऊक नाही. साहेबांपुढं हे कसं सांगणार ? पण मी तुम्हाला थोडं गाईड करू शकतो ! खळे चेंबूरला 'कुठंतरी' राहतात.'

लहानपणी, आमच्या गावचा कारखाना पहायला येणाऱ्या पाव्हणे मंडळींना आमचे गाईड– 'ते बघा चक्र फिरतंय' असं डोळ्यांना दिसणारंच पुन्हा शब्दात सांगून गाईड करायचे, त्याची मला आठवण झाली. तरी मी चाचरत विचारलंच. 'नाही, पण कुठं तरी म्हणजे नक्की... ?' 'म्हणजे बघा, शेल कॉलनी की काही तरी आहे, तिथं...' पुन्हा एक गोंधळयुक्त उत्तर ! एवंच– 'चेंबूरला कुठं तरी... शेल कॉलनी की काही तरी आहे... तिथं बहुधा...' इतक्या मौलिक माहितीनिशी मी मार्गस्थ झालो.

डोळ्यांपुढं सुरू होत असलेल्या '९० मर्यादित' रूटच्या बसमध्ये धावत पळत उडी टाकली आणि समोरच्याच माणसाला मुंबईच्या 'कॉस्मॉपॉलिटन' हिंदीत विचारलं, 'ये बस शेल कॉलनी जायेगी का नई ?' त्यानं माझ्याकडं करुणार्द्र दृष्टिक्षेप टाकून स्टॉपवर उभ्या असलेल्या '६ मर्यादित'कडे बोट दाखवलं. पुन्हा एकदा जीव मुठीत धरून मी चालत्या बसमधून उडी मारली आणि त्या दुसऱ्या नुकत्याच सुरू होणाऱ्या बसमध्ये (तिसऱ्यांदा) उडी घेतली. या गोंधळात एकच दिलासा मिळाला 'चेंबूरमध्ये शेल कॉलनी आहे !' वरच्या डेकवर जाऊन बसलो. सुटीचा दिवस म्हणून की काय, बसमध्ये मोजकी मंडळी होती. कंडक्टर जवळ येताच मी आत्मविश्वासपूर्ण स्वरात तिकिट मागितलं–'एक शेल कॉलनी' 'क्या बोला ?' हा शब्दसमूह प्रथम ऐकल्या-सारखा कंडक्टर खेकसला. 'शेल कॉलनी' – मी धीर सुटत चाललेल्या स्वरात पुटपुटलो. पहाता पहाता सारे सहप्रवासी या घोळात उतरले. 'शेल कॉलनी तो चेंबूर में नहीं'– एक ! 'वो बॉम्बे पूना रोडपे है'– दुसरा ! 'खोपोली के पास' – तिसरा ! आता यानंतर चौथं वाक्य 'शेल कॉलनी तो पूनामें है' असं देखील ऐकायची मी मनाची तयारी

केली होती. तेवढ्यात गोल टोपी घातलेले मायाळू चेहऱ्याचे एक बोहरी गृहस्थ माझ्याकडं वळले. 'शेल कॉलनी में आपको किससे मिलना है ?' 'श्रीनिवास खळे' मी माफीच्या साक्षीदारासारखा उत्तरलो. 'वो क्या बर्मा शेल कंपनीमे काम करते है ?'– आता हा संवाद कुठं जाणार तेच मला कळेना. 'नहीं, वो एच्. एम्. व्ही. के ऑफिसर है'– इति मी ! 'एच्. एम्. व्ही ? तो वो बर्मा शेलकी कॉलनी में कैसे रहते है ?'– 'वोही मैं उन्हे पूछने जा रहा हूँ !' माझ्या तुंबलेल्या सहिष्णुतेचा स्फोट झाला.

अखेर मी शेवटच्या स्टॉपला उतरलो. पुढं आलेल्या पहिल्या माणसाला असहाय्य स्वरात प्रश्न केला – 'शेल कॉलनीका नाम आपने जिंदगी में कभी सुना है ?' ह्यावर त्या माणसानं नाकासमोर हात करून 'सीधे चलते रहो मिल जायेगी' म्हणून सांगितलं. मी दैवाच्या अगाध लीलेचं कौतुक करीत एक टॅक्सी पकडली आणि तसाच हात दाखवून सांगितलं, 'शेल कॉलनी चलो !' टॅक्सी ड्रायव्हर म्हातारा सरदारजी होता. त्यानं स्टार्टर दाबला आणि पुन्हा इंजिन बंद करून माझ्याकडं वळून मला विचारलं, 'आपको कौनसी शेल कॉलनी चाहिये ? चेंबूर में वे दो हैं !'

'आँ ?' इतका वेळ शेल कॉलनीचं अस्तित्वच शंकास्पद होतं आणि आता एकदम दोन–? अनंतहस्ते कमलावराने...? मी सावरून विचारलं, 'दूसरी शेल कॉलनी कहाँ है ?' 'वहाँ, बहोत दूर–' डायवर-वाल्यानी पूर्ण विरुद्ध दिशेला हात दाखवला.

'अच्छा, तो वहाँ पहले चलो.'

'लेकिन आपका पता यहाँ होगा तो ?'– 'तो फिरसे यहाँ आयेंगे' आता मीही पेटलो होतो.

चेंबूर रेल्वे फाटकाशी वळताच शेल कॉलनीचा परिसर सुरू झाला. 'कहाँ रुकना है ?'... 'कहीभी रुको' जय सत्‌श्री अकाल... टॅक्सी अंदाजपंचे थांबवून उतरलो. पुढं आलेले पहिले गृहस्थ मराठी चेहऱ्याचे वाटले म्हणून बऱ्याच वेळानं मायबोलीचा आधार घेतला.

‘ माफ करा, आपण मराठी का ? ’– ‘ हो, कां ? ’ त्या तुसड्या स्वरातल्या ‘ कां ?’ या उद्‌गारानं ‘अमृताते पैजा जिंकणाऱ्या’ मऱ्हाटी बाण्याची खूण पटली. मी त्यांना माझी अडचण सांगितली. त्यावर त्याच तुसड्या स्वराची ‘ कंटिन्युटी ’ सांभाळून उत्तर मिळालं. ‘यापुढं तीन इमारती आहेत. त्यातल्या कुठल्या तरी एकीमध्ये, कुठं तरी मिळावेत. ’

मी चांगभलं म्हणून वळलो. मनातल्या मनात ‘ टॉस ’ केला आणि एका इमारतीत शिरलो. इकडं तिकडं न पाहता सरळ जिना चढून वर गेलो. एकाही दारावर पाटी नव्हती. तेव्हा पुन्हा एकदा ‘ टॉस ’ करून एक बेल वाजवली.

युगासमान काही क्षण गेले. दार उघडलं आणि मी बेशुद्ध पडायचाच राहिलो.

सुप्रसिद्ध ‘खळे स्पेशल’ प्रसन्न रुंद हास्य मुद्रेवर खेळवीत पुढ्यात साक्षात् श्रीनिवास खळे उभे होते.

आनंदाचे डोही आनंदतरंग
आनंदचि अंग – आनंदाचे ।।

❊ ❊

## ॥ सत्त्व ॥

मर्जीप्रमाणं अन्न, वस्त्र, निवारा, ऐहिक सुखं आणि स्थैर्य ह्या गोष्टी माणसाला पुरेशा असतात का? खरं म्हणजे नसतात. मानवी देहात 'मन' नावाचं जे काही आहे त्याला ह्या सर्वापलिकडं काही-तरी हवं असतं; पण सर्वसाधारण सूज्ञ माणसं त्या महामूर्ख मनाकडं शहाण्यासारखा काणाडोळा करतात आणि सुखी, यशस्वी वगैरे होत राहतात. काही माणसांना मात्र ते अव्यक्त असं जे काहीतरी असतं तेच महत्त्वाचं वाटतं. त्यासाठीच ती जगत असतात आणि क्वचित मरतात–देखील! निंबाळकर ह्यापैकीच एक! निंबाळकरच्या हकिकतीचा मी प्रत्यक्ष साक्षीदार नाही; पण आपल्या जन्मापूर्वीच्या किंवा कळतेपणापूर्वीच्या काही घटना उगीचच आपल्या आयुष्यात गुंतून जातात. तोच प्रकार इथंही आहे. कळू लागल्यापासून आजपर्यंत ही हकिकत मी इतक्या विविध कोनांतून ऐकली आहे की आज आठवायला बसल्यावर जणू काही मी ते सारं स्वतःच्या डोळ्यांनी पाहू लागलो आहे.

निंबाळकर म्हणजे, किर्लोस्करवाडीचा पस्तीस एक वर्षांपूर्वीचा 'सिक्युरिटी ऑफिसर' किंवा वाडीकरांच्या भाषेत 'फौजदार!' वाडीच्या ह्या संरक्षणखात्याचा इतिहास ही देखील एक मनोरंजक गोष्ट आहे. स्थापनेनंतरच्या आरंभीच्या काळात वाडीचं संरक्षण कोण करत असेल? औंध संस्थानातला, 'पिऱ्या मांग' नावाचा कुप्रसिद्ध दरोडेखोर! अनेक भयंकर गुन्ह्यांबद्दल तुरुंगात सजा भोगणाऱ्या पिऱ्याला नीट मार्गावर कसा आणावा ह्याची चिंता करणारे औंधाचे पंतप्रतिनिधी आणि त्यावर, गावाचा 'संरक्षक' म्हणून त्याला मागून घेणारे लक्ष्मणराव

किर्लोस्कर दोघंही थोरच ! त्या दोघांनी विश्वासानं सोपवलेली ही जबाबदारी पिऱ्यानंही त्याच विश्वासानं आणि जबाबदारीनं निभावून नेली.

यानंतरच्या काळात नागरी संरक्षणाची ही जबाबदारी प्रामुख्यानं नागरिकांनीच उचलली.मालकापासून सामान्य कर्मचाऱ्यांपर्यंत मंडळी आळीपाळीनं रात्रीची गस्त घालत, हातात भाले घेऊन ! अर्थात तसाच प्रसंग ओढवला असता तर त्या भाल्यांचा उपयोग नक्की कुणाला झाला असता— हा एक चिंतनाचा आणि (चिंतेचाही) विषय म्हणावा लागेल.

याखेरीज काही पोलीसही असत. कानापर्यंत जबडा फाकून, बेंबीच्या देठापासून 'आऽऽऽल् बेऽऽल' अशी आरोळी ठोकून जमेल तेवढ्यांच्या झोपा उडविणं हा त्यांच्या कामाचा एक महत्त्वाचा भाग ! कृष्णाप्पा पोलीस हे यापैकीच एक प्रकरण ! काळ्या पांढऱ्या झुपकेदार मिश्यांचा उंचापुरा, तगडा कृष्णाप्पा म्हणजे मायाळूपणा आणि धाक यांचं दुर्मिळ मिश्रण होतं. कितीही सावधपणे आणि गुप्तपणे उनाडक्यांचं प्लॅनिंग केलं तरी ऐन मोक्याच्या क्षणी, लंडनच्या बॉबीसारखा कृष्णाप्पा आपला नेमका टपकायचा. पोरांना पळता भुई थोडी ! शिवाय पळूनही उपयोग नाहीच. कारण कृष्णाप्पाला कुठलंही पोर—कोण, कुणाचं हे इत्थंभूत पाठ, त्यामुळं घरी रिपोर्ट होणारच ! अर्थात कधीकधी धाकट्याच्या खोडीसाठी मोठ्याला मुस्काटात खावी लागणं वगैरे 'तांत्रिक' गफलती व्हायच्या; पण नगाला नग मिळाल्याशी कारण !

निंबाळकरच्या येण्यानं संरक्षणाच्या 'गावठी' कारभाराचा नूरच पार पालटून गेला. पोलिसांची संख्या वाढली. परीटघडीचे गणवेष आले. डुगडुगत्या चौक्या जाऊन तिथं भक्कम चौक्या उभ्या राहिल्या. मुख्य चौकीला सुरेख रंगरंगोटी होऊन भोवती चक्क सुबक कुंड्यांची आरास मांडण्यात आली. नियमित कवायत सुरू झाली. तात्पर्य शेंदाड शिपायांच्या कळपाला आर्मीची झिलई चढली.

याचं कारण एकच— निंबाळकर मूळचा नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या आझाद हिंद सेनेमधला ! ते नुसतं पोटभरू सैन्य नव्हतं, एक

चळवळ होती, एक लष्करी संघटना होती, एका ध्येयानं भारलेली ! त्यातल्या लहानथोर प्रत्येक घटकाला जणू विजेचा स्पर्श झाला होता. नेताजींच्या मृत्यूनंतर झालेल्या वाताहतीत हा त्यातला एक स्फुल्लिंग भरकटत वाडीत येऊन पडला.

निंबाळकर वाडीत आला तेव्हा ऐन जवानीत होता. आयुष्याला सामोरा जाण्याचा जोश, उत्साह त्याच्यामध्ये ओसंडून खळाळत होता. जोडीला उपक्रमशीलता होती. उमदं व्यक्तिमत्त्व होतं. सिक्युरिटी ऑफिसर ह्या निर्जीव पदाला त्याच्यामुळं प्रतिष्ठा लाभली, ग्लॅमर आलं. कुठल्याही विशेष प्रसंगी तो त्याचा खास सैनिकी गणवेष चढवायचा. जणू काही तेवढ्या क्षणापुरता तो एक रुबाबदार सैन्याधिकारी बनायचा. त्याच ऐटीत टेचानं वावरायचा. थोड्याच दिवसात, रेठऱ्याच्या कुणा रूपवान मुलीशी त्याचं लग्न ठरलं. वाग्दत्त वधूला सोबत घेऊन तो गावभर मिरवलाच-- पण शाळेच्या साऱ्या वर्गांतून पोराटोरांच्याही सलाम्या घेत मोठ्या हौसेनं हिंडला. त्याचं लग्नही थाटामाटात पार पडलं. माझ्या वडिलांची आठवण अशी की अक्षता पडताच पाटावरून बाजूला होताना त्यानं धसमुसळेपणानं कपाळावरचं बाशिंग खेचून सहजपणे बाजूला फेकून दिलं. सुधारणेच्या आघाडीवर असलेली वाडीकर मंडळीही त्याच्या या उतावळ्या कृतीमुळं जरा गडबडलीच. त्याच्यातल्या भीतिदायक मनस्वितेची ही छोटीशी चुणुकच होती; पण एक निश्चित-- पूर्वायुष्यातील अस्थिरता संपून, निंबाळकर नव्या आयुष्याचा पाया भक्कमपणे जमवत चालला होता. इतक्यात--

महात्मा गांधींचा वध झाला. देशभर हलकल्लोळ झाला. त्यातूनच महाराष्ट्रात एक भयानक आंधळी वावटळ उठली. एक प्रचंड वणवा पेटला. त्याच्या अक्राळविक्राळ जिभा वाडीपर्यंत पोचू लागल्या. उबदार, सुरक्षित वाटणारं ते गाव एकदम असुरक्षिततेच्या भोवऱ्यात गरगरू लागलं. पेटत चाललेल्या झाडावरच्या घरट्यासारखी त्याची अवस्था झाली. जळून खाक व्हायला काही मिनिटंच पुरेशी होती. एक-दोन वेळा तो प्रसंग आलाही पण शं. वा. किर्लोस्कर आणि सहकाऱ्यांचं

धैर्य आणि धोरणीपणा यामुळंच तो टळला. पण अशी फार परीक्षा पहाण्यात अर्थ नव्हता म्हणून चालकांनी निर्णय घेतला. गावाच्या आणि कारखान्याच्या संरक्षणासाठी सैन्य बोलावण्यात आलं. मद्रासी आणि शीख अशा दोन पलटणी वाडीत हजर झाल्या. बघता बघता गावाला लष्करी छावणीचं रूप आलं.

गावकरी काहीसे निर्धास्त झाले; पण निंबाळकर मात्र पुरता बिथरला. आपल्या कार्यक्षेत्रात हे अपमानास्पद अतिक्रमण झालं असं त्याच्या मनानं घेतलं. त्याचे त्या मंडळींशी वारंवार खटके उडू लागले. शंवाकींनी त्याला परोपरीनं समजावलं, 'तुझ्या कर्तबगारीवर आमचा पूर्ण विश्वास आहे; पण संकट आपल्या आवाक्याबाहेरचं आहे म्हणून हा निर्णय घ्यावा लागलाय तेव्हा तुला त्यांच्याशी काय करायचंय? तू तुझं काम कर, ते त्यांचं करतील.'

पण निंबाळकर जिव्हारी दुखावला गेला होता. शिवाय आझाद हिंद सेनेत असताना तो ज्यांच्याबरोबर लढला, तेच सैन्य केवळ स्वातंत्र्य मिळताच स्वतंत्र भारतीय सैन्य म्हणून आपल्या नाकावर टिच्चून मिरवावं हा डंख त्याला सर्वांत अधिक असह्य झाला असावा. त्याची तगमग, तडफड चालूच राहिली, दिवसेंदिवस वाढतच गेली.

असेच दिवस संपत होते, वातावरणात ताण होताच. एका विचित्र दडपणाखाली वाडीकर झोपायचे आणि पोटात दचका घेऊनच जागे व्हायचे. गांधीवधानंतरची दहावी रात्र! अचानक मध्यरात्री एक स्फोट झाला. त्या आवाजानं दचकून गाव जागा झाला. तो आवाज बंदुकीच्या गोळीचा होता. थोड्याच वेळात त्या गोळीचाही अर्थ कळला.

मिलिटरीच्या मुख्य तळापाशी काळोखातून एक व्यक्ती आली. पहारा देणाऱ्या गार्डनं हॉल्ट म्हणून इशारा दिल्यावरही ती पुढंपुढंच येत राहिली. अखेर गार्डनं रायफल उचलून ट्रिगर खेचला, गोळी सणाणत सरळ छाती आरपार भेदून गेली आणि ती व्यक्ती कोसळली— तो निंबाळकर होता.

निंबाळकर किर्लोस्करवाडीत आला या गोष्टीला आता कुठं तीन महिने पुरे होत होते आणि त्याच्या लग्नाला तर अवघा एक

महिना! मांडलेला नवा कौतुकाचा संसार, जिवाभावाची पत्नी, समाधानी-निवांत आयुष्य आणि उजळणारं भविष्य हे सारं क्षणात झुगारून निंबाळकर स्वतःच्या पायांनी मृत्यूवर चालून गेला. त्याच्या डोळ्यात सलणारं ते अगांतुक लष्कर केवळ चार दिवसांचं पाहुणं होतं, पुढं निंबाळकरचे अधिकार अबाधितच राहणार होते; पण त्याच्या लेखी झालेल्या अपमानाची भरपाई केवळ प्राणांची किंमत चुकती करूनच व्हायची होती, त्याला कोण काय करणार ?

असल्या हट्टी, वादळी, मनस्वी मनाची रचना कशी असेल ?
या अनाहूत मरणाला काय नाव द्यायचं ?
दुर्दैवी अपघात ?
अविचारी आत्मघात ?
की, वेडं हौतात्म्य ?

❊ ❊

## ॥ मुनीर हुसेन ॥

'मुनीर हुसेन' हे नाव मी प्रथम ऐकलं ते 'रेडियो पाकिस्तान' वर ! रेडियो ऐकणं हा एकेकाळी माझा श्वासोच्छ्वास होता. शाळेत ८ वी, ९ वीत असताना केव्हा तरी माझा हा दुसरा श्वासोच्छ्वास सुरू झाला. 'अहो येता, जाता, उठत, बसता, कार्य करता' मी रेडियो ऐकायचो. 'अभ्यास करणे' याविषयी माझा फारसा दुर्लौकिक नव्हताच. पण जो काही थोडा बदनामीपुरता अभ्यास चालायचा तोही रेडियोच्या पार्श्वसंगीतावर !

आकाशवाणीच्या पुणे, मुंबई वगैरे केंद्रांच्या वाटेला मी कधी-कधीच जात असे. माझं ऐकणं म्हणजे मुख्यतः रेडिओ सीलोन ! खरोखर आज आठवताना कौतुक वाटतं–दिवसभर केवळ ध्वनिमुद्रिका ऐकवायच्या; पण त्या ऐकवण्यातही किती वैविध्य ! 'पुरानी फिल्मों के गीत', 'शीर्षक संगीत', 'अनोखे बोल', 'बदलते हुए साथी', 'आपके गीत', 'मेरी पसंद', 'एक और अनेक', 'एक गीतकार', 'एक संगीतकार', आणि तो रविवार रात्रीचा अविस्मरणीय 'आपके अनुरोधपर !' प्रत्येक कार्यक्रमाचा बाज निराळा, पेशकारीचा अंदाज निराळा आणि प्रत्येक कार्यक्रमाचं 'टायटल म्युझिक'ही स्वतंत्र वेगळं ! 'कौशल्य सारे रचनेत आहे.' या सुभाषिताचा–प्रत्येक कार्यक्रम म्हणजे साक्षात् अनुभव !

'लता मंगेशकर' नावाचा 'प्राणवायु' या कार्यक्रमांतूनच आमच्या आयुष्यात झिरपला तो आमच्या अखेरच्या श्वासापर्यंत आम्हाला पुरणार आहे, जोडीला आशा भोसले, महंमद रफी, गीता

दत्त, मन्ना डे, मुकेश, तलत महमूद, किशोर कुमार (तेव्हाचा) ही मंडळीही रेडियो सीलोनच्या वाटेनंच आमच्या काळजात वस्तीला आली. संगीतकार हुस्नलाल, भगतराम, अनिल विश्वास, सज्जाद, सी. रामचंद्र, नौशाद, शंकर-जयकिसन, एस. डी. बर्मन, सलील चौधरी, मदनमोहन, रोशन असा तो गोतावळा मग वाढतच चालला, आणि त्या साऱ्यांची आपल्या मिठ्ठास वाणीनं ओळख करून देणारे गोपाल शर्मा, शिवकुमार सरोज, शीला तिवारी हे निवेदकही आप्तासारखे वाटू लागले इतकंच कशाला रोज रेडियो सीलोन मिटताना ऐकवलं जाणारं 'अब श्रीऽऽऽलंका णमो णमो णमो णमो माता' हे सीलोनचं राष्ट्रगीतही तेव्हा मला तोंडपाठ झालं होतं.

याच वेडया वयात एके दिवशी दुपारी ३-३० च्या सुमाराला मला अचानक रेडियो पाकिस्तान 'सापडलं'. कोलंबसाला अमेरिका सापडावी तसं ! मग रोज दुपारी तोच छंद—'मगरबी पाकिस्तान की स्टँडर्ड टाईम के मुताबिक' रेडियो पाकिस्तान लावायचं आणि मिठ्ठास उर्दूतील निवेदनाच्या सोबतीनं नूरजहाँ, सलीम रझाक, एस. बी. जॉन, माला, इक्बाल बानू, हबीब वली यांच्या मधाळ स्वरात डुंबायचं ! या उत्सवात एके दिवशी एक अवीट गाणं ऐकलं.

'करार लूटनेवाले तू प्यार को तरसे
मेरी वफा को, मेरी एतबार को तरसे'

विव्हल हृदयाची ही शापवाणी गात होता—मुनीर हुसेन !

आपल्याकडील गायकात मला तलत महमूदचा चांदणं बरसल्यासारखा मुलायम, रेशमी आवाज त्या काळी फार आवडायचा ! मुनीर हुसेनच्या आवाजाची जातकुळी काहीशी तशीच—पण अधिक दर्दभरी, अधिक उत्कट ! हळुवारपणा आणि तीव्रता यांचं मजेदार मिश्रण म्हणजे मुनीर हुसेन ! 'करार लुटनेवाले' रेडियो पाकिस्तानवर वरचेवर लागायचं. पुढं पुढं ते सीलोनच्या 'आपके अनुरोधपर' मध्येही बरेचदा ऐकायला मिळालं. गंमत म्हणजे, या एका गीताखेरीज मुनीर हुसेनचं मी दुसरं काहीही ऐकलं नाही. आणि तरीही त्या अवघ्या एका गीतानंच—'ये शख्स अपनी तो जहन में घुस गया।'

पुढं पुण्याला आलो. रेडियोची श्रवणभक्ती मागं पडली. पण पुण्यात दुसरा खजिना सापडला–फर्ग्युसनजवळचं 'स्वरविहार!' पूर्वी रेडियोवर आवडतं गाणं ऐकायला मिळणं हा अपघात असायचा. पण 'स्वरविहार'मध्ये गेलं की, माफक दरात आवडत्या गाण्यांचं 'सचैल स्नान' गॅरंटीवर घडायचं. त्या काळात आमचा तर तिथं चक्क तळच पडलेला असायचा. लता मंगेशकरांची गाणी म्हणजे न संपणारं रत्न-भांडार! तेव्हा दरवेळी त्यातली नवनवीन रत्नं वेचून काढायची आणि त्यांच्या सोबतीला तीन गाणी कायमची–नूरजहाँचं 'अब यहाँ कोई नहीं कोई नहीं आयेगा' एस. बी. जॉनचं 'तू जो नहीं है तो कुछ भी नहीं है' आणि मुनीर हुसेनचं 'करार लूटनेवाले'...

ते खुळे, कोवळे दिवसही संपले आणि मुंबईच्या जंगलात घुसलो. पुन्हा एकदा सगळे संदर्भ बदलले. एक वेगळाच नशा चढला.

ती गाणी, ते खुळेपण संपलं नाही.
फक्त तळाला जाऊन बसलं आणि वरून
काळाच्या धुक्याचे लोट अनावरपणे वहात राहिले.

वसंतराव जोगळेकरांच्या 'जानकी' या चित्रपटाची गीतं लिहीत होतो. संगीतकार होते हृदयनाथ मंगेशकर! त्या कामानिमित्त 'प्रभुकुंज'वर बसलो होतो. दुपारची वेळ–हॉलमधल्या कोचावर एक अनोळखी जोडपं अवघडून बसलं होतं. पुरुष मध्यवयीन, काळ्या रंगाचा, सामान्य व्यक्तिमत्त्वाचा–बाई थोडी पुरुषी, गौरवर्णी पण व्यक्तिमत्त्वविहीन!

थोड्याच वेळात तिथं हृदयनाथ–बाळासाहेब मंगेशकर आले आणि त्या पुरुषाशी बोलू लागले. त्यांच्या बोलण्यात ओलावा जाणवत होता, आपुलकी होती. हिंदीत चाललेल्या त्या संवादानं माझं लक्ष वेधून घेतलं. कारण बाळासाहेब विचारत होते 'आपने यहाँ की फिल्मों के लिये कभी गाया है?' त्या पुरुषानं नकार दिल्यावर ते पुढं म्हणाले, 'मुझे मौका मिला तो मैं आपको जरूर बुलाऊंगा, आप बहोतही अच्छे गाते है ...'

माझं कुतुहल चुळबुळ करू लागलं, 'हा गायक कोण, कुठला?'

तेवढ्यात त्यांनी माझी त्या पुरुषाशी ओळख करून दिली. पण त्याची ओळख सांगताना ‘ आप पाकिस्तान के मशहूर गायक है ’ एवढं बोलत असतानाच काही तरी होऊन ते वाक्य अर्धंच तुटलं. त्या शब्दांनी एव्हांना माझं कुतुहल पूर्ण चाळवलं होतं. ‘ कोण बरं असेल हा ? एस. बी. जॉन ? सलीम रझाक ? की... ’ मी न राहवून विचारलंच, ‘ जी, आपका शुभनाम ?’– त्या पुरुषानं डोळे उचलून त्रयस्थ नजरेनं माझ्याकडं पाहिलं आणि अनिच्छेच्या स्वरात नाव सांगितलं– ‘ मुनीर हुसेन ! ’ मी ‘ प्रभुकुंज ’च्या छतापर्यंत उडालो. उतावळचा स्वरात म्हणालो, ‘ याने...याने ..आपही करार लूटनेवाले ?’– आता छता-पर्यंत उडायची पाळी त्याची होती. थोडयाच वेळात बाळासाहेबांच्या छोटचा खोलीत एक मैफिल जमली. हृदयनाथ, भारती, उषाताई, मीनाताई ही घरचीच मंडळी होती. पुढचात साक्षात् लताबाई बसल्या होत्या. आणि कधीकाळी रेडियोच्या खोक्यातून भेटलेले शब्द, सूर आणि गायक समोर साक्षात् सजीव रूपात मी ‘ याची देही, याची डोळा ’ पहात होतो. हार्मोनियमच्या केवळ ‘ कॉर्डस् ’च्या साथीवर मुनीर हुसेन डोळे मिटून गात होता–

‘ खुदा करें तेरा रंगीन शबाब छिन जाये
तेरी शराबे जवानी खुमारको तरसे
करार लूटनेवाले तू प्यारको तरसे... ’

मी स्वतःला सणसणीत चिमटा काढून पाहिला आणि मग स्वतःलाच विचारलं, ‘ हा मुनीर हुसेन, या लताबाई, हे प्रभुकुंज हे सगळं सत्य आहे. पण बेटचा, कुठल्या पुण्याईनं तू ह्या क्षणाचा साक्षी आहेस रे? ’

एक मात्र जाणवत होतं– मुनीर हुसेनची परिस्थिती चांगली नसावी. कलावंत लाचारीच्या पायरीपर्यंत येणं यासारखं दुसरं दुर्दैव नाही. मला दिसलेला मुनीर हुसेन त्या दिशेकडं झपाटचानं चाललेला होता. लताबाई, हृदयनाथ प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्याच्याकरिता आपल्या परीनं खूप काही करताहेत, हे त्या ओझरत्या प्रसंगातूनही जाणवलं. पण शेवटी, ज्याचा तोच असतो– त्यानंतर मुनीर हुसेनची भेट झाली नाही. त्याची काहीच खबर कळली नाही.

पाकिस्तानचे मेहदी हसन, गुलाम अली हे गुणवंत आणि भाग्यवंत कलाकार दिमाखात भारतात आले आणि कौतुक, प्रसिद्धी आणि संपत्ती यांची लयलूट करीत परत गेले. नूरजहाँचं येणं हा तर एक इतिहासच घडला. त्याच भूमीचा भाग्यहीन मुनीर हुसेन मात्र नुसताच आला नि गेला... की कुणास ठाऊक, मुंबईच्या बिनचेहऱ्याच्या गदारोळात आपला चेहरा हरवून अजूनही वणवण हिंडतो आहे ?

‘जब गुनको गाहक मिले
तब गुण लाख बिकाय
जब गुनको गाहक नही
कौडी बदले जाय...’

* *

**मुनीर हुसेन**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९२३
ग्रा.क्र. २४७२६
निबंध
३०।१०।७४
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

## ॥ एक आषाढ—शब्दांचा ! ॥

'नेमेचि येतो मग पावसाळा' ह्या साध्यासुध्या ओळीतून आपल्याला बालपणी आषाढाची पहिली ओळख होते आणि वाढत्या वयाबरोबर ती ओळख अधिक दाट, गहिरी होत जाते– आषाढाच्याचा घनदाट पावसासारखी ! 'आषाढस्य प्रथम दिवसे' म्हणणाऱ्या कालिदासापासून; कवी आणि कलाकारांच्या अगणित पिढ्या आषाढाचं उत्तेजक आव्हान झेलीत राहिल्या आणि पुढंही राहतील, पण ते आव्हान मात्र नवजात अर्भकासारखं सदैव ताजं, कोवळंच राहणार आहे. आपल्या मनात सुरू होऊन क्षितिजापर्यंत पसरत जाणारी अमर्याद तलखी आणि एका हव्याहव्याशा क्षणी त्यावर कोसळणारा धुंवाधार पहिला पाऊस, हे आपल्या आयुष्यातल्या अनेक अनेक अनुभवांचं प्रतीक बनलंय् ते यामुळंच !

वठलेल्या फांद्या होत्या
परवा परवा
आभाळ कोरडे होते
परवा परवा
नादला एकदा 'आषाढाचा झाला'
झाडांतुन
हिरवा पाउस दाटुन आला

ही अवस्था केवळ बाहेरच असते, असं नाही. खोल मनातही हा हिरवागार पाऊस बरसत असतो– ही किमया आषाढाचीच !

कशाचीही तमा न बाळगता; अशा अनेक आषाढांची मनःपूर्वक कदर करीत गेलो म्हणून की काय– 'बोनस' मिळावा तसा एक जादा आषाढ गेल्या वर्षी माझ्या वाट्याला आला आणि तोही, पंचांगाचे सारे नियम धाब्यावर बसवून ऐन फेब्रुवारी महिन्यात– म्हणजे चक्क माझ्या जन्ममासात ! माझ्या एकट्याच्याच मस्तकावर सुमारे महिनाभर बरसलेला तो वाटचुकार, उनाड आषाढ 'शब्दांचा' होता.

'शब्दांचं' म्हणून काही वेगळं 'भान' तुम्हाला आहे का ? मला तरी नव्हतं. काय गंमत आहे ! शब्दांचा केवढा अवाढव्य प्रपंच आपल्याभोवती पसरलाय याची आपल्याला जाणीवच नसते. पुस्तकात भेटतात, भाषणातून कानावर पडतात, एकूण अक्षरात जमा होतात तेवढेच 'शब्द' म्हणून आपण पहात असतो. पण एरवीचे, रोजच्या व्यवहारातले बेहिशेबी, असंख्य शब्द. . . त्यांचं काय ? ते कुठून येतात ? कुठं जातात?– हवेतल्या अणुरेणुइतके हे अगणित शब्द आपल्याभोवती वावरतात आणि त्यांच्यातून वाट काढत; नव्हे, त्यांच्या आश्रयावरच आपण जगत असतो. मात्र, याची जाणीव आपल्याला नसते. कारण हे शब्द आपल्याला श्वासोच्छ्वासाइतके सहज आणि अपरिहार्य वाटतात. आपल्याला जिवंत ठेवणाऱ्या श्वासाचं भान जसं आपल्याला नसतं, तसंच या शब्दांचंही!

मी तर शिष्टासारखा कित्येक दिवस शब्दांकडं पाहून उपहासानं नाक उडवायचो. (तेही 'माझं' नाक–बापरे ! ) 'रंग', 'सूर' या वश न झालेल्या मंडळींचा अनुनय करायच्या नादात शब्दांना येता-जाता झोडपायचो. शब्द, 'पोकळ' असतात, 'मातीचे' असतात, ते आशय 'पातळ' करतात असली पोपटपंची एकीकडे करायचो आणि तरीही, पुन्हा शब्दांवरच जगायचो. कहर म्हणजे शब्दांचे हे अवमूल्यन करायलाही पुन्हा मला शब्द लागायचेच.

खरं म्हणजे -- कधी काळी पहिली भूल पडली ती शब्दांचीच होती. कविता प्रथम आवडू लागली म्हणजे तरी काय झालं ? तर शब्दांचा झिम्मा आवडला आणि मग त्यांचाच पिंगा मनात सुरू झाला. अजूनही तोच खेळ सुरू आहे. आजही कुठल्याही कवितेचा आशय नंतर हळूहळू मनात झिरपतो आणि उरतोही. पण पहिल्या क्षणी डोळे

मिचकावून खुणावतात ते शब्दच ! अशा तऱ्हेनं शब्दांना नाकारीत पण त्याचवेळी शब्दांवर स्वतःच्याही नकळत प्रेम करीत मी चालत राहिलो आणि अवचित शब्दांच्या बाजारातच जाऊन पडलो.

चित्रपटाची गीतं लिहिणं ही एक सत्वपरीक्षाच असते. मनःपूर्वकता, स्वाभाविकता आणि कारागिरी या तीन आघाड्यांवर एकाच वेळी लढावं लागतं आणि त्याच वेळी आत कुठंतरी कवितेचा धर्म जपायचा हट्टही असतो. त्यामुळं भट्टीत सोनं तावून सुलाखून निघावं तशी शब्दांची आणि आपलीही कसोटी लागते. या अग्निदिव्यात एक थरार असतो तशीच विचित्र कुचंबणाही असते. त्या अनुभवातून तेव्हा मी चाललो होतो. शिवाय, खूपच दिवसात 'स्वांतःसुखाय' काहीच लिहिलं गेलं नव्हतं. म्हणजे -- लिहिलं गेलंच पाहिजे ही सक्ती कधीच मानली नव्हती. तरी पण--'कवितेच्या हाती हात दिलेला होता गर्दीत सोडला हात, हरवलो पुरता' असं काही झालंय की काय ? ही शंका छळत होतीच. एकूण वर सारं कुशलक्षेम असलं तरी आत कुठं तरी जबरदस्त मंथन चाललं होतं आणि एके दिवशी मुंबापुरीतल्या भव्य सकाळी--

दोन दोस्तांशी गप्पा ठोकत बसलो असताना मी सहज विधान करावं तसा बोलून गेलो,

शब्दांना नसते दुःख
शब्दांना सुखही नसते
ते वाहतात जे ओझे
ते तुमचे-माझे असते

ऐसपैस पसरलेले दोस्त ताड्कन उठून बसले आणि टवकारून पाहू लागले. मलाही जाणवलं, हे काही तरी मजेदार वेगळं घडतंय. शब्दांच्या येणाऱ्या आषाढाची ती पहिली चुणुक होती आणि इथून तो थरारक अनुभव सुरू झाला. एकटेपणी, रस्त्यावर, गर्दीमध्ये, बसमध्ये, गाडीमध्ये, मित्रमंडळींच्या घोळक्यात, कुठंही असो– आतून एक घुमारा खोल घुमत रहायचा आणि मनामध्येच शब्दांच्या 'सरीवर सरी' झडायच्या. प्रत्यक्ष कागद लेखणीशी त्यांचा संबंध बऱ्याच वेळानं केव्हा तरी यायचा; पण मनातला आषाढ त्यासाठी थांबत नव्हता.

आणि एक गोष्ट लक्षात आली– येणाऱ्या चार ओळी ही एकच स्वतंत्र कविता असायची. ' शब्द ' हे एक सूत्र सोडलं तर दुसरी कसलीही एकसूत्रता त्या कवितांना नसायची. प्रत्येक चौकट हा एक स्वयंपूर्ण अनुभव ! जणू एखादा छोटासा ' स्फोट ! ' कोऱ्या आकाशात एक एक चांदणी, कधी या कोपऱ्यात तर कधी त्या कोपऱ्यात– अलगद उमटत जावी तसा हा खेळ चालला होता. कधी नव्हे ती मीही एक शिस्त पाळली. संधी मिळेल तशा मी त्या ओळी डायरीत टिपत गेलो आणि सोबत; जिथे असेन ते ठिकाणही– आज इतक्या काळानंतर ती डायरी बघताना फार मौज वाटते आहे. अरुण काकतकरच्या खोलीत एकटाच बसलो होतो–

शब्दांच्या आकाशात
शब्दांचे मेघ भरावे
शब्दांचे क्षितिज धराया
शब्दाचे भिंग करावे

सुधीर फडक्यांच्या घरी गप्पागोष्टी चालल्या होत्या.

शब्दांचा शीण हराया
शब्दांची शेज करावी
शब्दांची गुंफुन स्वप्ने
शब्दांची नीज विणावी

दादर स्टेशनच्या ' फर्स्टक्लास ' (पण प्रत्यक्षात थर्डक्लास) वेटिंग-रूममध्ये कंटाळवाणी प्रतीक्षा भोगत होतो.

शब्दांना कुंपण जेथे
शब्दांची तिथवर धाव
शब्दांच्या गावाआधी
शब्दांची बुडते नाव

पुण्याला येणाऱ्या डेक्कन क्वीनची बांधलेली लय--

शब्दांच्या रानामधुनी
शब्दांची व्याकुळ शीळ

शब्दांना बहुधा स्मरली
शब्दांची संध्याकाळ

पुण्यातली एक रिकामी दुपार--

शब्दांच्या कुंद दुपारी
शब्दांचे जळ साकळते
शब्दांच्या शून्य दुपारी
शब्दांचे मृगजळ हलते . . .

कुरुक्षेत्रावरच्या कृष्णासारखा--विराट रूपात, ‘ शब्द ’ जणू साक्षात् पुढं उभा ठाकला होता आणि भांबावलेल्या अर्जुनासारखा मी शब्दांचे स्फुल्लिंग जिवाच्या आकांतानं वेचीत होतो. त्या लागलेल्या तंद्रीला मी नावही दिलं-- ‘ शब्दधून ! ’ शब्दधून लिहिली या गोष्टीला दीड वर्ष झालं. योग असेल त्याप्रमाणं ती पुस्तकरूपानं बाहेर पडेलही. पण आज उगाचच मला ‘ शब्दधून ’ची तंद्री लागलेले ते दिवस फार तीव्रपणे आठवताहेत. आपल्या हातून काही ‘ अपूर्व, अद्‌भुत ’ निर्माण झालंय असं मानण्याइतका मी ‘सुखी भाबडा’ नाही. माझ्यापुरती मला अपूर्वाई आहे ती केवळ निर्मितीच्या त्या अनोख्या प्रक्रियेची ! तिनं माझं जणू एक प्रकारचं ‘ डायॅलिसिस ’ केलं. अंतर्बाह्य धुवून उलटा करून कोवळ्या उन्हात टाकलेल्या कपड्यासारखा एक निर्मळ अनुभव मला मिळवून दिला. आपल्या मनाची डहाळी बदलत्या ऋतूत वठू शकते तशीच आषाढाचं ‘ हिरवं दान ’ झेलूही शकते हा विश्वास दिला आणि आयुष्यभर पुरेलसा एक ‘ वसा ’ ही दिला--

‘ शब्दांना मुहूर्त नसती
शब्दांना शकुन नसावे
शब्दांकित संन्यस्ताने
शब्दांना फक्त स्मरावे !

❊ ❊

## ॥ मुशायरा ॥

साहिर लुधियानवीच्या 'ताज' ह्या कवितेनं मला उर्दू कवितेच्या अलिशान उद्यानाची वाट दाखवली. एरवी, पुण्या-मुंबईपासून दूर वसलेल्या आणि लोखंडी कारखान्याच्या खेडेवजा गावात राहणाऱ्या सर्वसामान्य मराठी मुलाच्या मनात उर्दू कवितेचा 'माहौल' घमघमत रहायचं काहीच कारण नव्हतं. एकीकडं, राष्ट्रभाषा परीक्षेच्या शिक्षकांचे 'यह' 'वह' असले (व्याकरण) शुद्ध तुपातले उच्चार आणि दुसरीकडं गावठी मुसलमानांचं 'मैं पडचा, मैं बोल्या' असलं भेसळयुक्त 'मिरजी' हिंदी- ह्या कचाटचात जगणाऱ्या गरीब बापडचाला खानदानी 'लखनवी' उर्दूनं पापणी लववून का बरं खुणवावं ? (वडलांच्या बदलीमुळं, जन्मानंतरचं पहिलंच वर्ष अस्मादिकांना लखनौत काढावं लागलं, हे तर ह्यामागचं कारण नसेल ? अजाणतेपणी संस्कार घेण्याचा मक्ता काय फक्त अभिमन्यु, शिवाजी वगैरे मंडळींनाच दिलाय ?)- तर अशा तऱ्हेनं उर्दू कवितेच्या मुलखातली माझी बेशिस्त मुशाफिरी तेव्हा सुरू झाली ती आजतागायत चालूच आहे. अर्थात त्या विषयात अधिकारवाणीनं काही सांगण्या-बोलण्याची पात्रता माझ्याकडं तिळमात्र नाही हे प्रांजळपणे कबूल करायला हवं. कारण, माझी त्या बाबतीतली भूमिकाच मुळी अनोळखी प्रदेशात हिंडणाऱ्या अनभिज्ञ पण उत्सुक एकांडचा शिलेदारासारखी आहे. शिवाय मी उर्दू कवितेला भेटत आलो तो प्रामुख्यानं पुस्तकातून आणि तेही शब्दार्थांच्या कुबडचांचा वापर शक्य तितक्या माफक प्रमाणात करीत ! नाही म्हणायला एकदाच एक मुशायरा नावाचा 'हंगामा' जवळून अनुभवायची संधी मला अनपेक्षित

रीतीने मिळाली आणि तीही नुसता श्रोता म्हणून नाही तर मुशायऱ्यात सहभागी होणारा कवी म्हणूनही ! त्याचं असं झालं--

तीन-चार वर्षांपूर्वी मी गोयल सिने कार्पोरेशनमध्ये सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करीत होतो. तंत्रज्ञ मंडळींच्या टीममध्ये श्रीखंडे, इंगळे असा एखाददुसरा अपवाद वगळता बहुतेकजण अ-मराठीच होते; पण माणूस आपलासा करण्याच्या त्यांच्या खास अ-मराठी हातोटीमुळं, स्वतः देवेंद्र गोयल, केकी मिस्त्री, खान, इर्शाद, मुश्ताक जलीली, अन्वर इत्यादी मंडळींमध्ये मी बघता बघता फिट्ट बसून गेलो. कैसर उस्मानी हे त्यातलेच एक ! गोयल सिनेचं जाहिरात विभागाचं काम ते पहायचे. शिवाय 'कंटिन्युटी बुक' लिहिणं वगैरे निमित्तानं सेटवरही यायचे. ते स्वतः चांगले लेखक आणि कवीही ! त्यामुळं शूटिंगमधल्या रिकाम्या वेळात त्यांच्याशी झकास गप्पा रंगायच्या. कसा कोण जाणे; पण मी मराठीतला कवी वगैरे असल्याचा त्यांना सुगावा लागला आणि त्यातूनच मुशायऱ्याचं निमंत्रण माझ्याकडं चालून आलं.

मालाडच्या 'अदबी संगम' नावाच्या साहित्यसंस्थेनं हा जंगी मुशायरा आखला होता. हिंदी-उर्दूतील अनेक नव्याजुन्या कवींबरोबर कैफी आजमी, खुमार बाराबंकवी इत्यादी बुजुर्ग मंडळी हजेरी लावणार होती आणि समारंभाचे प्रमुख अतिथी होते, साहिर लुधियानवी ! या मुशायऱ्यात मराठी कवी ह्या नात्यानं उपस्थित रहाण्याचं निमंत्रण माझ्यावर गुदरलं. मराठी कवितेचं प्रतिनिधित्व वगैरे करण्याच्या भाबड्या कल्पनेनं नव्हे तर प्रख्यात उर्दू कवींना, विशेषतः साहिरना जवळून प्रत्यक्ष ऐकायला मिळणार या लाभासाठी मी 'नेकी और पूछ पूछ ?' म्हणत होकार दिला.

मालाडच्या एका प्रशस्त पटांगणात मुशायऱ्याची चांदणी रात्र निवांत मांडी ठोकून विराजमान झाली. तिच्या पाठोपाठ बघता बघता सारं पटांगण, आपल्या सवाई गंधर्व सोहळ्याची आठवण व्हावी, असं फुलून गेलं. एवढा प्रचंड जनसमुदाय नटुनथटून 'कविता' ऐकायला जमलेला पाहून माझा कंठ भरून आला. मुख्य म्हणजे तो जमाव केवळ लब्धप्रतिष्ठितांचा किंवा पांढरपेशांचा नव्हता. टॅक्सीवाले आणि ओझी

वहाणाऱ्यांपासून समाजाचे सारे थर तिथं एकवटले होते. त्या रात्री ९॥ पासून दुसरे दिवशी पहाट फुटेतो हा प्रचंड जनसंमर्द आपली जागा सोडून हलला नाही. फक्त एका विलक्षण चैतन्यानं जागच्या जागी उसळत राहिला आणि कवितेनं सामान्य माणसाला आपलंसं करण्याचा एक दुर्लभ अनुभव वारंवार देत राहिला.

त्या रात्री पेश झालेली सारीच शायरी आणि तिला मिळणारी दाद ही अव्वल दर्जाची होती असं नाही. 'प्राप्ते तु षोडषे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत्' हे सूत्र लागू पडणाऱ्या एका युवतीला मिळालेली दाद-ही तिच्या शायरीसाठी नव्हती हे समजण्यासारखं होतं. त्यात तिनं, 'दिलका मुआमला है, कोई दिल्लगी नही' ही जुनी पुराणी ओळ दडपून स्वतःच्या नावावर खपवल्यावर माझी मराठी अस्मिता चुळबुळ करू लागली होती; पण जवळ बसलेल्या ज्येष्ठ कवींनी मला डोळा घालून गप्प बसवलं आणि चाललेल्या 'वाहवा'च्या गदारोळात आपलाही आवाज मिसळला. तेव्हा माझ्या लक्षात आलं की आजची इथली भूमिका केवळ आनंद लुटण्याची आहे, शंकाकुशंका काढायची नाही. मग मीही त्या निखळ उत्साहाच्या पावसात भिजत राहिलो. शिवाय या साऱ्यातून बांधला जाणारा चढत्या रात्रीचा चढता टेंपो लाजवाब होता आणि जेव्हा खरीखुरी अस्सल शायरी पेश व्हायची तेव्हा मिळणारी भरतीच्या अनावर लाटेसारखी दाद 'छप्पर फाड के' म्हणतात तशी कोसळत रहायची.

एक बोलघेवडा प्रसन्न तरुण संपादक मुशायऱ्याचं संचालन करत होता. अतिशय हजरजबाबी चातुर्यानं आणि तरीही नेमका अंदाज घेत, कसलेल्या जादुगारासारखी त्याची गुंगवत ठेवणारी बडबड अविश्रांत चालली होती. खरं म्हणजे, समारंभ सुरू होऊन दोन एक तास लोटले होते तरीही अजून खुमार बाराबंकवी आणि साहीर यांचा पत्ता नव्हता; पण याच्या मजेदार बोलण्यामुळं ती उणीव न वाटता, उलट त्यांच्या आगमनाची जणु हवाच तयार होत होती. असाच काहीतरी किस्सा सांगता सांगता अर्धाच टाकून तो एकदम उल्हसित स्वरात ओरडला 'बघा, बघा, आपल्या हृदयातली हाक एवढी तीव्र होती की

ती थेट मद्यशाळेपर्यंत पोचली. और, देखिये । खुमारसाहब आ रहे हैं।' टाळ्यांच्या गजरात झेपावत खुमार बाराबंकवी आले आणि त्यांनी मंच ताब्यात घेतला. त्या दिवशी खरी बाजी मारली, त्यांनीच! 'तस्वीर बनाता हूँ, तस्वीर नहीं बनती' या तलतच्या गाण्यामुळं कधीकाळी ओळखीचा झालेला हा कवी आज मी प्रत्यक्ष पहात, ऐकत होतो. त्याची कविता सोपी, सरळ काळजाला भिडणारी होती. आवाज खुला, मधुर होता आणि पेशकारीतला आक्रमक आत्मविश्वास भीमसेन जोशींची आठवण करून देणारा होता.

पण या सर्व जल्लोषात माझे डोळे लागले होते, साहिरच्या येण्याकडं! अखेर मध्यरात्रीच्या मध्यावर केव्हातरी साहिर लुधियानवींची 'नाटचमय' एंट्री झाली. त्यांची 'तरंगती' अवस्था ५०,००० फुटांवरची होती. ते घोळक्यातून लडखडत आले आणि मंचावरल्या मधल्या लोडाला रेलून तसेच गुंगीत बसले. मुशायरा अर्थातच चालूच होता. गंमत म्हणजे, व्यासपीठावरील किंवा श्रोतृसमुदायातील समस्त मंडळी कशी निवांत होती. जणू काही सारं सारं ठरल्यासारखंच घडत होतं. तसा मलाही धक्का बसायचं काहीच कारण नव्हतं. फक्त, आपल्या आवडत्या कवीच्या 'एवढ्याच' दर्शनावर समाधान मानावं लागणार म्हणून मी अंमळ खट्टू झालो होतो; पण तासाभरातच उघड्यावरचा वारा खाऊन साहिरसाहेब भानावर आले आणि कविता म्हणायला उभे राहिले. एक खूप जुनी फर्माईश माझ्या मनातून दाटून आली पण 'सदाचा नडणारा' संकोच इथंही आडवा आलाच. तेवढ्यात जणु माझं मन ओळखून एक मनकवडी किशोरी धावत येऊन साहिरना चिठी देऊन गेली. साहिरसाहेब चिठी वाचून स्वतःशीच हसले आणि मैफिलीच्या चढ्या सुराशी विसंगत पण त्यामुळंच विलक्षण लोभसवाण्या अकृत्रिम शैलीत कविता वाचू लागले, 'ताज'! तिथल्या त्या सगळ्या समानशील मेळाव्यातही साहिर कुणी वेगळेच वाटत होते. स्वतःची कविता स्वतःच त्रयस्थपणे ऐकत असल्यासारखे तटस्थ, अलिप्त, काहीसे आपल्या कुसुमाग्रजांसारखे! मुशायऱ्याच्या या एका रात्रीत आजवरच्या जगलेल्या साऱ्या क्षणांचं सार्थक झालंसं मला वाटलं.

ते सगळं ठीक आहे हो; पण मराठी कवी म्हणून लावलेल्या हजरीचं काय ? सांगतो, तेही सांगतो--

सूत्रधाराच्या त्या खुमासदार शैलीत माझी 'वढाचढाके' ओळख करून दिली गेली. मी उभा राहून कवितेची पार्श्वभूमी थोडक्या शब्दांत हिंदीत (होय, बरं होय ! ) सांगितली आणि 'तरन्नुमके साथ सुनाईये' या आर्जवी फर्माईशीला मान देऊन खुल्या दिलानं आणि खुल्या स्वरात कविता ठणकावली. 'सखि मंद झाल्या तारका.'

माझं काव्यगायन संपताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्यातल्या ९५ टक्के टाळ्या केवळ सहानुभूती आणि सौजन्यापोटी होत्या हे मान्य केलं तरी ५ टक्के तरी माझ्यासाठी असतील ?

याचा अर्थ असा की, माझी कविता भाषेची कुंपणं ओलांडून श्रोत्यांच्या हृदयाला भिडली. किंवा असं तर नाही ? ( हे वाक्य लिहिताना माझा डावा हात माझं धपापणारं काळीज सांभाळतो आहे) की, ती दाद माझ्या (एक आवंढा) माझ्या ... गाण्याला तर नसेल ?

(असो ! ...असो ! )

* *

## ॥ स्वतंत्रते भगवती ॥

येत्या १५ ऑगस्टला 'स्वतंत्रते भगवती' ला १० वर्षं पुरी होतील. याचा अर्थ– इतिहासावर आधारलेली ही काव्यकलाकृती बघता बघता स्वतःच 'इतिहासजमा' होत चालली; पण आज सहज आठवू लागल्यावर लक्षात येतं की– 'स्वतंत्रते भगवती' ची विविध स्मरणं अजूनही इतकी टवटवीत आहेत की जणु काही सारं काल–परवाच घडलंय.

'पुण्यनिवासी' झाल्यानंतर मला कलाकार या नात्यानं खरंखुरं पहिलं व्यासपीठ लाभलं ते 'स्वरानंद' या संस्थेचं ! 'आपली आवड' पासून 'मंतरलेल्या चैत्रबनात' पर्यंत ती संस्था माझ्यासाठी एक आघाडी होती आणि प्रयोगशाळाही ! 'स्वतंत्रते भगवती' हा त्यातलाच एक 'प्रयोग !'

१९७१ चा सुमार– कवितेचा सूर छान लागला होता. गीतबद्ध काहीतरी भरीव लिहावं अशी उर्मी होती. पण, विषय ?... ज्ञानेश्वर, दत्त, गणपती या 'पीडित' मंडळींना आणखी पीडा द्यावी असं वाटत नव्हतं. तेवढ्यात 'स्वरानंद'चा आद्य सूत्रधार विश्वनाथ ओकनं त्याच्या डोक्यात घोळणारी एक कल्पना मांडली. १९७२ साली भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला २५ वर्षं पुरी होताहेत. त्या निमित्तानं 'स्वरानंद'तर्फे एक कार्यक्रम करावा– १८५७ ते १९४७ ह्या कालखंडावर आधारित! मी या विषयावर झडपच घातली. कार्यक्रमाचं शीर्षक म्हणून सावरकरांचेच शब्द निवडले– 'स्वतंत्रते भगवती' आणि शुभारंभाच्या स्वातंत्र्यस्तोत्राचा मुखडाही त्या बसल्या ठिकाणीच लिहून टाकला,

'जय स्वतंत्रते, जय स्वतंत्रते, जय स्वतंत्रते देवी,
भगवती स्वतंत्रते देवी
श्वासाश्वासातून सुगंधित तुझी स्मृती यावी
भगवती स्वतंत्रते देवी'

माडीवाले कॉलनीतल्या 'संतोष' हॉटेलमध्ये त्या क्षणी मी आणि ओक बसलो होतो. हे आठवायचं कारण—त्या पूर्वी आणि त्या नंतर तिथं पाऊल ठेवायचा योग आला नाही.

पहिल्या क्षणी आकर्षक वाटला तरी प्रत्यक्षात हा विषय म्हणजे छाती दडपून टाकणारं 'शिवधनुष्य'च होतं. एवढ्या विराट काल-खंडातलं काय वगळायचं? काय निवडायचं? आणि निवडलेलं नेमकं कवितेत कसं पकडायचं? कार्यक्रमाची कल्पना निघाली १९७१ च्या डिसेंबरच्या सुमाराला आणि प्रत्यक्षात १९७२ चा मे उलटून चालला तरी पुढ्यातले कागद मनाइतकेच कोरे होते म्हणजे तसा खूप वाचत होतो, विचार करीत होतो; पण वाटच सापडत नव्हती. एवढ्या मोठ्या विषयावर लिहायचं म्हणजे तसाच 'अभ्यास' हवा या कल्पनेच्या ओझ्याखाली जीव घुसमटत होता. कारण— 'अभ्यास' हा शब्द पुन्हा तसा 'अपार'च! आणि एका क्षणी तीव्रपणे जाणवलं— आपल्याला काही प्रबंध लिहायचा नाही किंवा कादंबरीही! आपल्याला लिहायचीय निखळ 'कविता'. इथं तपशीलाहून महत्त्वाचा आहे तो त्यामागचा आवेग आणि त्याला भिडू शकणारं उत्कट, प्रांजल कविमन!— आपण जागवायचं आहे ते आपल्याच मनाला! या जाणिवेबरोबर काटेकोर आखणी संपली. उरलं ते अनुभवांच्या केवळ स्वाधीन होणं आणि बघता बघता कवितेचा 'गिअर' पडला.

१९७२ च्या जूनमध्ये सलग ९/१० दिवसांत 'स्वतंत्रते भगवती'ची २२ गीतं मी लिहिली. समर्थांचा— 'दिसामाजि काहीतरी ते लिहावे' हा उपदेश त्या दिवसांत कधी नव्हे तो माझ्या आचरणात आला होता. ती एक प्रकारची धूनच लागली होती. रोजची जाग एका नव्या आतुर शोधाची असायची, पण त्यासाठी आटापिटाही नसायचा. आपसूक नवा विषय कवितेची ओळ होऊन अगोदर मनात उमटायचा

आणि मग पहाता पहाता संपूर्ण गीताच्या रूपात समोर कागदावर उतरायचा. स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वाचे टप्पे आणि त्याच्याशी समांतर असलेल्या व्यक्ती आणि घटना ह्यांचा आलेख त्या गीतांतून आपसूक आकार घेऊ लागला. आणखी एक गोष्ट लक्षात आली की त्या गीतांचा आत्मा 'भावकाव्या'चाच होता आणि त्यामुळं एखादी व्यक्ती किंवा घटना समोर ठेवून लिहूनही तसा कुठलाच प्रकट उल्लेख (एखाद दुसरा अपवाद वगळता) त्या गीतात नसायचा. मग एकाकी वासुदेव बळवंत 'घनतमातल्या मशाली' सारखे भासले. 'निखाऱ्यात अनवाणी' उभे राहिलेले आगरकर दिसले. होमकुंडात दर्वळत खाक झालेली 'चाफ्याची फुलं' दिसली. सावरकरांच्या तोंडच्या गद्य उद्गारांचीच कविता झाली. 'माझ्या दारी एक पाहुणा अवचित येऊन गेला' या भावकथेच्या रूपात ४२ च्या भूमिगतांचं आयुष्य लक्कन् उजळून गेलं.

विश्वनाथ ओक दररोज, 'इकडं आलोच होतो' या बहाण्याखाली बिनचूक ठरलेल्या वेळी चक्कर टाकायचा. उत्सुकता दाबून इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत रहायचा. मीही संभावितपणे हवापाण्याची वार्ता करता करता हळूच नवं लिहिलेलं गाणं पुढं करायचो. ते ऐकून तो खुलायचा आणि म्हणायचा, 'हार्मोनियम काढ!' विश्वनाथ ओकनं सुरेख चाली लावल्या. बघता बघता 'स्वरानंद'च्या साऱ्याच कलाकारांना 'स्वतंत्रते भगवती'ची नशा चढली आणि इथून पुढं तो कार्यक्रम कुणाचा एकट्याचा राहिलाच नाही.

स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवदिनी भरतनाट्य मंदिरात पालक शिक्षक संघातर्फे एस. एम्. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वतंत्रते भगवती'चा प्रयोग थाटामाटात झाला. सादरकर्त्यांच्या मनःपूर्वक प्रामाणिक धडपडीला श्रोत्यांचाही तसाच प्रतिसाद मिळाला. 'स्वतंत्रते भगवती'च्या त्या एकमेव प्रयोगानं रसिकांच्या मनात–स्वरानंद संस्था, तिचे कलाकार आणि कवी यांच्यासाठी एक छोटंसं घर तयार झालं.

पुढच्याच २६ जानेवारीला देविदास बागूल आणि अजित सोमण यांच्या सहकार्यानं अनंत धडपडीनिशी मी 'स्वतंत्रते भगवती' देखण्या पुस्तकरूपात प्रकाशात आणलं. पुस्तकाच्या पाठीवर कवी कुसुमाग्रजांचा

हात फिरायचं भाग्य लाभलं तर प्रकाशन कै. ग. दि. माडगूळकरांच्या हातून झालं. '४२ च्या लढ्याचा शाहीर' या आपल्या भूमिगत रूपाच्या आठवणीनं माडगूळकर पहाता पहाता भूतकाळात गेले आणि 'अंगावर फोड तरारावेत तशा कविता फुटून येण्याच्या' त्या दिवसांबद्दल भरभरून बोलत राहिले. थोड्याच दिवसांत दूरदर्शन आणि आकाश-वाणीवरूनही 'स्वतंत्रते भगवती'नं श्रोत्यांना भेट दिली. काही निवडक चांगल्या ठिकाणी मी 'स्वतंत्रते भगवती'चं प्रकट वाचनही केलं. समोरच्या श्रोत्यांची कक्षा होती—साठीपुढच्या वृद्धांपासून पहिल्या वर्षाच्या कॉलेज विद्यार्थ्यांपर्यंत !—परंतु एक प्रसंग डोक्यात पक्का राहून गेलाय.

अभिनेत्री सुलोचनाबाई, अनिल हवालदार, दादा (श्रीकांत) अशा काही निवडक मंडळींसह रायगडावर गेलो होतो. मूड पिकनिक-चाच होता. दिवसभर चकाट्या पिटत उनाडक्या केल्यावर संध्याकाळी थकून एका ठिकाणी बसलो. 'काही तरी म्हण रे' असा आग्रह झाला. 'गझल भावगीता'चीच अपेक्षा उभयपक्षी असताना दादाच्या सूचनेवरून 'स्वतंत्रते भगवती' ऐकवू लागलो. तास—सव्वातासानं भानावर येऊन थांबलो. तरीही भोवतालच्या काळोखात सारे तसेच चुपचाप बसून राहिले. एका अनामिक जाणिवेच्या आनंदानं मी आतल्या आत थरारलो—'स्वातंत्र्यगाथे'चं आजचं पठण मी देहभान हरपून सादर केलं होतं ते नकळतपणे चक्क शिवसमाधीच्या पायाशी !

कलाकृती म्हणून किमान मिळायचं तेवढं श्रेय मिळालं—मिळेल ! पण तरीही 'स्वतंत्रते भगवती'च्या आठवणीनं मनात एक विषण्ण जाणीव दाटून येते. वाटतं, त्या विषयापासून बघता बघता आपण कुठल्या कुठं दूर येऊन पोचलो आहोत. आपलं त्याच्याशी काही नातंच उरलेलं नाही. काळाबरोबर रहाणं यात वावगं काहीच नाही. पण दूर येणं वेगळं आणि सारे धागे तुटून कोरडं, त्रयस्थ होणं वेगळं ! काल-परवाचा हा आपल्याच स्वातंत्र्याचा इतिहास बघता बघता आपल्या लेखी जणु केवळ 'भाकड पुराण' होऊन बसलाय. आपल्या निबर मनांना धड त्या हौतात्म्याची तीक्ष्णताही जाणवत नाही की धड दोन घटका जिवाची करमणूकही होत नाही.

ज्कालामयी वधूंशीच विवाह करणाऱ्या वेडया क्रांतिकारकांच्या 'ज्वालाग्राही' कहाण्या स्वप्नातल्या सावल्यांसारख्या पुसट होत चालल्यात आणि कार्यक्रमाच्या अखेरीचा प्रकट चिंतन करणारा रोकडा फटका मात्र दुर्दैवानं अधिक अधिक विक्राळ होत चाललाय–

मूल्यांचे अवमूल्यन झाले
खुला नीतिचा व्यापार
भुकेल्यावरी भरल्यापोटी
उपदेशाचा भडिमार
सवंग त्याला मिळे प्रतिष्ठा
अस्सल त्याला वनवास
सच्चाईच्या गळ्याभोवती
दांभिकतेचा गळफास
ज्याचे त्याला, यथायोग्यता
श्रेय पुरे मिळणार कधी ?
स्वराज्य आले यौवनात–
पण, सुराज्य हे होणार कधी ?

❊ ❊

# ॥ टिळक आणि आगरकर ॥

पहिली गोष्ट आवडली ती म्हणजे नाटकाचं रोखठोक साधं नाव—'टिळक आणि आगरकर'! नाहीतर अर्वाचीन मराठी नाट्यपरंपरेला जागून 'दोन सूर्य झुंजले इथे' असलं काही 'नवाक्षरी' शीर्षक पहावं लागलं असतं तर आपण काय करू शकत होतो?— अर्थात् लेखक दिग्दर्शक विश्राम बेडेकर म्हटल्यावर किमान इतपत रांगडा थेटपणा अपेक्षितच होता. गेल्या वर्षी केव्हातरी 'टिळक आणि आगरकर' ह्या नावाची कुणकुण मुंबईत ऐकली, तेव्हापासून काल प्रत्यक्ष प्रयोग पाहीपर्यंत माझे कान त्या दिशेनं कायमचे टवकारलेलेच राहिले होते. कारण मुळात विश्राम बेडेकरांनी 'नाटक लिहिणं' आणि त्यासाठी असला बलाढ्य विषय निवडणं—ह्या दोन्ही तशा घटनाच !

नाटक पहायला जाण्यापूर्वी सामान्य प्रेक्षक ह्या नात्यानं आपली त्या विषयाची काय 'तयारी' आहे ह्याचा मी गंमत म्हणून तपास केला. तेव्हा जमेला काय आढळलं ? तर प्रथम—शालेय वयात प्रत्येक पिढीला ऐकाव्याच लागणाऱ्या चारदोन गोष्टी— शेंगांच्या टरफलांची गोष्ट सुपारीचं व्यसन, गीतारहस्य आणि आगरकरांची जिवंतपणी निघालेली प्रेतयात्रा ! नंतर जरा कळत्या वयात वाचनाच्या 'व्यसना'च्या तावडीत गेल्यावर ज्या काही पुस्तकांचा कळत-नकळत फडशा पडला त्यातील न. चिं. केळकर लिखित टिळक चरित्राचे दोन खंड आणि आगरकरांच्या 'सुधारका'तील निबंधाचे दहा भाग आणि अगदी अलिकडं वाचलेला 'विश्रब्ध शारदा' मधला दस्तुरखुद्द टिळक- आगरकरांचा मोजका पण वेचक पत्रव्यवहार !

मग लक्षात आलं की ती मोजकी चार-दोन पत्रं हाच आपला खरा आधार आहे. दोन मनस्वी आग्रही व्यक्तिमत्वं, त्यांच्यातील जिव्हाळा आणि तणाव, साम्य आणि तफावत आणि ह्या सर्वांमागं चुपचाप उभं असलेलं दोन भिन्न आयुष्यांचं विराट आणि कठोर कारुण्य ! – ह्या साऱ्या गोष्टींचं भान त्या बोलक्या पत्रांतील त्यांच्या स्वतःच्या शब्दांतून जितक्या तीव्रतेनं आलं तितकं दुसरीकडं कुठंच आलं नव्हतं. त्यातून मनात उभी राहिलेली दोन 'माणसां'ची धूसर चित्रं एवढंच आपलं भांडवल आणि ह्या 'जमिनीवरच' उभं राहून आता भेटायचं होतं ते नाटकांतून उभ्या राहू पहाणाऱ्या जिवंत व्यक्तिरेखांना !

सलामीलाच एक अडचण आली. टिळक आणि आगरकर ह्या दोघांच्या 'दिसण्या' विषयी काही ठाम कल्पना (कदाचित् चुकीच्याही) माझ्या मनात निश्चित झाल्या होत्या. आगरकरांच्या भूमिकेतील श्याम पोंक्षे आणि टिळक झालेला प्रमोद पवार ह्या दोघांचंही 'दर्शन' माझ्या त्या कल्पनांशी अजिबात जुळणारं नव्हतं. किंबहुना त्या दोघांच्या भूमिकांची अदलाबदल केली असती तर तो बदल माझ्या मनातील कल्पनांशी अधिक मिळता जुळता झाला असता. पण असं असूनही– काही क्षणातच मला ते दोघेही होते त्या त्या ठिकाणी पटत गेले. काय गंमत आहे; भूमिकेचं बाह्यरूप शेवटपर्यंत मान्य न होताही त्या भूमिकांचं 'आतलं अस्तित्व' मात्र मी सहजपणे स्वीकारत गेलो. हा अनुभव मी प्रथमच घेतला आणि त्याचा नीटसा उलगडा अजून मला स्वतःलाही झालेला नाही.

आगरकरांचा एम. ए. चा रिझल्ट लागून, सारं आयुष्य समाज-कार्याला वहायचा निर्धार त्यांनी कुटुंबियांसमोर प्रकट केला; इथपासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंतचा काळ आणि त्या काळातील टिळक आगरकरांचं –प्रेम आणि विरोध ह्यांनी विणलेलं जोड आयुष्य हा या नाटकाचा विषय आहे. अनेक घटनांनी आणि गुंतागुंतींनी भरलेला हा कालखंड पार्श्वभूमीवर सारखा जागता ठेवायचा आणि त्याच्यापुढं ह्या दोन; व्यक्तिगत आयुष्याचा होम केलेल्या महापुरुषांतली 'माणसं' साकार करीत न्यायची हे सोपं काम नव्हतं. लेखक आणि दिग्दर्शक ह्या दोन्ही

नात्यांनी विश्राम बेडेकरांनी त्यांच्या लौकिकाला साजेल अशा ताकतीनं हे आव्हान पेललं आहे. ह्या बाबतीत 'लेखक' ह्या व्यक्तिमत्त्वापेक्षाही 'चित्रपट दिग्दर्शक' ह्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांना अधिक उपयोग झाला असावा. कारण संपूर्ण नाटक चित्रपटाच्या अंगानंच पुढं जात राहतं आणि नाटकाची संहिताही शब्दप्रधान नाट्यकृती न वाटता लवचिक आणि चपखल पटकथा वाटते.

सर्व घटनांचा तपशील पडद्यामागं, आणि त्या घटनांच्या प्रतिक्रिया व्यक्त करणारे टिळक, आगरकर आणि त्यांचे ऋणानुबंधी प्रत्यक्ष रंगमंचावर हा तोल नाटकभर सुरेख सांभाळला आहे. असं असताना केवळ कोल्हापूरचं 'दत्तक' प्रकरण मात्र प्रत्यक्ष रंगभूमीवर (आणि तेही इतक्या सविस्तर) का दाखवलं आहे कोण जाणे ! त्यामुळं काही क्षण तरी नाटकाचा सांधाच विनाकारण बदलला जातो. अशीच एक खटकणारी आणि रसहानी करणारी गोष्ट म्हणजे सदोष ध्वनिसंकलन आणि कोरडं पार्श्वसंगीत ! पार्श्वसंगीताला काळाचा स्पर्श तर नाहीच पण एखादं सूत्रही नसल्यामुळं आकाशवाणीच्या 'फिलर्स'चं रूप त्याला प्राप्त होतं. पटकथेसारखी दृश्यांची साखळी केल्यामुळं नेपथ्यकार रघुवीर तळाशिलकरांनाही एक आव्हानच पेलावं लागलंय. पहिल्या वाड्याच्या अंतर्भागातील टिळक-आगरकरांचा शेजार, कोल्हापूरच्या राजवाड्यातील खाजगी महाल, डोंगरीच्या तुरुंगातील कोठडी, सभा उधळल्यावर आसरा म्हणून मिळालेली तिऱ्हाईताची खोली, टिळकांच्या नव्या घरातील बैठकीचं दालन आणि आगरकरांच्या घराच्या बाहेरील अंगण-ओसरी इतक्या ठिकाणांतून बारीकसारीक तपशीलानिशी तळाशिलकरांनी १९ वं शतक साक्षात् उभं केलं आहे.

व्यक्तिरेखाटनात टिळक-आगरकरांच्या पाठोपाठ महत्त्वाची ऐतिहासिक व्यक्तिरेखा आहे गोपाळराव जोश्यांची ! टिळक आणि आगरकर ह्या दोन्ही टोकाच्या व्यक्तिमत्त्वांचा छोटासा 'अंश'च असलेले पण तऱ्हेवाईक विक्षिप्तपणामुळं केवळ उपद्रवी ठरणारे गोपाळराव जोशी नाटकात चांगले गुंफले गेले आहेत. प्रत्यक्षात रंगभूमीवर मात्र ती व्यक्तिरेखा त्या प्रमाणात उभी रहात नाही. वस्तुतः जयंत सावरकर हे

संवेदनाशील कुशल कलाकार आहेत. पण तरीही इथं ती भट्टी जमत नाही हे खरं! सत्यभामा आणि यशोदा ह्या दोन पोरसवदा गृहिणींच्या भूमिकांत सुषमा सावरकर आणि निवेदिता जोशी छान 'जागच्या जागी' वावरतात. ह्याखेरीज दोन व्यक्तिरेखा बेडेकरांनी फार सुरेख उभ्या केल्या आहेत. एक आगरकरांचा पौगंडावस्थेतील पुतण्या नाना! परचुरे नावाचा थुलथुलीत अंगाचा गोबरा मुलगा ह्या भूमिकेत फार सहजतेनं वावरतो. शेवटच्या अंकातील भावविवश प्रसंगात मात्र त्याची सहजता त्याला सोडून जाते. दुसरी व्यक्तिरेखा म्हणजे; सर्वांबरोबर वडिलकीच्या अधिकारानं वावरणारी आणि साऱ्या घटनांच्या प्रतिक्रिया उत्कटपणे व्यक्त करीत कथानकाचा सांधा जोडत नेणारी खानावळवाली सोवळी काकू! ही हृद्य व्यतिरेखा अधिक हृद्य होऊन जाते भक्ती बर्वेमुळे! जातिवंत कलाकार एखादी 'साईडिंग' ची भूमिकाही बारीक-सारीक बारकाव्यांनिशी पण किंचितही 'आक्रमक' न होता किती जिवंत करू शकतो ह्याचं सुरेख उदाहरण म्हणजे ही सोवळी काकूबाई! कालखंडाचं भान ठेवून भूमिका जगण्याचं श्रेय ह्या नाटकातील साऱ्याच लहानमोठ्या कलाकारांना द्यायला हवं. त्यामुळं एवढा मोठा कालखंड तीन तासांत पहाता पहाता डोळ्यांसमोर उलगडत जातो. समाजसेवेचं व्रत स्वीकारणाऱ्या तडफदार आगरकरांच्या जागी खंगलेले, झडलेले पण तरी पराभव न पत्करणारे आगरकर दिसू लागतात आणि कर्तव्य-बुद्धीनं त्यांच्यावर कठोर घाव घालता घालता अंतर्यामी स्वतःही घायाळ होत राहणारे लोकमान्यही! 'विश्रब्ध शारदा' मधील आगरकरांच्या एका पत्रात 'पैतृक संपत्ती आणि आरोग्य ह्यांच्या अभावी होणाऱ्या अगतिक अवस्थे'चा अतिशय संयत पण म्हणूनच फार करुण उल्लेख आला आहे. तो प्रथम वाचला तेव्हा काळीज गलबलून आलं होतं. तो अनुभव नाटकाच्याही शेवटी आला हे फार मोठं श्रेय म्हणता येईल. कारण एरवी सबंध नाटकाचा सूर धीमा, संथ आणि संयत आहे.

एक गोष्ट खरी– 'टिळक आणि आगरकर' ह्या नाटकानं फार दिवसांनी एक निखळ श्रेष्ठ आनंद मिळवून दिला. नाटकानं मनावर उमटवलेल्या छटा कागदावर उतरवल्याखेरीज राहवलं नाही ते ह्यामुळंच.

पण त्या खेरीज आणखीही एक फार वैयक्तिक घरगुती कारण ह्या लेखनामागं आहे. ते कारण म्हणजे–आम्हा भावंडांच्या कलागुणांचा 'मूळचा झरा' असलेले आमचे वडील, बापूराव !

वयाच्या ८३ व्या वर्षी प्रकृतीनं कौतुकास्पद तंदुरुस्त असूनही श्रवणशक्ती पूर्ण नाहीशी झाल्यामुळं चारचौघांत असूनही स्वतःचा कोष करून त्यांना रहावं लागतं. एरवी तितकसं जाणवत नाही. पण 'टिळक आणि आगरकर' अशा नाटकाच्यावेळी मात्र एका मोठ्या आनंदापासून त्यांना वंचित रहावं लागतं ह्याची खरंच खंत वाटते. मी हे नाटक पहात असताना मनानं त्यांच्या जागीही होतो, आणि म्हणूनच नाटकाचा हा इतका परामर्श ! मी घेतलेला आनंद अंशतः जरी हा लेख वाचून त्यांना मिळाला तरी मी जिंकलो.– आणि मला वाटतं, हे जमावं ! कारण, काळाच्या आणि पिढीच्या अंतरामुळं थोडाफार फरक पडला तरी आनंद घेणारी आणि आणि बारकावे टिपणारी माझी 'नजर' ही मुळात–त्यांचीच 'नजर' आहे.

## ॥ दुसरं घर ॥

आज प्रथमच मी हे इतक्या जाहीरपणे सांगतोय की पुण्यात माझं एक 'दुसरं घर'ही आहे. काही मराठी साहित्यिक-कलावंतांनी 'दुसरं घर' ह्या संज्ञेला जो 'गोऽऽऽड' अर्थ प्राप्त करून दिलाय त्या अर्थानं मी म्हणत नाही आहे. (त्या अर्थानं तूर्त मी तसा 'बेघर'च !) —'दगड, माती, विटा, कौलांनी बनतं ते घर' ह्या चारचौघांच्या व्याख्येला धरून मी हे विधान करतो आहे. त्या दृष्टीनं मात्र माझं हे 'दुसरं घर' खरोखर दृष्ट लागावी असं आहे. मुख्य म्हणजे ते बैठं, टुमदार आहे. त्याला छान लाकडी सिलिंग आहे, भरपूर प्रशस्त खिडक्या आहेत. वाटल्यास प्रायव्हसीसाठी सुरेख पडदे आहेत. कौलांचं छप्पर आहे. घराच्या दोन्ही बाजूंना छोटीशी अंगणं आहेत. एकीकडच्या अंगणात तर कोकण आठवावं अशी झाडं आहेत आणि चक्क छोटा आड वाटावा असा हौदही आहे. आजकालच्या दिवसात असलं घर कुणाला हो मिळतं ? मी तसा चतुर म्हणून सुमारे ९।१० वर्षांपूर्वीच ह्या घराशी ऋणानुबंध जोडून टाकला.

या माझ्या 'दुसऱ्या घरा'बाबतीत एक बारीकशी गोम आहे. ती म्हणजे बरीच मंडळी ते घर 'आपलंच'च म्हणून सांगत फिरत असतात. पण मी मोठ्या मनानं तिकडं दुर्लक्ष करतो. कुणी कुणी तर माझ्यासमोरच असल्या थापा मारू लागतात. तेव्हा फक्त मी आणि घर एकमेकांकडं पाहून हलकेच डोळे मिचकावतो. (बिचारे !) याउलट मी मात्र, अनेकांना त्या घराची सावली मिळावी या उदात्त हेतूनं, मन विशाल (की घट्ट ?) करून ह्या माझ्या दुसऱ्या घरावर 'कॅफे डिलाईट'

अशी चक्क पाटी लावायलासुद्धा मुळीच हरकत घेतली नाही, (आजकाल ते मनाचं मोठेपण कोण दुर्मिळ झालंय !)—तर असं हे माझं पुण्यातलं—'दुसरं घर'—फर्ग्युसन रोडवरचं 'कॅफे डिलाईट'!

पुण्यात आलो अन् 'हॉटेल संस्कृती' या संस्थेनं माझ्या आयुष्यात प्रवेश केला. 'हॉटेल संस्कृती' ते 'कॉफी संस्कृती' हा नंतरच्या माझ्या आयुष्याचा, चढत्या प्रगतीचा आलेख आहे. तोच अधिक सोप्या शब्दांत सांगायचा तर 'लकी ते कॅफे डिलाईट' असं म्हणता येईल. लकी—पीसीएच (पूना कॉफी हाऊस)—आयसीएच (इंडियन कॉफी हाऊस)—लॉ कॉलेजपुढचा काका करंदीकर-सतलज-वैशाली-रूपाली-डिलाईट असा स्थूलमानानं तो प्रवास आहे. पण 'डिलाईट' हा प्रकार भेटेपर्यंत त्यामागचा 'हॉटेल' हा शब्द गळून पडला नव्हता. 'लकी'च नातं नानकटाई-चहाशी होतं. 'पीसीएच'पासूनच कॉफी आयुष्यात आली. पण तरी तोपर्यंत ते केवळ हॉटेलात जायचं निमित्त होतं; ती अनिवार्य निकड नव्हती. 'डिलाईट'मध्ये मात्र कॉफीला स्वतःचं असं 'व्यक्तिमत्त्व' आलं, ते आयुष्याचं एक 'प्रयोजन' झालं.—आता या पद्धतीचं तुलनात्मक लिहिणं मी थांबवतो. कारण—आपल्या घराची तरफदारी करताना मी इतरांच्या 'घरा'च्या भावना का दुखावू ?

१९७३ च्या सुमाराला 'डिलाईट'शी घरोबा जडला तो मुळात पी. आर. शिंदेसरकारांमुळे ! त्या काळात 'रूपाली' आमचा 'कँप' होता. मेडिकलला शिकणाऱ्या वाडीकर दोस्तांच्या कंपूमध्ये 'रूपाली'च्या अंगणातल्या ठराविक कोपऱ्यातल्या टेबलवर आमचा तळ पडलेला असायचा. मधे दुधाच्या रंगाचा फेस मिरवणारी साखरमिश्रित कॉफी असायची. समोर वाहता रंगीबेरंगी फर्ग्युसन रस्ता आणि शिवाय उतरता कॉमर्स रस्ता—त्यामुळं निदान मानेला बऱ्यापैकी 'व्यायाम' मिळायचा. सरकार तेव्हा नुकतेच आमच्या ग्रुपमध्ये मिसळू लागले होते. एके दिवशी लक्षात आलं की ५ । ६ दिवस सरकार संध्याकाळच्या बैठकीत गायब असतात. त्यांना रस्त्यात गाठून जाब विचारल्यावर त्यांनी सांगितलं,—'रूपालीत फार कलकलाट असतो म्हणून मी कॅफे डिलाईटमध्ये जातो. तिथं कॉफीही चांगली असते'—तो काळ रूपाली

निष्ठेचा होता. त्यामुळं आम्ही चेवून उठलो. वाकडच्या मार्गावर जाऊ पाहणाऱ्या आपल्या माणसाला आपणच ठिकाणावर आणायला हवं अशा ईर्षेनं अस्मादिक एका संध्याकाळी सरकारांचा माग काढीत 'कॅफे डिलाईट'मध्ये शिरले आणि स्वतःलाही नकळत तिथलेच होऊन बसले. माझ्यापाठोपाठ 'रूपाली'चा दरबार उठून 'डिलाईट'मध्ये मुक्कामाला आला तो थेट आजमितीपर्यंत !

'डिलाईट'मध्ये आलो आणि—कॉफीचा रंग बदलला. चिनी-मातीच्या कपबशा जाऊन ती जागा स्टेनलेस स्टीलचं छोटं पातेलं आणि उभट फुलपात्रानं घेतली. साखर 'स्वतंत्र' झाली. 'दोन स्ट्रॉंग कॉफी—शुगर सेपरेट' ही ऑर्डर देताना स्वरात 'कॉफी-खानदाना'च्या वारसाचा डौल डोकावू लागला. सकाळी ९ आणि संध्याकाळी ६ वर काटा आला की 'पाऊले चालती डिलाईटची वाट' म्हणत दिंडी निघू लागली. ठिकठिकाणाहून वारकरी ठरल्या वेळी गोळा होऊ लागले. 'सरकार' हे त्याबाबतीत आद्यपीठाचे शंकराचार्य ! कुणी असो-नसो, ते असायचेच. माझ्या मुंबईवाऱ्या तेव्हा नुकत्याच सुरू झाल्या होत्या, त्यामुळं माझा अधूनमधून खंड पडायचा. पण एरवी मात्र 'विरहानं प्रेम वाढतं' या चालीवर गाडीतून उतरताच मी आधी डिलाईटवर आणि मग घरी ! माझ्या दोस्तमंडळींचं येणं न येणं थोडंसं माझ्यावर अवलंबून असायचं. सरकार या लोकांची 'व्यभिचारी निष्ठेचे' म्हणून लटकी संभावना करायचे. आता मात्र सारे एका 'मशिदी'तले पुरे 'नमाजी' बनले आहेत.

'डिलाईट'मध्ये अशी काय वेगळी ओढ आहे की तिथं आल्या-वाचून राहवू नये ? 'अशी कॉफी पृथ्वीतलावर अन्यत्र मिळत नाही' हे एक कारण झालं. पण या खेरीज ?

'अनुभवायची' गोष्ट 'शब्दात' सांगणं मुष्किल आहे. पण तरी सांगायचं झालं तर 'डिलाईट'ला एक अत्यंत दुर्मिळ असं घरगुतीपण आहे. एक अतिशय लवचिक आणि अनौपचारिक मोकळाढाकळा ऐस-पैसपणा तिथं आहे. इथल्या वेटर्सना नावापुरता गणवेश दिला असला तरी इतर हॉटेलातल्यासारखे ते बिनचेहऱ्याचे किंवा कडक इस्त्रीच्या चेहऱ्याचे नाहीत. उलट सिलोन रेडिओच्या निवेदकांप्रमाणं त्यांना

नावागावानिशी 'व्यक्तिमत्त्वं' आहेत. (त्या व्यक्तिमत्त्वातील बारकाव्यांविषयी अधिक माहिती हवी असल्यास कुणाही 'अट्टल' डिलाईटवाल्याला गाठून चौकशी करावी.)

इथं येणाऱ्या मंडळींकडं बारकाईनं पाहिलं तर समाजाचा उभा छेद पहायला मिळेल. महाविद्यालयीन टोळकी, नाटकवाले, बिझनेसवाले, पत्रकार, प्राध्यापक मंडळी, राजकारणी, ब्रिज-टेनिसचे अखंड वादावादी करणारे ग्रुप्स, मोर्चे, मेळावे या उपद्व्यापात गुंतलेली 'गुलाबी' मंडळी, 'नारी मंचा'च्या नारी आणि (पुरुषही) 'फ्रीलान्सर' ह्या गोंडस नावाखाली बिनधास्त बेकार भटकणारे आमच्यासारखे लोक, डॉक्टर्स, गॅस पोचवणारी खाकी डगलेवाली माणसं, कधी मळकट धोतरं आणि कुडती घालून खणखणीत स्वरात बोलणारी 'गावाकडली माणसं', कधी चक्क ट्रॅफिक कंट्रोलचे गणवेष तर कधी सणासुदीला अघळपघळ कुटुंबकबिले...असं विश्वरूपदर्शन इथं बसल्याठायी घडत राहतं आणि गंमत म्हणजे इतकी ये-जा होऊनही अपवादाचे क्षण वगळता 'निवांत एकांत'ही मिळतो. त्यामुळं आपणच ते पहिले 'आदम नि ईव्ह' असं सिद्ध करणारे प्रेमी जीव– 'दुनियाकी कौनसी ताकद' त्यांना रोखू शकणार ?

इथे 'पडीक' असणाऱ्या सर्व मंडळींच्या एकमेकांशी ओळखी आहेत, असं नाही. पण तरी सारे एकमेकांना 'ओळखून' आहेत हे नक्की ! कुणाच्या येण्याच्या वेळा कुठल्या ? कोण कुणासाठी येतं ? कोण कुणाबरोबर येतं ? कोण कुणाला टाळून येतं ? ह्या साऱ्याची एक पद्धतशीर 'आचारसंहिता' आहे.–पण म्हणून कोण कुणामध्ये विनाकारण ढवळाढवळही करत नाही. कारण कॉफी हाऊसचं म्हणून काही 'एथिक्स' आहे. सहा माणसांच्या बैठकीवर एकटा बसला असला तरी दुसरा तिथं बसताना 'बसू ना ?' म्हणून विचारतो. (अपवाद नियम सिद्ध करतात) शिवाय सर्वांना एकत्र बांधणारा 'डिलाईट'चा एक अदृश्य 'बाँड'ही आहे. माझी खात्री आहे, डिलाईटमध्ये नाकासमोर जाणारी पोरगी उद्या चुकून मुंबईत भेटली तर मुद्दाम थांबून दहा जन्मांच्या गप्पा करील. सरकारांनी अशा ओळखीच्या आणि बिनओळखीच्या चेहऱ्यांना मजेमजेदार नावं ठेवली होती. कुणाला 'नांदगावकर',

कोण ' नाक उडवणारी मुलगी ', कुणाला ' काळा मुकुंदराव ', कुणी ' डिलाईटची दुर्गा भागवत ' तर युरोपियन कंपूतील यच्चयावत् कोकणस्थी घाऱ्यागोऱ्या मुलींना ' मंदा गोडबोले '...

ज्यांच्या अंगरख्याचं टोक पकडून आमच्या ' गँग 'नं ' कॅफे डिलाईट 'मध्ये प्रवेश केला ते शिंदेसरकार बघता बघता अज्ञातात निघून गेले. ' गँग 'मधले काही समुद्रापार ' परदेशी ' झाले. पण ' डिलाईट 'च्या हवेची जादू अशी की तिथं जाऊन बसलं की वाटतं— सर्वजण आपल्याभोवती आहेत. ती मैफिल अखंड अशीच चालणार आहे, चालतच राहणार आहे.

आता असं ऐकतो की 'कॅफे डिलाईट' थोड्याच दिवसात जाईल. तिथं एक टोलेजंग इस्पितळ उभं राहील. त्याच्या तळमजल्यावर डिलाईट हॉटेलला जागा मिळेल. पण ते हॉस्पिटल कँटीन म्हणजे 'कॅफे डिलाईट' नक्की नसेल. 'डिलाईट-पडिक मंडळीं'च्या यावरच्या प्रतिक्रिया विविध— कुणाची ' हा बेत सगळे मिळून हाणून पाडू या ' ही झुंझार भूमिका, कुणाची ' आकाशाचं छप्परसुद्धा जाणार तिथं डिलाईटच्या छपराचं काय ? ' ही ' पोचलेली ' भूमिका, तर कुणाचा ' छेः, असं होणारच नाही ' हा उगीचच भाबडा आशावाद ! ह्या सगळ्या प्रतिक्रियांच्या मागे लपलंय एकच ' कावरेबावरेपण '—खरंच, ' डिलाईट ' नसेल तर ?

दोस्तांनो, बेघर व्हायचं तेव्हा होऊ ! सध्या एकच करायचं— आपली वेळ झाली की डिलाईटमध्ये येऊन ठरलेल्या बैठकीवर ठाण मांडायचं. आपल्या जिवलग कंपूच्या साथीनं उकळत्या कॉफीचा घोट घ्यायचा आणि नसानसात तो उबारा पसरत चालला की मिटल्या ओठांनीच गुणगुणायचं—

सोबत तुमच्या आहे मीही
काही दूरपर्यंत
गडे हो, काही दूरपर्यंत
परंतु पुढती नाही म्हणुनी
नसो खेद वा खंत !

## ।। ‘ वराती ’ चे दिवस ।।

बऱ्याच मंडळींप्रमाणं– रोज जागा होताना माझ्याही मनात कुठलं तरी एक हिंदी किंवा मराठी गाणं जागं झालेलं असतं. आणि मग संबंध दिवसभर ते गाणं माझी पाठ तर सोडत नाहीच; पण भेटेल त्या माणसालाही त्याची लागण होत राहते. परवा असाच माझा ताबा घेतला नीरजच्या ‘ कारवाँ गुजर गया गुबार देखते रहे ’ ह्या अप्रतीम कवितेनं ! – सहज विचार करू लागलो की, ‘ कारवाँ ’, ह्या कल्पनेला मराठीत काय बरं म्हणता येईल ? ‘ काफिला ’, ‘ तांडा ’ हे शब्द म्हणजे निव्वळ शब्दशः अनुवाद झाला, त्यामध्ये ‘ कारवाँ ’ ह्या शब्दाचं अमराठी परकेपण तसंच उरतं. ‘ कारवाँ ’ ह्या शब्दामागं जो ‘ अनुभव ’ दडलाय त्याच्याशी काही अंशी तरी समांतर जाऊ शकणारी; पण त्याच वेळी १०० टक्के मराठी अशी संकल्पना कुठली ? आणि एकदम एक शब्द आठवला– ‘ वरात ’ !

नव्या पुलाखाली कसब्यामधल्या पंडितांच्या वाड्यात माझं आजोळ होतं. आम्हा सर्व भाचे कंपनीचे ‘ आनंदधाम ’ असे मोरयामामा ( त्या काळचे उमेदीचे लघुकथाकार कै. शशिकांत पुनर्वसू ) कमला-मामींसह तिथे रहायचे. सुटीला म्हणून प्रथम तिथं आलो असताना ‘ वरात ’ ह्या ‘ प्रकर्णा ’शी पहिला परिचय झाला आणि उत्तरोत्तर तो वाढतच गेला. कारण ‘ उत्सवप्रिय ’ पुण्यात वरातींना हो काय तोटा ? आता लग्न आणि मुंज ह्या दोन्ही विधींचे हेतू वास्तविक किती विरुद्ध ? अगदी दोन टोकाचे ! पण दोन्हीकडं ‘ वरात ’ आपली कॉमन असायचीच. चकचकणारे गणवेष घातलेली ‘ धैर्यधर ’ मंडळी दोन्ही

वरातींच्या आघाडीवर स्थितप्रज्ञाच्या निर्विकारपणानं 'फाँऽऽ फाँ फाँऽऽ फाँ' करीत चालत राहायची. पण एक गोष्ट मात्र खरी की, त्यांच्या गोंगाटयुक्त अस्तित्वामुळं कशी अचेतनालाही जागवत जायची. वरात पुढं निघून गेली तरी हवेत तो गदारोळ जणू कोंदून राहायचा. वाटायचं, तासा–दोन तासानं इथं कोणी आला तरी त्याला सर्वांगानं जाणवेल की इथून नुकतीच एक वरात गेली आहे.

सांस्कृतिक मराठी जीवनाच्या वातावरणात असाच एक, वरातीचा सुगंधी नादकल्लोळ ठिच्चून भरून राहिला आहे आणि येणारी कित्येक वर्षं तो ओसरेलसं वाटत नाही. जे कुणी ऐन भरात ह्या वरातीत सामील झाले किंवा निदान तिचे साक्षीदार झाले त्यांच्या लेखी तर जसा काळ जाईल तशा त्या वरातीच्या दिवसांच्या आठवणी अधिकच दाट बनत जातील. ही वरात म्हणजे श्रीमान् पु. ल. देशपांड्यांनी सहकुटुंब, सहपरिवार थाटामाटात वाजतगाजत काढलेली मराठी रंग-भूमीवरची एकमेवाद्वितीय– 'वाऱ्यावरची वरात'!

'पु. ल. देशपांडे' हे नाव आमच्या कुटुंबाच्या खातेवहीत फार पूर्वीच 'स्पेशल पोझिशन' बळकावून बसलं होतं. घरी सर्वजण एकत्र बसून 'अभिरुची' तल्या त्यांच्या 'नाटक कसे बसवतात' ह्यासारख्या लेखाचं प्रकट वाचन करून हसतखिदळत बसणे–ही माझ्या लहान-पणची नेहमीच्या अनुभवाची गोष्ट होती. मराठी चित्रपटाच्या क्षेत्रात अभिनय, लेखन, संगीत, दिग्दर्शन ह्या साऱ्या आघाड्यांवर त्यांनी केलेली चौफेर मुलुखगिरीही बारीकसारीक तपशीलानिशी आमच्या घरानं अपूर्वाईनं नोंदवून घेतली होती. त्यामुळं, 'तुझे आहे तुजपाशी' नंतर दाही दिशांनी पु. ल. जेव्हा मराठी जीवनावर 'छा गये' म्हणतात तसे व्यापून उरले, तेव्हा नव्यानं साक्षात्कार घडावा तसे खडबडून जागे न होता आम्ही, अखेर 'आपल्या' माणसाच्या पदरात भरभक्कम माप पडू लागलं, ह्या आनंदानं कसे निवांत निवांत झालो.

ह्या साऱ्या पार्श्वभूमीवरच 'वाऱ्यावरची वरात' आली. आमच्या दृष्टीनं त्यात जिव्हाळ्याचा आणखी एक गहिरा तंतू गुंतला होता. पु. लं. च्या त्या आनंदपरिवारात मोक्याच्या जागी आमचा 'दादा'

झोकात चालत होता. १९६२-६३ च्या सुमाराला ' वाऱ्यावरची वरात ' मराठी रंगभूमीवर आली आणि जणू चैतन्याचा एक खळाळ वाहू लागला.

तेव्हा मी किर्लोस्करवाडी मुक्कामी होतो. ' वराती ' च्या अभूतपूर्व स्वागतानं मराठी वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरून वाहिले. 'बहुश्रुत'च्या दिवाळी अंकात विजय तेंडुलकरांनी खास त्यांच्या शैलीनं ' वरात ' काही अंशी शब्दांत उभी केली. मी ते सारं अधाश्यासारखं वाचलं आणि ते ' अवभृतस्नान ' स्वतःला घडण्याची वाट पहात राहिलो.

लौकरच तोही योग आला. पुण्याच्या डेक्कन जिमखान्याच्या अवाढव्य पटांगणात प्रचंड उघड्या कनातीत ' वाऱ्यावरच्या वराती ' चे प्रयोग अक्षरशः, ' साजरे ' झाले. हजारो प्रेक्षक त्या आनंदाचे वाटेकरी झाले होते आणि उरलेले यच्चयावत् पुणेकर घरोघरी हळहळत होते. नाटक, तमाशा, व्हरायटी, कीर्तन, नकला, गाणं, नाच, कथाकथन अशा साऱ्या आविष्कारांचं मिळून एक स्वतंत्र रसायन रंगभूमीवर तीन–साडेतीन तास ओसंडत रहायचं आणि-- ' निघाली वाऱ्यावरची वरात ' म्हणून वरातीचा शुभारंभ करणारी वऱ्हाडी मंडळी पहाता पहाता शिस्तबद्ध ' जनगणमन ' म्हणूही लागायची.

त्या दिवसात ' वराती ' चा ग्रुप ' तेव्हांच्या ', ' पूनम ' मध्ये उतरला होता. मीही त्यांच्याबरोबर राहिलो. ' गरजत्या चाळिशी 'तले सर्व कलांनी विकसित बिंबासारखे ऐन भरातले पु. ल. देशपांडे जवळून पाहिले. त्यांच्या अखंड आणि अवीट गप्पांची मैफिल जवळून ऐकली. पु. ल. आणि सुनिताबाईंखेरीज तिथं होते– दत्ता भट, विजया जयवंत, श्रीकांत मोघे, रमाकांत देशपांडे, मधु कदम, प्रफुल्ला जोशी ( आजच्या प्रसिद्ध चित्रकार प्रफुल्ला डहाणूकर) नीला देसाई (नीलम प्रभू), मधु गानू... ! ! सगळं एक दृष्ट लागावसं ' कुटुंब ' च होतं. आबालवृद्ध पुणेकर मंडळी अपूर्वाईनं ' वराती ' तल्या कलाकारांना पहायला ' पूनम 'वर घिरट्या घालायची. ( त्यांत कॉलेज पब्लिक जास्त ! ) ' ग्लॅमर ' ह्या शब्दाचा नेमका हवा तो अर्थ तिथं मला जाणवला, उमगला.

तारतम्य आणि अंदाज ह्या बाबतीत पु. ल. थोरच! तुफान चाललेली 'वरात' त्यांनी मधेच सुमारे ९ वर्षं बंद ठेवली आणि १९६८–६९ मध्ये ब.लगंधर्व रंगमंदिराच्या नव्याकोऱ्या रंगमंचावर पुन्हा नव्यानं 'वराती' चा खेळ मांडला. दरम्यान आम्ही 'पुणेकर' झालो होतो. पुन्हा एकदा एक 'इतिहास' घडू लागला.

पहाटे पाचपासून तिकिटासाठी मंडळी उभी रहायची. तिकिटाची खिडकी ९ वाजता उघडेपर्यंत रांग जंगली महाराज रस्त्यावर गेलेली असायची. प्रथम तिकिटांचा कोरा प्लॅन खिडकीवर दिसायचा आणि मग विक्रीला सुरुवात व्हायची. प्रत्येकाला जास्तीत जास्त सातच तिकिटं! गणितात गती असलेल्या मंडळींनी बालगंधर्व रंगमंदिराची आसनसंख्या आणि रांगेतील माणसं गुणिले सात हा हिशेब मनातल्या मनात करायचा आणि रांगेत उभं रहावं की नाही हे ठरवायचं.

'मी 'वरात' किती वेळा पाहिली त्याला गणती नाही. 'वरात' हा आपलं आयुष्य वाढवणारा 'बोनस' आहे असं आमच्या दोस्त-मंडळींचं मत होतं.– सामान्यतः, नाटकाची प्रयोगसंख्या वाढत चालली की, नटवर्गाचं आपापल्या भूमिकेतलं 'सुटणं' ह्या प्रकाराला तोंड द्यावं लागतं. 'वराती'चे ते सारे प्रयोग हा मात्र जणू एक स्वरेल वाद्यमेळ होता. एक सूर चढा नाही की उणा नाही.

पुन्हा काही वर्षांची 'गॅप'! मग कानांवर आलं 'चंद्रलेखा' तर्फे 'वरात' सादर होणार. वेगळ्याच संचात. स्वतः पु. ल.-सुनिताबाईही नाहीत. मुळातला कलाकार एकच–श्रीकांत मोघे!

– काहीच खरं नव्हतं. चंद्रलेखेला शोभेलसा थाटमाट, दिमाख होता;– पण आत प्राण नव्हता. पूर्वार्धातला गणगौळण, पोवाडा हा वरातीत माझा सर्वात आवडता भाग! तोच एकदम 'ढिला' वाटायचा. ते नुसतं श्रवणीय गाणं वाटायचं. कर्नाटकी कडवेकर मामीच्या भूमिकेत लखलखीत सुनिताबाईंना ज्यांनी पाहिलं होतं, त्यांना आशा-लता पटणं कठीण होतं. त्यातून 'हित्तं भरतंय् काऽऽय तुमचं ते भाजी बजाऽर?' ह्यातल्या 'भ' चा उच्चार 'व' च्या जवळचा? लाहौल बिलाकुवत्!

वसंतराव देशपांडे हुन्नरी, थोर कलाकार खरे! पण कुणीही माणूस कुठंही फिट्ट बसेल असं थोडंच आहे? शिवाय 'वराती' तल्या अभिनयाला (विशेषतः पूर्वार्धात) ज्या 'प्रोजेक्शन' ची गरज आहे, त्याचाच वसंतरावांकडं अभाव! 'सर्व जाणत्या' पु. लं. ना हे कळलं नसेल हे कसं शक्य आहे? आणि शोधायचा तर त्यांचा योग्य पर्याय (निदान पूर्वार्धापुरता–उत्तरार्धात वसंतराव बरेच सुसह्य होते.) तेच उभा करू शकले असते.–तात्पर्य, 'चंद्रलेखा' ची 'वरात' पहाताना पुन्हा पुलंचीच आठवण होत राहिली.

मौज म्हणजे-तरीही मनातल्या 'वराती' च्या मूळ चित्रावर मात्र छोटासाही चरा उमटला नाही. तीच गोष्ट थोडयाबहुत फरकानं दूरदर्शनवर झालेल्या 'वाऱ्यावरच्या वराती'ची! मधु कदम, शशि झावबा ह्यांच्यावर मधल्या वर्षांनी उमटलेल्या खुणा पाहाताना काही हरवल्यासारखं, चुकल्यासारखं वाटलं. बदललेल्या रूपांतही तोच जुना अनुभव कौतुकास्पद रित्या दिला मुख्यतः तिघांनी–रमाकांत देशपांडे, दादा आणि स्वतः पु. ल.! पण तरीही पूर्वीची 'वरात' न पाहिलेल्यांना थोडीशी कल्पना आली आणि पाहिलेल्यांच्या आठवणी जागवल्या हे श्रेय दूरदर्शनला द्यायलाच हवं.

पण ह्या साऱ्या घडामोडींतून 'वरात' अधिकच जिव्हारी जाऊन बसली आहे. मधल्या काळात मराठी रंगभूमीवर अनेक सुरेख संहिता पाहिल्या. अभिनयाचे उन्मेष पाहिले. नवी क्षितिजं विस्तारणारे 'प्रयोग' पाहिले. तरी मनातला एक कोपरा केवळ 'वराती' नंच अजूनही व्यापला आहे. कदाचित् ज्या संस्कारक्षम काळात 'वरात' प्रथम पाहिली त्याचा हा परिणाम असेल. पण ह्या चिरतरुण आविष्काराचं आणि तो देणाऱ्या कलाकारांचं आपल्यावर फार मोठं ऋण आहे, असं मनःपूर्वक वाटतं.

मृत्यूसमयी डोळयांसमोर निवडक तुकडया-तुकडयातून आयुष्याचा 'फ्लॅश बॅक' दिसतो ही फिल्मी कल्पना खरी असेल तर माझ्या 'फ्लॅश बॅक' मध्ये 'वाऱ्यावरच्या वराती' ची जागा 'राखीव' आहे.

❋ ❋

## ॥ संस्था ॥

सुमारे ११/१२ वर्षांपूर्वी 'स्वरानंद–पुणे' ह्या नावाला काही विशेष आकार नव्हता; पण तरी, ती एक जिवंत, नवे नवे प्रयोग करू इच्छिणारी आणि गुणी गायकवादक कलाकारांच्या एकजुटीवर ताठपणे उभी राहिलेली स्वयंभू 'संस्था' होती.

आज – 'मंतरलेल्या चैत्रबनात' ह्या विक्रमी कार्यक्रमामुळं बृहन्महाराष्ट्रातील सर्व रसिकांना 'स्वरानंद' हे नाव सुपरिचित आहे. परंतु 'चैत्रबन' नावाच्या भर्जरी, झगमगत्या पडद्याआडच्या डोळे दिपवणाऱ्या काळोखात- 'स्वरानंद' नावाची ती 'संस्था' नक्की कुठं आहे किंवा मुळात शिल्लक आहे का ?– हा संशोधनाचाच विषय आहे. आयुष्यात अतिशय योग्य वेळी आणि योग्य काळापर्यंतच 'स्वरानंद'शी माझा घनिष्ठ संबंध आला, हे मी मनःपूर्वकपणे माझं भाग्य मानतो.

पुण्यात येण्यापूर्वी मी केवळ 'नाटकात' रमलेला होतो. वर्षभर ह्या ना त्या निमित्तानं चेहऱ्यावरचा रंग पुसलाच जायचा नाही; पण स्थलांतर करताना मात्र आयुष्यानं सांधा पारच बदलून टाकला. नाटक दूर गेलं, कविता, जवळ आली. स्वतःच्या अस्तित्वाचा नव्यानं शोध सुरू झाला. त्या वेळी पुण्यात 'हिंदी ऑर्केस्ट्रा' हा प्रकार ऐन जोमात होता. मी, तलत–मुकेशची गाणी भरपूर म्हणायचो; पण तरीही 'हिंदी ऑर्केस्ट्रा'त जायची ओढच कधी वाटली नाही. 'नाटक नाही, ऑर्केस्ट्रा नाही–मग आपल्यातल्या परफॉर्मरचं काय ? त्याला व्यासपीठ कुठलं ?'– 'बघू या'

एके दिवशी एक वेगळी जाहिरात वाचली–मराठी भावगीतांचा कार्यक्रम, 'आपली आवड'! एखाददुसरा अपवाद वगळता कलाकारांची नावं पूर्णपणे नवी, अपरिचित होती. तरीही खेचल्यासारखा मी शुभारंभाच्या पहिल्या प्रयोगाला तिकीट काढून हजर राहिलो आणि एका निर्मळ आनंदानं मन काठोकाठ तुडुंब भरलं. जुन्या भावगीतांचा जमाना पूर्वीच संपला होता. हृदयनाथ मंगेशकर, श्रीनिवास खळे, यशवंत देव, मंगेश पाडगांवकर, शांता शेळके आदींनी नवा कालखंड सुरू केला होता. कात टाकल्यासारखं 'मराठी भावगीत' नवं झालं होतं. नाट्यसंगीतातही जितेंद्र अभिषेकींमुळं, शास्त्रीय संगीत आणि सुगम भावसंगीत ह्यांचा सुवर्णमध्य साधणारी, नव्या काळाला आपलीशी वाटणारी नाट्यगीतं हवेत घुमू लागली होती-मग ह्या साऱ्या आवडणाऱ्या गाण्यांची भेट घडायची ती केवळ ध्वनिमुद्रिकांतून आणि मुख्यतः आकाशवाणीवरून! पुणे–मुंबई केंद्रावरच्या 'आपली आवड' ह्या कार्यक्रमाची 'कानांत प्राण' आणून वाट पाहिली जायची ती त्यामुळंच!

'स्वरानंद' च्या ह्या अभिनव कार्यक्रमामुळं रेडिओच्या खोक्यामधली 'आपली आवड' रंगभूमीवर 'फूटलाइटस्‌च्या प्रकाशात' आली. हिंदी ऑर्केस्ट्रांच्या भाऊगर्दीत–स्वतःच्या वेगळेपणामुळं आणि साधेपणामुळं उठून दिसणारा 'स्वरानंद' चा हा त्या काळातला एकमेव 'मराठी ऑर्केस्ट्रा' होता. नाही म्हणायला, स्वतः हृदयनाथ मंगेशकर, अरुण दाते ही मंडळी 'भावसरगम' सादर करीत होती; पण हार्मोनियम–तबला–व्हायोलीन अशा मोजक्या वाद्यांनिशी आणि म्युझिक पीस नावाचा प्रकार पूर्णपणे वगळून!– म्हणजे भावगीतगायनाची काहीशी जुनीच धर्ती!

ह्या पार्श्वभूमीवर, 'स्वरानंद'ची 'आपली आवड' फार ताजी, टवटवीत वाटली आणि म्हणूनच अल्पावधीतच रसिकप्रिय ठरली. गुणी गायक-गायिका, सुसज्ज वाद्यवृंद आणि शिस्तबद्ध सुबक आविष्कार ह्यामुळं मराठी भावगीतांच्या इतिहासात नवी प्रथा सुरू करण्याचा मान निःसंशयपणे 'स्वरानंद'च्या नावावर नोंदवला जाईल. त्यामुळंच

शुभारंभाच्या प्रयोगानंतर वर्ष दीडवर्ष– 'स्वरानंद'च्या कलाकारांचा निःसीम चाहता आणि सुहृद ही माझी भूमिका होती. माझ्यातल्या 'किंचित्' गायकाला ह्या नव्या व्यासपीठाचं कुठं तरी खोल आकर्षण वाटत होतं, हेही मोकळेपणी कबूल करायला हवं.– आणि योगायोगानं एका क्षणी अनपेक्षितपणे मीही पूर्णांशानं 'स्वरानंदी' झालो.

त्या वर्षीच्या 'सवाई गंधर्व उत्सवा'च्या गर्दीत 'स्वरानंद' चा संयोजक विश्वनाथ ओक भेटला. 'तुझ्याशी काहीतरी बोलायचंय' म्हणून मला बाजूला घेऊन गेला. तेवढ्या काही क्षणात– 'रंगभूमीवर डौलात माईकसमोर उभं राहून आपण आवडीची यच्चयावत् गाणी गातोय, श्रोत्यांचं भान हरवलंय.' इ. इ. शेखमहंमदी मनोरथांचा धावता ट्रेलरही मी पाहून टाकला.– थोडं आडोशाला गेल्यावर ओकनं त्या स्वप्नसृष्टीतून मला जमिनीवर आणलं. 'आमचा नेहमीचा निवेदक सुहास तांबे परीक्षेमुळं बिझी आहे. तेव्हा तू 'आपली आवड'चं निवेदन करशील का ?'–

'काहीतरी' विचारायचंय-म्हणून पोरीनं आपल्याला 'कॉर्नर'-मध्ये न्यावं आणि आपण 'अंतर्बाह्य मोहरलेले' असताना 'ह्या भाऊ-बिजेला मी तुला ओवाळू का ?' (हा उभयपक्षी) 'व्याकुळ' प्रश्न टाकून आपल्याला 'कॉर्नर' करावं, तशी माझी अवस्था झाली. अशा प्रसंगी 'हो' म्हणण्यापलीकडं आपण काय करणार ?– मीही तेच केलं. ओकला होकार देऊन टाकला. माझ्यातल्या भुकेल्या 'परफॉर्मर' ला एक लाजवाब व्यासपीठ मिळालं.

अशा कार्यक्रमाचं 'निवेदन' ही एक विचित्र गोष्ट आहे. 'असून अडचण, नसून खोळंबा' अशी काहीशी ती अवस्था असते. कारण लोक सकृत्दर्शनी तरी केवळ गाणी 'ऐकायला' आलेले असतात. त्यांना निवेदनात 'रस' घ्यायला लावायचा आणि त्याच वेळी मूळ कार्यक्रमा-वर 'आक्रमण' ही करायचं नाही अशी दुहेरी कसरत ! मी बराच विचार केला आणि दिल्ली रेडिओवर गाण्याला समांतर शेरोशायरी पेश करायचे, त्या धर्तीवर कवितांतून कार्यक्रम विणू लागलो. ही कल्पना अपेक्षेपलीकडं 'क्लिक' झाली. एकाच वेळी अनेक गोष्टी साध्य झाल्या.

...६

कार्यक्रम उठावदार होऊ लागला. निवेदनाची नवी शैली आकाराला येऊ लागली. आणि माझ्या कवितांना मनमुराद अंगण सापडलं.

पण 'स्वरानंद 'विषयी मला खरा जिव्हाळा होता तो तिथल्या प्रयोगशीलतेमुळं ! 'आपली आवड 'च्या पाठोपाठ दोन स्वतंत्र कार्यक्रम त्यांनी सादर केले होते. मूळ शास्त्रोक्त चिजा आणि त्यांवर आधारलेली नाटचगीतं यांचा–'नाटचसंगीत, उगम आणि आविष्कार' हा एक कार्यक्रम आणि दुसरा 'शिवगीतांजली !'– मी संस्थेत येताच आणखी एक नवा कार्यक्रम उभा राहिला, भारतीय स्वातंत्र्ययुद्धावर आधारित 'स्वतंत्रते भगवती' ! - असे प्रयोग हा संस्थेचा खरा 'प्राणवायू' असतो. त्या प्रयोगांचं व्यावहारिक अपयश हेही त्या संस्थेचं व्हिटॅमिन ठरू शकतं. हे भान संपतं तेव्हा– 'नुसत्याच जटाजूट आणि दाढीमिशा, आत ऋषीच नाही' अशी संस्थेची अवस्था होते.

'आपली आवड' जोसात होती. चित्रपट व्यवसायाशी नातं जुळून माझी मुंबईला ये-जा सुरू झाली. त्याच सुमाराला 'स्वरानंद 'ला पहिला तडा गेला. संयोजक विश्वनाथ ओकच संस्था सोडून गेला. उरलेली मंडळी एकवटून उभी होती; पण तरीही पायाच डळमळला होता. अशा वेळी नवा कार्यक्रम उभा करणं ही एकच गोष्ट, उभारीच्या दृष्टीनं हिताची ठरते. मीही तेच केलं. खूप दिवसांपासून ठेवणीत एक कल्पना पडली होती. 'स्वरानंद 'मध्ये येण्यापूर्वी त्या कल्पनेचा एक प्रयोग करून पाहिला होता; पण फसला होता. तीच कल्पना नव्या दमात पुन्हा साकार केली– गदिमांच्या सदाबहार गीतांचा कार्यक्रम 'मंतरलेल्या चैत्रबनात' !

'मंतरलेल्या चैत्रबनात' हे माझ्या गदिमा गीतांवर लिहिलेल्या एका लेखाचं शीर्षक ! 'गाण्यांच्या कार्यक्रमाचं शीर्षक म्हणून हे खटकतं' अशा स्वरूपाची चर्चाही त्या काळात 'स्वरानंद' मध्ये झाली होती. कार्यक्रमाच्या आखणीचे आणि स्वरूपाचे पूर्णाधिकार मी 'स्वरानंद 'मध्ये असेपर्यंत माझ्याकडेच होते. अर्थात 'स्वरानंद 'च्या गुणी कलाकारांच्या बहुमोल सहकार्यावाचून कार्यक्रम उभाच राहिला नसता ही गोष्ट निःसंशय आहे.

ग. दि. मा., सुधीर फडके, राजा परांजपे ह्या त्रयीच्या साक्षीनं साजऱ्या झालेल्या पहिल्या प्रयोगापासूनच 'मंतरलेल्या चैत्रबनात' भाग्यवान ठरला. कल्पना, आविष्कार आणि यश ह्यांची अखेर गाठ पडली.–पुढचा काळ, धीम्या चालीत पण दिमाखदारपणे 'चैत्रबन' चालत राहिलं. मुंबईतही एक–दोन प्रयोग झाले. क्षितिज विस्तारत होतं. इतक्यात मी 'स्वरानंद'मधून बाहेर पडलो. कारणांचं चर्वित-चर्वण करण्यात अर्थ नाही. घडलं ते अपरिहार्यच होतं एवढंच त्याबाबत म्हणता येईल. माझ्यापाठोपाठ तिघे–चौघे महत्त्वाचे सहकारी बाहेर पडले.–ह्यानंतर, माझ्या आठवणीप्रमाणं, सुमारे एक वर्ष 'चैत्रबन'चा एकही 'थिएटर शो' होऊ शकला नाही. केवळ 'आपली आवड'च रकुठुकु चाललं होतं. वर्षाच्या अखेरीला कविवर्य माडगूळकरांचं निधन झालं. लगेचच्या आठवड्यात 'चैत्रबन' संक्षिप्त रूपात दूरदर्शनवर सादर झालं.–'ज्योतिने तेजाची आरती' ह्या निराळ्या शीर्षकाखाली ! त्याचा सूत्रधार मी होतो. त्या छोट्याशा कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

'दूरदर्शन'वरील कार्यक्रमाचा 'पूर्णावतार' अशा चलाख जाहिरातीनिशी 'स्वरानंद'नं प्रदीर्घ काळानंतर 'मंतरलेल्या चैत्रबनात' थिएटरमध्ये सादर केला आणि कार्यक्रम न भूतो, न भविष्यति उठला. वर्ष दीडवर्ष धीमेपणानं चाललेला आणि नंतर सुमारे वर्षभर रखडलेला 'तो'च कार्यक्रम एकाएकी प्रचंड लाटेवर स्वार झाला. 'यशासारखं यश नाही' ह्या विधानाचा साक्षात् प्रत्यय आला. हे यश अभूतपूर्व आणि भूषणास्पद आहे हे मान्य करूनही त्याचं समंजस मूल्यमापन करताना त्यामागच्या बेभान 'गदिमा प्रेमा'चा सिंहाचा वाटा मानावाच लागतो.

लाट ही केव्हा तरी ओसरतेच आणि मग लाटेवर स्वार झालेल्यांचे पाय जमिनीवर डगमगू लागतात. 'स्वरानंद' ही संस्था आज त्या अवस्थेत दिसते आहे. संस्था सोडली असली तरी व्यक्तिगत संबंधांना कसलाच बाध यायचं कारण नव्हतं. त्यामुळं त्या भावनेपोटीच मी संस्थेचा सारा प्रवास तटस्थपणे पहात आलो आहे.

'स्वरानंद'च्या पायाभरणीत विश्वनाथ ओकचा पुढाकार होता. 'चैत्रबन' हा कळस मानला तर त्यातला सुधीर मोघ्यांचा मोठा वाटा

न नाकारता येणारा ! पूर्वार्धात पाच स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे प्रयोग करणाऱ्या स्वरानंदनं नंतरच्या काळात प्रचंड लाटेवर तुकडे पडत असताना वाहत राहण्याखेरीज काय केलं ? ह्याचा संस्थेनं शांतपणे विचार करायला हवा.

काही उपक्रम हे 'काळाची गरज' म्हणून जन्माला येतात. 'स्वरानंद' यापैकीच एक ! ती गरज संपली आहे का ?– ह्याचा शोध घ्यायला हवा. नसेल तर कात टाकून नव्या काळानुसार नवं रूप घ्यायला हवं आणि एक खूणगाठ मनाशी निश्चित बांधायला हवी–

प्रतिभावंत, अभिजात बुद्धी; गुणी निष्ठावंत कलाकारांची एकजूट आणि नित्य नव्या प्रयोगांचा शोध ह्यावर संस्था उभ्या राहतात. कुठल्या तरी प्रलोभनानं एकमेकांशी जखडून राहणारी, कालचा कित्ता आजही गिरवीत बसणारी आणि सोईप्रमाणं संस्थेशी नातं तोडणारी आणि पुन्हा जोडणारी दिशाहीन माणसं एकत्र बांधलेला कळप–म्हणजे 'संस्था' निश्चितच नव्हे !

## ॥ उंबरठ्यावरचा ॥

कलाक्षेत्राच्या अगदी आरंभीच्या उंबरठ्यावर तो उभा होता, तेव्हापासून मी जब्बारला पहात आलो आहे. पी. डी. ए. तर्फे सरिता पदकींचं 'खून पहावा करून' तेव्हा नुकतंच रंगभूमीवर आलं होतं. दिग्दर्शक आणि प्रमुख भूमिकेत डॉ. श्रीराम लागू होते. ह्या नावाभोवती आज असलेलं वलय तेव्हा नव्हतं. पण 'वेड्याचं घर उन्हात' मुळं त्या नावाचा प्रकाश क्षितिजावर नुकताच डोकावत होता. 'नाटक गाजणं, त्याचे झंझावाती दौरे निघणं' ह्या शब्दांना आजचा अर्थ तेव्हा अजून आलेला नव्हता. त्यामुळं पुण्या-मुंबईपासून दूर राहणाऱ्या नाट्यवेड्यांना वृत्तपत्रातील वर्णनांवर भूक भागवावी लागायची. 'खून पहावा करून' ह्या नाट्यप्रयोगाचं कौतुक मी असंच ऐकून होतो. त्यात पुन्हा पी. डी. ए. ही अव्यावसायिक नाट्यसंस्था ! त्यामुळं त्यांचे प्रयोग बाहेरगावी पहायला मिळणं हा दुर्मिळ योगच ! पण गणेशोत्सवानिमित्त 'खून पहावा करून' चा प्रयोग चक्क आमच्या गावी ठरला आणि मी दिवस मोजू लागलो.

किर्लोस्करवाडीच्या शिस्तबद्ध गणेशोत्सव सोहळ्याला एकाच 'खलनायका'चा धाक सदैव असायचा. वेळ चुकवून (की 'साधून' ?) साऱ्या आनंदावर पाणी ओतायला टपलेला चुकार पाऊस ! पण त्या दिवशी तोही कृपावंत होता. वाडीच्या उघड्या नाट्यगृहात थंडगार हवेमध्ये मंडळी हौसेनं जमली आणि शोध लागला की अजून 'नाटक कंपनी' आलेलीच नाही. मग तास दीडतास सामुदायिक प्रतीक्षा झाली. चर्चा-शंका-कुशंका-तर्ककुतर्क झाले आणि तेवढ्यात कलाकारांची गाडी

नाट्यगृहाच्या पटांगणात शिरली. कऱ्हाडपाशी वाट चुकल्यामुळं बराच मोठा टल्ला खाऊन मंडळी अखेर मुक्कामाला पोचली होती. 'मोजून दहाव्या मिनिटाला नाटक सुरू होईल' अशी दिलगिरीनिशी ग्वाही ध्वनिक्षेपकावरून देण्यात आली. खरोखरच दहाव्या मिनिटाला नाटक सुरू झालं. आणि झालेल्या उशिराची कसर पुरेपूर भरून निघाली.:

मला त्या प्रयोगाचा 'इम्पॅक्ट' आजही आठवतो. लागूंच्या व्यक्तिमत्त्वाशी विसंगत वळणाची असूनही परिणामकारक ठरलेली त्यांची प्रमुख भूमिका आठवते. त्यांच्या बायकोच्या भूमिकेतल्या तडाखेबंद श्यामला वनारसे आठवतात. एकाच स्वरात अखंड बडबडत रहाणाऱ्या टक्कलवाल्या भूमिकेतले विश्वास मेहेंदळे आठवतात. रुबाबदार 'पठाण' श्रीराम खरे आठवतात. पण तरीही—त्या सर्वांत अधिक भिडला होता तो—इथियोपियाला चाललेल्या तरुण रहस्यकथा लेखकाच्या भूमिकेतला उंचाडा, पोरसवदा जब्बार पटेल ! त्याच्या आसपासच बहुधा 'जनावर' ही एकांकिका सादर करून त्यानं 'पुरुषोत्तम करंडक स्पर्धा' गाजवल्याचं वाचलं होतं.—पण मी प्रत्यक्ष पाहिलेला तो 'खून पहावा करून' मधला जब्बार खरोखरच अविस्मरणीय होता. 'अभिनेता' म्हणून मला जब्बारची आवडलेली ती 'एकमेव' भूमिका !

पुण्यात रहायला आल्यावर मी सलामीलाच जब्बारला पाहिला व्यंकटेश माडगूळकरांच्या 'तू वेडा कुंभार' मध्ये ! त्या नाटकातला त्याचा रंगमंचावरचा आक्रमक संचार, नंतरचा आक्रस्ताळा तडफडाट हा त्या साऱ्या नाट्यप्रयोगाच्या एकूण 'चढ्या' स्वराशी जुळणाराच होता, हे खरं—पण तरीही, 'खून पहावा करून' मधल्या त्याच्या संयत भूमिकेवर लुब्ध झालेल्या मला, त्याची ही भूमिका गरजेहूनही अधिक भडक, अंगावर येणारी वाटली.

त्यानंतर थोड्याच दिवसांत मीही पी.डी.ए. परिवाराच्या काठाकाठानं वावरू लागलो. विद्याधर वाटवे, डॉ. पानवलकर, रमेश मेढेकर, सुरेश बसाळे, अंजली फडके, ज्योत्स्ना चिटणीस असा झकास ग्रुप जमला होता. आम्हा ज्युनिअर मंडळींचा जब्बार हा अनभिषिक्त म्होरक्या होता. त्यामुळं त्याला जवळून पहाता आला आणि हळूहळू लक्षात येऊ

लागलं की अभिनेत्याहून महत्त्वाचं असं अधिक काहीतरी त्याच्याजवळ आहे. स्वतःच्या मर्यादांची आणि सामर्थ्याची फार थोड्या लोकांना असणारी 'नेमकी' जाणीव त्याला पुरेपूर आहे. त्यामुळं त्या दोन्हींचा आणि एकूणच अनेक गोष्टींचा चतुर 'वापर' करून घेण्याचं कसब त्याच्याकडं आहे. हाती घेतलेल्या कामात स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन सर्व अस्तित्वानिशी राबण्याची आवड आहे. अवघड गोष्टी सुरळीत करून घेण्याची दुर्मिळ हातोटी आहे आणि प्रसंगी – 'ठेवणीतलं अस्त्र' म्हणून वापरण्यासाठी पुरेसा 'रूथलेसनेस'ही आहे. त्यामुळंच पुरुषोत्तम करंडकपासून आजपर्यंतचा त्याचा सारा प्रवास (जाणीवपूर्वक असेल अथवा नसेल, पण) फार 'निश्चित' आहे.

कुठल्याही संस्थेला 'वाढतं झाड' हवंही असतं आणि नकोही असतं. 'हवाहवासा' असण्यापासून ते 'नकोनकोसा' होईपर्यंतच्या पी.डी.ए.मधला जब्बारचा प्रवास मी काही अंतरावरून पाहिला आहे. अर्थात् 'जब्बार' हीच एक संस्था मानली तर तो स्वतःही ह्या नियमाला अपवाद ठरू शकत नाही, हेही तितकंच खरं !

प्रथम त्यानं 'पीडीए'च्या ज्येष्ठांना सोबत घेऊन अनिल जोगळेकरचं 'अपराधी' केलं. नंतर जुन्यानव्यांचं मिश्रण करून 'मॅजिशियन' केलं. मग बरोबरच्या मंडळींसह 'अशी पाखरे येती' दिलं आणि मग–एकरकमी ताजी, टवटवीत मंडळी हाताशी धरून 'घाशीराम कोतवाल' नावाचा 'ऐतिहासिक' अॅटमबॉंब ओंजळीत झेलला.

पैकी 'अशी पाखरे येती' ह्या कवितेसारख्या मधुर नाटकाबद्दल लेखक म्हणून विजय तेंडुलकर आणि दिग्दर्शक म्हणून जब्बार ह्या दोघांना आपले मनःपूर्वक सलाम आहेत. ह्या नाटकात मूळचाच विलक्षण लवचिक, कोवळा फॉर्म जब्बारनं त्याच अंदाजानं रंगभूमीवर उभा केला होता.–'अशी पाखरे' मधली त्याची बरीच लोकप्रिय झालेली भूमिका मात्र पुन्हा 'अभिनेता' ह्या नात्यानं मला कणभरही पटली नाही. स्वतःच्याच धुंदीत स्वतःचीच फसवणूक करीत एकाकीपणाच्या खाईत आपल्या पायांनी जाणारा ह्या नाटकाचा नायक जब्बारनं अनावश्यक भडक पद्धतीनं उभा केला होता.– 'माणूस' म्हणून त्याचं 'खोटेपण'

क्षणभर मान्य केलं तरी खोटा माणूसही त्याच्या त्याच्या ठिकाणी, निदान त्या त्या क्षणी ' जेन्युईन ' असायला हरकत नाही. तो मुद्दाम ठरवल्या-प्रमाणं ' खोटा माणूस ' म्हणून उभा करणं आणि त्यासाठी गळ्याच्या शिरा ताणून आरडाओरडा करणं ही अभिनयाची पद्धत त्या नाटकाच्या तरल प्रकृतीला पूर्णतः विसंगत होती असं मला आजही प्रांजलपणे वाटतं. ' नाटक ' ह्या माध्यमावर जब्बारला आलेली जबरदस्त पकड मात्र ह्यानंतर चढत्या श्रेणीनं जाणवत गेली. आणि एक गोष्ट आज जाणवते की ' अशी पाखरे येती ' पासूनच तो नकळत चित्रपट ह्या माध्यमाच्याही जवळ येत चालला असावा.–कदाचित् मी चुकतही असेन! ...पण प्रदीप दीक्षितच्या ' बिफोर द थर्ड बेल गोज् ' ह्या डिप्लोमा फिलमसाठी त्यानं ' अशी पाखरे ' चा ग्रुप वापरला होता. त्या शूटिंगमध्ये सहभागी होतानाच जब्बारचं चित्रपट माध्यमाचं आकर्षण केवळ अभ्यासू प्रेक्षक ह्या भूमिकेची रेषा ओलांडून पुढं निघालं असावं, असं मला वाटतं.

अशी माणसं जेव्हा एखादी गोष्ट मनात घेतात तेव्हा ती गोष्टही त्यांच्या दिशेनं आपणहून वाटचाल सुरू करते. जब्बारच्या पायाखाली ' सिनेमाची वाट ' अशीच अलगद आपसूकपणे आली–आणि तशी ती वाट, अमर्यादच !

' सामना ते सिंहासन ' ही जब्बारची वाटचाल मी जागरूकपणे पाहिली आहे. ' सामना ' हा नाटकाची पुण्याई वापरून मांडलेला सावध हिशेब होता. ' जैत रे जैत ' हे स्वतःच्या कातडीला धक्का न लावणारं १०० % निखालस अपयश होतं. (जब्बारमधला व्यवहारी माणूस हे मान्य न करता उलट–' ते चित्र मी काही वर्षं 'लौकर' केलं ' असलं दुसऱ्याला मूर्ख ठरवणारं विधान मुलाखतीत करतो, ते एक सोडा. ) ' सिंहासन ' हे नव्या माध्यमाचा येत चाललेला अंदाज, चाकोरीबाहेरील विषय निवडण्याचं धाडस, प्रचंड व्याप मांडूनही काटेकोर आखणीनं केलेला उरक आणि जनसामान्यांना भिडण्यात मिळवलेलं यश–अशा अनेक गोष्टींचं कौतुकास्पद प्रत्यंतर होतं. ' उंबरठा ' विषयी एकमुखानं बरंच ऐकून आहे आणि शिवाय त्या सर्वांपलिकडं स्वतःला वाटणारी उत्सुकताही आहेच. अनेक यशं आणि अपयशं पचवूनही दुसऱ्याच्या

मनात स्वतःविषयी अपेक्षा आणि उत्सुकता जागृत ठेवणं—हे श्रेय लहान-सहान निश्चितच नाही.— जब्बारच्या 'अशी पाखरे येती' मध्ये मी 'उसना आवाज' दिला होता हा एक अपवाद वगळता जब्बारशी मला पूर्वीही कधी देणं घेणं नव्हतं आणि पुढही असायचं कारण नाही. पण तरीही केवळ सहप्रवासी म्हणूनही; ह्या सर्वार्थानं 'पोचलेल्या' ( ले, लै, लं लः ही संपूर्ण बाराखडीही कमीच पडावी ! ) माणसाबद्दल एक गूढ आपुलकी मला वाटते—ही मजेदार वस्तुस्थिती आहे.

चांगला चित्रपट निर्माण करण्यापलिकडं जाऊन जब्बारनं दाखवलेल्या 'अवांतर चलाखीनं' बऱ्याच मंडळींना धक्का बसल्याचं दिसतं. जब्बारला 'ओळखणाऱ्यांना' धक्का बसायचं काहीच कारण नाही. त्याच्या 'प्रायोगिक' रूपात हा 'प्रोफेशनल कमर्शियल' कधी-पासूनचा आहे. फक्त चित्रपटाच्या उघडचा जगात तो अधिक उघडा होऊ लागलाय, एवढंच !—ह्यावर जसा विनाकारण बोटं मोडण्यात अर्थ नाही, त्याचप्रमाणं अशा 'करामतीचं' गोंडस समर्थन कुणी करू पाहणं हेही मूळ कृतीइतकंच संतापजनक आहे. शेवटी, चित्रपट हा 'धंदा' आहे. ह्या युद्धात स्वतःच्या बचावासाठी स्वतःला पटतील—जमतील ते वैध—अवैध मार्ग वापरायचं स्वातंत्र्य प्रत्येकालाच आहे. फक्त—भूमिका स्वच्छ असावी ! उगाच – आडून बाण मारून केलेल्या 'वालीवधा' ला 'खलनिर्दालन' वगैरे म्हणू नये ! – 'उंबरठा' ही संकल्पना फार बोलकी आहे. 'उंबरठा' हा एकाच वेळी दोन जगांचा प्रतिनिधी असतो. कुठलीही दिशा धरली तरी नवं जग नव्या सुखदुःखांनिशी स्वागताला उभं असतंच. अशा उंबरठ्यावर उभा राहणारा माणूस म्हटलं तर त्या दोन्ही जगांचा असतो किंवा केवळ उंबरठ्याचाच असतो. पण तरी तो तसा 'कुंपणावरचा' नक्कीच नव्हे ! – आयुष्याचा कुठलाही किंवा प्रत्येक जागता क्षण हा ज्यांचा 'उंबरठा' असतो, अशी कर्तृत्ववान् माणसं मोजकीच असतात.

असा सदैव 'उंबरठ्यावरचा' माणूस कुणाला पहायचा असेल तर त्यानं बेशक जब्बारला भेटावं.

❊ ❊

## ॥ मुहूर्ताचं गाणं ॥

मी मुळात कवितेकडं आलो ते गाण्यांच्या वाटेनं! नकळत्या वयातही स्वरांच्या ओढीनं जी गाणी ऐकली, त्या सुदैवानं सच्च्या कविताही होत्या. त्यामुळं स्वरांच्या रेशमी कोषातून स्वत:लाही नकळत अनाहूत दान मिळत राहिलं ते कवितेचंच! मौज अशी की राजापूरच्या गंगेसारखा तो कवितेचा प्रवाह कितीतरी दिवस मनाच्या त्वचेआड मुकाट वाहत होता. पण आयुष्याचा जाणीवपूर्वक प्रवास सुरू होताच एका क्षणी तो कारंजासारखा बाहेर उसळला आणि उभं अस्तित्व कवितेनं झपाटलं गेलं. त्या कवितेचं रूप गाण्याहून खूप निराळं होतं. निखळ गद्यच जणू कवितेच्या रूपानं वाट काढू लागलं होतं.

क्षणोक्षणी चुका घडतात
आणि श्रेयं हरवून बसतात
आपल्याच रिकाम्या ओंजळी आपल्याला
फार काही शिकवीत असतात

..............

एक सांगशील, आपले रस्ते
अवचित कुठ कसे जुळले ?
आपल्याच नादात चालताना
हेदेखणे वळण कसे भेटले ?

– कधी कधी वाटायचं, हे तर साधेसुधे उद्गार आहेत–ह्यांना 'कविता' तरी म्हणावं का ? पण तरीही ते मनाचे उद्गार कवितेच्या घुमटात अनावर घुमतच राहिले आणि लक्षात आलं की आपल्या

पायांखालची वाट कवितेची झाली आहे.–आता आर्युविम्यालाही पर्याय असेल, पण कवितेला नाही ! ह्या मस्त वाटचालीतच एका वळणावरती जुन्या ओळखीची गाण्यांची वाट पुन्हा सामोरी झाली आणि बघता बघता कवितेच्या वाटेत विरघळून गेली. कधी मख्मली हिरवळ भेटावी, तर कधी थंडगार धूळ पावलांना बिलगावी त्याप्रमाणं आता सोबतीला कधी कविता असते, कधी गाणं असतं.

'चित्रपटातील गीत' हा माझा जुन्या जिव्हाळ्याचा विषय खरा ! पण चित्रपट गीतकार होण्याची तीव्र महत्त्वाकांक्षा वगैरे माझ्यात होती असं मला वाटत नाही. शिवाय चित्रपट क्षेत्राच्या बुलंद, पोलादी भिंतीत लपलेले छुपे दरवाजे कुठल्या मुहूर्तावर उघडतील आणि कुठल्या क्षणी मिटतील ह्याची कल्पना साक्षात् जगन्नियंत्यालाही असणं मुष्किल–तेव्हा आपण उगाच ते दरवाजे उघडण्याची 'कळ' कुठे आहे ते शोधत कळ लागेतो तिष्ठत बसण्यात काय मतलब ? ह्या समंजस विचारानं मी आपला माझ्याच नादात चालत राहिलो आणि योगायोगानं स्वतःला कळण्यापूर्वीच चित्रपट गीतांच्या मुलखात आपसूक येऊन पडलो.

'किल्ले राजगड'वर एक अनुबोधपट करण्याच्या इराद्यानं पूर्व लेखनासाठी माझा मित्र प्रदीप दीक्षित गो. नी. दांडेकरांसमवेत राजगडावर दोन-तीन दिवस मुक्काम करणार होता. त्याअगोदर ५।६ महिन्यांपूर्वी मीही एकदा राजगड ही 'चीज' अनुभवून आलो होतो. तेव्हा ह्या खेपेलाही 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' ह्या न्यायानं अस्मादिक त्या दोघांसमवेत राजगडावर डेरेदाखल झाले.–दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी एक चित्रपटाचं युनिट 'लोकेशन्स' पाहण्यासाठी किल्ल्यावर आलं. दिग्दर्शक चंद्रवदनभाई, निर्माते किशोर मिस्किन इत्यादी मंडळींचा त्यात समावेश होता. संपूर्ण शिवचरित्रावर एक महत्त्वाकांक्षी चित्रपट काढण्याचा बेत त्यांनी आखला होता. प्रदीप दीक्षित त्यांचं पटकथा-संवादाचं काम करणार होता. त्याचा मित्र ह्या नात्यानं मी त्या मंडळींमध्ये मिसळून गेलो, भटकलो, फोटो काढले, रात्री शेकोटीभोवती कविता-गाणी-नकला ह्यांच्या सहाय्यानं 'रात्र जागवायचं'

कलावंताचं आद्यकर्तव्य इमानेइतबारे पार पाडलं.– दुसऱ्या दिवशी निरोप घेताना, ' राजा शिवछत्रपती ' ह्या भव्य, रंगीत मराठी चित्रपटात ' मदारी मेहेतर 'ची छोटीशी भूमिका मला देण्याचा मनोदय दिग्दर्शक चंद्रवदननी जाहीर केला. मनातून गुदगुल्या झाल्याच. पण पूर्वानुभवांमुळं–त्या काळात लावल्या जाणाऱ्या अनेक 'मधाच्या बोटांत' ' आणखी एकाची भर ' अशी मनाची समजूत घालून मी शांतचित्तानं पुण्यपत्तनी परतलो.

दोन-चार दिवसांनी जवळच्या दोस्तमंडळींनी 'चित्रपट गीतकार' बनल्याबद्दल अचानकपणे अभिनंदन करायला सुरुवात केली. काय घोळ आहे, कळे ना ! शोध घेतल्यावर झालेला घोटाळा लक्षात आला. ' रसरंग 'मध्ये ' राजा शिवछत्रपती ' निघणार असल्याची वार्ता फोटोसहित छापून आली होती. राजगडावर काढलेल्या त्या फोटोत साहजिकच मीही होतो आणि खाली युनिटच्या लोकांची नावं लिहिताना ' कवी सुधीर मोघे ' असा अस्मादिकांचा उल्लेख होता. तात्पर्य, गैरसमजाला भरपूर वाव होता. मी योग्य तो खुलासा करून दोस्तमंडळींचा गोड गैरसमज दूर केला. त्या चित्रपटाशी ' गीतकार ' ह्या नात्यानं त्यावेळी अपघातानं जोडला गेलेला संबंध पुढं खरोखरच जुळायचा होता, हे तेव्हा मला स्वप्नातही खरं वाटलं नसतं.

' आपली आवड 'च्या कार्यक्रमाच्या निमित्तानं मुंबईला गेलो असताना शिवाजी मंदिरपाशी अचानकपणे दिग्दर्शक चंद्रवदनभाई भेटले. ' मदारी मेहेतर 'ची भूमिका मलाच मिळणार असल्याचा खुंटा मी हलवून बळकट केला. भाईंनी ते मान्य केलंच; पण एकूण बहुगुणीपणा लक्षात घेऊन त्यांचा 'सहाय्यक दिग्दर्शक' म्हणून येण्याचं आवाहन त्यांनी केलं. आपणहून आलेली चांगली गोष्ट नाकारायची नाही ह्या धोरणाला जागून मी होकार दिला आणि एका सुप्रभाती राजकमल स्टुडिओत मांडलेल्या भव्य सेटवर सुरू झालेल्या शूटिंग नावाच्या गदारोळात मीही सामावून गेलो.

' राजा शिवछत्रपती ' ह्या ऐतिहासिक चित्रपटाची ' ऐतिहासिक कहाणी ' हा एक स्वतंत्र विषय आहे, केव्हा तरी रसभरीतपणे

सांगण्याजोगा ! पण अनेक अर्थांनी सलामीलाच तिथं मला जे शिक्षण मिळालं त्याला तोड नाही. त्या चित्रपटाची गाणी ह्या गोष्टीशी तेव्हा माझा सुतरामही संबंध नव्हता. 'केवळ सहाय्यक दिग्दर्शक–तोही शिकाऊ' ह्या भूमिकेत मी पार बुडून गेलो होतो.–एक गंमतीची गोष्ट आज जाणवते, वास्तविक 'रेकॉर्डिंग स्टुडियो' ह्या गोष्टीविषयी माझ्या मनात कधीपासून अपार उत्सुकता ! आता इथं तर दहा पावलांवर राजकमलचा अद्ययावत् रेकॉर्डिंग स्टुडियो होता. पण का कोण जाणे, केवळ 'व्हिजिटर' म्हणून मी तिथं पाऊलही ठेवलं नाही. कधी काही कारणानं पायरीपर्यंत गेलो तर तिथूनच परत फिरलो.

काय चक्रं फिरली कुणास ठाऊक ! त्या चित्रपटाचं पहिलंच मुहूर्ताचं गाणं लिहायची जबाबदारी ध्यानीमनी नसताना एका सायंकाळी माझ्यावर सोपवण्यात आली. चंद्रवदनभाईंनी मला प्रसंग समजावून सांगितला. दुसऱ्या दिवशी गाणं घेऊन संगीतकार कै. वसंत देसाईंच्या घरी बोलावलं. एका अर्थी ती 'ट्रायल'च होती, आणि तीही वसंतरावांसारख्या तपस्वी संगीतकारापुढं ! नाही म्हटलं तरी काही क्षण प्रचंड दडपण आलं. सारं भविष्य एका क्षणावर तोल सांभाळत खुणावतंय असं वाटलं.–मी मुंबईच्या धुँवाधार पावसात आवडत्या वरळी 'सी' फेसवर चिंब भिजलो. खोलीवर येऊन निवांत बिनघोर झोपलो. सरत्या मध्यरात्री केव्हा तरी टवटवीत जागा झालो. ताजातवाना होऊन पुढ्यात कागद ओढले आणि जंजिरा किल्ल्याचा मुहूर्त करून शिवाजीराजांनी दर्यावर पालाण घातलं ह्या प्रसंगावरचं आनंदगीत लिहून हातावेगळं केलं.

दिशाही नव्हत्या, सुकाणू नव्हतं
शीड फाडणारा वारा
पाण्याच्या पोटात कभिन्न खडक
वरती गारांचा मारा
खडक फोडेल, तुफान पेलेल
असला तांडेल आला ......

शिवाजीराजाची येताच चाहूल
रात अशुभाची गेली
सारंगा, बघ रं–आभाळ हसलं
भगवी पहाट झाली
लाटांलाटांवर सांडलं केशर
दर्यात सूर्या न्हाला ......

– त्या गीतानं मला 'चित्रपट गीतकार' ह्या नात्यानं राजकमलच्या त्या सुसज्ज रेकॉर्डिंग स्टुडिओत पाऊल टाकण्याची संधी दिली. 'राजा शिवछत्रपती' ह्या चित्रपटाचा मी अधिकृत कवी झालो. वर्षापूर्वी अपघातानं छापलेली बातमी पुन्हा नव्यानं प्रसिद्ध झाली. त्याच गीताच्या अनुरोधानं पहिला चित्रपट प्रकाशात येण्यापूर्वीच सौ. सुमतीबाई आणि वसंतराव जोगळेकरांनी 'हा खेळ सावल्यांचा'साठी विश्वासानं संधी दिली. वसंत देसाईंपाठोपाठ हृदयनाथ मंगेशकरांबरोबर काम करायचा सुयोग जुळून आला. एका मोठ्या चक्राला गती मिळाली.

ह्या क्षणापर्यंत ते चक्र वाढत्या डौलात मनाजोगतं फिरतंय... पुढंही फिरेल ! तरी उद्याचा हवाला कुणी द्यावा ? पण आजच्याप्रमाणं क्षणभर थबकून चुकून मागं वळून पाहिलं की ते 'मुहूर्ताचं गाणं' आठवतं. तेव्हा प्रत्यक्ष लिहिताना जे लक्षात आलं नाही, ते आज जाणवतं. आज इतक्या अंतरावरून आपणच लिहिलेले ते शब्द पाहताना फार मौज वाटते.–

'दिवसा उजेडी, पुनव नसून
आभाळी चांदवा आला,
समिंदरा, माझ्या समिंदरा
तुझ्या भाग्याचा मुहूर्त झाला ......

– मनाच्या उद्‌गारांचीच कविता करायची माझी जुनी खोड गेलीच नाही तर !

## ।। जुना मित्र ।।

आज टी. व्ही. ला जे ग्लॅमर आहे, ते आमच्या लहानपणी 'रेडियो' ला होतं. 'रेडियो' घरात असणं हीच मुळात एक प्रतिष्ठेची बाब होती. मग 'रेडियोस्टार' ह्या 'वस्तुविशेषाकडं' तर 'अजि म्या ब्रह्म पाहिले' ह्याच एका नजरेनं पाहिलं जावं ह्यात नवल काय? (दक्षिण महाराष्ट्रात अजूनही हे ग्लॅमर थोडंबहुत शिल्लक असावं.) –तुम्ही आम्ही कधी आयुष्य तपासून पहातच नाही म्हणून–नाहीतर आपल्या व्यक्तिमत्वाच्या घडणीत 'रेडियो' नामक ध्वनिमाध्यमाआड लपलेल्या 'सायलेंट टीचर' चा (ह्या दोन गोष्टी एकत्र येऊ शकतात तर!) केवढा वाटा आहे हे आपल्या लक्षात आलं असतं.

माझ्या आयुष्यातला 'ऑल इंडिया रेडियो' चा पहिला प्रवेश हा खूप बालपणातल्या पुण्याच्या आठवणींशी निगडित आहे. नव्या पुलाखालच्या मोरयामामांच्या घरात भल्या सकाळी जाग यायची ती तीन प्रकारच्या नादांनी! नव्या पुलावर सुरू होणारी सायकल घंटा-मिश्रित वर्दळ! शनिवारवाड्यावरचा सनईचौघडा आणि परमेश्वराला आर्त पुकार घालावी तशी हवेत घुमणारी ऑल इंडिया रेडियोची 'सुप्रसिद्ध' सिग्नेचर ट्यून'! तंबोऱ्याचं ते घनगंभीर गुंजन आणि त्या पार्श्वभूमीवर कुणा अज्ञात वादकानं मोजक्या स्वरांनिशी व्हायोलीनवर उमटवलेली ती आर्त मधुर धून पहाटेच्या काळोखात ऐकणं, हा एक शब्दातीत अनुभव आहे असं मला आजही उत्कटपणे वाटतं.

रेडियोवरच्या 'सिग्नेचर ट्यून्स्' हाही एक स्वतंत्र आस्वादाचा विषय आहे. कवितेच्या छोट्याशा ओळीसारखी सिग्नेचर ट्यूनही

सोपी, समर्पक आणि प्रत्ययकारी असावी लागते. रेडियो सीलोनच्या साऱ्या ' ट्यून्स् ' ह्या तशा मूळ चित्रपट संगीतातल्याच– पण फार चोखंदळपणे निवडलेल्या ! ' आपके अनुरोधपर ' सुरू होताना लता मंगेशकरांचं किंचित् सर्दी झालेल्या स्वरातलं ' अभी तो मैं जवान हूँ '– ' आपही के गीत ' च्या आधी क्ले व्हायोलिनवरची ' नागिन ' मधल्या पुंगीची आठवण करून देणारी धून; ' अनोखे बोल ' च्या अगोदर ते शीर्षक सार्थ करणारा ' डंपकढुंबा ' असल्या अर्थहीन पण मजेदार अक्षरांना स्वरात गुंफलेला समूह अशा किती म्हणून ट्यून्स् आठवाव्या. ह्या सर्वच वेळी त्या ट्यून्स्चा मूळचा स्त्रोत लक्षात यायचा नाही. किंबहुना तो हुडकणं हाही एक मजेदार खेळ व्हायचा. असाच ' मेरी पसंद ' च्या आरंभीचा स्वरमेळ मी खूप आवडीनं ऐकायचो. त्या स्वरांचा चेहरामोहरा खूपच ओळखीचा वाटायचा. पण मूळ वंश काही केल्या लक्षात यायचा नाही. एके दिवशी अचानक तो पत्ता लागला. अस्मादिकांच्या अतिशय आवडीचं एक गाणं म्हणजे लता आणि मदन-मोहन ह्यांच्या सहकार्यातून बनलेलं 'मोहर' चित्रपटातलं 'तुम हो साथ रात भी हँसी है ! त्या गाण्याचा छोटासा 'ओपनिंग पीस' म्हणजेच 'मेरी पसंद' ची ती ' सिग्नेचर ट्यून ' ! हा ' साक्षात्कार ' झाला तेव्हा मी उन्मनी अवस्थेत (पण वस्त्रांनिशी ) युरेकाच्या ऐवजी 'अरे लेका' असं ओरडत धावत सुटल्याचं मला अंधुक आठवतं.

आकाशवाणी पुणे-मुंबईच्या विविध कार्यक्रमांच्या ' सिग्नेचर ट्यून्स ' ही तर त्या तुलनेत 'स्वतंत्र निर्मिती' म्हणता येईल. कार्यक्रमाचं ' व्यक्तिमत्व ' लक्षात घेऊन कुणाकुणा संगीतकारांनी बांधलेल्या त्या ' ट्यून्स ' तुम्ही कधी लक्षपूर्वक ऐकून पाहिल्यात का ? – फार मजा येतो. उदाहरणे म्हणून ग्रामीण कार्यक्रमाची काळ्या मातीच्या चवीची ' गावरान धून ' ऐकावी किंवा मुंबईच्या ' आपली आवड ' ची लोकप्रिय धून बघावी.– पहिली वाद्यवृंदाची तुटक उडती सुरावट, मग अचानक-पणे घेतलेलं लावणीबाजाचं वळण आणि शेवटी संपवताना चक्क नृत्याच्या तोडच्यांची आठवण करून देणारा तिय्या ! इलेक्ट्रिक गिटारनं सुरू होणारी पुण्याच्या ' आपली आवड ' ची धून त्या मानानं मॉडर्न

आणि आक्रमक...पण त्यातही मधेच थेट काळजात ‘बो’ घुसवणारा एक सोलो व्हायोलीन पीस फैय्याज हुसेननं वाजवला आहेच. ( काही अपवादाचे क्षण वगळता नेमकं त्याच पीसला ‘फेडर’ बदलून अनाऊन्समेंट सुरू होते, ही ‘औरंगजेबशाही’ एक सोडा ! )

मग लक्षात येतं की ह्या एवढ्याशा लाकडी खोक्यानं केवढ्या अफाट, रंगीत नादविश्वाची ओळख करून देत राहण्याचं काम वर्षानुवर्षं निष्ठावंतपणे केलं आहे.—कैक गायक-वादक-वक्ते-अभिनेते ह्यांची पहिली ओळख ह्या ध्वनिमाध्यमातूनच झाली. मराठी भावसंगीताचा मानदंड ठरलेलं ‘गीतरामायण’ प्रथम रेडिओमुळंच जन्माला आलं. खाजगी भावगीतांची सारी युगं ह्या आधारावरच तरली. भीमसेन जोशींचा बुलंद स्वर प्रथम रेडियोवरच ऐकला. श्रीधर पार्सेकर ऐकले. ‘भूपाल तोडी’च्या एका छोट्याशा धूननं पन्नालाल घोष नावाच्या जादुगाराची ओळख करून दिली. बेगम अख्तरचा ‘दर्द’ प्रथम तिथंच भेटला. सरहद्दीपलिकडले किती गायक-वादक दोन घटका पाहुणे झाले. ‘अमीरखाँ’ हे तर खास रेडियो ह्या माध्यमाचेच कलाकार ! असा स्वरभोगी आत्ममग्न कलाकार बिनचेहऱ्याच्या मैफलीच्या सवंग गर्दीत ऐकण्यापेक्षा; काळोख्या खोलीत केवळ रेडियोच्याच मंद प्रकाशात ऐकावा. तिथं त्याचे स्वर नुसतेच कानांना न भेटता प्राणांनाही भेटत राहतात.

रेडियोला असणारी केवळ ‘ध्वनी’ ही मर्यादा मला त्या माध्यमाची फार मोठी शक्ती वाटते. इथं ध्वनीलाच सारी ‘डायमेन्शन्स’ द्यावी लागतात. आणि मग त्याचा परिणाम चौकटीतल्या चित्रासारखा बंदिस्त ढोबळ उरत नाही. ऐकणाऱ्याच्या संवेदनाशीलतेनुसार कमी अधिक होण्याइतकी गूढ तीव्रता त्या ध्वनीत असते. तो एकाच वेळी आपल्या कानाच्या पाळीवरही बसतो आणि त्याच क्षणी क्षितिजापल्याडचाही होतो.

केवळ श्रोता ही भूमिका संपून पुढं जेव्हा रेडियोशी प्रत्यक्ष जवळीक होत चालली तेव्हा हे अधिकाधिक जाणवत गेलं. नभोनाट्यलेखक, कवी, नट, संगीतकार, गायक, निर्मिती सहाय्यक, निवेदक अशा अनेक भूमिकांतून सुदैवानं मला आकाशवाणीत मनमुराद बागडायला

मिळालं. ते सारेच प्रयोग यशस्वी किंवा सुखद होते असं म्हणता येणार नाही. सर्व सरकारी क्षेत्रांत जाणवणारा अमर्याद थिटेपणा तिथंही पावलोपावली भेटत राहिला. पण त्या छोटयामोठया पराभवांतूनही जाणवत राहिली ती मूळ माध्यमाची अफाट शक्तीच !

दहा हजार श्रोत्यांसमोर व्यासपीठावर उभं राहण्यात जे 'आव्हान' आहे; त्याहीपेक्षा मोठं आव्हान आकाशवाणीच्या एवढयाशा माईकला सामोरं जाण्यात दडलेलं असतं. आरशात पाहून बोलायचा प्रयत्न केल्यावर जी अनपेक्षित तारांबळ उडते तिचा अनुभव इथंही येतो. दूरदर्शनच्या कॅमेऱ्यासारखाच आकाशवाणीचा मूठभर माईकही भल्याभल्यांचं प्रसंगी चक्क वस्त्रहरण करतो. थोडाही उसना, नाटकी अभिनिवेष तो माईक खपवून घेत नाही. तो भुकेला असतो; सच्च्या अकृत्रिम स्वाभाविकतेचा !

आपल्या दैनंदिन आयुष्यात 'रेडियो' ह्या माध्यमाचं खरंखुरं 'अवमूल्यन' नेमकं कधी सुरू झालं ? माझं म्हणणं थोडं विचित्र वाटेल कदाचित्–पण 'ट्रांझिस्टर' नावाचा उठवळ प्रकार अस्तित्वात आला आणि 'रेडियोसेट' या देखण्या प्रकाराचा 'घरंदाजपणा' ढळला. घराच्या बैठकीतली त्याची मोक्याची, मानाची जागा गेली आणि उघडया चौकातल्या म्युनिसिपालिटीच्या गळक्या नळाची कळा त्याला आली. पाठोपाठ टेलिव्हिजन आला आणि त्यानं सारं खाजगी आयुष्यच बळकावून टाकलं.

रंगभूमी, चित्रपट आणि आकाशवाणी ह्या तीन तत्त्वांच्या संयोगातून निर्माण झालेला टेलिव्हिजन हे एक प्रभावी माध्यम आहे, ही गोष्ट वादातीत आहे. पण दुर्दैवानं ह्या सुबुद्ध जाणिवेच्या आधारावर ह्या नव्या माध्यमाचा स्वीकार आपण केला आहे, असं दिसत नाही. रेडियोच्या मर्यादा आणि सामर्थ्याची जशी आपल्याला जाणीव नव्हती तशी टेलिव्हिजनची खरी ताकद आणि धोकेही आपण ओळखलेले नाहीत. लहान मूल नवं खेळणं दिसताच जुनं अडगळीत टाकून नव्यावर झेपावतं, त्याच बाळबुद्धीनं आपणही वागतो आहोत. एरवी आपल्याला कळलं असतं–

कुठल्याही नव्या आविष्कार माध्यमामुळं पहिलं माध्यम डावललं जायचं कारण नाही,—पन्नास पानांच्या छोटचा पुस्तकाची जागा पन्नास कोटींचा भव्य रंगीत चित्रपट घेऊ शकत नाही. एका रसाळ कीर्तनाची जागा एखाद्या विराट समूहनाटचाला घेता येत नाही. ' बळ ज्याचे त्यास ते ' ह्या न्यायानं रंगभूमी, चित्रपट, दूरदर्शन, आकाशवाणी ही माध्यमं एकवेळ ' पूरक ' ठरू शकतील... पण ती पर्यायी निश्चितच नाहीत.

आपल्या आंधळचा मुर्दाड रसिकतेनं हे नीट समजून घेतलं तर उद्याच्या कुठल्याही येणाऱ्या नव्या आविष्कार माध्यमाचं आपण चोखंदळ स्वागत करू, पण त्याच्या आहारी जाणार नाही. आपण त्यासाठी आवश्यक तेवढाच वेळ देऊ आणि बाकीच्या वेळात जीवनाच्या इतर अंगांकडंही पहायला शिकू.

उदा०— रेडियो नावाच्या अडगळीत पडत चाललेल्या ' एका जुन्या मित्रा ' ची आठवण ठेवू... त्यावर जमलेले धुळीचे थर जमल्यास झटकून देऊ आणि पुन्हा न साचतील, ह्याची काळजीही घेऊ.

✻ ✻

ग्रंथ संग्रहालय ठाणे
3923
ग्रा. क्र. २८७२६
निबंध 30/10/15
शाखा (स्थळ प्रत)

## ।। शंकरभाऊ ।।

किर्लोस्कर उद्योगसमूहाच्या आद्य कारखान्याचे एक अध्वर्यु ह्या नात्यानं ते एस्. व्ही. किर्लोस्कर ह्या घवघवीत नावानं वावरायचे. सांस्कृतिक आणि वाङ्मयीन महाराष्ट्र त्यांना 'शंवाकि' ह्या सुटसुटीत नादमधुर नावानं ओळखायचा आणि गावातल्या–किंबहुना पंचक्रोशी-तल्या आबालवृद्धांना मात्र ते होते केवळ, 'शंकरअण्णा'! ही तीन संबोधनं डोळ्यांसमोर नुस्ती एकामागोमाग एक उभी केली तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व्याप लक्षात येईल. 'शंकरअण्णा' ह्या घरगुती संबोधनाला आणखी एक तितकाच घरेलु पर्याय होता तो म्हणजे– 'शंकरभाऊ!'

सामान्यतः शब्दांच्या शिकण्यातून जगाची ओळख आपल्याला होत जाते असं आपण मानतो; पण काही काही शब्दांचे अर्थ मात्र आपल्याला नकळतपणे आधीच प्रतीत होऊन गेलेले असतात आणि शब्द नंतर कधी तरी भेटतात. 'व्यक्तिमत्त्व' हा शब्द प्रत्यक्ष माझ्या आयुष्यात बऱ्याच नंतर आला असला तरी त्याचा अर्थ मात्र फार लहानपणीच माझ्या मनात प्रथम खोलवर रुजला तो शंकरभाऊंमुळं! इतका, की पुढच्या आयुष्यात अनेक समृद्ध व्यक्तिमत्त्वं ओळखीची होऊनही 'व्यक्तिमत्त्व' हा शब्द उच्चारताच आजही माझ्या डोळ्यां-समोर पहिले उभे राहतात ते 'शंकरभाऊ'च!

उंचीपुरी रुबाबदार देहयष्टी आणि विलक्षण स्निग्ध मुद्रा लाभलेल्या शंकरभाऊंची किती किती रूपं याक्षणी माझ्या डोळ्यांपुढून सरकताहेत.–संपूर्ण अद्ययावत् साहेबी पोषाखातले धीमी पावलं टाकत

कारखान्यात चाललेले, शुभ्र पोषाखातले स्वातंत्र्यदिनाला ध्वजारोहण करणारे, दोन्ही खांद्यांवर पट्टे असलेली पँट आणि उघडचा कॉलरचा शर्ट घालून हुरडा पार्टीत रंगलेले, हाफपँट आणि शर्टमध्ये गावाच्या श्रमदान आघाडीवर कुदळ--फावडं चालवणारे, पॅड आणि हँडग्लोव्हज् चढवून बॅटिंग करणारे, साधा बिनइस्त्रीचा स्वच्छ धुवट पायजमा-सदरा घालून काठी घेऊन फिरायला निघालेले—गावाबाहेरच्या शेतजमिनीच्या काळचा ढेकळात कुणा शेतकरी कुटुंबाशी गप्पांत रमलेले, क्वचित् संपूर्ण सैनिकी गणवेषात चक्क कवायत घेणारे आणि एरवी-व्हरांडचातल्या झोपाळचा-वर एकटेच निवांत झोके घेत बसलेले... !

नियतीची योजना ही फार मजेदार गोष्ट आहे. ह्या योजनेमुळं कुठल्याही उपक्रमाच्या आरंभीच्या काळात कर्तबगार पुरुषांची एक प्रभावळच उभी राहते. कै. लक्ष्मणराव किर्लोस्करांपाठोपाठ ती धुरा पेलायला पुढची पिढी उभी राहिली ती अशा व्यक्तिमत्त्वसंपन्न पुरुषांची !— सर्वार्थानं 'नायक' शोभणारे शंतनुराव किर्लोस्कर, 'अॅडमिनिस्ट्रेटर' नानासाहेब गुर्जर, उत्स्फूर्त यंत्रज्ञ अनंतराव फळणीकर, चतुरस्त्र शंभूअण्णा जांभेकर आणि लोखंडी यंत्रांच्या जगामधला माणुसकीचा गहिवर जपत जगणारे 'कलावंत' शंकरभाऊ......

फोटोग्राफी, चित्रकला ह्यातच 'करिअर' करू इच्छिणारे शंकरभाऊ योगायोगानं महाराष्ट्राच्या औद्योगिक चळवळीत ओढले जावे ह्याला 'नियतीचा संकेत' ह्यापलिकडं काही नाव देणं शक्य नाही; पण हा संकेत शुभशकुनीच म्हणायला हवा. कारण त्यामुळं शंकरभाऊं-मधल्या सुप्त चित्रकाराला एक प्रचंड 'कॅनव्हास' मिळाला आणि एका विराट यंत्र—यज्ञाला कलावंताचा कोवळा स्पर्श घडला.— कारखान्याचे जनरल मॅनेजर, 'किर्लोस्कर मासिका'चे संस्थापक—संपादक, एका टुमदार गावाचे अध्वर्यु नागरिक आणि गावाभोवतालच्या अफाट परिसरातील लहान—थोर माणसांशी एका अदृश्य नात्यानं बांधलेला 'निखळ माणूस'—अशा अनेक भूमिका स्वीकारून शंकरभाऊ देहभान हरपून आसक्तीनं काम करीत राहिले आणि एका योग्य क्षणी त्या साऱ्या व्यापातून मुक्त होऊन स्वतःच्या 'मधुघटा'त विरक्त वानप्रस्था-श्रमी झाले.

कर्तृत्वाच्या ऐन बहरात शंकरभाऊंनी विविध आघाड्यांवर जी आव्हानं पेलली, त्यांना तोड नाही.--संपादक 'शंवाकीं'नी वाडीसारख्या आडगावात राहून किर्लोस्कर, स्त्री, मनोहर ही तीन लोकप्रिय मासिकं सुरू केली आणि केवळ मोठ्या शहरांच्या भाग्यात असणारा, सांस्कृतिक धुरीणत्व आणि लोकप्रियतेचं वलय ह्यांचा ओघ त्या छोट्याशा गावाकडं खेचून आणला. ना. धों. ताम्हनकर, ग. पां. विजापुरे ह्यासारखी माणसं हेरून जोडली आणि त्यांच्या कर्तृत्वाला चालना दिली. फडके–खांडेकरांसारख्या मातबरांचा स्नेह संपादन केला. सावरकरांसारख्या प्रतिभावंतांचं लेखनसहकार्य मिळवलं. सायकलवरून जगप्रवास करणाऱ्या गोडबोल्यांपासून खेड्यातल्या धों. म. मोहित्यांपर्यंतच्या माणसांना लिहितं केलं. 'स्त्रीमुक्ती' ही संज्ञा अस्तित्वातही नव्हती त्या काळात केवळ स्त्रियांसाठी मासिक सुरू करून लेखिका आणि संपादिकांची परंपरा उभी केली. महादेवशास्त्री दिवेकरांच्या सहाय्यानं तत्कालीन प्रतिष्ठित बुवाबाजीचे भपकेबाज पडदे टराटर फाडले. कातडी–बचाऊ-पणानं उंटावरून शेळ्या न हाकता खास गोटात प्रतिनिधी घुसवून खऱ्याखुऱ्या अर्थानं 'स्पेशल रिपोर्टस्' सादर केले. ना. सी. फडक्यांच्या लेखणीच्या जोडीनं आपली स्केचपेन्सिल उचलून 'टाकांच्या फेकी' प्रत्यक्षात आणल्या. ताम्हनकरांचा 'दाजी धडपडे' अक्षरांच्या प्रकाशात तर आणलाच; पण स्वतःमधल्या चित्रकाराला कामाला लावून 'दाजी'चं सर्वपरिचित रूपही स्वतः साकार केलं. आजही आदर्श ठरतील अशी मासिकाची ध्येयधोरणं इतक्या जुन्या काळात द्रष्टेपणानं आखली आणि कार्यक्षमतेनं ती अंमलातही आणून दाखवली. अनौपचारिक साहित्यसंमेलनं म्हणावीत असे नव्या–जुन्या लेखक–लेखिकांचे मेळावे भरवले, चर्चा-परिसंवाद घडवून आणले. पहिल्यापासून साहित्याला मोबदला देण्याचा कटाक्ष पाळला. प्रकाशनाची तारीख चुकू दिली नाही. प्रतिष्ठित साहित्यिक, नवोदित उमेदवार आणि लहान-मोठे विक्रेते ह्या सर्वांना एकाच आपुलकीनं वागवलं आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे--चोखंदळ विद्वानाइतकाच सर्वसाधारण वाचकाचाही सन्मान केला. प्रत्येक कृतीला आणि शब्दाला काही प्रयोजनतत्वाची बैठक ठेवली. कला आणि व्यवहार ह्यांची सहजसुंदर सांगड घालून दाखवली.

शंकरभाऊ केवळ टेबलखुर्चीला चिकटलेले विचारवंत नव्हते. प्रत्यक्ष कार्यात घुसण्याचीही त्यांना मनस्वी ओढ होती. ह्याच ओढीनं त्यांनी केवळ गावाचंच नाही तर भोवतालच्या साऱ्या ग्रामीण परिसराचं धुरीणत्व केलं. अनेक अवघड प्रसंग चातुर्यानं हाताळले. उत्सवापासून संपहरताळांपर्यंत सर्वत्र स्वतः जातीनं सामोरे गेले.-स्वदेशीच्या बालिश उत्साहात परदेशी मालाची होळी करायची कल्पना आखून काही कामगारमंडळींनी शंकरभाऊंकडे डोक्यावरच्या फेल्ट-हॅटची मागणी केली. सर्व कामगारांच्या जाहीर सभेत शंकरभाऊंनी स्वतःची हॅट शांतपणे होळीत फेकून दिली; पण त्यापाठोपाठ त्याच सभेत गावातली गटारं साफ करणाऱ्या महाराच्या हातचं पाणी स्वतः पिऊन इतरांनाही 'अस्पृश्यतानिवारणाच्या देशकार्यात सहभागी होण्याचं आवाहन केलं आणि तमाम 'जाति'वंतांच्या देशभक्तीची जाहीर तपासणी केली. गांधीवधानंतरच्या एका भयानक रात्री गावावर चालून आलेल्या बेभान जमावाला शंकरभाऊ धैर्यानं सामोरे गेले नसते तर किर्लोस्करवाडी हे गाव आज केवळ इतिहासात उरलं असतं.

शंकरभाऊंच्या आठवणी ही एक लखलखीत बावनकशी मोत्यांची माळ आहे. कितीही मणी ओढले तरी न संपणारी आणि एखादा मणी पाहिला तरी माळेचं 'अस्सलपण' सिद्ध करणारी... ! मला लहानपणी 'संपादक' होण्याची फार हौस होती. हौसेतूनच 'बुडबुडा', 'धुमकेतू' असल्या तऱ्हेवाईक नावाच्या हस्तलिखितांचा जन्म व्हायचा. असाच एक 'धुमकेतू' नावाचा 'विनोद विशेषांक (!) मी काढला होता आणि त्यामध्ये 'ओढा-मंथन' (समुद्रमंथनाच्या चालीवर !) नावाचा खटचाळ लेख लिहिला होता. समस्त गावकरी गावाबाहेरच्या गढूळ ओढ्याचं मंथन करतात आणि त्यातून 'मासलेवाईक रत्नं' बाहेर पडतात अशा स्वरूपाचा काही वाडीकरांना 'फिशपाँडस्' देणारा तो विनोदी (आजच्या भाषेत 'निर्विष') लेख होता.- 'वाडीकर पोरा'लाच शोभेल अशा आगाऊपणानं मी थेट जनरल मॅनेजरच्या ऑफिसमध्ये घुसून शंकरभाऊंना अंक दाखवून अभिप्रायाची मागणी केली. त्यांनी अंक ठेवून घेतला आणि संध्याकाळी घरी बोलावलं.-

संध्याकाळी व्हरांड्यात झोपाळ्यावर झोके घेणाऱ्या शंकरभाऊंनी उसन्या गांभीर्यानं माझ्या हाती अंक ठेवला. मी शेवटचं पान उघडलं आणि 'आ' वासून पहातच राहिलो.–संपूर्ण पान सुरेख व्यंगचित्रांनी भरलं होतं. चित्रात, मी आणि माझा सहकारी पार्श्वभागाला पाय लावून धावत होतो आणि मागं-मी ज्यांची टिंगल केली होती ती सारी माणसं दात–ओठ खात आमचा पाठलाग करीत होती. मधल्या मोकळ्या जागेत वळणदार अक्षरात दोनच वाक्य होती. 'पोरांनो, मला तुमचा अंक आवडला; पण तुमची काय कंबक्ती ओढवणार आहे ह्याची काही कल्पना आहे का ? तुमचा शंकरभाऊ.'

एकाकीपणा हा मानवी आयुष्याला जडलेला अटळ शाप आहे. सर्वांच्या आयुष्याला ही किनार असतेच; पण कुणाकुणाच्या वाट्याला त्या शापाचं माप शिगोशीग येतं. ज्यासाठी कुणालाही निर्णायकपणे दोषी किंवा अपराधी ठरवता येऊ नये असे ते भरल्या संसारातलं अपरिहार्य स्वयंभू एकटेपण हे सांगून कळणार नाही. ते ज्याचं त्यानंच अनुभवावं; पण दुबळ्या माणसांसाठी ते एकाकीपण ही सर्वनाशाची खाई असते तर झुंजार पुरुषांसाठी ते मोकळं अमर्याद आकाश असतं. शंकरभाऊ अशा कर्तृत्ववान पुरुषांपैकी एक होते. मिळालेला शाप त्यांनी वरदानासारखा पेलला. ज्या मनस्वीपणानं कर्तृत्वाचा कालखंड जगून घेतला त्याच मनस्वीपणानं अलिप्त वानप्रस्थही स्वीकारला आणि त्या तृप्त, शांत वानप्रस्थाचा उंबरठा ओलांडला तो एकदाच आणि अखेरचा !

❋ ❋

## ॥ सुहृद ॥

'वचन'; 'एक फूल दो माली'; 'दस लाख'; 'एक महल हो सपनोंका' हे हिंदी चित्रपट आणि त्या चित्रपटांचे निर्माते-दिग्दर्शक देवेंद्र गोयल ही नावं बालपणापासून माझ्या केवळ कानांवरूनच गेलेली! कानावरून म्हणजे अक्षरशः कानां 'वरून' – कानांच्या माजघरात-सुद्धा जिथं त्यांचा प्रवेश झाला नव्हता तिथं मनाचा गाभारा ही तर दूरचीच गोष्ट! असं असूनही, देवेंद्र गोयल ऊर्फ गोएलसाहेब ह्या व्यक्तीची गणना आज माझ्या अंतःकरणात वस्ती करून राहिलेल्या मोजक्या सुहृदांत होते ह्या योगायोगाला काय म्हणावं?

'हा खेळ सावल्यांचा'च्या गाण्यांचं काम नुकतंच हातावेगळं झालं होतं. त्याच चित्रपटाला वसंतराव तथा अप्पा जोगळेकरांचा सहाय्यक म्हणून काम करायची संधी हाताशी होती. व्यवसाय आणि शिक्षण ह्या दोन्ही दृष्टींनी सोन्यासारखी असलेली ती संधी मी काही घरगुती अडचणींमुळं सोडून दिली आणि पुण्यातच मुक्काम ठोकला. 'मंतरलेल्या चैत्रबनात' आणि 'कविता, कविता, कविता' अशा दोन कार्यक्रमात पुरता गुंतून गेलो. मौज म्हणजे, 'चैत्रबना'च्या निमित्तानंच गोएलसाहेबांच्या नावाचा संदर्भ प्रथमच माझ्याशी थेट भिडला. शुभारंभाचा प्रयोग माडगूळकर–फडके–परांजपे ह्या त्रयीच्या उपस्थितीत व्हावा ह्या दृष्टीनं आम्ही सर्व आखणी केली होती. तसं गदिमांचं आश्वासनही मिळवलं होतं. प्रत्यक्षात प्रयोगाच्या आदल्या दिवशी आम्हाला शोध लागला की अण्णांचा मुक्काम मुंबईत आहे आणि ते पुण्याला येण्याचं चिह्न नाही. आमची तारांबळ उडाली. मी मुंबईला

फोन लावला. फोनवर अण्णा म्हणाले–' मुला, अरे उद्या येणं जमणार नाही गड्या–देवेंद्र गोयलच्या नव्या सिनेमाचं काम आलंय. मी आणि बाबूजी त्या कामालाच बसलोय.' – आमच्या ' जागतिक ' महत्त्वाच्या कार्यक्रमात अडथळा आणणाऱ्या देवेंद्र गोएलच्या नावानं ' दगडफोड ' करत आम्ही सर्वस्व पणाला लावलं आणि माडगूळकर – फडक्यांचं कार्यक्रमाला येण्याबद्दल मन वळवलं. त्यांचा होकार मिळताच झालेल्या अलोट आनंदात–कणभर का होईना, पण देवेंद्र गोयल नावाच्या बड्या हिंदी निर्मात्यावर कुरघोडी केल्याचा आनंद नसेलच असं म्हणवत नाही. मजेदार योगायोग असा की त्याच चित्रपटासाठी गोएलसाहेबांचा सहाय्यक म्हणून पुढच्या वर्षभरातच मी स्वतःच ' गोएल सिने कॉर्पोरेशन ' मध्ये दाखल झालो.

हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषेत तो चित्रपट बनवायचं गोएलसाहेबांनी योजलं होतं. हिंदी चित्रपटाचं नाव–' आदमी सडक का' आणि त्याचा मराठी अवतार होता–' दोस्त असावा तर असा ! ' अगोदरच हिंदी चित्रपटाचा खाक्या ऐसपैस– त्यात ही जोडभाषेतली निर्मिती त्यामुळं एकूण युनिटला ' जोडसंसारातल्या एकत्र कुटुंबा 'ची कळा आली होती. कुटुंबप्रमुख अर्थातच गोयलसाहेब !

शूटिंगचे पहिले दहा–बारा दिवस हा कुटुंबप्रमुख माझ्याशी काहीशा कोरड्या अलिप्ततेनं वागला. हसऱ्या मुद्रेनं केलेल्या पहिल्या ' गुड–मॉर्निंग ' नंतर ते दिवसभर जवळजवळ माझी दखलच घेत नसत. जणु हा कोणी प्राणी आपणच सेटवर आणलाय ह्याची त्यांना आठवणच नसायची. मला हे थोडं चमत्कारिक वाटायचं, पण फारसं मनावर न घेता मी माझं काम बजावत राहिलो. शूटिंगचं पहिलं ' शेड्यूल ' संपता संपता लक्षात आलं की वरकरणी दुर्लक्ष करीत गोयलसाहेब माझ्या प्रत्येक हालचालीकडं फार बारकाईनं पाहात होते– आपली निवड अजमावत होते.– त्यानंतर पुढची दोन वर्षं गोयलसाहेबांकडून जी वागणूक मला मिळाली ती वरिष्ठाची नव्हती, सुहृदाची होती–वडिलधाऱ्या आप्ताची होती. ह्या सुमारे दोन वर्षांत मी हा हृद्य माणूस खूप जवळून पाहिला.

पहिली गोष्ट जाणवली ती म्हणजे त्यांचा आरपार आणि स्वच्छ खरेपणा ! गोयलसाहेब तसे कौटुंबिक चित्रपटाचे कंत्राटदार ! – पण एकदा चित्रपट हा १००% व्यवसाय मानल्यावर ‘ वचन ’ पासून ‘ आदमी सडक का ’ पर्यंत ती भूमिका त्यांनी पुऱ्या इमानानं पार पाडली. ‘ ओ जानेवाले बाबू, एक पैसा दे दे ’ म्हणणारा ‘ वचन ’मधला भिकारी बहुतेक चित्रपटातून पुन्हा पुन्हा न कंटाळता आणला. ( ‘रवी’ नावाचा संगीतकार माथ्यावर मारल्याचा गुन्हा अक्षम्य खरा–पण त्यावर एकच उःशाप म्हणजे पहिला चित्रपट मदनमोहनकडून घेतला.) ‘आदमी सडक का ’ मध्येही वृद्ध, आजारी आई दाखवताना ‘ मेरी दवा भी खत्म हुई ’ ह्या करुण वाक्याबरोबर तिच्या हातात औषधाची रिकामी बाटली तर दाखवलीच पण बाटलीवरचं औषधाचं लेबल कॅमेऱ्याच्या दिशेनं ठेवायची दक्षता घेतली. मी अंमळ नाखुषी व्यक्त केल्यावर न चिडता खुलासा केला, ‘ देखो सुधीर, अपने ऑडियन्सकी उम्र सिर्फ नौ बरसकी है ’– त्यांचं म्हणणं ‘ बरं ’ नाही हे तेव्हाही मी म्हणू शकत होतो. पण ते ‘ खरं ’ नाही हे म्हणायची मात्र आजही हिंमत नाही.– त्यांच्या जुहूच्या बंगल्यात एके दिवशी दुपारी जेवताना त्यांचा थोरला मुलगा अजय कुणातरी निर्मात्याबद्दल चित्रपट पडल्यामुळं तो आयुष्यातून उठणार वगैरे भाकित वर्तवू लागला. थोडाही प्रतिसाद न देता गोयल-साहेबांनी शांत स्वरात मुलाला विचारलं, ‘ अब जो पिक्चर हम बना रहे हैं वो अगर फेल होगी तो हम क्या करेंगे ? क्या ये बंगला बेच डालेंगे ?’ आमच्याच सिनेमातले असले लिलावाचे हृदयद्रावक प्रसंग आठवून माझ्या मराठमोळ्या पोटात (सुग्रास अन्न खात असतानाही) उगाचच खड्डा पडला, पण अजय मात्र वडिलांइतकाच निवांत दिसला. मंद हसून तो म्हणाला, ‘ नही डॅडी, हम तो दूसरी पिक्चर निकालेंगे ’– तो प्रश्न आणि ते उत्तर ह्यामागचा आत्मविश्वास पोकळ नव्हता हे मी गोयलसाहेबांच्या मृत्यूनंतरही पाहातो आहे.

व्यावसायिक पिंड जुळणारा नसला तरीही मी गोयलसाहेबांच्या लोभात पडलो तो खरा त्यांच्या हृद्य माणूसपणामुळं ! त्यांच्याकडच्या माझ्या ‘ नोकरी ’ला नोकरी म्हणणंच कठीण होतं. कारण नोकरी

म्हणावी असा एकमेव 'रूटीन' तिथं होता, तो म्हणजे ठरलेल्या तारखेला दरमहा हातात पडणारा पगार! त्यामुळं शूटिंग–एडिटिंग–डबिंग–स्टोरी सिटिंग–रेकॉर्डिंग हे सारं धरूनही मी तसा 'फ्री लान्सर'च असायचो. कधीमधी गोयलसाहेब एकदम विचारायचे–' क्यूं सुधीर, और क्या क्या चल रहा है ?'– एखाद्याकडून महिन्याला रक्कम घेतली की सारं आयुष्य त्याच्याकडं गहाण पडलं अशी समजूत असलेलं माझं कारकुनी रक्त प्रथम प्रथम असल्या प्रश्नानं बावचळायचं. पण गोयल-साहेबांचा प्रश्न फार मनापासून आणि प्रांजळ सदिच्छेपोटी असायचा. अशाच एका 'गॅप'मध्ये मी फारच उनाडपणा केला. बेपत्ताच राहिलो. माझी शोधाशोध झाली, माझ्या नावानं बरीच आरडाओरडही झाली. मी शूटिंगच्या आदल्या संध्याकाळी टपकलो. खरं म्हणजे चूक माझीच होती. तरी अशा ताणात गेलो की काही उणं–वावगं ऐकून घ्यायचं नाही. वेळ पडली तर सरळ तोंडावर राजीनामा खरडायचा इत्यादी इत्यादी! माझा 'करारी बाणा' गोयलसाहेब काहीतरी वेडंवाकडं बोलतील ह्याची वाटच पहात होता. पण त्यांनी शांतपणे फाईल काढून कामाबद्दल बोलणं सुरू केलं. इकडे माझ्या तुंबलेल्या वाफेचं पाणी पाणी झालं. तासाभरानं सहज स्वरात मनःपूर्वक बोलले–' सुधीर, कहाँ थे तुम इतने दिन ? तुमसे मुझे यह उम्मीद नही थी।'– बस्स् खतम्! एरवी नर्मदेतले गोटे असलेले माझे डोळे ह्या वाक्यानं पार विरघळले. कधी चुकून सवड असली तर कुठलातरी 'दस नंबरी' किंवा 'नंबरी' चित्रपट पहायला चलणार का, म्हणून विचारायचे. टाळाटाळ केली तर म्हणायचे, 'तुम इस इण्डस्ट्री में हो–अच्छा हो या बुरा, तुम्हें सबकुछ देखना चाहिये'–कथेवरची चर्चा संपली की रात्री जुहूपासून बांद्र्याला जायला गाडी द्यायचे. कधी संकोच केला की म्हणायचे–' ध्यान में रखो, कंफर्ट इफ पॉसिसल; डिसकंफर्ट इफ नेसेसरी.'

चित्रपट पूर्ण झाला आणि माझा 'गोयल सिने' बरोबरचा करारही संपला. पण त्या कागदावरच्या करारापलिकडेही एक अलिखित करार होता–ऋणानुबंधाचा–जो माझ्या दृष्टीनं खराखुरा मोलाचा होता. त्यामुळंच हृदयविकाराच्या झटक्यानं गोयलसाहेब अकस्मिकपणे

गेल्याचं कळल्यावर मी मुळापासून हललो, मनापासून कळवळलो. मला बातमी सांगणारे सद्‌गृहस्थ माझी अवस्था पाहून 'सहानुभूती' नावाच्या लेबलात गुंडाळलेल्या क्षुद्र आणि दुष्ट स्वरात हळहळले—'अरे अरे, फार वाईट झालं. तुझी नोकरी गेली.'— त्यांना क्षमा करण्यावाचून गत्यंतर नव्हतं.

गोयलसाहेबांनी दिलेल्या सौहार्दाचा ओलावा त्यांच्या आठवणीतून माझ्याजवळ सदैव राहील.

❊ ❊

## ॥ अ-स्मिता ॥

काही वर्षांपूर्वीची गोष्ट ! मुंबईत दूरदर्शन नुकतंच सुरू झालं होतं. एका नव्या अपूर्वाईचा आरंभ झाला होता. इकडं पुण्यामध्ये दत्ता सराफांच्या संपादकत्वाखाली साप्ताहिक 'मनोहर'नं कात टाकल्या-सारखं नवं टवटवीत रूप घेऊन बऱ्यापैकी धमाल उडवली होती. अनिल हवालदार त्याच्या खास ढंगदार शैलीत 'मनोहर'मधून नियमितपणे लिहायचा. टेलिव्हिजनच्या नवलाईचा दुर्लभ योग साधून त्याच्या सुपीक मेंदूतून एक 'फीचर'ची कल्पना निघाली. 'मनोहर'साठी दूरदर्शनवर निवेदिका म्हणून काम करणाऱ्या मुलींच्या मुलाखती घ्यायच्या– 'मनोऱ्यावरच्या मुली' ह्या शीर्षकाखाली ! फीचरची कल्पना 'आल्हाद-दायक' होती ह्यात शंकाच नाही. बहुतेक मुलाखती घेऊन झाल्या होत्या. इतर काही जुजबी सामुग्री गोळा करायची म्हणून अनिलला टी. व्ही. सेंटरवर जायचं होतं. अस्मादिकांचा मुंबईत मुक्काम होता आणि दुसरा काही उद्योग नव्हता म्हणून मीही त्याच्याबरोबर टी. व्ही. सेंटरवर गेलो. तिथं सलामीलाच ज्योत्स्ना किरपेकर भेटली. बोलता बोलता सहजपणानं म्हणाली–'माझी एक मैत्रीण नुकतीच अनाउन्सर म्हणून जॉईन झालीय–तिचीही मुलाखत घेणार का ? मी पाठवून देते तिला.'

थोड्याच वेळात ती मुलगी आमच्यापुढं हजर झाली. काळ्या आणि किरकोळ अंगयष्टीच्या त्या मुलीचं व्यक्तिमत्त्व प्रथमदर्शनी तरी मुळीच छाप पाडणारं नव्हतं. आम्ही तीघे बाहेरच्या अंगणातील एका कठड्यावर बसलो. त्या दोघांची प्रश्नोत्तरं सुरू झाली. मी केवळ वेळ

काढायचा म्हणून तिथं बसलो होतो, इतकंच ! पण थोडयाच वेळात जाणवू लागलं की ह्या नगण्य वाटणाऱ्या मुलीतही काहीतरी विशेष आहे– शब्दांनी सांगता न येणारं पण तरीही फार तीव्रपणे व्यक्त होत राहाणारं ! तिच्या मोठ्या डोळयांत एक मन:पूर्वकता होती आणि साऱ्या मुद्रेवर एक मनस्वीपणा होता. तिचं एकूण व्यक्तिमत्त्वच गूढ, काहीसं कोडयात टाकणारं वाटत होतं.

तिची फॅमिली बॅकग्राऊंड तशी मोठीच दिसत होती. पण त्यातून येणारी तकलुपी सुखासीनता मात्र तिच्यात कणभरही नव्हती. उलट मध्यमवर्गीय घरात जन्मलेल्या स्वतंत्र बाण्याच्या मुलीत आढळणाऱ्या एका अनिवार्य बेचैनीनं तिचं सारं अस्तित्व व्यापून टाकलंयसं वाटत होतं. तिचं वागणं–बोलणं–संस्कार ह्यातली सफाई कॉन्व्हेंटची वाटत होती. पण प्रत्यक्षात तिचं शालेय शिक्षण झालं होतं ते चक्क पुण्याच्या सदाशिवपेठी मुलींच्या शाळेत ! खेळ-कला-शिक्षण ह्यातली नजरेत भरणारी कुठलीही पुण्याई त्या क्षणी तिच्याजवळ दिसत नव्हती. तिलाही त्याची जाणीव होती. पण तरीही आपल्याकडे काहीतरी आहे अशी तिला खात्री होती. त्या आधारावरच ती बोलता बोलता एकदम मनापासून म्हणाली–' बट आय वॉंट टु प्रूव्ह मायसेल्फ ! ' तिचं ते बिनबुडाचं वाक्य त्या क्षणी मला थोडं मजेशीर वाटलं; पण त्याच वेळी त्यामागच्या मन:पूर्वकतेमुळं कुठंतरी आत भिडलंही. आज इतक्या वर्षांनी मला कबूल करायला हवं की ते वाक्य बिनबुडाचं नव्हतं. ती जाणीवपूर्वक बोलली असेल किंवा नसेल, पण काळानं त्यातलं अक्षर न् अक्षर सिद्ध केलंय. ऐका अर्थी तिनं बोललेलं शब्दश: खरं करून दाखवलंय. ह्या मुलीचं नाव– ' स्मिता पाटील.'

स्मिता पाटीलची आणि माझी चांगली ओळख आहे. पण त्या ओळखीला ' मैत्री ' वगैरं म्हणणं योग्य होणार नाही, कारण तशी वस्तुस्थिती नाही आणि आवश्यकताही नाही. तिच्या व्यक्तिगत आयुष्यासंबंधीही मला फारच थोडी माहिती आहे. मला खरा रस आहे तिच्यातल्या अभिनेत्रीमध्ये आणि एका अंत:स्फूर्तीनं ' आय वॉंट टु प्रूव्ह मायसेल्फ ' म्हणणाऱ्या तिच्यातल्या सुप्त अस्मितेमध्ये ! एक रसिक

प्रक्षक ह्या नात्यानं मी तिचा सारा प्रवास पाहात आलो आहे, पुढंही पाहाणार आहे. नाही म्हणायला कारकीर्दीच्या अगदी सलामीलाच योगायोगानं आम्ही काही थोडा काळ एका ठिकाणी आलो होतो.

पहिला डाव भुताला द्यावा म्हणतात तशी अवस्था असल्यामुळं त्या चित्रपटाचा उल्लेख होत नसला तरी 'ऐतिहासिक' 'राजा शिवछत्रपती' हा स्मिताचा आणि माझाही पहिला चित्रपट! ( हे थोडंसं पुलंच्या–'आमी न् पीयेल यकदमच इंडष्ट्रीत आलो' म्हणणाऱ्या नामू परटाच्या चालीवर होतंय ह्याची मला जाणीव आहे. पण मी तरी 'ऐतिहासिक सत्य' कसं लपवू शकणार ? )

आजही एरवी लक्षात न येणारा स्मिताचा 'फोटोजेनिक फेस' मला प्रथम जाणवला तो 'राजा शिवछत्रपती' मध्येच! सईबाईच्या भूमिकेत खानदानी मराठमोळ्या वेषभूषेत सारा साजशृंगार करून स्मिता प्रथम सेटवर आली तेव्हा समस्त मंडळींच्या जिभा टाळ्याला चिकटल्या–अगदी रंगील्या वृद्धयुवा हरिंद्रनाथ चट्टोपाध्यायांसह! पहिलं चित्रण होतं ते शिवाजी आणि सई ह्यांच्यातील प्रणयप्रसंगाचं! शिवाजी जवळ येताच सईनं मर्यादशीलपणे उठून दूर व्हायचं आणि सईच्या पदराचा नुसता वारा लागतोयसं दिसताच महाराजांनी भारदस्तपणे अंग चोरून लांब जायचं, असा एकूण त्या 'प्रणया'चा खाक्या होता. मधेच, 'सई लाजते' असा एक उल्लेख आला. हा 'प्रसंग' ओढवल्यावर स्मितामधल्या मॉडर्न बाँबे गर्लनं हताश असहाय्य प्रश्न केला–'बापरे, आता मी लाजायचं का ?'–मी न राहून म्हणालो, 'प्रयत्न करून बघ. नाहीच जमलं तर आपण महाराजांना लाजायला सांगू.'

ह्याच सेटवर एके दिवशी वसंतराव जोगळेकर स्मिताला भेटायला आले. 'हा खेळ सावल्यांचा'साठी नायिका म्हणून त्यांनी स्मिताची निवड केली होती. तिथंही पाठोपाठ 'गीतकार' म्हणून सोवळं-भांडं घेऊन आम्ही हजर झालोच. अप्पांच्या घरी एका बैठकीत स्मिता सहजपणे बोलली–'मला उद्या श्याम बेनेगलनं भेटायला बोलावलंय.' त्या साध्यासुध्या वाक्यात केवढं भवितव्य लपलं होतं ते आज कळतं.– काही अडचणींमुळं 'खेळ सावल्यांचा' तेव्हा रेंगाळला. वर्षभरानं सुरू

झाला तेव्हा स्मितासह साराच 'सेट अप' पार बदलला होता. त्या काळात एके दिवशी रात्री माहीमच्या 'नीलम'मध्ये मी दोस्तांबरोबर जेवायला गेलो. तिथं आजारापूर्वीचे रसरशीत तब्येतीचे अण्णा माडगूळकर आणि गोविंदराव घाणेकर भेटले. बोलता बोलता घाणेकरांनी दुसऱ्या दिवशी त्यांच्या एका चित्रपटाची ट्रायल पाहायला बोलावलं. त्या श्याम बेनेगल दिग्दर्शित चित्रपटाचं नाव होतं, 'चरणदास चोर.' एका लोककथेवर आधारित तो चित्रपट हा एक वेगळाच प्रयोग होता. छत्तीसगढच्या अेका खेड्यात चित्रित केलेल्या त्या सिनेमात प्रमुख भूमिकांमध्ये, अभिनयाचा गंध नसलेली स्थानिक खेडूत मंडळी होती. आणि छोट्या भूमिकांसाठी पाहुणे कलाकार म्हणून मुंबईचे कलाकार होते. त्यामध्ये स्मिता राणीच्या भूमिकेत वावरताना दिसली आणि मला अप्पांच्या घरी ऐकलेल्या वाक्याचा संदर्भ लागला. पाठोपाठ 'निशांत' आलं, 'मंथन' आलं, 'भूमिका' आलं आणि एक लखलखीत कारकीर्द सुरू झाली.

एखाद दुसरा अपवाद वगळता ह्या बहुतेक भूमिका मी पाहिल्या आहेत आणि स्मिताला मनापासून मानलं आहे. पहिल्या भेटीत दिसलेला तिचा प्रांजळ मनस्वीपणा ह्या साऱ्या लहानमोठ्या भूमिकांतून वारंवार प्रकर्षानं जाणवत आला आहे. चित्रपट ह्या माध्यमाची एकूण समज; तुकड्या तुकड्यातून उभ्या राहाणाऱ्या भूमिकेवरची पकड; अभिनयातलं सातत्य आणि 'अभिनय' ह्या शब्दाचा विसर पाडणारी कॅमेऱ्यापुढची अकृत्रिम सहजता ह्या दुर्मिळ वैशिष्ट्यांचा सुखद अनुभव वेळोवेळी मिळाला आहे. 'सर्वसाक्षी' सारख्या 'चित्तचक्षुचमत्कारिक' चित्रपटातही स्मितापुरता पडदा जणू जिवंत होऊन जातो तो त्यामुळंच !

'उंबरठा'तली सुलभा हा तर स्मिताच्या चित्रजीवनातला महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल. ती ह्या भूमिकेत सर्वस्वानिशी अशी झोकून देऊन उतरली आहे की चित्रपटातील उणीवा; तिच्या स्वतःच्या व्यक्तिरेखेतील गफलती अशा अनेक गोष्टींचा भल्याभल्यांनाही निदान तेवढ्या वेळापुरता विसर पडावा. ह्याचा प्रत्यय हवा असेल तर अधिकारी आणि मान्यवर व्यक्तींनी 'उंबरठा' ह्या चित्रपटाला दिलेली

भरमसाठ प्रशस्तीपत्रकं पहावीत.—ह्याच पद्धतीनं बोलायचं तर, स्मितानं अभिनयाचं 'शिखर' गाठलं आहे वगैरे समारोपाच्या गोष्टी करता येतील. तिच्या स्तुतिपर वाक्यांची नजरबंदी करणारी आतषबाजीही मांडता येईल. —पण 'अभिनेत्रीपण' पलिकडची अस्मिता आणि शहाणपण असलेल्या स्मिताला खरीखुरी दाद द्यायची असेल तर एक छोटंसं वाक्यही पुरेसं व्हावं—

'येस्, शी हॅज् प्रूव्हड् हरसेल्फ !'

* *

## ॥ लय ॥

सर्वच गोष्टींप्रमाणं 'संगीताची जाण' ह्या बाबतीतही अस्मादिकांचा प्रवास एकलव्याच्या पद्धतीनंच झाला. ह्याचा मुख्य तोटा असा की संगीतकलेनं ह्या एकलव्याचा 'अंगठा' कापून घेतला नसला तरी त्यालाच एका अर्थानं 'अंगठा दाखवला.' (काही दुष्ट हितचिंतक ह्याचा संगीतावरील एक 'अरिष्ट' टळलं असाही अर्थ लावतात. त्या नत-द्रष्टांना परमेश्वर शासन... आपलं–क्षमा करो ! ) पण ह्या जोडीला एक इवलासा फायदाही आहे. कुणीतरी आपल्याला वाट दाखवण्यापेक्षा स्वतःच्या स्वतःला ती सापडण्यात जो अनोखा आनंद लपला आहे तो यामुळं पोटभर अनुभवायला सापडला. संगीताची छोटीमोठी तत्त्वं जेव्हा आपसूक उमगत गेली तेव्हा ते क्षण केवळ माहितीवजा न ठरता जणू साक्षात्काराचे ठरले. संगीतातल्या एका मूलतत्त्वाचं भान प्रथम आलं तो क्षण असाच साक्षात्काराचा होता.

तोपर्यंत 'सूर' हे एकच तत्त्व मला ठाऊक होतं. गाण्यात भान हरपलेलं असतानाही एकीकडं सारखं जाणवत राहायचं की स्वराबरोबर आणखी असं 'काहीतरी' आहे की जे आपल्याला वेढून राहिलंय आणि त्या गाण्यालाही जिवंत करतंय. पण ते काय ते कळत नव्हतं. एके दिवशी लक्षात आलं की ती आहे; 'लय'! ती आपण समजतो तशी तबल्याच्या तालातून जन्मत नाही. ती मुळात असतेच. तिच्यातूनच सूर स्फुरतो. तीच स्वरांच्या लडी ओवीत नेते आणि गाण्यात स्वराच्या जोडीला तालाचा प्रवेश होतो तो या लयीचं बोट धरूनच !–मग ती लय गाण्याबाहेरही जाणवू लागली. मानवी देहात लवलवताना दिसू

लागली. झाडाडोंगरापासून ते वास्तुशिल्पापर्यंतच्या यच्चयावत् आकृतींतून डोकावू लागली. काळाच्या ओघामध्ये जाणवू लागली. फार कशाला विश्वाच्या असीम अवकाशालाही ही कमनीय लयच व्यापून राहिली आहे; असं भासू लागलं. मात्र कवितेचं एक 'बन' या लयीच्या वाटेनंच आपल्याला सापडेल हे माझ्या ध्यानीमनीही नव्हतं. पण तसं घडलं खरं...नुकतंच, परवाच्या जुलै महिन्यात !

दीडदोन वर्षांपूर्वी रॉय किणीकरांचा 'उत्तररात्र' नावाचा छोटासा कवितासंग्रह माझ्या हाती आला आणि मी त्यात गुंतलोच. ते पातळसं सुबक पुस्तक; त्यातली सुभाष अवचटची छोट्या कवितांसारखी रेखाचित्रं आणि रॉय किणीकरांच्या चार ओळींच्या टपोऱ्या कविता हा सगळाच प्रकार मला मनापासून भावला. त्या कविता काही अभूतपूर्व होत्या असं मुळीच नव्हे. उलट त्या कवितांचा गूढ साधेपणा हीच त्यांची मोठी शक्ती होती. किणीकरांनी त्या पुस्तकात कुठेही तसा उल्लेख केला नसूनही मला त्या खऱ्या अर्थानं 'मराठी रुबाया' वाटल्या.

स्वतःही कवी असलं की अशा वेळी एक धोका संभवतो. एखादा कविता प्रकार आवडला की तोच आपणही गिरवीत सुटण्याचा मोह ! (उदा. सुरेश भटांच्या गझलांवर भाळून सध्या माजलेला 'छापा'च्या मराठी गझलांचा सुळसुळाट !) अनुकरण करायलाही हरकत नसावी. पण ते करण्यापूर्वी स्वतःची प्रकृती आणि प्रवृत्तीही पाहायला हवी. आणि म्हणूनच, मनापासून आवडूनही रॉय किणीकरांच्या पावलावर पाऊल ठेवून रुबाया लिहिण्याच्या मोहापासून मी कटाक्षानं दूर राहिलो. याच सुमाराला—कलंदर कविमित्र रमेश वैद्यांनी लिहिलेल्या सुरेख रुबाया वाचल्या आणि रुबायांच्या वाटेला जाण्याचा धर्म आपल्या कवितेचा नाही हे अधिक तीव्रपणे पटलं.

शिवाय ते दिवस तसे कवितेच्या अवर्षणाचेच होते. किती किती दिवसांत आभाळ भरून येत नव्हतं, किती किती दिवसांत कविता चाहूल देत नव्हती. मागणीबरहुकूम लिहिता लिहिता मागणीवाचून लिहिताच येऊ नये अशी अवस्था येते की काय असं वाटत होतं. बऱ्यापैकी बेचैन होतो. त्या बेचैनीतूनच 'शब्दधून'चा आषाढ बरसला.

मनाला एक सतेज टवटवी आली. साऱ्या गोष्टींतून एक नव्हाळी जाणवू लागली. तरीही, पुन्हा तसाच दुसरा बहर लगेच वाट्याला येईलसं वाटत नव्हतं. पण, तो आला. गंमत म्हणजे त्यालाही पुन्हा निमित्त झालं ते रॉय किणीकरांच्या 'उत्तररात्र'चंच !

'उत्तररात्र'मधील काही रुबायांना चाली लावाव्या अशा इराद्यानं पुस्तक उघडून बसलो. दोनतीनदा उलटसुलट वाचलं आणि हार्मोनियम काढून बसल्यावर गंमतच घडू लागली. स्वरांची वाट पाहाताना अचानक शब्दांच्या ओळीच फेर धरू लागल्या.

आकाश कुणाचे ?
पृथ्वी ही कोणाची ?
जन्मांकित, मरणांकित
यात्रा कोणाची ?
हे गूढ पुरातन विश्वचक्र कोणाचे ?
जो होईल त्याचा–
केवळ, 'त्याचे – त्याचे'

० ० ०

मी ओंजळ माझी
रितीच घेऊन आलो
जाताना ओंजळ
रितीच ठेउन गेलो
ओंजळीत आल्यागेल्या श्रेयांवरती
पण–पुसट, कोवळे
नाव कोरुनी गेलो

त्या एका झपाट्यात १५/१६ कविता लिहून झाल्यावर लक्षात आलं–की सगळ्या कवितांची मांडणी न ठरवता, योजता, नेमकी सात ओळींत होत होती आणि कवितेचं 'मीटर' 'उत्तररात्र'मधल्या कवितांचं होतं. मग पुढं जाणीवपूर्वक तो नेणिवेतला प्रवास तसाच चालू ठेवला.

ज ठाउक नव्हते
तेही जाणुन झाले
मग होते–नव्हते
क्षणी नाहिसे झाले
मी फळा मनाचा पुसून केला स्वच्छ
कण बोटांवरती
कसे चिकटुनी आले ?

० ० ०

ही दरी
धुक्याचे तळे जणू अनिवार
सांडला केशरी कुंभ
उठे झंकार
कोवळ्या तृणांना जणू उन्हाचे डोळे
उमटले कळीवर
पाय दवाचे ओले

० ० ०

कळले ना ;
जगणे गाणे आहे सारे
कोणीही गावे
लागलेत तंबोरे
रे जगणे म्हणजे संथ स्वराचा श्वास
अन् मरण ?
जणू ही दोन स्वरातिल आंस

आभाळाच्या छताखालचं काय काय त्या प्रवाहात वाहू लागलं. कधी कवितेतून पुन्हा कविताच; कधी आरस्पानी मन; कधी पापणी आडचा 'कधीचा' पाऊस; तर कधी ऐकणाराला बुचकळ्यात टाकणारी एखादी अनुभूती.

तू–मी दोघे नि
दर्या होता तिसरा
वर एकांताचा
होता गूढ पहारा
पाहून वाट भरतीची शिणला--थकला
वेडावुन दर्या
दोघांवर कोसळला

तरीही--ह्या ‘ रुबाया ’ आहेत असं, का कोण जाणे, मला कधीच मनःपूर्वक वाटलं नाही. आपली नेहमीची खास मराठी भावकविताच या एका विशिष्ट वृत्तात व्यक्त होत राहाते आहे अशी माझी समजूत आहे. विश्लेषण करून सांगणं कठीण आहे पण ज्या अर्थानं रॉय किणीकरांची कलंदर कविता मला रुबाई वाटली--त्याच अर्थानं या कविता रुबाया नव्हेत असं वाटतं. अर्थात हे शेवटी ठरवायचं अभ्यासू वाचकांनी आणि जाणकारांनी ! पण एक मात्र खरं की उत्तररात्र-मधल्या कवितांच्या ‘लयी’तूनच माझ्या या सप्तपदी कवितांना चालना मिळाली.--‘ शब्दधून ’च्या वेळी ७/८ दिवस डोक्यात केवळ ‘ शब्द ’ घुमत होता तशी यावेळी ७/८ दिवस केवळ ती ‘ लय ’ गुणगुणत होती. कुठे कुठे भिरभिरत होती. तिला हव्या त्या अनुभूती तिची तीच टिपत होती. ही जाणीव मला झाली ती त्यातल्याच एका सप्तपदी कवितेतूनच--

लय एक हुंगिली
खोल खोल श्वासात
ओवीत चालली
शब्दांच्या धाग्यात
लहडला वेल--तो पहा निघाला गगनी
देठांना फुटल्या
कविता पानोपानी

हे भान आलं त्याच क्षणी ठरवलं की या कवितांचं जे संकलन प्रसिद्ध करायचं त्याला हेच शीर्षक द्यायचं-- ‘ लय ’ !

आणि एक महत्त्वाची गोष्ट-- आजवरसारखी दिरंगाई नाही करायची. जमेल तितक्या लौकर ही ‘ लय ’ लोकांच्या हाती तिच्या भल्याबुऱ्या नशिबासह सोपवून टाकायची.

तस्मात् --

बा ऽ आदब, बा ऽ मुलाहिजा

होश्शिया ऽ र...

❊ ❊

## ॥ अजोड ॥

खूप जुनी गोष्ट आहे. शहरात शिकायला असलेला थोरला भाऊ सुटीच्या दिवसांत घरी परतायचा तो पोतडीत दर वेळी नव्या नव्या चिजांची भर टाकून......नवे किस्से, नव्या नकला, नवी गाणी ! अशाच एका खेपेला तो एक गाणं घेऊन आला. त्या गाण्यानं आमचं पुरं घर झपाटून टाकलं. विषय अस्सल ' मऱ्हाटी ' होता. पाखंडी विरोधकांनी तुकोबांची गाथा इंद्रायणीत बुडवली खरी, पण बुडाले ते केवळ कागद ! जनसामान्यांच्या आयुष्यात ती अभंगवाणी इतकी भिनली होती की अखेर लोकगंगेवर गाथा तरलीच. हा आशय मांडणाऱ्या त्या गीताचे शब्द होते--

ज्ञानदेविच्या, मराठियेच्या
नगरीतुन हिंडुन
आणिले टिपुनी अमृतकण

पुढं कित्येक वर्षं त्या गाण्याची शिदोरी आम्हाला पुरली, अगदी कालपरवापर्यंत......एका अर्थी द्रौपदीची थाळीच म्हणा ना ! इतक्या वर्षांत त्या गीताच्या शब्दांचा टवटवीतपणा कणभरही कोमेजला नाही.

रानात पेरिती कृषिक बियाणे नवे
पेरिती तुक्याच्या अभंग गीतांसवे
अन्नब्रह्म होऊनी विनटतो
म्हणुनी नारायण.
अंगणी घालिती सुवासिनी जे सडे
त्या तिथं तुक्याची वाणी कानी पडे

कान उभारुन ऐकत राही
गोठ्यातिल गोधन.

ती देहु आळंदी देवाची पंढरी
दुमदुमे तुक्याच्या नामाच्या तोडरी
घरोघरी ही अभंगवाणी
झाली वृंदावन
आणिले टिपुनी अमृतकण !

अभ्यासक्रमातल्या अन्वयार्थाच्या जंगलात घुसमटणाऱ्या कवितां-सारखी ही कविता अनोळखी, परकी वाटत नव्हती. रोजच्या व्यवहारातलं साधंसुधं बोलणंच जणू ' गाणं ' होऊन नव्यानं भेटत होतं. त्या गाण्याचं ऋण आजन्म मानायला हवं. कारण त्या गाण्याचं बोट धरूनच एका अजोड लेखणीचा आयुष्यात प्रवेश झाला. आणि पाठोपाठ मग त्या लेखणीतून जन्मलेल्या गीतांचा एक खळाळच वाहू लागला.

' प्रभातसमयो पातला... '
' मनोरथा, चल त्या नगरीला '
' आश्रम की हरिचे हे गोकुळ '
' जाळिमंदी पिकली करवंद '
' माझा होशिल का ? '
' वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदेमातरम् '

ज्या स्वरांनी हे शब्द वाहते केले त्या स्वरांचं ऋण प्रथम मानायला हवं. कारण त्या स्वरांविना शब्द नुसतेच डोक्यावाटे बुद्धीच्या कठोर तटबंदीवर धडकत बसले असते. परंतु स्वराच्या धारेतून ते कानांवाटे सरळ हृदयापर्यन्त पोचले. किंबहुना शब्द आणि स्वर हा दुरावा तिथं नव्हताच. शब्द स्वरांचे अर्थ सांगत होते आणि स्वर शब्दातील नि:शब्द पोचवीत होते. आणि हे सारं घडत होतं व्यवसाय म्हणून—मागणीबरहुकुम !

त्या लेखणीच्या करामतीनं पुढचं आयुष्य गजबजून गेलं. मानवी आयुष्याच्या शेकडो रंगांत ती लेखणी अंतरंगापासून चिंब भिजली होती. त्यामुळं ' वसंतकाली, वनी-दिनान्ती ' ह्या अवघ्या तीन शब्दांत

केवढं वातावरण ओथंबून यायचं. ‘ बाभळीला बहर पिवळा, वरुन बोले कावळा ’ असला खडबडीत तपशीलही नदीकाठच्या मातीसारखा मऊसूत होऊन जायचा. कधी त्या लेखणीतल्या कॅमेऱ्यातून ‘ उतरण, झाडी, वळत्या वाटा – घरे, दूरवर नदी, चव्हाटा ’ असा डोंगर माथ्यावरून टॉप अँगलचा ‘ लाँग शॉट ’ मिळायचा, तर दुसऱ्याच क्षणाला ‘ काळा कातिव देव आतला, हार गुंफुनी तया घातला ’ असा गाभाऱ्याचा मिणमिणत्या प्रकाशातला ‘ क्लोज अप् ’ मिळायचा. चित्रदर्शीपणा हा तर त्या लेखणीचा स्वभावच ! त्यामुळं, ‘ तीच घरटी, झोपड्या त्या, तीच माती तांबडी । तीच कौलारे उतरती, तीच वळणे वाकडी ’ अशी ‘ लँडस्केप्स् ’ तर बघता बघता रेखाटली जायचीच, पण ‘ हास्याविना फुटेना ओठात शब्द काही ’ असली सूक्ष्म छटा टिपण्यातही त्या लेखणीतल्या कुंचल्याकडून कसूर व्हायची नाही. ‘ प्रेम ’ हा विषय तर त्या लेखणीनं जन्मभर हळुवारपणे इतक्या असंख्य तऱ्हांनी रंगवला की केवळ तेवढ्यासाठी त्या लेखणीच्याच प्रेमात पडावं. मग त्यामध्ये–‘ का असा गेलास तू ना बोलता ना सांगता ’ असं ‘ टीन एजर ’ प्रेम आलं. ‘ नाहीस बोलला तू नाहीच बोलले मी । दोन्ही मनात प्रीती हे आज जाणिले मी ’ अशी प्रेमाची अबोल खूणगाठ बोलकी झाली. आणि ‘ एक भेट, ताटातूट, संपली कहाणी ’ ह्या एका ओळीत तर सारंच सांगून झालं.

चांगलं गीत ही एक ‘ घटना ’ किंवा ‘ गोष्ट ’ असते. सुख-दुःखाच्या अशा अनंत ‘ गोष्टी ’ ह्या लेखणीनं गाण्यांतून मांडल्या. त्यामुळं ही गीतं ‘ यमक ’ नावाचं शेपूट पकडायला कुत्र्याप्रमाणं स्वतः-भोवती तिथल्या तिथंच गोल गोल फिरताना दिसत नाहीत. तर प्रवाही-पणे पुढं पुढं जात राहातात आणि कल्पनेचं एक वर्तुळ पूर्ण करतात. ‘ बघुन बघुन वाट तुझी नयन थांबले ’ ह्या शब्दांतून सुरू झालेली प्रतीक्षा केवळ आतुर आसमंतच उभा करून थांबत नाही.

मनि येते रे नाथा
येशिल तू–मी जाता
सोसशील दुःख कसे
मज न सोसले

ह्या शब्दांतून ती ' वाट पाहाणारी' डोळ्यापुढं साक्षात् उभी झाल्यावरच तो ' विचार ' पूर्ण होतो. अवकाश व्यापून जन्मलेलं कवितेचं वर्तुळ लहान होत अखेर मनात मिटून जावं, तशी ही मजेदार प्रक्रिया आहे.

मराठी भाषा तशी नाठाळ ! पण संतकाव्यावर पोसलेल्या ह्या लेखणीतून मात्र मराठी गद्यही लवचिक कविता होऊन कसं साळसूदपणे वाहात राहायचं.

' कधी तरी मी आले होते
बसले होते या इथे
या इथे की त्या तिथे ? '

' आला नाही तोंवर तुम्ही
जातो म्हणता का ? '

पुराणकथांतील चपखल रूपकं योजकपणे वापरण्यात तर ह्या लेखणीचा हातखंडा ! गरीब पतीचा संसार सुखानं करणारी नायिका रंगवताना ह्या लेखणीला ' वनवास हा सुखाचा, दिनरात लाभताहे सहवास राघवाचा ' म्हणणारी सीता नेमकी आठवायची. परांगदा पती पुन्हा भेटेल ह्या श्रद्धेवर जगणाऱ्या सुवासिनीसाठी ' कधी मी पाहिन ती पाउले ' म्हणणारी अशोकवनातली जानकी सापडायची. आणि माहेरी अपमानित होऊन परतणारी मानिनी रेखाटताना ' मानभंग हाचि झाला मंडपी आहेर । उमा म्हणे यज्ञी माझे जळाले माहेर ' म्हणणारी दक्षकन्या सती ह्या लेखणीत नेमकी हजर व्हायची.

साऱ्या रोजच्या ओळखीच्या, माहितीतल्या गोष्टी...पण लेखणीतून आरपार गेल्या की जणू नवीन व्हायच्या. तशी ह्या लेखणीनं उसनवारीही वेळोवेळी खूप केली. वाल्मिकीच्या ' यथा काष्ठं च काष्ठं च ' मधून ' दोन ओंडक्यांची होते सागरात भेट ' ह्या ओळी आल्या. ' विकत घेतला श्याम ' मधून मीरेची अस्मिता व्यक्त झाली. ' ही एक धर्मशाळा सारे इथे प्रवासी । दिनरात दोन दारे येण्यास जावयासी ' किंवा ' चित्रातल्या जळात ते चित्र तारवाचे' ह्या ओळींतून उमरखय्याम बोलला. पण हे सारे उपरे, कोरडे अनुवाद नसायचे तर त्या त्या कल्पनांचे जणू पुनर्जन्म भासायचे.

उणीपुरी दोन अडीच तपं ह्या लेखणीनं जणू अधिराज्य गाजवलं. आपली मस्ती सांभाळली. दिमाख जोपासला आणि अस्तानंतरचा अटळ काळोख येण्यापूर्वीच अज्ञाताची वाट धरली...कीर्तीचा सुगंध मागं दर्वळत ठेवून !

ह्या लेखणीला ' दैवी चमत्कार ' वगैरे मानून देव्हाऱ्यात तिची स्थापना करू जाणं हा भाबडेपणा होईल. किंबहुना इतिहास म्हणून दखल घेताना अभ्यासकांनी अतिशय परखड वस्तुनिष्ठपणे ह्या लेखणीचा विचार निर्भयपणे करायला हवा. कारण बावनकशी सोनं कसोशीला कचरत नसतं. पण आस्वाद घेताना मात्र तोही तितक्याच दिलखुलासपणे घ्यायला हवा. तिथं ' कवी, गीतकार ' असे घोळ निर्माण करून हात आखडता घेण्याचा करंटेपणाही बरा नव्हे.

कलाक्षेत्रात ' शेवटचा शब्द ' ही गोष्ट नसतेच. मराठी गीतकारांची पूर्वपरंपरा मोठीच आहे आणि पुढंही ती खंडित व्हायचं काही कारण नाही. कारण प्रत्येक काळाची आव्हानं वेगळी असतात आणि ती आव्हानं पेलणारेही नवे, वेगळे असावेच लागतात. परन्तु भविष्यात झेपावणाऱ्या प्रत्येक स्वयंभू लेखणीत ह्या लेखणीचे चार धागे झिळमिळताना दिसतील आणि त्या साऱ्या लेखण्या ह्या लेखणीच्या खांद्यावरच उभ्या असतील.

ह्या लेखणीमागचा ' लिहिता हात ' अज्ञातात विलीन झाला ह्या घटनेला परवाच्या १४ डिसेंबरला ५ वर्षं पूर्ण झाली. मनाच्या खोल गाभ्यात सुप्तपणे सतत तेवणारी ह्या अजोड लेखणीच्या आठवणीची ज्योत वर काढून आज काहीक्षण न्याहाळली ती त्या निमितानंच !

❋ ❋

## ॥ "कवितेतला" कवी ॥

कै. कविवर्य बा. भ. बोरकरांना मी खऱ्या अर्थानं कधीच भेटलो नाही...पण तरीही त्यांना असंख्य वेळा भेटतच जगलो. पहिली भेट अर्थातच पाठ्यपुस्तकातल्या ' दिव्यत्वाची जेथ प्रचीती । तेथे कर माझे जुळती ' ह्या कवितेतूनच...... !

यज्ञीं ज्यांनी देऊनि निज शिर
घडिले मानवतेचे मंदिर
परी जयांच्या दहनभूमिवर
नाही चिरा, नाही पणती... !

उदास सत्यही उदात्तपणे मांडणाऱ्या एका घरंदाज प्रसन्न कवितेशी त्या पहिल्या भेटीतच नकळत नातं जुळून गेलं. आणि मग पाठ्यपुस्तका-बाहेरही त्या कवितेच्या पाऊलखुणा शोधण्याचा नाद जडला.

आषाढिच्या घनें का
त्वन्नेत्र भारलेले ?
नादात गुंगसी जे
शब्दांत सांग बाले......

ह्या गीतपंक्तींनी तर काही काळ मी पुरा वेडा झालो होतो. थोडासा गाण्यातला असल्यामुळं ह्या शब्दांना चाल लावण्याचा खटाटोपही करून झाला. आज लक्षात येतं, ह्या गीतातलं आवाहन म्हणजेच बोरकरांचं समग्र ' कवीपण ' ! आयुष्यभर ते आपल्याच नादात गुंगत राहिले आणि ते ' गुंगणं 'च आपल्या लयदार शब्दांत उमटवत राहिले. किंवा

असंही म्हणता येईल की एका तरण्याबांड प्रतिभावंतानं... ‘ नादात गुंगसी जे, शब्दात सांग बाले ’ म्हणूनच आपल्या कोवळ्या कवितेलाच विनवलं आणि त्या उमद्या कवीची ती आर्जवी शपथ त्याच्या कवितेनं उभ्या आयुष्यभर पाळली.

कवीची आणि कवितेची ओढ ही फार जालिम गोष्ट आहे. विडंबन, उपेक्षा, टवाळी ह्यांचे ढीग रचले तरी ही ठिणगी ते सारं भस्मसात् करून पुन्हा आपली लुकलुकतच राहते. त्यामुळं रसिकाला नुसती कविता आवडून पुरेसं होत नाही. ‘ कवि तो आहे कसा आननी ? ’ ही उत्सुकता उरतेच.— खरं म्हणजे इथूनच बहुतेक वेळा ‘ परतीचा प्रवास ’ सुरू होतो. पण ह्या कवीबाबतीत तसं घडलं नाही. त्या कोवळ्या वयात, बोरकरांचा जो काव्यसंग्रह माझ्या हाती पडला त्यामधे बोरकरांचा एक सुटाबुटातला सुरेख फोटो होता. त्यातल्या त्यांच्या स्वप्निल, उमद्या दर्शनानं मला आतल्या कवितांइतकंच खिळवून ठेवलं. ह्या घटनेला वर्षं लोटली, बघता बघता कविवर्य बोरकर काळाच्या पडद्याआडही गेले. पण तरीही ह्या अखेरच्या क्षणापर्यंत त्या पुराण्या क्षणी मनावर उमटलेला ठसा जराही पुसटला नाही. किंबहुना बोरकरांचं राजबिंडेपण आणि त्यांच्या कवितेचं खानदानी देखणेपण ह्या दोन्ही गोष्टी वाहाणाऱ्या काळाबरोबर कशा छान जोडीनंच पिकत गेल्या. स्वप्नातलं जग, कादंबरीतला नायक ह्याप्रमाणं बोरकर जणू ‘ कवितेतले ’ कवी होते.

आज हाताशी संदर्भ नसतानाही बोरकरांच्या किती किती ओळी अनाहूत गोजिरवाण्या पाखरांप्रमाणं मनाच्या डहाळीवर उतरताहेत...

रात्र ही सरेल कधी
खंत नको प्राणा
पावलां नखांगणीक
नेत्र चालताना...

० ० ०

तापल्या आहेत तारा
तोवरी गाऊन घे...

० ० ०

विरले सगळे सूर तरीही
उत्तररात्र सुरेल...

० ० ०

उजाड माळावरती अवचित
तृप्तीचा प्राजक्त झडे
उषा दिनान्ता भुलून यावी
तशी गडे, तव भेट घडे...

० ० ०

झिणि झिणि वाजे बीन
सख्या रे, अनुदिन चीज नवीन...

'सौंदर्यासक्ती' हा कवी बोरकरांच्या व्यक्तित्वाचा 'प्राण' होता. पण ही सौंदर्यासक्ती कठोर वास्तवाकडे डोळेझाक करणारी नव्हती, तर असुंदराचे सारे घाव झेलून आणि व्रण सोसूनही अपरिहार्य-पणे टवटवीत राहिलेली सौंदर्यासक्ती होती. एका अर्थानं ती कवीची 'मजबुरी'च म्हणावी लागेल. स्वच्छ, कोवळ्या उन्हात हिरव्या कुरणांइतकेच निवडुंगाचे फडही सुंदर दिसावेत त्याप्रमाणं बोरकरांच्या कवितेत वेदना, सल ह्या गोष्टीही सुंदर होऊन जायच्या. कारण, न संपणाऱ्या काळोखापेक्षाही...चालणाऱ्या पावलांना आणि नखांना फुटणारे डोळे त्यांना महत्त्वाचे वाटायचे. उजाडणाऱ्या दिवसाइतक्याच मध्य-रात्रीच्या 'उदयवेणा' पाहाणं त्यांना भाग्याचं वाटायचं. तेजाचा सोहळा बघण्याचं स्वप्न ते जरूर पाहायचे. पण त्याच वेळी 'सोहळा असा मिळो, मिळो न वा कधीही । चालण्यातला प्रकाश पाहण्यात नाही' हे जागृत भानही ते हरवू द्यायचे नाहीत.–दैनंदिन जीवनात सारी सुखं, साऱ्या सुविधा ह्यांचा हिशेबी सावधपणे मनसोक्त आस्वाद घेत केवळ कवितेत भग्न, उध्वस्त वगैरे होण्याची 'फॅशन' पडलेल्या चालू युगात, दोन पिढ्या मागचे,'जळणाऱ्या जळत रहा, जळतो सारेच आम्ही, जळण्याच्या लाख तऱ्हा, राख मात्र जास्त कमी' म्हणणारे बोरकर वेगळे वाटतात ते त्यामुळंच !

बोरकरांची कविता हा जणु 'आनंदाचा कंद' आहे. ती मुक्त आहे. निर्भर आहे. 'कामद्रुमाची डहाळी आज एकाएकी न्हाली' असा

कोणताही अनुभव निरागसपणे टिपण्याइतकी स्वाभाविक, निर्भय आहे. आयुष्याची संध्याकाळ ढळण्याची चाहूल लागल्यावर बोरकरांनी एका ठिकाणी म्हटलं होतं–

‘ संधिप्रकाशात
अजून जों सोने
तों माझी लोचनें
मिटों यावी.’

–आणि तसंच झालं....त्यांच्या संधिप्रकाशातली सोनेरी जर अखेरपर्यंत विटली नाही....त्यांच्या संवेदनेची तार अखेरपर्यंत उतरली नाही, सदैव तापलेली राहिली....त्यांची बीन सदैव झिणझिणत राहिली....त्यांचा गळा गात राहिला आणि त्यांच्या हातातला कवितेचा हात कधीही सुटला नाही.

ते कवितेसाठीच जन्मले आणि कवितेसाठीच जगले.
मृत्यूची खाई ही गोष्ट तशी भयावहच !
पण आजवरची वाटचाल पाहिल्यावर वाटतं–

त्या अज्ञात उतरणीवरही हा आत्ममग्न कवी
जीवनाचा स्रोत पाठीशी घेऊन आपल्याच नादात
गुंगत चालला असेल आणि मस्तीत स्वतःशीच
गुणगुणत असेल....

ये ग, ये ग, परी
चोरपावलांनी घरी
मागे प्रपात पांढरा
....पुढे गार गार दरी....

❋ ❋

## ॥ सल ॥

लता मंगेशकर आणि आशा भोसले ह्या दोघींना आपण मनःपूर्वक मानतो. केवळ त्या अजोड गायिका आहेत म्हणून नव्हे. त्याबद्दल नव्यानं त्यांचं कौतुक करू पाहणं म्हणजे आपल्याच स्पंदनाची महती आपल्याला सांगण्यासारखं आहे. तितके आपण पोरकट नक्कीच नाही. पण त्यांना मनाच्या देठापासून सलाम करावासा वाटतो तो वेगळ्याच कारणामुळं! ते कारण म्हणजे कलावंत ह्या नात्यानं; समरसता आणि अलिप्तता ह्यांची त्यांनी आयुष्यभर घातलेली अद्भुत सांगड ! दोन तपांहून अधिक काळ असंख्य गाणी त्यांनी गाईली. आजही गाताहेत. गंगेच्या निवळ-शंख पाण्यासारखा आपला निर्मळ स्वर घेऊन त्या रोज स्टुडिओत येतात. वेगळं ठिकाण, वेगळा वाद्यवृंद, वेगळी चाल, वेगळे शब्द ह्यांना आपलंसं करून ध्वनिक्षेपकासमोर उभ्या राहतात आणि गाऊ लागतात. गातात त्या असा जीव ओतून की जणू हे एकच गाणं गेले काही दिवस त्यांच्या ध्यानीमनी भरून राहिलं आहे असं वाटावं. पण ' टेक ' ओ. के. होतो आणि पाहाता पाहाता त्या क्षणात अलिप्त होतात. झालेलं गाणं ऐकायचीही तसदी न घेता त्या निघूनही गेलेल्या असतात. कारण पुन्हा वेगळ्या ठिकाणी वेगळे शब्द आणि वेगळ्या स्वररचना त्यांची आतुरतेनं वाट पाहात असतात. वर्षानुवर्ष टिकलेल्या त्यांच्या अजब अढळपदाचं आणि ताजेपणाचं हेही एक रहस्य असावं.–कुठल्याही कला-नुभवात त्या त्या क्षणी खोलवर उतरायचं, पण त्यातून बाहेर आल्यावर मात्र त्याचेच रंग आणि डंख अंगावर मिरवीत राहायचं नाही. उलट पुन्हा पहिल्याच ताजेपणानं नव्या अनुभवाला सामोरं जायचं. ही किमया

प्रत्येक कलावंताला साधायला हवी. माझाही तसा प्रांजल प्रयत्न असतो. पण अजूनही गुंतून पडायला होतं. कुठं कानामागं रंग उरतो, कधी खोल मनात एखादा सल रेंगाळतच राहातो. उदा. 'नागीण' ह्या 'गतवर्षी' येऊन गेलेल्या चित्रपटाची आणि त्यातल्या गाण्यांची आठवण !

शाळेत ८ वी - ९ वीत असताना केव्हातरी रणजित देसाईंची 'बारी' ही कादंबरी वाचली होती. फार आवडली वगैरे होती अशातला भाग नाही. पण त्यातलं 'वातावरण' मनात रेंगाळलं होतं एवढं नक्की ! कारण इतक्या वर्षांनंतरही, त्यावर चित्रपट काढायचा बेत कॅमेरामन दोस्तानं—देबूनं बोलून दाखवला तेव्हा मी अभावितपणे त्याला विचारलं—'बारी म्हणजे ती नागी आणि तेग्याची गोष्ट ना ?'—पण वस्तुस्थिती अशी की ह्या दोन नावांपलिकडंचा कुठलाही इतर तपशील किंवा ती धड गोष्टही मला आठवत नव्हती. मग पुन्हा एकदा नव्यानं पुस्तक काढून वाचलं. कादंबरीचा रांगडा थाट आणि पूर्वार्ध खूप आवडला. उत्तरार्धात कथेनं घेतलेली वळणं मात्र निदान चित्रपटाच्या दृष्टीनं योग्य नाहीत, असं वाटलं. त्या वेळी रमाकांत कवठेकर कोवाडला रणजित देसाईंबरोबर कथेच्या कामालाच बसला होता. तेव्हां उत्सुकतेनं त्याची वाट पाहात राहिलो. त्यानं आणलेली बंदिस्त पटकथा बघून तबियत खूष झाली. 'नागी आणि तेग्याची गोष्ट आणि बेरडाचं इमान' हाच केंद्रबिंदू धरून त्याभोवती विणलेली ती पटकथा नुसती वाचताना-सुद्धा चित्रपट डोळ्यापुढं उलगडतोय असं वाटत होतं. गाण्यांच्या जागाही फार अचूक निवडल्या होत्या—कथानकाच्या ओघातून स्वाभाविकपणे उमलणाऱ्या ! मूळ गोष्टीवर बाहेरून कलम करावं तसा अगांतुक उपरेपणा त्यात कुठंही नव्हता. हा सुखद अनुभव फार दुर्मिळ असतो. संगीतकार भास्कर चंदावरकरांची काम करण्याची पद्धतही सुदैवानं कवीचं स्वातंत्र्य अबाधित राखणारी ! त्यामुळं मी पटकथेच्या वातावरणात मन अगदी मनसोक्त भिजू दिलं आणि मग 'सूर' लागल्यावर एका तडाख्यात चित्रपटाची सारी गाणी लिहून झाली.

एक गाणं—तेग्या आणि नागीच्या लग्नाच्या जल्लोषावेळचं समूह-गीत ! बेरडांची जीवनपद्धती सांगणारं. प्राणाहून मोलाचं त्यांचं इमान

व्यक्त करणारं आणि त्यामुळंच पुढच्या अशुभ संघर्षाची चाहूलही देणारं–

‘ न्हाई कशाची ददात
द्येवाजीचं ल्येक आम्ही न्हाऊ खुशालीत....
वाघाशीही झुंजनारी छाताडात मस्ती
रगेल नि रंगेलाची येका ठायी वस्ती
मुठीमंदी फरशी आनि बाईल मिठीत....
दिल्या बोलासाठी देऊ आनि घेऊ प्रान
जिवापरीसबी भारी मिठाचं इमान
प्वार पोटचाबी फेकू खुश्शाल आगीत....

तृप्त मनानं नागी जंगलात एकटीच मनाच्या हिंदोळ्यावर झोके घेते आहे. तिच्या ह्या आनंदाचं गुपित म्हणजे तिला नुकतीच लागलेली गर्भातली चाहूल....

फांदीवरी कावळा बोलतोय ग
कोण पाव्हणा येतोय ग....
येकलीच होत्ये मी पहिली
ह्यो आला–दुक्कल जमली
तिसरा चाहुल देतोय ग
कोण पाव्हणा येतोय ग....

तेग्या आणि चंद्रोजी ह्या जिवलग दोस्तांच्या रासवट रंगेलपणाला चाळवू पाहणाऱ्या नटरंगी ‘ चिमणा तमासगिरीणीची ढंगदार लावणी....’

‘ कोण तिला परका ?
जिवाचा मैतर कोण ?
येका चिमणीनं पटवलं चिमणं दोन ’

धन्यानं केलेल्या विश्वासघाताला बळी पडून तेग्या जन्मठेपेत खितपत पडलेला ! उभ्या संसाराचा झालेला ‘ इस्कोट ’ सावरत नागी तान्ह्या पोरात साऱ्या आशा एकवटून उरीपोटी राबते आहे. कर्तव्यकठोर ऋतुचक्र त्याच्या धीम्या चालीत फिरतंय. फिरतच राहिलंय.

पळक्षणांची पाखरं
दाही दिशांना उडाली
दिस चाललं चाललं
मास चाललं चाललं
वर्सं चालली चालली
कुणासाठी ना थांबली

फिरणारं ऋतुचक्र एवढाच त्या गीताचा अर्थ नाही. अनादि अनंत काळाच्या अखंड प्रवाहावरती त्या गीताचे शब्द जणू होडचा बनून तरंगताहेत.

काळ जखम करतो
काळ फुंकर घालतो
काळ यातना देऊन
त्येंचा ईसर पाडतो
काळ छळाची काहिली
काळ मायेची साऊली...
काळ धावे म्होरं म्होरं
जणु वाघ लागे पाठी
त्येच्या जोडीनं धावणं
हेच माणसाच्या हाती
काळ काळजी वाहतो
काळ पाहतो खुशाली...
कंदी उन्हाचा कडाका
कंदी कडाक्याची थंडी
कंदी चैताचा फुलोरा
कंदी पावसाच्या झुंडी
नाना रूपांत सारखा
काळ येरझारा घाली...

बेरडांचा नवा नाईक झालेल्या तेग्याच्या पोराचं—तरण्याबांड ईश्वराचं गाणं हा एक मजेदार चॅलेंजच होता.' पहिल्या तेग्याच्या गाण्यातला आशयच इथं पुन्हा मांडायचा होता, पण वेगळ्या ताजेपणाची

झिलई देऊन ! जणू ही दोन्ही गाणीही ' बालेका 'सारखी वाटावीत. म्हणून मग ईश्वराच्या गाण्याला ' मीटर ' निवडला तो ' बनगरवाडी '-तल्या ' इडिबांग डिपांग, डिचिबाडी डिपांग ' ह्या हलगीच्या बोलांच्या तालावरचा– ' ढोल-नगारं घुमू लागता, लयीत पाऊल झुलू लागता, सूर टिपंला जाऊन भिडता । हात बांधुनी निमूट -हानं, हे मर्दाचं काम नव्हं जी, हे मर्दाचं काम नव्हं ! ' ईश्वराच्या या म्हणण्यावर त्याची प्रेयसी लगमाचा खटचाळ जबाब ओघानंच आला– ' झुरमुरत्या चांदाच्या खाली, रात कवाची जागत बसली, वाट पाहते कुनी येकली । अश्या येळीबी येळ काढणं हे मर्दाचं काम नव्हं जी, हे मर्दाचं काम नव्हं. '

केवळ पटकथा किंवा गाणीच नव्हे, साऱ्या अंगानंच ' नागीण ' फार सुरेख बांधला गेला होता. मुळातली रांगडी कथा त्याच थाटात उभी करणारं रमाकांत–विवेकचं दिग्दर्शन, रंगही फिके वाटावे असं बाळ देवधरचं कृष्णधवल छायाचित्रण, चित्रपटाची ' लय ' बांधणारं जावेदचं संकलन, चंदावरकरांचं अनुरूप संगीत, लहानथोर कलाकारांची अचूक निवड, अशोक–रंजनाची मन.पूर्वकता, रवींद्र मकणीचा रसरशीत ताजेपणा, आ. दे. पाटलांचा ' मल्लादादा 'च्या भूमिकेतला चकित करणारा अभिनयाविष्कार आणि नाना पाटेकरनं उभी केलेली ' तेग्या 'ची अविस्मरणीय प्रत्ययकारी भूमिका ! अनंत अडचणींतून ' नागीण ' बनला. प्रदर्शित झाला. चोखंदळ रसिक आणि समीक्षकांनी थोडाबहुत नावाजला आणि दृष्ट लागावी तशी सारी घडी विस्कटली. सर्व क्षेत्रातील ' मऱ्हाटी ' इतिहासाची पुनरावृत्ती इथंही झाली. महत्त्वाच्या व्यावसायिक आघाडीवर ही दैना, मग राज्यस्पर्धांचा आनंद काय विचारावा ? त्या वर्षीच्या तिथल्या महान् हिशेबी मातबरांच्या साठमारीत ' नागीण 'ला वाली कोण ? ज्यांनी आर्थिक बोजा उचलला होता त्यांची हालत त्यांनाच ठाऊक ! सर्वांचेच श्रम वाऱ्यावर गेले. एक मुबक कलाकृती होऊ नये इतक्या लौकर इतिहासजमा झाली.

पण तरीही ' नागीण 'नं दिलेला निर्मितीचा आनंद विसरता येणार नाही. तो आनंद आणि ती उभारी कशी मोजायची ? म्हणूनच

'नागीण'च्या आठवणीत एक सलही आहे आणि एक दिलासाही–

आभाळाच्या छताखाली
काही वाया जात न्हाई
जुनं संपता संपता
पुन्हा नवं जल्म घेई
काळाम्होरं मातीमोल
गड्या नियती आंधळी
    वर्सं चालली चालली,
    कुणासाठी ना थांबली

❊ ❊

## ॥ 'पटकथे'ची कथा ॥

आपण सारे सर्वसामान्य ( हा शब्द महत्त्वाचा ) रसिक प्रेक्षक चित्रपट पाहातो म्हणजे नक्की काय पाहातो याचा तुम्ही कधी विचार केला आहे का ? आपण फक्त ढोबळ एक 'गोष्ट' कळून घेत असतो. कलाकारांचा ( तेही बहुधा हीरो-हिरॉइन ) बरावाईट अभिनय पाहात असतो. इमानेइतबारे गाणी—म्हणजे मुख्यत्वे गाण्यांच्या चाली ऐकत असतो. नयनरम्य देखावे पाहात असतो आणि ते देखावे म्हणजेच 'फोटोग्राफी' असं सोईस्करपणे मानून चालत असतो. फारच पुढची कलात्मक मजल म्हणजे संपूर्ण चित्रपटात 'दिग्दर्शक कुठे कुठे दिसतो ?' याचा वेळप्रसंगी मुख्य चित्रपटही डोळ्यांआड करून, शोध बोध घेत असतो; परंतु चित्रपट हे एक फार मोठं 'टीमवर्क' आहे याचं भान आपल्यापैकी कितीजण ठेवतात ?—त्यामुळं चित्रपटाची श्रेयनामावलीही आपल्या डोळ्यासमोरून केवळ निर्विकारपणे सरकत राहाते आणि आपल्या मेंदूवर मात्र त्यातली दोन-चारच नावं उरतात. इंग्रजी चित्रपटा-प्रमाणं श्रेयनामावली चित्रपटाच्या शेवटी ठेवली म्हणजे तर आनंदच ! कारण ती सुरू होते तेव्हा आपण अर्धेअधिक घराच्या वाटेवर पोचलेले असतो. हा एक प्रकारचा बधीरपणाच म्हणायला हवा. या बधीरपणामुळं चित्रपटाच्या अनेक महत्त्वाच्या अंगांची आपल्याला दखलच नसते. उदा. संकलन किंवा पटकथा !

एक तर या सगळ्या तांत्रिक गोष्टी आहेत आणि त्यांची माहिती घ्यायला केवळ फिल्म इन्स्टिटयूटमध्येच जायला हवं, अशी काही तरी आपली समजूत असते. 'गाणं' कळून घ्यायचं म्हणजे

'कागदोपत्री' रागदारीचं शिक्षण घेतलंच पाहिजे, कवितेचा आस्वाद घ्यायला एम. ए. ( तेही मराठीतच ) करायलाच पाहिजे. ......आर्कि-टेक्चरचा कोर्स केला नसेल तर घरांच्या किंवा इमारतींच्या सौंदर्याचा आस्वाद घ्यायची सक्त मनाई असते– अशा अनेक 'नैतिक' समजुतीं-सारखीच हीही एक समजूत ! पण खरं तर निखळ आनंदाच्या ओढीनं निघालं तर सारं काही आपसूक उमगत जातं. साऱ्या वाटा पायाखाली आपोआप उलगडू लागतात.

हे सगळं 'पांडित्य' आज सांगतोय खरं. – – पण परवांपरवां-पर्यंत अस्मादिकही अशाच अनेक (गैर) समजुतींच्या चकव्यात घोळले जात होते. 'दोन्ही घरचा पाहुणा' नामक सुरेख चित्रपट 'नटराज'-मध्ये ( तेव्हाचे 'हिंदविजय' ) लागला होता. चित्रपटाच्या युनिटशी घरगुती संबंध असल्यामुळं प्रिमियर 'शो' पाहायला मिळाला. चित्रपट खूप आवडला; पण एका गोष्टीमुळं मी फार अस्वस्थ झालो. श्रेय-नामावलीत कथा–मनोहर काटदरे, पटकथा–गजानन जागिरदार आणि संवाद–अनिल हवालदार असा उल्लेख होता. मला कळेना की मुळातली कथा काटदऱ्यांची, ती संवादरूपात लिहिली अनिल हवालदारनं ! मग या 'पटकथा' वाल्या जागिरदारांनी केलंच काय ? 'दिग्दर्शक' हे इतकं महत्त्वाचं 'टायटल' मिळालेलं असूनही पुन्हा आणखी एक 'टायटल' उकळण्याचा काय हा अधाशीपणा ?–त्या प्रामाणिक, पण आचरट शंकेचं आज हसू येतं आणि थोडी लाजही वाटते. कारण थोड्याच दिवसात कळलं की सविस्तरपणे शब्दांत सांगितलेली गोष्ट म्हणजे चित्रपट नव्हे. चित्रपट पाहाताना आपल्याशी भिडणारे पात्रांचे खटकेबाज संवाद म्हणजेही चित्रपट नव्हे. चित्रपटाचा खराखुरा गाभा म्हणजे विविध प्रसंगांच्या साखळीतून मूळची कथा अधिक फुलवून आपल्या डोळ्यांसमोर साक्षात उभी करणारी–वाहती पण बंदिस्त पटकथा !

आपल्याला पूर्णरूपात दिसणारा चित्रपट प्रथम कागदावर मांडला जातो तो पटकथेच्या रूपात ! गोष्टीचं मूळ सूत्र पटकथा ठरवते. त्या सूत्रात ओवण्यासाठी नेमक्या प्रसंगांची निवड पटकथा करते. कुठला प्रसंग कुठून पकडायचा आणि कुठं सोडून द्यायचा हा निर्णय प्रथम पटकथेलाच करावा लागतो. एका अर्थी पटकथा म्हणजे चित्रपटाचं

अक्षरात मांडलेलं 'घडणं!' कारण इथं गोष्ट 'सांगायची' नसते तर प्रत्यक्ष 'घडवायची' असते. लेखक म्हणजे 'शब्दसृष्टीचा ईश्वर' आणि लेखनकृती 'शब्दांचा नजरबंदी करणारा फुलोरा' या रूढ कल्पनांमुळं पटकथालेखकाला साहित्यिक किंवा लेखक मानायचं आपल्या जिवावर येतं. कारण त्याचा बिचाऱ्याचा शब्दांशी या रूढ अर्थानं संबंध येत नाही. त्याला तर पोचायचं असतं ते शब्दांपलीकडं!

'ऊनपाऊस'मधला एक अविस्मरणीय प्रसंग आठवतो. बापूमास्तर आणि काशीबाई या वृद्ध दांपत्याची, मुलांनी त्यांचीही वाटणी करून घेतल्यामुळं, ताटातूट झालेली असते. एकमेकांची कधी नव्हती इतकी गरज भासण्याच्या त्या परावलंबी वयात कोंडमारा असह्य होऊन काशी एके दिवशी नातीकरवी परगावी बापूमास्तरांना 'ट्रंक कॉल' लावते. सुदैवानं फोनवर स्वतः बापूमास्तरच येतात. त्यांचा 'हॅलो' हा स्वर ऐकून अडाणी काशी हरखते आणि मोठ्यांदा 'अहो ऽऽ' अशी हाक मारते. बापूमास्तर प्रथम गोंधळतात; पण नंतर फोनवर आपली पत्नी बोलते आहे या जाणिवेनं अंतर्बाह्य थरारून उठतात; पण त्यामुळंच 'काशी' एवढा एकच शब्द कसाबसा उच्चारल्यावर त्यांना खोकल्याची प्रचंड उबळ येते. पुढचे काही क्षण मग पडद्यावर खोकल्यानं प्राण कंठाशी आलेले बापूमास्तर आणि त्यांचं ते खोकणं ऐकून कासावीस होऊन 'अहो, अहो' असं केविलवाण्या स्वरात म्हणत राहाणारी काशी –असे दोघेच दिसत राहातात आणि फोन कट् होतो. दोनच शब्दांचा संवाद असलेला हा हृद्य प्रसंग पडद्यावर काळजाला हात घालतो ते कलाकारांच्या अभिनयाद्वारे–पण ते आव्हान मुळात कल्पनेनं पेललेलं असतं पटकथेनं!

'सन्फ्लॉवर'मधली मनस्वी नायिका युद्धावर गेलेल्या प्रियकराची वर्षानुवर्षं वाट पाहात राहाते. अखेर त्याचा शोध घेत निघते. रशियामधल्या एका खेड्यातला त्याचा पत्ता काढून घरापाशी पोचते. आतुरतेनं दाराची घंटा वाजवते. दार उघडलं जातं तिच्याच वयाच्या विवाहित तरुणीकडून!... तो स्वतः घरी नसतोच. हिला क्षणात सारा प्रकार कळून चुकतो. एक शब्द न उच्चारता ती तीरासारखी माघारी फिरते. परतीच्या गाडीत चढते. येऊन बाकावर बसते आणि इतका वेळ

कष्टानं रोखून धरलेला सारा बांध फुटतो. भोवतालच्या गर्दीच्या चमत्कारिक नजरांना न जुमानता तिचं दुःख उन्मळून वाहात राहातं. पडद्यावरून प्रेक्षकांचं अंतःकरण पिळवटून टाकणारी ती आसवं मुळात पटकथेमधल्या चार मोजक्या ओळींत साठवलेली असतात.

'ओह गॉड' सारखा अफलातून चित्रपट जेव्हा आपल्या साऱ्या आयुष्यात सामात्रून जातो तेव्हा त्या श्रेयातला सिंहाचा वाटा 'फँटसी' आणि 'रिॲलिटी' यांची बेमालूम सरमिसळ करीत विणलेल्या त्याच्या मधुर पटकथेचाही असतो.

हे भान येत चाललं की कथा एकाची, संवाद तिसऱ्याचे—मग या मधल्या दुसऱ्यानं केलं काय हे कोडं पडेनासं होतं. कळतं की, 'दिग्दर्शन' हा चित्रपटाचा कळस आणि इतर तांत्रिक बाजू या भक्कम भिंती असतील तर पटकथा ही त्याची 'जमीन' आहे. किंबहुना कुठल्याही अभिजात दिग्दर्शकामध्ये एक पटकथालेखक आणि एक संकलक हे दोघे सुप्त रूपात असणारच—निदान असायला हवेत.

पण पटकथा म्हणजे काय हे कळायला चित्रपटालाच गेलं पाहिजे असंही नाही. एखादा चित्तथरारक प्रसंग किंवा एखादा दिलखुलास प्रसन्न अनुभव आपल्यापैकी प्रत्येकालाच अनुभवायला मिळत असतो; पण मनात फार असूनही त्याचा प्रत्यय दुसऱ्याला देणं आपल्याला काही केल्या जमत नाही. अशा वेळी आपल्यातला एखादा चतुर ती हकीगत प्रभावीपणानं सांगू लागतो. उगाच पाल्हाळाचा फापटपसारा न मांडता तो नेमक्या महत्त्वाच्या टप्प्यांची निवड करतो. गाळलेल्या तपशीलाचा पत्ताही लागू नये अशा चातुर्यानं तो निवडलेल्या प्रसंगांची सांधेजोड करीत नेतो. काही पदरचा मीठमसालाही बेमालूम मिसळतो. कुठला प्रसंग सविस्तर रंगवायचा आणि कुठला आटोपता घ्यायचा याचं धोरण सांभाळत पाहाता पाहाता ऐकणाऱ्याच्या डोळ्यांपुढं तो अनुभव साक्षात उभा करतो. आपणही थक्क होऊन त्या साऱ्या अनुभवातून जणू पुन्हा जाऊ लागतो.

मात्र हे सारं घडत असतानाही
बहुतेक वेळी आपल्यापैकी कुणालाच पत्ता नसतो की
ती साधीसुधी हकिकत म्हणजेही
एक प्रकारे 'पटकथा'च आहे.

## ॥ एक डोळस अनुभव ॥

खूपच दिवसांत– खरं म्हणजे वर्षांत 'परी'ला भेटलो नाही. 'परी' ही मुंबईतली एक छान मैत्रीण! तिला प्रथम भेटलो तो टेलिफोनवर! आणि पुढंही कित्येक दिवस फोनद्वारेच तिला भेटायचो आणि बोलायचो. मला एरवी फोनवर बोलायचा कंटाळा आहे. फोनच्या रिसीव्हरमध्ये तोंड खुपसून तासन्‌तास अगम्य कुजबूज करणारी माणसं किंवा फोनच्या कार्यक्षमतेवर विश्वास नसल्याप्रमाणं खणखणीत स्वरात सगळ्या जगाला ऐकू येणाऱ्या 'कानगोष्टी' करणारी मंडळी पाहिली की काही वेळानं मलाच घेरी येऊ लागते. त्यामुळे स्वतः फोनवर बोलताना माझी भूमिका – 'काय ते लौकर एकदाचं सांगून टाका (किंवा टाकतो)' अशी असते! परंतु परीशी मात्र फोन-वर त्या मानानं मी बराच बोलायचो. ह्यामागं कसलंही 'स्पेशल' कारण नसून एक साधीसुधी गोष्ट होती. ती म्हणजे– तिचा लहान मुलीसारखा विलक्षण कोवळा स्वर आणि अतिशय मनमोकळं हसणं! आकाशवाणीचा माईक, टेलिव्हिजनचा कॅमेरा आणि फोनचा रिसीव्हर ह्या 'त्रिस्थळी' सहज बोलणारी आणि त्याहूनही स्वाभाविक हसू शकणारी मंडळी एकूणच दुर्मिळ, असं माझं अनुभवान्ती बांधलेलं मत आहे. 'परी' ही त्या दुर्मिळ व्यक्तींपैकीच एक! त्यामुळंच माझ्याशी सुतराम संबंध नसलेलं असं काही जरी ती फोनवर बोलत असली तरी (माझ्यातल्या उद्धट 'मी'ला चुचकारत) मी निमूट रिसीव्हर कानाशी धरून ठेवायचो.

अशा बऱ्याच फोनभेटींनंतर मी तिला प्रत्यक्ष भेटलो. हमखास

अपेक्षाभंगाची ९९ टक्के गॅरंटी घेणाऱ्या ह्या वेळा असतात. मागं एका निवेदिकेच्या आवाजावर भाळून तिची ओळख करून द्यावी म्हणून भुणभुण लावीत एक दोस्त रेडिओत गेले; पण दुरूनच तिचं प्रत्यक्ष दर्शन घडवताच 'ओळख नको' म्हणून गयावया करू लागले. ह्या दृष्टीनं टेलिव्हिजन बरा– कारण तो आवाजाबरोबरच चेहराही दाखवतो. अर्थात् तिथंही 'वरचा मजला' नामक प्रकरणी फसगत होण्याचा धोका उरतोच. परीच्या बाबतीत मात्र यातलं काही घडलं नाही. कारण 'परी' ह्या नावाला अनुरूप असंच तिचं दिसणं वागणं आहे; पण ह्या खेरीजही तिच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा विशेष आहे. तो म्हणजे 'परी' जन्मांध आहे.

असं काही ऐकलं की स्वतःच्याही नकळत एक 'चुक्चुक्' ओठांवर येते; पण इथं ती रोखायला हवी. कारण परीला तशी गरज नाही. उणीवेची जाणीवही नसावी इतक्या स्वाभाविकपणे ती सर्वत्र– ओळखीच्या आणि अनोळखी ठिकाणीही–वावरत असते. तिच्या साऱ्याच वागण्या–बोलण्यात एक समंजस डोळसपणा जाणवतो. तिच्या राहणीमधला नीटनेटकेपणा, कपड्यांच्या निवडीतून व्यक्त होणारी तिची सौंदर्यदृष्टी आणि रंगसंगतीची जाणीव ह्याबद्दल आम्हा मित्रांना नेहमीच कुतूहल वाटायचं. मुंबईसारख्या महानगरातही ही मुलगी आपली 'व्हाइट केन' पर्समध्ये टाकून बिनधास्त हिंडत असते. एकतर तिचे डोळे आणि बुबुळांचा रंग पाहाताना त्यातला 'अभाव' चट्कन कुणाला जाणवतच नाही. एके दिवशी रस्ता क्रॉस करताना तिचा अंदाज थोडा चुकला आणि वैतागलेल्या ट्रक ड्रायव्हरनं तिला 'क्यू बे ? अंधी है क्या ?' म्हणून विचारलं. परीनंच ही हकिकत आम्हाला इतकी सहज सांगितली की क्षणभर आम्हीच कावरेबावरे झालो. त्या ट्रक ड्रायव्हरचा काय दोष ? कारण सर्व जाणीव असलेल्या आम्हा मंडळीचंही तिच्याशी वागताना कधीकधी तारतम्य सुटायचं. 'तिला त्याचं काही वाटत नाही.' ही समजूत कधीकधी मर्यादेपलिकडं ताणली जायची. त्यामुळंच आमच्या ओळखीतल्या एका वडिलधाऱ्या गृहस्थांनी तिला 'तिचं अंधत्व' ह्या विषयावर इतके सविस्तर प्रश्न विचारले की, 'आपण हा विषय आता बदलू या' असं गोड सौम्यपणे सांगण्याची पाळी परीवर

आली. आपली भाबडी आपुलकी बऱ्याच वेळी विकृत कुतूहल बनते हे केवळ दैवयोगानं धडधाकट असलेल्या बहुतेकांना कळत नाही, ते हे असं ! पण हे कळणारा मीही फारसा वेगळा नव्हतो ह्याचा अनुभव मला मिळायचा होता. लौकरच तो प्रसंग आला.

परी एका मुलींच्या अंधशाळेत काम करते. तिथं पाहुणा म्हणून परीनं मला बोलावलं. एका कलत्या दुपारी मी तिथं पोचलो. शाळेची घंटा वाजली आणि अनादिकालापासून ही घंटा वाजताच होणारा गोंगाट सुरू झाला. धावपळ, दंगामस्ती करणाऱ्या शाळकरी मुलींनी पाहाता पाहाता सभागृह तुडुंब भरलं. मी आणि एक दोन व्यक्ती वगळता सर्वच मंडळी दृष्टिहीन होती. पूर्वी न कल्पिलेलं एक विचित्र दडपण माझ्या मनावर नकळत चढू लागलं. एरवीच्या 'नॉर्मल' जगात कुठलंही न्यून आपल्याला ॲबनॉर्मल वाटतं; पण न्यूनत्वाच्या ह्या छोटयाशा जगात मीच मला 'ॲबनॉर्मल' वाटू लागलो.

मी कविता ऐकवू लागलो आणि जाणवलं की– इतका 'एकाग्र श्रोता' आपण पूर्वी कधीही अनुभवला नव्हता. एरवी, आपण सभा कितीही गुंगवून बांधून टाकली तरी जरा 'खुट्ट' झालं की आपली पकड सैलावते आणि सगळ्या माना तिकडं वळतात. डोळस जगात डोळे कानांवर नेहमीच कुरघोडी करतात. पण इथं मात्र जाणवत होतं की, आपल्यावर रोखलेले शेकडो 'कान' एकचित्तानं आपल्याला ऐकताहेत...आणि पाहाताहेतही ! ...मी बघता बघता किवता म्हणण्यात रंगून गेलो.

'संपेल ना कधीही, हा खेळ सावल्यांचा' ह्या गाण्याची एक-मुखानं फर्माईश आली. मी विचार केला – महेंद्र कपूरनं गाइलेलं ते गाणं सगळे नेहमीच ऐकतात. तेव्हा त्याच मुखडयाचं मुळात टायट्ल् साँग म्हणून लिहिलेलं, पण चित्रपटात न आलेलं गाणं ऐकवावं.

सूर्योदयाबरोबर जन्मणारे सावल्यांचे खेळ...
झाडांच्या पाण्यावर हलणाऱ्या सावल्या... बिलगणाऱ्या, चकवा देणाऱ्या, भूल घालणाऱ्या लडिवाळ सावल्या आणि संध्या-काळच्या लांबलेल्या विरक्त सावल्या...

फार दिवसांनी म्हणत असल्यामुळं स्वतःचीच कविता नव्याने ऐकावी तसं वाटत होतं. शेवटचा अंतरा म्हणू लागलो आणि एकदम ध्यानात आलं. की शेवटच्या ओळीत ' आंधळेपणा 'चा एक थेट उल्लेख आहे. त्या अंध श्रोत्यांसमोर– 'फसतात सावलीला हा दोष आंधळ्यांचा' ही ओळ म्हणायची ह्या कल्पनेनं मी एकदम गडबडलो; पण आता परतीची वाट नव्हती. स्वतःला सावरून कशीबशी तो ओळ म्हणून टाकली आणि गप्प झालो. फार अपराधी वाटत होतं. तोच टाळ्यांचा कडकडाट झाला. कविता मनःपूर्वक आवडल्याचं साऱ्या दृष्टिहीन कोवळ्या चेहऱ्यांवर स्वच्छ दिसत होतं. ती ओळ ' त्या ' अर्थानं कुणालाही लागली नव्हती. मग लक्षात आलं, त्यांनी फर्माईश केलेल्या गाण्यातही ती ओळ होतीच. त्या ओळीसकटच ते गाणं त्यांच्या आवडीचं होतं. ह्याचा अर्थ असा की त्या आंधळेपणाच्या उल्लेखामागचा खोल अर्थ त्यांना बरोबर कळला होता; पण तो अर्थ मांडणारा मी स्वतः मात्र, काही क्षणच का होईन, पण केवळ शब्दार्थातच घुसमटलो होतो.

जन्मताना लौकिक अर्थानं उघडलेले माझे डोळे त्या दिवशी पुन्हा एकदा उघडले. ते कितपत उघडलेत, हे काळच ठरवेल !

## ॥ हकिकत ॥

ह्या क्षणी माझ्या पुढचात पडलेलं पिवळसर जीर्ण शीर्ण पानांचं छोटंसं पुस्तक हा माझा आजवरच्या आयुष्यातला एक शंभर टक्के खात्रीलायक विरंगुळा आहे आणि पुढच्या आयुष्यातही त्या विरंगुळचाची ओढ ओसरेलसं वाटत नाही. कितीही काळानंतर हाती घेतलं तरी त्या पुस्तकाची भेट हा प्रत्येक वेळी एक ताजा रसरशीत अनुभव असतो. ह्या पुस्तकाला शीर्षक आहे; पण ते केवळ व्यावहारिक सोयीपुरतंच ! कारण सूक्ष्म निरीक्षण आणि रसाळ वाणी लाभलेला एखादा गोष्टी–वेल्हाळ गप्पिष्ट जेव्हां आपल्याला तासन्तास त्याच्या बोलण्यानं गुंगवत ठेवतो तेव्हां त्या अवीट गप्पांना शीर्षक कसलं द्यायचं ?

अगदी कुमारवयात मी ह्या गोडसेभटजी नामक बोलघेवडचा ब्राह्मणाला प्रथम भेटलो. म्हणजे–' मे महिन्याच्या सुट्टीत वाचलेली पुस्तके; वाचनाला लागलेला काळ; पुस्तकाचा सारांश ' इ. इ. पंचनामा वहीत लिहिण्याच्या बाळबोध काळात ! पण ' माझा प्रवास ' नावाचं हे पुस्तक वाचू लागलो आणि बघता बघता आपण पुस्तक वाचतो आहोत हे भानच पार पुसलं गेलं. आजतागायत तो अनुभव बदललेला नाही. आजही वाचायला सुरुवात केली की, काही क्षणात हातातलं पुस्तक विरघळून जातं. भोवतालचे वर्तमानकाळाचे कंगोरे वितळू लागतात. १९ व्या शतकाचा पुराणा गंध नाकाशी घोटाळू लागतो. कोकणातल्या वरसई नामक गावच्या एका गूढ सावल्यांनी झाकोळलेल्या वाडीतील सारवलेल्या अंगणात आपण जातो आणि समोरच्या बाजेवर मांडा ठोकून बसलेला टुणटुणीत म्हातारा त्याच्या

तरुणपणातील एका मोहिमेच्या आठवणी आपल्याला सांगू लागतो. जगून झालेलं सारं आपल्यासगवेत पुन्हा जणु नव्यानं जगू लागतो.

प्रथम येतो तो त्याचा कुलवृत्तांत ! आता कोकणच्या घराण्यामधल्या त्या काळच्या हकीकतीत वेगळेपणा कसला ? तेच अठराविश्व दारिद्रच; तीच हताश अगतिकता आणि त्यातून मग येणारी तीच अटळ ओढगस्त आणि कुचंबणा ! पण गोडसेभटजी ह्या गोष्टीही मोठ्या स्वाभाविक शैलीदारपणे सांगतात. त्यांच्या भाषेत, 'दारिद्रचावस्थेनं त्यांना माळ घातलेली असते किंवा 'लहानपणापासूनच त्यांच्या मागीलदारी–पुढीलदारी दारिद्रच फुगडचा घालीत असतं.' साहजिकच तरुण गोडसेभटजींच्या हृदयातला सुप्त सिंदबाद जागा होतो आणि उत्तर हिंदुस्थानात जाऊन काही धनप्राप्ती करावी असा संकल्प सोडून कशीबशी घरच्यांची समजूत घालून ते निघतात आणि एका रोचक कहाणीचा आरंभ होतो.

> 'तारुण्याच्या भरात, शक्तीच्या अमदानीत प्रवासासारखी मौज नाही. सुखाची, आनंद देण्याची शक्ती काही दुःखाची मिसळ असल्याशिवाय बाहेर पडत नाही. चालण्याने अंग दुखणे, आज जेवावयास न मिळणे, उद्या भर दोन प्रहरी एखाद्या बाभळीच्या विरल छायेत पाणी पाणी करीत बसणे, परवा रात्रीच्या भर थंडीत अरण्यात कुडकुडत पडणे, थोडीशी भामटचांची भीती असणे वगैरे प्रसंगी घडणाऱ्या गोष्टी प्रवासाच्या सुखात मिळून सुख-रूपच होऊन जातात.'

यांसारखी वाक्यं जेव्हा भटजी ओघात बोलून जातात तेव्हां त्यांच्या तोंडून जगातील सर्व भटक्या माणसांचं मानसशास्त्रच जणु बोलू लागतं. वर्षाच्या आत परतण्याचा हवाला देऊन भटजी निघाले खरे; पण प्रत्यक्षात एका मागोमाग एक नव्या आपत्तीत सापडत आणि त्यातून निभावत तब्बल दोन वर्षांनी पुन्हा आपल्या घराची सावली ते पाहू शकले. कारण कुटुंबाचा चरितार्थ एवढचाच माफक ध्येयानं भटजींनी घर सोडलं असलं तरी प्रत्यक्षात देशाच्या इतिहासातील एका ज्वलंत घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार होणं त्यांच्या भाग्यात लिहिलेलं होतं.

गोडसेभटजींच्या साऱ्या कहाणीला प्रचंड 'कॅनव्हास' मिळाला आहे तो १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचा ! ह्या घटनेकडं एरवी आपण नेहमी पाहातो ते इतिहास म्हणून आणि काळाचं अंतर पुरेपूर राखून ! पण गोडसेभटजींची हकिकत वाचताना तो इतिहास हा जणू 'वर्तमानकाळ' होऊन जातो. त्या साऱ्या धामधुमीत भटजींबरोबर चारचौघांसारखे आपणही सामील झालेलो असतो आणि त्यामागचा सारा थरार जणू साक्षात् अनुभवत असतो. मग ऐतिहासिक तटस्थपणाही उरत नाही की, राणा भीमदेवी अभिनिवेशही चढू शकत नाही. कारण आपली भूमिका होते ती महापुरातून नाकातोंडात पाणी जाऊनही बचावून उरणाऱ्या आर. के. लक्ष्मणनिर्मित 'कॉमन मॅन' नामक लव्हाळ्याची ! ह्या हतबुद्ध 'कॉमन मॅन' च्या नजरेतूनच मग आपण साऱ्या गोष्टी पाहू लागतो. तत्कालीन सामाजिक परिस्थिती पाहातो, व्यक्तींच्या हकिकती ऐकतो.

एका सुस्वरूप भगिणीशी स्वतः संधान जोडून, तिच्याशी चोरून संबंध ठेवणाऱ्या समस्त ब्रह्मवृंदांची 'जानवी' तिच्याकरवी गोळा करून अवघ्या शहरावर गोमूत्र शिंपडण्याचा प्रसंग आणणारे उपद्व्यापी शास्त्रीबुवा मग ओळखीचे होतात. दोन वेळा खायची भ्रांत असलेल्या भिक्षुकाला उंची शय्यादान, हत्तीदान—कहर म्हणजे स्वरूपसुंदर 'दासी'चं दान असल्या 'आचरट दानशूरते' चे सोहाळे साग्रसंगीत पाहायला मिळतात. काडतुसांना गाईची आणि डुकराची चरबी लावतात ह्या अफवेमुळं उडालेली घबराट मग जणु आपल्याभोवतीच गरगरत राहाते. झाशीवर कोसळणारे इंग्रजी तोफांचे लालभडक गोळे रात्रीच्या अंधारात आपल्या डोळ्यांसमोर अंधारी आणू लागतात आणि त्या धडधडाटानं आपल्याच कानांना कानठळ्या बसतात. शहरावर ताबा घेऊन बिजन' सुरू झाल्यावर प्राणभयानं असंख्य लोकांसमवेत आपणही भिंतीतल्या छुप्या भुयारांचा आश्रय घेतो आणि एका चिंचोळ्या, अंधाऱ्या जागेत एका अनोळखी तरुण स्त्रीला बिलगून तासन्तास बसूनही भयाच्या दडपणामुळं मनाला वासनेचा स्पर्शही होऊ नये ह्याचं नंतर आश्चर्य (की पश्चात्ताप ?) करत बसतो. मग बिमोड झाल्यानंतर नानासाहेब पेशवे देशोधडीला लागतात तेव्हां ते दृश्य पाहाणाऱ्या काठावरच्या

आंधळ्या गर्दीत आपणही असतो आणि ठिकठिकाणी इंग्रज सैन्य घुसल्यावर त्यांच्यापुढं लोटांगण घालणाऱ्या पाठींमध्ये एक कुबड काढलेली पाठ आपलीही असते.

गोडसेभटजींच्या ह्या कहाणीतून उभी राहिलेली सर्वांत उत्कट व्यक्तिरेखा म्हणजे झांशीची राणी लक्ष्मीबाई! झांशीच्या राणीची गोष्ट त्याच त्या ठोकळेबाज पद्धतीनं आपण वर्षानुवर्ष ऐकत आलो आहोत; पण पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून झुंजायला उभी राहिलेली आणि तरीही अखेर हाडामासांची स्त्रीच असलेली झांशीची राणी ज्या हृद्यपणानं इथे पाहायला मिळते त्याला खरोखर तोड नाही.

झांशीपासून काल्पीपर्यंत अद्‌भुत दौड मारल्यावर राणीला थांबणंच भाग पडलं. 'कारण तिला स्त्रीधर्माप्रमाणं अस्पर्श दशा प्राप्त झाली! ! त्यात तिचा संपूर्ण पुरुषवेष व जवळ पैसा नाही! ही सारी अवस्था हळुवारपणे सांगता सांगता– 'स्त्रियांनी अतिशौर्य केले तरी काय उपयोग? प्रसंगात घात करणारा असा त्यांचा शारीरिक धर्म त्यांजवळ भरलेलाच आहे.' असं एखादं वाक्य भटजी लिहून जातात तेव्हां त्यातून अर्थाच्या असंख्य छटा जाणवतात. झांशीच्या राणीला 'माणूस' म्हणून उभी करणारा आणखी एक हृदयस्पर्शी प्रसंग भटजींनी लिहिलाय.

झांशीहून जीव बचावून काल्पीच्या दिशेनं निघालेल्या गोडसे-भटजींना भल्या पहाटे एका विहिरीजवळ चार-पाच घोडेस्वार दुरून येताना दिसतात. त्यांमध्ये राणीही असते. 'पठाणी पोषाख, अंग धुळीनं भरलेलं.. तोंड किंचित् आरक्त, म्लान व उदास!' तिला भटजीबुवांची झांशीतली ओळख पटते. विद्याभ्यासी ब्राह्मणांना तसदी द्यायची नाही म्हणून ती स्वतः रस्सीमडकं विहिरीत टाकून प्यायला पाणी काढते. बोलताना आपल्या अटळ भवितव्याची झालेली जाणीव व्यक्त करते. तशाही परागंदा अवस्थेत राणीच्या वृत्तीनं ह्या भिक्षुकांचं कुशल विचारते, त्यांना मार्गदर्शन करते आणि मग पाहता पाहता पहाटेच्या अंधुक प्रकाशात निघून जाते. ती जातेच!... मला तर नेहमीच हा प्रसंग वाचताना, आपण पुस्तक वाचतोय की चित्रपट पाहतोय?.. असा संभ्रम पडतो.

१८५७ ची पार्श्वभूमी असलेले, ‘शतरंज के खिलाडी’ आणि ‘जुनून’ हे दोन्ही चित्रपट मला खूप आवडले होते; पण त्यांनाही जमीनदोस्त करेल असा खराखुरा ऐतिहासिक (मराठी) चित्रपट उभा व्हावा– अशी ताकद गोडसे भटजींच्या ह्या रसाळ हकिकतीत निश्चित आहे. मात्र त्यासाठी ‘नणंद भावजय’, ‘वहिनी-जाऊ भाऊ’, ‘हळदीकुंकू’ असले मराठी संस्कृतीचे अपरिहार्य उंबरठे ओलांडून जाणाऱ्या जबरदस्त निर्मात्या-दिग्दर्शकाची (आणि प्रेक्षकांचीही) वाट पाहायला हवी.

पाहू या......!

❋ ❋

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९२३
२४७२६
३०।१०।८५
(स्थळ प्रत)

## ।। सती ।।

सती,

तुझ्या नावाचा संदर्भ माझ्या निरंकुश मनाच्या रोजनिशीत प्रथम उमटला तो १२ वर्षांपूर्वी ! मला ठाऊक आहे, तुझं खरं नाव वेगळं आहे; पण मला मात्र तुला 'सती'च म्हणायला आवडेल– तुझी पहिली भेट झाली एका नाटकातून ! माझ्या एका अतिशय आवडत्या लेखकाच्या लेखणीतून तुझा जन्म झाला होता. एका दर्जेदार प्रयोगशील नाटचसंस्थेनं तुझी कहाणी साकार केली होती आणि एका संवेदनाशील मनस्वी कलावतीच्या रूपात तू रंगभूमीवर वावरत होतीस. तुझी पहिली ओळख करून दिली म्हणून मी ह्या सर्वांचा ऋणी आहे; पण त्याबरोबरच हेही खरं की, ती केवळ धूसर तोंडओळख होती. त्यामागच्या धुक्यात लपलेल्या तुझ्या गूढ अस्तित्वाची केवळ जाणीव करून देणारी! तेव्हापासूनचा माझा सारा प्रवास जणू नकळतपणे तुझ्याच दिशेनं चाललाय. प्रत्यक्ष त्या नाटचप्रयोगात तुझा प्रवेश बराच नंतर झाला होता; पण तेव्हांपासूनच माझं मन ओढ घेऊ पाहातं ते तुझ्या कहाणीच्या गाभ्याकडं ! उत्तर पेशवाईपाठोपाठच्या त्या जुन्या कालखंडाकडं !

सती, यज्ञज्वालेचं रूपसौंदर्य आणि निरांजनाची सात्विकता ह्या गोष्टी तू तुझ्या आईकडून घेतल्या असशील; पण प्रज्ञा आणि ओज हा तुझ्या वडलांचा वारसा ! आई तुला नकळतेपणीच सोडून गेली. त्यानंतर शास्त्रीबुवाच तुझे वडील आणि आईही ! कन्यारत्न म्हणजे धर्मसंकट मानलं जाणाऱ्या त्या काळातही शास्त्रीबुवा तुला जीव की प्राण करायचे. एक तर हिंदुधर्माच्या बुरसटलेल्या जुनाट रूढींच्या

पलिकडल्या सत्याचा वेध घेऊ पाहाणारी शास्त्रीबुवांची नजर होती, ती नजर त्यांनी तुलाही दिली. त्यांनी तुला जणू पुत्रच मानलं. तसेच संस्कार दिले. वेदविद्या शिकवली आणि एक निर्भयपणाही दिला; पण तू वयात आलीस आणि शास्त्रीबुवांच्यातला बेडर विचारवंत डळमळून त्या जागी काळजीवाहू 'मुलीचा बाप' प्रकट होऊ लागला. शास्त्रीबुवा जणू भानावर आले, 'पोरीचं लग्न करून द्यायला हवं.'

त्या काळाच्या संदर्भात तू १३ वर्षांची घोडनवरी! शिवाय घरचं दारिद्र्य...! तुला कोण पत्करणार? –शास्त्रीबुवा घाबरेघुबरे झाले. बरीच वणवण करून एक स्थळ मिळालं. मुलगा सोन्यासारखा होता; पण त्याच्या घरावर छाया होती मृत्यूची! त्या घरात सुवासिनी नव्हतीच. सगळ्या केशवपन केलेल्या सोवळ्या स्त्रिया– अशा ठिकाणी आपली लाडकी पोरगी द्यायची? शास्त्रीबुवांची चिंतातुर अवस्था पाहून तू चकित झालीस आणि म्हणालीस– 'बाबा, आपण असल्या गोष्टी मानायच्या? मग आजवरचे सारे संस्कार व्यर्थच म्हणावे लागतील. काळजी करू नका. मी आनंदानं ते घर आपलंसं करीन.'

आणि खरंच– मोठ्या उमेदीनं तू त्या घराचा उंबरा ओलांडलास. उमद्या, तेजस्वी नारायणाला पाहून तू हरखलीस. त्याच्या नजरेतला विरक्त अलिप्तपणा तुला कळला नाही असं नव्हे; पण तू तिकडं दुर्लक्ष केलंस. परंतु पहिल्या रात्रीच नारायणनं तुला सांगून टाकलं– 'मला संसारात तिळमात्र रस नाही. केवळ आईच्या शब्दा-साठी, ह्या घरात सुवासिनी हवी म्हणून, तुझा इथं प्रवेश झाला आहे. एरवी आपण एकमेकांचे कोणीही नाही.' –तुझ्यावर जणू वीज कोसळली. तरी धीर धरून हरतऱ्हेनं त्याला जिंकायचे प्रयत्न करत राहिलीस. पण तुला हळूहळू कळून चुकलं की, तो खरोखरच पुरा विरक्त आहे. त्यानं तुझा स्वीकार केवळ 'मनानं' करणं हे देखील या जन्मी अघटित आहे.

सारा एकूण प्रकार लक्षात आल्यावर नारायणाची वृद्ध आई एके दिवशी त्राग्यानं म्हणाली– 'एवढा विरक्त आहेस तर राहातोस कशाला घरात? जा की काशीयात्रेला!' नारायण समाधानी स्वरात म्हणाला,

'जाणारच आहे. मिरजेची पटवर्धन मंडळी यात्रेला निघाली आहेत. त्यांच्याबरोबर जायचा माझा निश्चय झाला आहे. तुझी परवानगी हवी होती. बरं झालं, तू आपणहून दिलीस.' घरात एकच हलकल्लोळ उडाला. तू मात्र उदास, शांत स्वरात म्हणालीस– 'त्यांना जाऊ दे. त्यांच्या मनाविरुद्ध सक्ती करण्यात काय अर्थ आहे ?' नारायणानं त्या क्षणी तुझ्याकडं पाहिलं असेल तर तुमची झालेली नजरानजर एवढंच तुम्हा दोघांचं क्षणाचं नातं ! तो निघून गेला आणि तू 'आपली जागा कुठली ?' ह्या संभ्रमात काळ कंठत राहिलीस.

त्या काळच्या यात्रा हे एक 'दिव्य'च असायचं. एके दिवशी वार्ता येऊन थडकली. प्रवासात आलेल्या रोगाच्या साथीत अनेक माणसं मृत्युमुखी पडली. त्यात नारायणही दगावला. सारं कुटुंब शोकसागरात बुडालं. तू मात्र केवळ सुन्न, बधीर झालीस. हळूहळू भानावर आलीस तेव्हा तुला जाणवलं की, भोवतालच्या हतभागी स्त्रिया विकृत आनंदानं तुझ्या पुण्याईचे गोडवे गाताहेत आणि तुझ्या 'सती' जाण्याची तयारी चालू आहे. तू सैरभैर झालीस. भेटायला आलेल्या वडलांना सतीच्या रूढीमागचा अर्थ विचारलास. सतीचे मंत्र जाणून घेतलेस आणि विचारलंस– 'प्राणसर्वस्व असलेल्या पतीबरोबर सहगमन करणं मी समजू शकते; पण ज्यानं केवळ मनानंही माझा स्वीकार केला नाही त्या परक्या पुरुषाबरोबर गमन केलं तर माझी गती काय ?'

शास्त्रीबुवा निरुत्तर राहिले. व्याकुळ स्वरात– 'तुझ्या बुद्धीला पटेल ते कर' एवढंच बोलू शकले. सतीची चिता रचली गेली. तू सुधे-पणानं गेलीस तर ठीकच पण विरोध केलास तर तुझा आवाज दडपता यावा म्हणून गदारोळ करण्यासाठी पद्धतीप्रमाणं ताशे–नगारे सज्ज होतेच. इतक्यात एका बेसावध क्षणी तू चितेवरून उडी टाकून तीरा-सारखी धावलीस. सगळा गोंधळ माजलेला असतानाच नदीकाठच्या उंच डगरीवर गेलीस आणि कृष्णामाईच्या दुथडी पुरात आपला देह झोकून दिलास...

सती, तू हे काय केलंस ? तुला आत्मघात परवडत होता, पण तुझी होणारी सार्वजनिक हत्या नको होती. होय ना ?– पण दोन

दिवसानंतर तुला शुद्ध आली तेव्हा तू वेगळ्याच वातावरणात होतीस– ब्रिटिश सैन्याच्या छावणीतील एका कॅप्टनच्या तंबूत ! त्या कॅप्टननं प्रवाहात वाहात जाणाऱ्या तुला पाहिली, उडी टाकून वाचवली आणि भगीरथ प्रयत्नांनी शुद्धीवर आणली. भूत आणि भविष्य नसलेल्या वर्तमानकाळाच्या जाणिवेनं तू अधिकच सैरभैर झालीस 'हे काय भलतंच होऊन बसलं ?' तू ! स्वतंत्र प्रज्ञेची खरी; पण आयुष्याला मिळालेली ही अनपेक्षित कलाटणी तुलाही झेपणारी नव्हती.

तू तडफडत्या स्वरात एकच विचारलंस– 'मला का वाचवलंत? ह्यावर त्या सभ्य, सुसंस्कृत इंग्लिश कॅप्टनचा प्रश्न साधा होता– 'जे आयुष्य आपण सुरू करू शकत नाही ते संपवण्याचा आपल्याला काय अधिकार ?' त्या उमद्या माणसानं तुला अन्न, वस्त्र, निवारा दिला. मनाला प्रसन्न वाटावं म्हणून छोटं देवघर दिलं आणि सांगितलं– 'म्हणाल त्या क्षणी तुम्हाला हवं तिथं पोचवून देण्याची व्यवस्था करतो, तोपर्यंत विनासंकोच राहा.' ह्यावर तू काय बोलणार ? त्यानं तुझ्या दिमतीला एक कुणबीण दिली होती. मोकळ्या मनाची ती रांगडी स्त्री एका इंग्लिश टॉमीबरोबर बिनधास्त राहायची. आपलं अजब तत्त्वज्ञान भाबडेपणानं तुला ऐकवीत राहायची 'अवो, ज्या जगाला आपुन भ्याचं त्ये जग म्हंजे कोन ? आपल्याला वळखनारी मुठभर मान्सं– त्येंची पर्वा आपुन कशापाई करायची ?' तुला हे कळू शकत होतं, पण वळणं अशक्य होतं. एवढ्यात तो कॅप्टन ठगांच्या बंदोबस्ताच्या मोहिमेवर निघाला. जाताना त्यानं एकच वचन मागितलं. 'मी येईपर्यंत इथून जायचं नाही आणि आत्मघाताचा विचारही मनात आणायचा नाही.' तो जाऊ लागला तेव्हा तू त्याला क्षणभर थांबवलंस आणि कपाळावर तिलक लावून पंचारतीनं ओवाळलंस. निरोप देण्याच्या ह्या हृद्य लोभस प्रथेनं तो तगडा पुरुषही हेलावला आणि पाठ वळवून निघून गेला. तू स्वतःच्या मनाच्या तळ्यात स्वतःच्याच मनाचा तळ शोधत राहिलीस.

एव्हाना गावात वार्ता गेली होतीच. निदानालस्तीला पूर आला होता. तुला नेण्यासाठी आलेल्या चुलत सासऱ्याला तू उभा आडवा फैलावर घेतलास, 'तुमच्या सुनेला तर तुम्ही चितेवर जबरदस्तीनं जाळलंत. आता आपला संबंध काय ?' म्हणून हाकलून दिलंस; पण

नंतर वडील आले तेव्हा मात्र त्यांच्या कुशीत विकल होऊन घुसलीस. शास्त्रीबुवा म्हणाले– 'पोरी, लोकांनी दगडांनी ठेचून आपल्याला मारलं तरी चालेल; पण ह्या फिरंग्याच्या छावणीतून बाहेर चल,'–तू काकुळतीनं सांगितलंस, 'मलाही इथं राहायचं नाही. पण त्या भल्या माणसाला येऊ दे. मी त्याला तसं वचन दिलंय.'

तोवर बातमी आली. ठगांच्या रणधुमाळीत कॅप्टन ठार झाला. क्षणभरच तू हेलावलीस; पण क्षणात सावरलीस, शांत झालीस. जणू सगळा कोलाहल निवला. तृप्त, शांत स्वरात तू शास्त्रीबुवांना सांगितलंस 'बाबा, माझी सतीची तयारी करा. मी सती जाणार आहे.'

'सती'च्या रूपकामागील मानवी संबंधांच्या गाभ्याला हात घालणाऱ्या ह्या तुझ्या कहाणीनं मी अंतर्बाह्य थरारलेलो आहे. वर्षा-मागून वर्षं मागं पडताहेत; पण तसतशी पुसट होण्याऐवजी तू माझ्या नजरेसमोर अधिकाधिक स्पष्ट होत चालली आहेस. मी तुझ्या अधिकाधिक जवळच येत चाललो आहे.

हे सगळं अहेतुकपणे घडतंय की काही संकेतानं ?

ते तुलाच ठाऊक !

## ॥ बेघर ॥

त्याच्या नावाचा उच्चार नक्की कसा करायचा हे मला काल-परवापर्यंत ठाऊक नव्हतं. त्याच्या शायरीशी किंवा चरित्राशी माझा फार मोठा गाढा परिचय आहे, असंही नाही. मला तो ठाऊक आहे तो अवघ्या एका कवितेमुळं आणि कुठून कुठून तुटकपणे कानांवर आलेल्या त्याच्या आयुष्याच्या 'चित्तरकथे'मुळं! ती एकुलती एक कविता आणि त्याच्या कहाणीचे ते चार तुटके धागे एवढ्याच आधारावर त्याच्यावर काही लिहावं (आणि तेही आजच) असं मला का वाटावं? हा मलाही पडलेला एक प्रश्न आहे. पण मनाच्या मर्जीपुढं आपण कोण हो?–कुणी उर्दू कवीनं म्हणूनच ठेवलंय;

'मैं अपने आपको समझा लूँ
पर दिल को मनाना मुश्किल है'

–आयुष्यावर रेडियो सीलोनची मालकी होती त्या काळात 'ठोकर' ह्या चित्रपटातलं तलत महमुदचं गाणं एके दिवशी कानांवर आलं आणि तत्काळ मनावर गोंदवलं गेलं.– 'अय् ग़मेदिल् क्या करूँ अय् वहशते दिल क्या करूँ?' बहुतेक माणसं गाणं ऐकतात तेव्हां मुळात कविता ऐकत नसतातच. मग त्या 'गाण्याचा कवी कोण?' ही चौकशी दूरच! आता स्वत: गीतकार म्हणून काम सुरू केल्यावर ही गोष्ट फार जाणवते आणि डाचतेही; पण खरं सांगायचं तर श्रोत्याच्या भूमिकेत होतो तेव्हा आम्हीही कुणी वेगळे नव्हतो. त्यामुळं वरकरणी आमच्या लेखी कित्येक दिवस ती कविता हे केवळ तलत महमूदचं गाणं होतं. पुढं केव्हांतरी जाणवलं की, तलतच्या दर्दभऱ्या स्वराचा प्रभाव

वादातीत असला तरी काळजावर ओरखडे उमटवत होती ती त्या स्वरातून फुटून बाहेर पडणारी कविताच–

रास्ते में रुक के दम लूँ
यह मेरी आदत नहीं
लौटकर वापिस चला जाऊँ
मेरी फ़ितरत नहीं
और कोई हमनवाँ मिल जाये
यह किस्मत नहीं
अय् ग़मे दिल, क्या करूँ ?
अय् वहशते दिल क्या करूँ ?

मग एके दिवशी ज्ञान प्राप्त झालं की त्या कवितेच्या कवीचं नाव ' मजाज़ ! ' – हा तरुण कवी आणि त्याची ' आवारा ' नावाची कविता ह्यांना उर्दू साहित्यात फार मानतात, त्या ' आवारा ' नामक कवितेचं संक्षिप्त रूप म्हणजेच ' ठोकर ' मधलं तलतचं ते गाणं, ' अय् ग़मे दिल क्या करूँ ? '

' बेचैनी ' हा तसा उर्दू कवितेचा स्थायीभावच ! ' दर्दोग़म दिलकी तबीयत बन चुकी, अब यहाँ आरामही आराम है ' म्हणणारे शायर इथं ठेचेठेचेला, दुःख पांघरून निवांत पहुडलेले, सापडतील... पण तरीही– ' मजाज़ ' हा मामला काही वेगळाच ! एरवी, शायर आणि त्याची शायरी ह्या दोघांमध्ये सूक्ष्म का होईना पण अंधुकशी तरी रेषा दिसते. पण मजाज़चं आयुष्य आणि त्याची कविता ह्या दोन वेगळ्या गोष्टी नव्हेतच. एकाच अस्तित्वाची ती जणू केवळ दोन वेगळी नावं ! ह्या जाणिवेचं बोट पकडून शोधत निघालो कवितेच्या उगमस्थानाकडं...

अवधमधल्या ' रदौली ' ह्या कसब्यात १९०९ साली मजाज़चा जन्म झाला. शालेय शिक्षण संपवून आग्र्याच्या सेंट जोन्स कॉलेजात तो शिकू लागला आणि अलिगढ युनिव्हर्सिटीमधून बी. ए. झाला. ह्याच काळात जज्बी, फानी ह्या कवींच्या सहवासात तो आला आणि एका क्षणी कवितेनं ' मजाज़ ' नावाचं झाड घट्ट पकडलं. उभं आयुष्य ही एक चढती कमान बनली. तारुण्य होतं, मस्ती होती, कविता होती

आणि कवितेला हवं ते ते सारं होतं. मजाज़च्या कवितेवर आणि पर्यायानं त्याच्यावर पोरींच्या झुंडींच्या झुंडी अक्षरशः 'गतप्राण' व्हायच्या. त्याला न भेटलेल्या मुलीदेखील उशीखाली त्याच्या कवितांच्या डायऱ्या ठेवून झुरायच्या. मजाज़ मात्र आपल्याच मस्तीत होता. १९३६ मध्ये दिल्लीमधल्या 'आवाज' नावाच्या पत्रिकेचं संपादकपद तो भूषवू लागला आणि एका बेसावध क्षणी स्वत.च प्रेमात पडला.' बुरी तरह से' म्हणतात तसा फसला.– पण ती विवाहिता होती. शेवटी व्हायचं तेच झालं. ते अनावर चक्री वादळ सारं अस्तित्व झपाटून अखेर घोंगावत निघून गेलं आणि मागं उरला उध्वस्त, उन्मळलेला मजाज़ ! 'रुख्सत अय् दिल्ली, तेरी महफिल से अब जाता हूँ मैं' म्हणत मजाज़ माघारी फिरला. केवळ दिल्लीतून नाही, साऱ्या आयुष्यातून माघार घेत घेत निघाला.

आयुष्यावरची त्याची पकडच सुटली. चारचौघांप्रमाणं सुरक्षित जगू इच्छिणारा सावध माणूस आणि आत्मविनाशी मनस्वी कवी ह्या दोन व्यक्तिमत्त्वांची मजाज़च्या दुबळ्या देहात निकराची आणि निर्णायक झुंज सुरू झाली.

अशा परागंदा आणि पराभूत मुशाफिरांच्या वाटेवर एक खाई जबडा वासून सदैव उभीच असते–मद्याची ! ती सावजाला गोंजारत, चुचकारत बघता बघता घशाखाली उतरवते. त्या नागिणीचा जहरी विळखा मजाज़भोवती घट्ट आवळला गेला. त्याच्या काळजात एक जीवघेणी चिरंतन वेदना वस्तीला आली आणि तरीही हाताच्या बोटांत कवितेचा चिवट, रेशमी धागा गुंतलेलाच राहिला–

रात हँसहँस के यह कहती है
कि मयखाने में चल्
या किसी शहनाजे लाला रूख के
काशाने में चल्
यह नहीं मुमकिन, तो फिर
अय् दोस्त, वीराने में चल
अय् ग़मे दिल्, क्या करूँ ?......

पुढच्या १०-१२ वर्षांत तीन वेळा मजाज़ला 'नर्व्हस ब्रेक-डाऊन' चे झटके आले. रांचीच्या मेंटल हॉस्पिटलमध्ये रवानगी होण्या-पर्यंत पाळी आली आणि त्यातून पुन्हा पुन्हा तो निकरानं स्वतःला सावरत राहिला.

कलावंतावरचं तुमचं-आमचं प्रेम ही एक फार मजेदार गोष्ट आहे. जिव्हाळा, हेवा, मत्सर, क्रौर्य अशा अनेक धाग्यांनी ते विणलेलं असतं. आपण एकीकडे त्याच्या तालावर नाचतो तर दुसरीकडे आपल्या तालावर त्यालाही नाचवतो. आपण त्याच्यावर जीव टाकतो आणि त्याचा नकळत जीवही घेतो. तो आपलं प्राणसर्वस्व असतो आणि औट घटकेची करमणूकही असतो.

रोज रात्री शायर मजाज़ नव्या नव्या मैफिलीत ओढून नेला जायचा. कारण उध्वस्त आयुष्याच्या पार्श्वभूमीवरही त्याची कवी म्हणून प्रतिष्ठा किंचित्‌ही कमी न होता उलट अधिकच झळाळून उठली होती. त्या धुंद, बेहोश मैफिलींचा केंद्रबिंदू तोच असायचा. सुंदर स्त्रिया त्याच्याभोवती घुमत राहायच्या. उंची मद्य पोटात झिरपायचं. 'इर्शाद, इर्शाद' चा जल्लोष उसळायचा. बेभान मजाज़ तहानभूक हरपून कविता ऐकवीत राहायचा. तो शिखरावर पोचायचा, तेव्हा भोव-तालची मंडळी बेताबेतानं जमिनीवर यायची, हलके हलके काढता पाय घ्यायची आणि मग एक क्षणी सरत्या मध्यरात्री मजाज़ झगमगत्या शहराच्या सुनसान रस्त्यांवर एकटा, अगदी एकटा उरायचा.

यह रुपहली छाँव,
यह आकाश पर तारों का जाल
जैसे सूफी का तसव्वुर
या हो आशिक का खयाल
आह लेकिन कौन समझे,
कौन जाने जी का हाल
अय् ग़मे दिल् क्या करूँ ?
अय् वहशते दिल् क्या करूँ ?

—१९५५ साली, उत्तर हिंदुस्थानच्या हिवाळ्यातल्या अशाच

एका मध्यरात्री कराकरा दाढा खाणारी प्रचंड थंडीची लाट शहरावर चालून आली. रस्त्याकडेला दुकानाच्या फळीवर झोपलेल्या मजाज़वर तुटून पडली. 'आज की रात और बाकी है; कल तो जानाही है सफरपे मुझे' असं म्हणणारा मजाज़ खरोखरच त्या अज्ञात प्रवासाला निघून गेला. लौकिक जगाच्या सोपस्कारासाठी मागं केवळ काष्ठ झालेली कुडी उरली. आणि–

एक निनावी वेदना बेघर झाली.

## ॥ कविमित्रा... ॥

माझ्या कविमित्रा, खूप दिवसांपासून मनात घोळणारे विचार केव्हांतरी तुझ्यापाशी प्रकट करावे असं वाटत होतं. आज तो प्रयत्न करून बघणार आहे. तशी तुझी-माझी ओळख आहेही आणि नाहीही ! कारण मुळात तुला एक नाव नाही, एक रूप नाही, की एक गावही नाही. ज्या ज्या गावात जावं तिथं तू असतोसच. वेगवेगळ्या नावानं सामोरा येतोस, वेगवेगळी रूपं घेऊन भेटतोस. कधी कवितेच्या नादापायी आयुष्य खर्ची टाकून संभ्रमित अवस्थेत असतोस तर कधी कवितेच्या पायरीच्या नुसत्या स्पर्शानंही अंतर्बाह्य फुललेल्या कोवळ्या वयात दिसतोस. क्वचित् कविसंमेलनाच्या व्यासपीठावर कोपऱ्यात अवघडून बसलेला दिसतोस, तर बहुतेक वेळी समोरच्या श्रोतृसमुदायात धड ना निव्वळ श्रोता, ना निखळ कवी अशा त्रिशंकू अवस्थेत अस्वस्थपणे चुळबुळत असतोस. क्वचित् एखाद्या बेचव, निःसत्व मासिकाची पानं उलटत असताना–जाहिरातीतून बचावून राहिलेल्या एखाद्या काळ्या (!)चौकटीत अंग चोरून ताटकळणाऱ्या बापुडवाण्या कवितेत दिसतोस तर बहुतेक वेळा 'साभार परतीच्या बंद पाकिटातून घुसमटत घरी परतत असतोस– हे सगळं जाणीवपूर्वक आणि एका सुप्त अंतःस्फूर्तीनं तू करत असशील तर त्यावर काहीच म्हणायचं नाही; पण तसं दिसत नाही. प्रत्यक्षात दिसतं असं की, प्रवाहपतिताची हताश अगतिकता ह्या सगळ्या वागण्यात आहे. कळपात खाली मुंडी घालून पाय ओढीत जाणाऱ्या मेंढराचा प्रवास ह्या प्रवासाहून फारसा वेगळा नाही. तसं असेल तर मात्र थांबून तुझा तूच विचार करायला हवा. तुझ्या

विचारचक्राला हलकासा धक्का देणं एवढंच काम दुसऱ्याकडून होण्यासारखं आहे– माझ्या ह्या प्रयत्नाचा अर्थ आणि हेतू तेवढाच आहे.

कुणा दुढ्ढाचार्यांच्या किंवा विचारवंताच्या भूमिकेतून मी हे बोलतोय असं कृपया समजू नकोस. कारण तसल्या काही भाबड्या गैरसमजात मश्गूल असतो तर नको इतका ‘ सुखी ’ झालो असतो आणि मुळात असलं काही मुक्त चिंतन वगैरे करायच्या फंदातच पडलो नसतो. तेव्हा माझी भूमिका असलीच तर कवितेवर मनापासून प्रेम करणाराची आहे–‘ बस्स, इतकंच. ’

मला सांग, मुळात आपण कवितेकडं का वळतो ? –एकीकडं पाहावं तर नाटक, कादंबरी, कथा ह्या साऱ्या लोकप्रिय साहित्य प्रकारांच्या तुलनेत कवितेच्या वाट्याला उपेक्षाच जास्त ! आणि तरीही, कवितेच्या बारमाही सुगीला मात्र ‘ दुष्काळ ’ ठाऊकच नाही. सर्व-सामान्य माणसाला कवितेशी खरं म्हणजे काहीही ‘ घेणं ’ नाही आणि तरीही एखाद दुसरा अपवाद वगळता एका विशिष्ट वयात जवळजवळ प्रत्येकानं हा कविता करण्याचा ‘ गुन्हा ’ केलेलाच दिसतो– हे काय ‘ प्रकरण ’ आहे ?

मग असं लक्षात येतं की, कविता हा केवळ साहित्यप्रकार नाहीच मुळी ! ती एक माणसाची ‘ प्रवृत्ती ’ च आहे. –नादलयीची आणि छंदांची एक नैसर्गिक ओढ आपल्या रक्तातच आहे. त्या ओढीमुळंच, क्रौंचवध पाहून वाल्मिकीच्या काळजात उठलेली कळ ‘ मा निषाद ’ ह्या शब्दातून छंदरूप होते तर सर्वसामान्य फेरीवालाही खाद्यपदार्थांच्या जंत्रीला “ पूरीभाजी दो आना, चपातीभाजी दो आना, मिर्चिका भज्जा एक आना ऽऽ ” असा नकळतपणे छंदातच ओवून टाकतो. अनुभवातून येणाऱ्या साध्यासुध्या गद्य म्हणी किंवा सुभाषितांनाही कवितेची ऊब नकळतपणे मिळत राहाते, ती ह्या छंदाच्या ओढीमुळंच ! तेव्हा ही ओढ जिवंत आहे तोवर कविता आणि गाण्यांना मरण नाही. (मग भले आपण कवी म्हणून व्यवहारात उपाशी राहू.)

पण नाद लयीची किंवा छंदांची ही उर्मी, हा फक्त अगदी वरचा पापुद्रा झाला. त्या उर्मीतून जेव्हां एक विलक्षण लवचिक आणि

संवेदनाशील जिवंत मन सळसळत वाहू लागतं तेव्हा 'अभिजात कवी'चा जन्म होतो. मग कविता छंदात लिहिली आहे की, मुक्तछंदात? —हा प्रश्नच उरत नाही. एक तर केवळ मुक्तछंद कवितेला 'नवे'पण देऊ शकत नाही की, छंदामुळं कविता जुनाट ठरत नाही. —कारण मुळातच 'छंद' किंवा 'वृत्त' म्हणजे गणमात्रांचा हिशेब जमवता जमवता होणारी दमछाक नव्हे आणि मुक्तछंद म्हणजे छंदाचं अज्ञान लपवायची सोयीस्कर पळवाट नव्हे. उलट छंदाच्या रचनेत मुक्ततेची सहजता हवी तशीच मुक्तछंदातही लयीची एक स्वयंभू शिस्त हवीच हवी आणि त्यातून अखेर व्यक्त व्हायला हवं एक पारदर्शी व्यक्तिमत्त्व जे इतरांना त्यांचंच वाटेल पण तरीही खास स्वत:चंच असेल. 'ले-देके अपने पास फक़त इक नजर तो है। क्यूँ देखे जिंदगी को किसीकी नजर से हम?' हा साहीर लुधियानवीचा प्रश्न हे खरं पाहाता प्रत्येक कवीचं, किंबहुना कलाकाराचं, मनोगत आहे. ही 'नज़र' किंवा हा 'अंदाज' म्हणजेच प्रत्येक कवीचं स्वतंत्र 'कवीपण'!

एकदा हे स्वत:चं 'कवीपण' नीट उमगलं की भोवतालच्या कोलाहलातही स्वत:चा 'सूर' जपणं मुष्किल नाही. मग कुठल्याही दैवताला कौल लावायची वेळ येणार नाही. कुठल्याही पंथात किंवा दिंडीत सामील व्हायची गरज उरणार नाही. कुणी एखाद्या काव्य-प्रकाराचा झेंडा उचलला म्हणून त्या आंधळ्या कवायतीत आपणही शेंदाड शिपाई बनण्याची स्वत:चीच सक्ती स्वत:वर होणार नाही. कारण आपलंच मन आपल्याला सांगेल की शेवटी 'कविता' महत्त्वाची —मग ती 'गझल' असो, 'सुनीत' असो, ओवी, अभंग असो, की चित्रपटातलं भावगीत असो! कविता व्यक्तिगत आहे की सामाजिक जाणिवांची आहे, ह्यालाही तसा फारसा अर्थ नाही. कवितेची खरी अंतिम कसोटी एकच— कविता 'खरी' आहे की 'खोटी?'

आणि कविमित्रा हे लक्षात ठेव की अशा सच्च्या कवितेची जात-कुळी 'सुगंध आणि प्रकाश' ह्यांची असते. सुगंधाला किंवा प्रकाशाला जशी जाहिरातीची आणि वकिलीची गरज नसते तशीच जातिवंत कवितेलाही असू नये— किंबहुना नसतेच. आजच्या 'जाहिरातयुगा'त

माझं बोलणं फार मागासलेपणाचं वाटेल कदाचित् पण तरीही ते त्रिवार सत्य आहे, हे विसरू नको. –लौकिकाची किंवा प्रसिद्धीची ओढ वाटणं ह्यात वावगं काहीही नाही; पण कवितेसाठी शब्द जसे राजी-खुषीनं आपणहून यायला हवेत तशा ह्या गोष्टीही अधिकारसिद्ध लाभायला हव्यात. भीक मागून किंवा मखलाशी करून नव्हे आणि दैववशात् त्या मिळाल्या, ना मिळाल्या तरी त्याहूनही महत्त्वाची गोष्ट मानायला हवी ती म्हणजे कवीचं 'सत्त्व'! हे 'सत्त्व' इतर कुणाला कळो न कळो, पण निदान स्वत: कवीला कळायलाच हवं.

हे कळलं की मग कुठल्याच बाबतीत बुभुक्षित आशाळभूतपणा राहाणार नाही. मग आपल्या वाटणीची दाद खण्णकन् वाजवून हक्कानं घेता येऊ लागेल आणि दुसऱ्याला मन:पूर्वक दाद देताना आपलाही हात आखडणार नाही. मला सांग, तुला मला तरी याहून जास्त काय हवं ?

माझ्या निनावी कविमित्रा, माझं हे बेशिस्त अनाहूत बोलणं पटलं तर घे, नाही तर सोडून दे. कारण शेवटी स्वतंत्र आयुष्याचं बरं-वाईट दान स्वीकारत आपल्या वेगळ्या वाटा आपण आपापल्या पद्धतीनंच तुडवायच्या आहेत; पण तरी कवितेच्या ऋणानुबंधामुळं एक विसरून चालणार नाही–

'छोटीसी यह दुनिया
पहचाने रास्ते हैं,
कभी तो मिलेंगे
– तो पूछेंगे हाल'...

❋ ❋

## ॥ मध्यन्तर ॥

प्रिय संपादक,

मागचे एक दोन लेख द्यायला आलो तेव्हा तुम्हाला भेटावं अशी इच्छा होती; पण ते शक्य झालं नाही. कारण तुम्ही कुठं ना कुठं गेलेला होतात. तुमच्या सहकाऱ्यांशीही निवांतपणे विचारविनिमय करणं– इच्छा असूनही जमलं नाही. एकतर माझ्या धावपळीच्या आयुष्यात मी बहुधा मुदतीच्या शेवटच्या क्षणी– म्हणजे रात्री लेख आणून द्यायचो. तेव्हा ती मंडळी भेटणं कठीण! शिवाय तुमचा दैनिकाचा धबडगा पाहिल्यावर गप्पांमध्ये तुम्हा कुणाचा वेळ घेणं हे स्वतःचं स्वतःलाही पटायचं नाही. त्यामुळंच काहीशा अनपेक्षितपणे हे पत्र लिहावं लागतंय. ह्या अनपेक्षितपणाबद्दल प्रथमच 'क्षमस्व' म्हणतो.

बघता बघता १९८२ साल संपत आलं. उद्या वर्षाचं 'शेवटचं पान' उलटेल. एका अर्थी रोजनिशीचंही हे शेवटचं पान म्हणावं लागेल. 'निरंकुशाची रोजनिशी' लिहायला मी सुरुवात केली २९ एप्रिलला आणि सलग आठ-नऊ महिने खंड न पाडता ३५ लेख मी चक्क लिहिले. ह्यावर तुमच्याप्रमाणंच माझाही विश्वास बसत नाही आहे; पण हे 'कठोर सत्य' स्वीकारण्यावाचून आता गत्यंतर नाही. तेव्हां त्यानिमित्त थोडं सिंहावलोकन करायला हरकत नसावी.

तसे एकूण अस्मादिक भाग्यवानच! कुठलीही गोष्ट मनात तीव्रपणे जागी झाली की, कुणीतरी बटण दाबावं तशा दिशा अनुकूल होतात. वाटा पायाखाली पायघड्यांप्रमाणं स्वतःहून अंथरल्या जातात. (पैसा, स्थैर्य, प्रतिष्ठा ह्या बारीकसारीक बाबी सोडून) 'निरंकुशाची

रोजनिशी 'ही त्याला अपवाद नाही. यापूर्वी माझ्या लेखनाचा उत्साह कवितांपुरताच सीमित होता. लिहिलेली टिचभर कविता पुन्हा उतरवून काढणंही ज्याच्या जिवावर यायचं त्याच्याकडून इतर गद्य लेखन कुठलं व्हायला ? – पण गेले काही दिवस ही लिहिण्याची ऊर्मी वारंवार डोकं वर काढू पाहात होती. तिला कुठं बरं वाट करून द्यावी ? हा विचार मनात यायला आणि तुमचं 'आवातनं' यायला एकच गाठ पडली. न खाल्ल्या देवांना नैवेद्य दाखवत हिंडायची अस्मादिकांना सवय नाही आणि एकूणच सर्वत्र (तारतम्य बाळगूनच) पण 'जो भी प्यार से मिला हम उसीके हो लिये' हा खाक्या ! त्यामुळं तत्काळ मी तुम्हाला होकार देऊन टाकला. त्या एका बैठकीतच सदराचं नाव निश्चित केलं. शीर्षकासोबत सदैव नांदणाऱ्या कवितेच्या चार ओळी सुचल्या. एक सही लपेटून दिली आणि पाठोपाठ पहिला लेखही दिला.

॥ देवाय नमः ॥

'निरंकुशाची रोजनिशी' हे शीर्षक मुळात कसं सुचलं ? पार्श्वभूमी थोडी मजेदार आहे. मला 'पाळण्यातलं नाव' एकच आहे. आपलं पुत्ररत्न पुढं लोकांकडून बरीच नावं 'ठेवून' घेणार हा अंदाज तीर्थरूपांनी आधीच बांधला असावा; पण चांगल्या अर्थानंही तो खरा ठरला. –'राजा शिवछत्रपती' च्या वेळी हिंदी गीतकार योगेश, माझ्याच एका गाण्याच्या मुखड्यावरून मला 'माज्या समिंदरा' म्हणून हाकारायचा. 'हा खेळ सावल्यांचा'च्या दिवसांत हृदयनाथ मंगेशकरांनी मला 'गोवळकोंड्याचा कैदी' हे नाव बहाल केलं होतं. ह्याच पद्धतीवर– गजानन जागीरदार ऊर्फ 'पपा' मला नेहमी त्यांच्या उबदार स्वरात 'निरंकुश' ह्या नावानं पुकारतात. तेव्हां 'निरंकुशाची रोजनिशी' ह्या शीर्षकाचं श्रेय अर्धअधिक त्यांचं !

दर आठवड्याला नियमितपणे वृत्तपत्रामध्ये सदरं लिहिणं ही खायची गोष्ट नव्हे ह्याची जाणीव पुरेपूर होतीच. अनुभवान्ती ती अधिकच पक्की झाली. तेंडुलकरांची 'कोवळी उन्हं' हा ह्या बाबतीतला 'लँडमार्क', व्यंकटेश माडगूळकराचं 'पांढऱ्यावरती काळे', आणि रवींद्र पिंग्यांची 'माणूस' मधली शतपावली– हे सारं मी त्या त्या

वेळी आवडीनं वाचलं होतं. (अलिकडच्या काळात आवडलेलं लेखन म्हणजे विजया राजाध्यक्षांचं 'अवती-भवती'! ) इतर भल्या भल्या मंडळींनी सदर चालवण्याचे केलेले फोल प्रयत्नही पाहिले होते. ह्या साऱ्या पार्श्वभूमीवर 'आपलं काय होणार?' ही चिंता सदर सुरू करताना वाटणं साहजिक होतं. पण ती तेवढ्यापुरतीच! पहिल्या दोन लेखांनंतर जी 'धुन' लागली ती लागलीच! एकतर 'ले-देके अपने पास फक़त इक नजर तो है' ही जाणीव पुरेपूर आल्यावरच मुळात लिहायला उद्युक्त झालो होतो. त्यामुळं दुसऱ्या कुणाच्याच यशापयशाचं ओझं वाहायचं आपल्याला कारण नाही, एवढी खूणगाठ मनाशी पक्की झाली होती.

सदराचं 'प्लॅनिंग' वगैरे मुळीच केलं नाही. म्हणजे प्रथम काही संकल्पित विषय म्हणून कागदावर नोंदवून पाहिले; पण प्रत्यक्ष प्रवास फारच स्वयंस्फूर्तीनं झाला. लेखनात एकच पथ्य कटाक्षानं पाळलं– आरपार मनःपूर्वकता, मग तिच्या पोटी एक सच्चेपणा असतोच. त्यामुळं लेखन कधी जमलं असेल, कधी फसलं असेल, कधी पसरट झालं असेल तर कधी फार वैयक्तिक कदाचित् वाटलं असेल– पण एकाही लेखात 'पाटी टाकली नाही' हे नक्की! एखाद-दुसरा अपवाद वगळता नैमित्तिक किंवा प्रासंगिक शक्यतो लिहिलं नाही. लिहिलं तेव्हांही त्यापलिकडं जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. लेखनाचा बाज काहीसा ललित निबंधांचा ठेवला.

वाचकाचा प्रतिसाद ह्या बाबतीत माझी भूमिका बेपर्वा नसली तरी काहीशी उदासीन होती हे मान्य करायला हवं. वाचनातला साक्षेप आणि एकूणच पोच देण्याचा उत्साह ह्या गोष्टी आपल्या वाचकांत फार दुर्मिळ आहेत अशी माझी समजूत होती. (त्या बाबतीत वाचक म्हणून स्वतःलाही मी वेगळा काढत नाही आहे.) पण प्रत्यक्षात आलेला अनुभव सुखद अपेक्षाभंग करणारा ठरला. चोखंदळ जाणकारांपासून सर्वसामान्य वाचकांपर्यंत अनेकांच्या प्रतिक्रिया मला ह्या काळात अनाहूतपणे कळत राहिल्या. माझा लिहिण्याचा हुरूप वाढवत राहिल्या; पण त्या साऱ्या प्रतिक्रियांचा आदर करूनही मी लिहिताना मात्र

कसोशी केली ती स्वतःच्या लेखन तंद्रीशीच केवळ इमान राखायची. त्याच भूमिकेतून मग जन्मस्थानाचं मन जाणून घ्यायचा प्रयत्न केला. मृत्युशय्येवर असलेल्या पी. आर. शिंदे सरकारांचं मित्रऋण अंशतः फेडण्यासाठी धडपडलो. 'सरकार' ह्या लेखाद्वारे आपलं मन शेवटी त्यांच्यापर्यंत पोचू शकलं आणि त्यांच्यावर मृत्युलेख लिहिण्याचा प्रसंग न यावा इतपत तो लेख वेळच्या वेळी लिहिला गेला हे एक भाग्यच मानावं लागेल. मुनीर हुसेन, मजाज़, जब्बार, स्मिता, शंवाकि, देवेंद्र गोयल अशा ज्ञात–अज्ञात व्यक्तिमत्त्वांचा मागोवा घेतला. 'एक आषाढ शब्दांचा', 'लय', 'स्वतंत्रते भगवती', 'मुहूर्ताचं गाणं' यातून निर्मिती प्रक्रियेकडे काही अंतरावरून तटस्थपणे नजर टाकली. कधी किस्से सांगितले– कधी हलकंफुलकं चिंतन केलं. एकूण काय तर– 'रात्र जागवत राहिलो.'

तसे विषय अजून संपले नाहीत. कधीच संपणारही नाहीत कारण 'जगणं' चालूच आहे.

लहानपणापासून बरेच मोठे होईपर्यंत आम्ही भावंडं रोज दिवेलागणीला स्तोत्रं, परवचा (बापरे!) वगैरे म्हणायचो. त्यात माझ्या वडलांची एक स्वरचित अप्रतीम प्रार्थना असायची. रोज पोपटपंचीसारखी ती म्हणता म्हणता नकळत त्यातली एक ओळ साऱ्या आयुष्याची बैठक बनली. तेव्हा ते कळलं नाही; पण आज जाणवतं. ती ओळ म्हणजे 'प्रेय ते श्रेयही व्हावे!' प्रेय आणि श्रेय ह्यांचा मेळ घडवण्याच्या ह्या उद्योगात आजवरचं आयुष्य दवळून गेलं. बघता बघता पुढचंही जाईल. तेव्हां विषयांना काय तोटा?–पण तरीही आज थोडं थांबावं असं वाटतंय.

एक तर नवी नवी वळणं सामोरी येताहेत तेव्हां क्षणभर थांबून अंदाज घ्यायला हवा. शिवाय कुठंच सांकेतिकतेच्या चौकटी पडेतोवर रेंगाळलो नाही. मग इथं तरी का रेंगाळायचं?

मात्र एक नक्की–<br>
हे थांबणं हा केवळ अर्धविराम आहे,<br>
पूर्णविराम नाही.

मध्यन्तर

कारण

'निरंकुशाच्या रोजनिशी'नं अशा एका अनोख्या आनंदाची ओळख करून दिली आहे, ज्या आनंदाला पारखं होणं मलाच आवडणार नाही.

असं एक 'व्यसन' जडवून दिलं आहे की त्या व्यसनापासून सुटका झालेली माझी मलाच चालणार नाही.

पण तरीही—

ह्या क्षणी ही श्वासाची उसंत घ्यायलाच हवी.

वाटल्यास आपण त्याला तुमचं 'फेवरिट' नाव देऊ,

— 'मध्यन्तर'

कळावे, लोभ असावा.

तुमचा

* *

REFBK-0024726

शाखा (स्थळ प्रत)